Your Posts 2024

लौकरच येतील माझी खालील पुस्तके --

१. नाणेफेक आणि इतर पाच नाटके

२. ओळख परेड ( एकांकिका संग्रह )

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ' रंगवाचा ' प्रसिद्ध झाला याची फारशी कुणी दखल घेऊ नये, हे इथल्या सांस्कृतिक पर्यावरणाला धरूनच आहे !

भटकी कुत्री

माणसे काही एकमेकांवर प्रेम करू शकत नाहीत हे आता सर्वांनाच माहीत झालेले असून मान्यही झालेले आहे. आणि हार्ट पेशंटना तर प्रेमाची औषधी गरज असते ! हे ओळखून डॉक्टर्सच त्यांना एखादे कुत्रे पाळायचा सल्ला देतात. त्याच्याकडून माणसाला प्रेम, आदर, मोठेपणा आणि जणू काही एखादा जाणता राजा असल्याप्रमाणे ट्रीटमेंट ( उपचार या अर्थीही ) मिळू शकते हे निश्चित असते. ते सगळे ठीक आहे. पण कुत्रे या प्राण्याची दुसरी एक भयानक बाजू मात्र नेहमीच दुर्लक्षित होत आलेली आहे. ती म्हणजे भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या, त्यांच्या पाठलागांमुळे घडणारे अपघात आणि त्यांच्या आक्रमकतेपासून असणारा धोका. विशेषत: लहान मुलांना तर ते फारच धोकादायक असते. अलीकडेच असे ऐकले की एक स्त्री तिच्या लहान मुलाला घेऊन चाललेली असताना एका कुत्र्याने त्या लहान मुलावर हल्ला केला. त्या स्त्रीने लगेच त्या मुलाला उचलून कडेवर घेतले तर ते कुत्रे अधाशीपणे उड्या मारत त्या मुलाकडे झेपावत होते ! तो मुलगा आणि ती स्त्री कसेबसे वाचले. लहान मुलांवर होणाऱ्या भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांच्या बातम्या वारंवार येत असतात. काही वेळी तर मुले मृत्यूमुखीही पडतात.

यावर उपाय म्हणून त्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण करावे असा एक माणुसकीचा उपाय काढला जातो. ते काही फारसे घडताना दिसत नाही. एकाच डिझाईनची त्यांची प्रजाही वाढताना दिसते. ही समस्या सोडवण्याच्या आड सुप्रसिद्ध असा प्राणी संरक्षण अधिनियम येतो म्हणे ! अरे गाढवांनो, त्या कुत्र्यांचे करा रे रक्षण पण त्यांच्यापासून माणसांना धोका होता कामा नये, अशी काही उपाय योजना हजार वर्षांतही सुचू नाही शकत ? मुक्या प्राण्यांची काळजी घ्यावी यात दुमत नाही पण त्याचबरोबर माणसांचीही, विशेषत: लहान मुलांचीही काळजी घेतलीच पाहिजे, हे कळत नाही ? अशी उपाय योजना करण्याच्या आड कुठला कायदा येत असेल तर तो सत्वर बदलायला हवा. काही लोक त्यांच्यांत असणाऱ्या करुणेपोटी आणि ते आल्यावर ती कुत्री शेपूट हलवतात यातून मिळणाऱ्या प्रेमाच्या गरजेपोटी त्या कुत्र्यांना बिस्किटे वा इतर काही अन्नपदार्थ खाऊ घालतात. खरे तर तसे करण्याविरुद्धही कायदा आहे म्हणे !

कुणी असा उपाय सुचवला म्हणे की गायी, म्हशी, बैल यांचे जसे पांजरपोळ असतात तसे या भटक्या कुत्र्यांसाठीही करावेत. पण, त्यांना असे बंदिस्त तुरुंगात ठेवणे अमानुषपणाचे आणि क्रूरपणाचे होईल असे काहींना वाटते. त्यांना त्यांच्या नेहमीच्या अधिवासात जगण्याचा त्यांचा हक्क अबाधित ठेवला पाहिजे असे काही दयार्द्र बुद्धीचे लोक म्हणतात ! एवढ्या मोठ्या या भारत देशात, ही समस्या मिटवणारे कायदे कसे करावेत याचा सल्ला देऊ शकणारा एकही कायदे तज्ञ नाही ? अपात्रतेचे खटले दोन्ही बाजूंनी लढवणारे ग्रेट वकील, काय त्यांची दहा-वीस कोटींची फी

असेल ती देऊन त्यांना या कामाला लावणे निकडीचे आहे. हवे तर मंत्रिमंडळातल्या दहा-वीस लोकांनी या समस्येचा अभ्यास करण्यासाठी काही परदेशांना भेटीही देऊन यावे. या अशा माणुसकीच्या कामावर पैसे खर्च झाले तर जनता मुळीच तक्रार करणार नाही. ही समस्या सुटत नसल्यामुळे लोकांना रोज कोणत्या शिव्याशापांचा वापर करावा लागतो हे संबंधितांना माहीत नसेल ?

--- 000 ---

अनिल भागवत

हा माझा एक जवळचा मित्र आज गेला. आम्ही दोघेही सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे कर्मचारी म्हणून सेंट्रलाईटस. तसेच आणखी एक महत्त्वाचे म्हणजे तो माझ्या ' धागेदोरे ' या नाटकाचा नायक होता. खरे तर न-नायक ! त्या नाटकाची अनेक ठिकाणी परीक्षणे आली होती – त्यांतले एक होते मा.कृ. पारधी यांचे पूना हेराल्ड मध्ये आलेले इंग्रजी परीक्षण. त्यात त्यांनी म्हटले होते की हा मराठीतला पहिला अँटि-हीरो आहे ! तो खरोखरच उत्तम काम करायचा. तो थिएटर ॲकॅडेमीचा एक महत्त्वाचा नट होता. तसाच, पी डी ए चा एक महत्त्वाचा नट असलेला आमचा आमच्या बँकेतलाच एक सहकारी कै. विश्वास गद्रे हाही त्या नाटकात होता. विश्वास तसा साधा, सज्जन पण अनिल जरा टगेगिरी करायचा. विश्वासच्या तो अनेकदा फिरक्या घ्यायचा. त्या दोघांचे संवाद ऐकणे हा एक विशेष आनंद असायचा. अनिलने थिएटर ॲकॅडेमीच्या अनेक नाटकांतून कामे केली. एका टीव्हीपटात तो निळू फुल्यांबरोबरही होता. ' पक पक पकाक ' या चित्रपटात त्याने नाना पाटेकरांबरोबरही काम केले होते. बँकेचे जग हाताळणाऱ्या एका टीव्ही मालिकेत त्याने एक महत्त्वाची भूमिका केली होती. उत्तम नट आणि दिलखुलास मित्र ! आम्ही दोघेही एकमेकांना मध्येच कधीतरी निव्वळ आठवण आली म्हणून फोन करायचो. अलीकडे त्याला पायाचाही त्रास होता. तो फारसा बाहेर पडत नसे. पण सुमारे दोन महिन्यांपूर्वी आमचे एक निवृत्तांचे अधिवेशन झाले होते, तेव्हा आमच्याच एका सहकाऱ्याच्या मदतीने तो आला होता. तेव्हा आमचे बोलणे झाले होते.

त्याची एकच काय, अनेक स्मृती आहेत – त्या सर्व स्मृतींना सादर अभिवादन !

--- चं. प्र. देशपांडे.

--- ००० ---

आता इंग्रजीत –

Megha Herur is with Rita Bhatia and

Solid - The New Age Theater is thrilled to announce its next show, "Dhol Tashe," a co-production with Bay Area Drama Company.

The show will be staged at Pear Theatre in March [8th -17th] 2024.

Auditions on Nov 11 & 12.

Link for audition details Link: https://bit.ly/dhol-auditions

एका लेखकाच्या मनातली ॲब्सर्डिटी ---

( सिंहासनाधिष्ठित फोटो ).

Premanand Gajvee

खूप खूप जूना मित्र... चित्रकार सतीश नाईक...

लोकप्रभा..... साप्ताहिकात तो सहसंपादक होता...

काय गच्च होते ते दिवस... १९८० चा तो कालखंड.

'लोकप्रभा' चे एकांकिका विशेषांक प्रकाशित होतं असतानाचा तो काळ.... आणि तो काळ गाजवणारं नाव ....सतीश नाईक........आनंद नाडकर्णी, प्रकाश बुद्धीसागर, चंप्र देशपांडे, प्रेमानंद गज्वी अशा दिग्गजांच्या एकांकिका एकाच विशेषांकात..... आणि INT ची ती एकांकिका स्पर्धा म्हणजे लोकप्रभा विशेषांकाचीच स्पर्धा असे......

पार्टनर,देवनवरी, संसारानु पेंडधार ..... अशा कितीतरी एकांकिका.....ते एकांकिका विशेषांक.... आत्ता हाताशी नाहीत... नाही तर सगळ्या लेखकांची नावं मी इथं दिली असती...

हे सगळं आता इथं सांगतो कारण तो चित्रकार सतीश नाईक परवा (दि. १८/१/२०२४) भेटला दादर-माटूंगा DMCC त, डॉ.मीनाक्षी पाटील यांच्या 'उत्तर आधुनिकता आणि मराठी कविता' या प्रकाशन प्रसंगी....

कित्ती वर्षांनी.... तो काळ एकदम मेंदूत नाचू लागला... कडकडून मिठी भेट झाली... म्हटलं सतीश.... अरे कित्ती वर्षांनी भेटतोयस.... आणि एक सेल्फी काढली.....ती मिठी-ती भेट.... अजरामर असेल मेंदूत...

गिरीश रांगणेकर हा त्याच्या दोन मित्रांना बरोबर घेऊन काही वर्षांपूर्वी ' व्यक्त-अव्यक्त ' हे मासिक काढत असे. त्यात त्याने मला सल्लागार ही पोस्ट दिलेली होती. त्या मासिकात मी लिहीतही असे. तेव्हापासूनचा हा माझा मित्र आहे. शिवाय, हा एक मोठा माणूस आहे. अनेक टीव्ही वाहिन्या, सिंबायोसिस मध्ये विभागप्रमुख, टिळक महाराष्ट्र विद्यापीठात डीन, अशा जबाबदाऱ्या पार पाडण्याबरोबरच, अनेक जत्रा, प्रदर्शने आयोजित करणे, अनेक शॉर्ट फिल्म्स करणे आणि मुबलक परदेश प्रवास वगैरे खूप मसाला त्याच्या गाठीला आहे. आपली आपण पुस्तके प्रकाशित करायचे मी ठरवले तेव्हा मला लगेच याचीच आठवण झाली. तो नेहमीच या कामात मला साथ देत आलेला आहे. तो स्वत: एक उत्तम संपादक आणि एक हरहुन्नरी लेखक आहे. त्याच्यामुळेच मला आवश्यक त्या व्यक्ती, तंत्रज्ञ, चित्रकार हे मिळत आलेले आहेत. या चित्रातला तीसरा आदमी सुशील शिरसाठ हाही गिरीशमुळेच माझा मित्र झालेला आहे. त्यालाही, परदेशातल्या व इथल्या अनेक जाहिरात कंपन्यांबरोबर काम करण्याचा अनुभव आहे. हा मुखपृष्ठ या विषयात जो भी मंगता है ते करून देतो. या दोघांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे संगीतप्रेम ! गिरीश गायक असून सुशील हा अनेक वाद्यांचा वादक आहे. त्यांचा एक संगीतसमूह असून ते जाहीर कार्यक्रमही सादर करतात. आणि माझे तर विचारूच नका ! लेखन आणि पुस्तक-प्रकाशन या कामांत मला ज्या ज्या गरजा निर्माण होतात त्यांची त्यांची पूर्तता करणारी माणसे आकाशातून येऊन माझ्यापुढे हजर होतात ! तर अशा आम्हा तिघांचा हा फोटो –

चंप्रंनी लिहिलेली असंख्य महत्वपूर्ण नाटके, दीर्घांक आणि एकांकिका यांना सध्या पुस्तकरूप मिळते आहे. प्रत्येक पुस्तक छापून आल्यावर आमची निवांत डिनर भेट अगदी ठरलेली असते. अश्या भेटींचे कधी फोटो काढले गेले नाहीत. मात्र कालची भेट त्याला अपवाद! म्हंटलं, पुस्तकाच्या नावाप्रमाणेच होऊन जाऊदे एकदम "खुल्लम खुल्ला"! सोबत माझा मित्र सुशील शिरसाट, ज्याने "खुल्लम खुल्ला" सह चंप्रंच्या "पाच ऍब्सर्ड नाटके" पुस्तकाचे देखील कव्हर डिझाईन केले आहे.

खरंतर सरांच्या या प्रकाशनाच्या, छपाईच्या कामात माझा सहभाग अगदी अल्पसा आहे. मात्र चंप्र सर त्यांच्या या पुस्तकांत अनेक मातब्बर मंडळींबरोबर माझे देखील आभार मानत आले आहेत आणि वर पुस्तक गरमा गरम छापून आल्यावर लगेचच्या भेटीत पुस्तकाची प्रत देखील सहीनिशी अगदी अगत्यपूर्वक भेट देत आले आहेत! आमची ही मोकळी ढाकळी भेट जणू वैचारिक मेजवानी असते. माणसाचं एकूण जगणं, मन, बुद्धी, विचारसरणी, कलेचा उपयोग अश्या असंख्य विषयांना कवेत (प्याल्यात?) घेत आमच्या गप्पा रंगत जातात. कालचीही भेट अर्थातच अपवाद नव्हती.  धन्यवाद चंप्र सर, आणखी एका यादगार मेहेफीलीसाठी! --- गिरीश रांगणेकर.

आरती प्रभू / चिं. त्र्यं. खानोलकर हे माझे आवडते कवी / लेखक ! त्यांच्या नावाचा पुरस्कार मिळणे याचा मला आनंद आहे ! --- ( आणि निमंत्रण पत्रिका ).

*आरती प्रभू पुरस्कार-२०२४*

बाबा वर्दम थिएटर्स ही कुडाळ (जि. सिंधुदुर्ग) येथील हौशी कलाकारांची नाटयसंस्था, कुडाळ येथील कै. बाबा वर्दम, के. वामनराव पाटणकर, कै. शंकरभाई वर्दम यांच्या प्रेरणेने व श्री. चंदू शिरसाट या प्रतिभावंत दिग्दर्शकाच्या मार्गदर्शनाखाली तसेच संस्थेच्या विद्यमान अध्यक्षा सौ. वर्षा वैद्य यांच्या नेतृत्वाखाली गेली ५२ वर्षे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात अग्रस्थानी आहे. कुडाळ मधीलच नामांकित शैक्षणिक संस्था क.म.शि.प्र. मंडळाने सन २०१३ मधे संस्थेच्या कुडाळ हायस्कूल, कुडाळ या प्रशालेचे माजी विद्यार्थी, प्रतिभावान साहित्यिक कै. चिं. त्र्यं. खानोलकर ऊर्फ आरती प्रभू यांच्या नावे आरती प्रभू कला अकादमी ही संस्था स्थापन केली. या संस्थेमार्फत नृत्य, नाट्य, संगीत याचे प्रशिक्षण दिले जाते. क.म.शि.प्र. मंडळाचे कार्याध्यक्ष मा.शशिकांत गावडे, आरती प्रभू कला अकादमीचे अध्यक्ष मा. श्री. भाईसाहेब तळेकर तसेच संस्थेचे सर कार्यवाह मा. श्री. आनंद वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली अकादमीची वाटचाल जोमाने सुरू आहे.

कै. चिं.त्र्यं. खानोलकर उर्फ आरती प्रभू हे कुडाळचे सुपुत्र. त्यांच्या लोकविलक्षण प्रतिभेबद्दल कुडाळच्या साहित्य, नाट्य व शैक्षणिक क्षेत्रात वावरणाऱ्या सर्वांना अतिशय आदर आहे. त्यांच्या स्मृती चिरंतन रहाव्यात याकरीता त्यांच्या नावाने कवी, कवयित्री आणि नाटककार यांना आरती प्रभु पुरस्कार दिला जातो.

बाबा वर्दम थिएटर्स, कुडाळ आणि आरती प्रभू कला अकादमी, कुडाळ या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हा आरती प्रभू पुरस्कार सन २०१३ पासून कविता आणि नाट्यलेखन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कवी किंवा नाटककारास दरवर्षी दिला जातो. रोख रु. ११,०००/-, स्मृतीचिन्ह, मानपत्र व शाल-श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

सन २०१३ सालचा पहिला पुरस्कार गोवा येथील प्रसिध्द कवी व नाटककार श्री. विष्णू सूर्या वाघ, सन २०१४ सालचा पुरस्कार पुणे येथील प्रसिध्द नाटककार श्री. सतीश आळेकर, सन २०१५ सालचा पुरस्कार मुंबई येथील प्रसिध्द नाटककार श्री. शफाअत खान, सन २०१६ सालचा पुरस्कार नागपूर येथील प्रसिध्द नाटककार श्री. महेश एलकुंचवार, सन २०१७ सालचा पुरस्कार मुंबई येथील प्रसिध्द नाटककार श्रीम. सई परांजपे, सन २०१८ सालचा पुरस्कार मुंबई येथील प्रसिध्द कवी डॉ. महेश केळूसकर, सन २०१९ सालचा पुरस्कार मुंबई येथील प्रसिध्द कवी श्री. किशोर कदम उर्फ सौमित्र, सन २०२१ सालचा पुरस्कार मुंबई येथील प्रसिध्द नाटककार श्री. प्रेमानंद गज्वी, सन २०२२ सालचा पुरस्कार प्रसिध्द कवी श्री. गुरु ठाकूर, सन २०२३ सालचा पुरस्कार पुणे येथील प्रसिध्द कवयित्री श्रीम. अरुणा ढेरे यांना प्रदान करण्यात आला.

*या वर्षीचा पुरस्कार पुणे येथील ज्येष्ठ नाटककार श्री. चं. प्र. देशपांडे यांना देण्यात येणार आहे. सदर पुरस्कार वितरण रविवार दिनांक ०४ फेब्रुवारी २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वा. एकनाथ ठाकूर सभागृह, संत राऊळ महाराज महाविद्यालय, कुडाळ येथे केले जाणार आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा सुप्रसिध्द दिग्दर्शक, अभिनेते डॉ. शरद भुताडिया यांच्या हस्ते तसेच बाबा वर्दम थिएटर्सचे संस्थापक श्री. चंदू शिरसाट व आरती प्रभु कला अकादमीचे अध्यक्ष श्री. अविनाश उर्फ भाईसाहेब तळेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व बाबा वर्दम थिएटर्सच्या अध्यक्षा सौ. वर्षा वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.*

या पुरस्कार वितरण सोहळ्याला सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन बाबा वर्दम थिएटर्सचे कार्यवाह श्री. केदार सामंत व आरती प्रभू कला अकादमीचे कार्यवाह श्री. आनंद वैद्य यांनी केले आहे.

तो राजहंस एक ( दीर्घांक )

ले ० दत्ता पाटील, दिग्द ० सचिन शिंदे,

निर्मिती ० सोशल नेटवर्किंग फोरम आणि परिवर्तन.

हे एक अप्रतिम, उत्तम नाटक काल पाहिले. दत्ता पाटील हे एक उत्तम लेखक आणि सचिन शिंदे हे एक उत्तम दिग्दर्शक असल्याचे मला माहीत होते कारण या द्वयीचे दोन दीर्घांक, ‘ हंडाभर चांदण्या ‘ आणि ‘ गढीवरच्या पोरी ‘ हे मी पूर्वी पाहिलेले होते. हाही दीर्घांक तसाच दर्जेदार म्हणावा असा होता.

याचे नाव जरा रोमँटिक होते पण, विषय-आशय परखड, लहान शेतकऱ्याच्या मुलाच्या समस्या हा होता. यातला नायक हा शेतकऱ्याचा मुलगा असून एम ए झालेला आहे. शेतीतले तुटपुंजे उत्पन्न, कर्जाचा बोजा, नोकरी नसणे आणि या सगळ्या परिस्थितीमुळे लग्नाच्या जगात मुलींकडून सारखे नकार येत जाणे, असे हे उजाड जगणे आहे. चौतीस नकारांनंतर तो पस्तीसाव्या नकाराच्या वेळी मात्र त्या मुलीशी बोलायचे ठरवतो. ते दृश्य, प्राजक्त देशमुख आणि ईशा संजय यांनी त्यातल्या सर्व गुंत्यासह प्रभावीपणे सादर केले. या नायकाचे लग्न होत नसल्याने तो आपल्या बायकोकडे ‘ वाईट ‘ नजरेने पाहतो, असा त्याच्या भावाला संशय आहे. नायकाच्या दु:खावर भयानक डागण्या देणारा हा प्रकार आहे. या सगळ्या प्रकारात त्याचा पब्या नावाचा मित्र मात्र त्याची साथ देत राहतो आहे. त्याची आई गेलेली असून वडील परिस्थितीने गांजलेले आहेत.

हा सुस्वभावी, साधा, सज्जन नायक कवीही आहे. त्याच्या दु:खी अनुभवातून येणाऱ्या कविता तो लिहितो. “ कविता लिहून काही नाही होत “ हे पालुपद तो अनेकदा उच्चारतो. विशेष म्हणजे त्याच्या कवितांतून हत्ती, राजहंस – अशा प्रतिमा येतात. हत्ती नसला की त्याच्या त्या रिकाम्या जागेत आपण आपला हत्ती तयार करायचा, असे काही तो बोलतो. आपल्या भूतकाळाने आपण आपला वर्तमानकाळ भरून टाकतो – असे सखोल म्हणावे असेही त्याला काही सुचते. तो एक संवेदनशील आणि चिंतनशीलही असा एक कवी आहे. कविता लिहून काही होत नाही असे म्हणणाऱ्या या कवीला आपल्या हातून जागतिक दर्जाचे काही लिहून होत नाही याची खंत आहे आणि त्या बाबतीत तो निराशावादीही आहे. इतके दु:ख असूनही त्यातून जागतिक महत्त्वाचे असे का नाही काही निर्माण होत, असा एक प्रश्न हे नाटक समोर आणते. इथे शेतकऱ्याने आत्महत्या करण्या ऐवजी त्याच्या मुलाने या विचित्र समस्यायुक्त परिस्थितीने आत्महत्या करण्याची शक्यता व्यक्त होते. “ आत्महत्या करायची तर मागे ठेवायच्या चिठ्ठीतला मजकूर एकाच पानात मावला पाहिजे, अशी पद्धत आहे “ असे उपरोधिक वाक्य तो बोलतो.

दत्ता पाटील या अलीकडच्या काळातील सशक्त लेखकाने हे नाटक म्हणजे नुसतीच एक विद्रोही, परिवर्तनवादी प्रतिक्रिया म्हणून लिहिलेले नसून या समस्येचे सर्वांगीण भान व्यक्त करणे, हा व्यापक आवाका घेतलेला आहे. त्यामुळे हे एक ‘ वेगळे ‘ नाटक ठरते. अर्धवट, अपूर्ण वाक्यांचे संवाद, काही रोमँटिक वा अतिवास्तववादी कविता यांच्या योगाने त्यांनी या संहितेला एक व्यापक परिमाण दिलेले आहे. या सशक्त संहितेला रंगमंचावर सादर करण्यात दिग्दर्शक सचिन शिंदेही तोडीस तोड यशस्वी झालेले आहेत. ही जोडगोळी मराठीत अशा अनेक उत्तमोत्तम कलाकृती सादर करत राहील, यात शंका वाटत नाही.

विशेष उल्लेख केला पाहिजे तो म्हणजे प्राजक्त देशमुखचा. या नाटकातली त्याची नायकाची भूमिका खूपच आव्हानात्मक होती. साधारणत: भरकटण्याच्या काठावर असलेला पण तरीही बराचसा नीट असलेला असा हा नायक उभा करणे सोपे नाही. हालचाली, विराम, आवाजातले चढ-उतार यांचे खूपच वैविध्य प्राजक्तने दाखवले. हा अभिनयातला सूक्ष्मपणा इतका आहे की तो प्रत्येक प्रयोगात वेगळाच असणे भाग आहे. प्रत्येक वेळी नव्याने सादर करायची ही भूमिका आहे. प्राजक्त हा एक मराठीला मिळालेला खूपच आश्वासक, चिंतनशील नट आहे, असे मला वाटते.

साधेसे नेपथ्य, पुरेसे संगीत, प्रकाशयोजना – हे सर्व उत्तम ! सर्व टीमचे खूप खूप अभिनंदन !

--- ००० ---

कै. चिं. त्र्यं. खानोलकर यांनी त्यांची ' त्रिशंकू ' ही कादंबरी मला सप्रेम भेट दिली होती -- त्याचा हा फोटो –

माझ्या ' मन ' या दीर्घांकाच्या बाबतीत आपल्या परिनिरीक्षण मंडळाचे एक पत्र आलेले असून, त्यांनी त्या संहितेतल्या शिव्या वगळायला सांगितले आहे. त्याला मी दिलेले उत्तर खालीलप्रमाणे आहे --

सप्रेम नमस्कार.

' मन ' या मी लिहिलेल्या दीर्घांकातल्या शिव्या -- भिकारचोट, भडव्या, भडवे --

या वगळण्याबाबतचे आपले पत्र पोचले.

मला ही सूचना मुळीच मान्य नाही. नुसतेच संदर्भहीन शिव्यांचे शब्द
पाहून ते वगळायला सांगणे हे पूर्णपणे चुकीचे आहे. त्या संहितेत, त्या त्या ठिकाणी
त्या शिव्या, ते शब्द आवश्यक वा योग्य आहेत की नाहीत ते पाहिले जायला हवे.
तरीही, या कारणामुळे तुमचे प्रमाणपत्र मिळणार नाही -- ही बाब -- हा विषय
मी नाट्यकर्मींच्या व इतरांच्या चर्चेसाठी जाहीर करत आहे.
कळावे.
आपला,
चं. प्र. देशपांडे.
पुणे, दिनांक -- ३१-०१-२०२४.

सन्मान आणि भाषणाची बातमी –

मुंबई विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाचे संचालक योगेश सोमण, आरती प्रभू कला अकादमीचे अध्यक्ष अविनाश ऊर्फ भाऊसाहेब तळेकर, डॉ. शरद भुताडिया, मी, बाबा वर्दम थिएटर्स च्या अध्यक्षा सौ. वर्षा वैद्य, बाबा वर्दम थिएटर्स चे संस्थापक चंदू शिरसाट --- पुरस्कार वितरण सोहळा, दिनांक -- ०४-०२-२०२४. ( फोटो ).

पावन खिंडीच्या विजय स्तंभाजवळ – ( फोटो ).

कोंडुऱ्याच्या समुद्रकिनाऱ्यावर – ( फोटो ).

Dhol Tashe - Cast Introduction
Solid -  The New Age Theater presents Dhol Tashe in collaboration with Bay Area Drama Company
Tickets at www.badco.art/tickets
Roshni DattaPrathyay BhandarkarKrishna DasVaishnavi SridharRita BhatiaChampra Deshpande Sandeep K Belliappa

सूर्यवादळे
एका हिंदी वाहिनीवर अशी बातमी चालू आहे की सूर्याचे उत्तर ध्रुव आणि दक्षिण ध्रुव यांत उलटापालट होत असून येत्या काही महिन्यांतच ही घटना घडणार आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर सूर्यवादळे निर्माण होणार असून त्यांत पृथ्वी भाजून निघण्याचा धोका आहे !
या एवढ्या मोठ्या बातमीचा इतर वाहिन्यांना काही पत्ताच नाही !

कशाला आता त्या निवडणुका आणि ते राडे आणि ते एकमेकांच्या द्वेषांत जळणे ? मस्तपैकी सगळे डबे घेऊन जाऊ ट्रिपला आणि म्हणू गाणी ' तेरा नाम रहेगा रोशन -- '

--- ००० ---

माझ्या मित्रयादीत काँग्रेसी, समाजवादी, साम्यवादी, वंचितवादी, हिंदुत्ववादी अशा सर्व प्रकारच्या व्यक्ती आहेत आणि नेहमीच असणार !

माझ्या ' लाईक ' चा अर्थ -- पाहिले, वाचले, दखल घेतली -- असा असतो. त्याचा अर्थ आवडले वा पटले -- असा असेलच, असे नाही.

" देव देश अन धर्मासाठी
( आणि आता धर्मनिरपेक्षतेसाठी )
प्राण घेतलं हाती ! "

" आता मीही तिकडे चाललोय. असे होत असते. काही फरक पडणार नाही. इकडे सर्व मजबूत आहे. जनताच मला धडा शिकवील ! "

इंग्रजीत ' ढोलताशे ' आता अमेरिकेत – ( अनेक फोटो ).

प्रचारसूत्रे

हातातून सत्ता गेल्याने ब्राह्मण अस्वस्थ होते, त्यातून विष्णुदास भाव्यांनी ‘ सीतास्वयंवर ‘ हे नाटक लिहिले – असली विश्लेषणे मला पटत नाहीत. त्याच चालीवर मग असे म्हणता येते की राजकारणातून हकालपट्टी झाल्याने इथल्या डाव्यांनी कला व संस्कृतीची क्षेत्रे काबीज केली. तर हीच काय, कुठल्याही विश्लेषणांतून सत्याचा प्रकाश सापडतो असे मला वाटत नाही. आपापल्या मतांना पुष्टी देणारे तपशील जमवून विश्लेषणे केली जातात आणि ती सत्य म्हणून खपवली जातात, असेच मला वाटते. हे लक्षात घेऊन या निरर्थक अंगणात आपणही पाहावे खेळून असे वाटल्याने हे लिहीत आहे.

स्वातंत्र्य लढ्याच्या वेळेस काँग्रेसपुढे, स्वातंत्र्य मिळवणे आणि परदेशी शक्तींपासून रक्षण या दोन गोष्टी होत्या. तीच त्यांची प्रचारसूत्रे होती. स्वातंत्र्यानंतर ती पुण्याई आणि देशाची प्रगती ही प्रचारसूत्रे उपयोगी पडत गेली. जातीय आणि धार्मिक समीकरणे काँग्रेसने पायाभूत मानली नाहीत. त्या गणितांचा निवडणुकांत वापर केला पण संघटनेचा तो आधार मानला नाही. स्वातंत्र्याचे समावेशक प्रचारसूत्र हळूहळू नष्ट होत गेले आणि वातावरणात इतर प्रचारसूत्रे पुढे येऊ लागली. समाजवाद, साम्यवाद, हिंदुत्ववाद हे आपला अवकाश शोधू लागले. सध्या काँग्रेसकडे कोणतेही प्रचारसूत्र नाही असे दिसते. त्यामुळे, विस्कळितपणे काही बोलत राहणे त्यांना भाग पडते आहे. एखाद्या खेड्यातल्या

आजाऱ्यासाठी आपण काही करतो आहे असे ' वाटून घेण्यासाठी ' कुठेतरी लांब जाऊन अंगारा आणला जातो, तसेच त्यांच्या यात्रांचे स्वरूप दिसते आहे. ठोस असे समोर काही नाही आहे.

भाजपाचा हिंदुत्वाचा अजेंडा, आपल्या धर्माची भूमी शाबूत ठेवणे आणि इतर धर्मियांच्या संभाव्य वर्चस्वापासून रक्षण होणे या मजबूत पायावर फोफावत गेला. या प्रकारात इतर पक्ष धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व प्रचाराला फार वापरतात असे दिसताच त्यांनी युक्ती केली. हिंदुत्ववाद आचरणात ठेवला पण बोलण्यात कमी केला. बोलण्यात विकासाचा अजेंडा मोठा केला. धोरणात धर्मभेद  ठेवला नाही आणि ' सबका साथ सबका विकास ' हे सूत्र ठेवले. ते समावेशक होते आणि राष्ट्रवादाच्या त्यांच्या प्रचारसूत्राला बढावा देणारेही होते. त्यामुळे संघटन वाढणे आणि मजबूत होणे ही प्रक्रिया चालू राहिली.

महाराष्ट्रात तरी काही पक्ष जातीचा पाया महत्त्वाचा मानून उभे राहिले. त्यासाठी ब्राम्हणाला शत्रू म्हणून दाखवत राहणे त्यांना आवश्यक होते. पुढे ब्राह्मण तर सामाजिक, राजकीय वा आर्थिक कोणत्याच दृष्टीने प्रभावी राहिला नाही. त्यामुळे त्या जातीय पायाची गरज संपत गेली वा गैरवाजवी ठरत गेली. ओबीसी आणि मराठा असे शत्रुत्व मानणे दोघांनाही पेलणारे नव्हते आणि नाही. दुसरा मुद्दा, धर्मभेद नको, हा. त्यात, धोरणात्मक स्तरावर सत्य फारसे दाखवता न आल्याने त्यातलीही हवा गेली. एकूणच प्रादेशिकपणाचे छोटे स्वरूप येत गेले.

महाराष्ट्रात ब्राम्हणांना लाथा न घालणारे, सन्मानाने जगू देणारे कोण होते तर काँग्रेस, शिवसेना, भाजपा आणि नंतर मनसे. ब्राह्मण मतदार अर्थातच या पक्षांत विभागाला गेला. शिवाय, त्याला एक गठ्ठा अस्तित्व असे नव्हतेच. या प्रकारात शिवसेनेने भाजपाची साथ सोडल्याने बदल झाले. काँग्रेस-राष्ट्रवादी बरोबर गेल्याने त्यांचे हिंदुत्व विरत गेले. मग, आमचेच हिंदुत्व ग्रेट, भाजपाचे खोटे असे म्हणत राहणे त्यांना भाग पडत गेले. त्यांचे ' मराठी ' चा कैवारी असणे तर कधीच मागे पडले होते. त्यामुळे, सध्या उबाठाकडे कोणतेही प्रचारसूत्रच नाही, अशी अवस्था आहे. उबाठाची आणि काँग्रेसची अवस्था या बाबतीत समान आहे ! प्रचारसूत्राचा अभाव ! देश आणि धर्म असे एखादे मजबूत प्रचारसूत्र यांना उभे करता आले नाही तर हळूहळू त्यांची स्थिती अधिकाधिक अवघड होत जाईल, हे स्पष्ट आहे.

भारतात उभे करता येणारे असे एक मोठे प्रचारसूत्र म्हणजे ' शेतकरी ' हे आहे. पण ते विविध पक्षांत, विविध नेतृत्वांच्या प्रभावाखाली आहे. ते एक गठ्ठा उभे राहणे अवघड आहे.

भाजपाची मजबूत प्रचारसूत्रे पराभूत करता येतील असे काही शोधून काढणारे प्रतिभाशाली नेतृत्व सध्या तरी कुणी दिसत नाही. त्यामुळे, भाजपा अर्थातच निश्चिंत आहे.

सारांश, विश्लेषणे सगळी निरर्थक असतात, तसेच हेही आहे. मला तर या राजकीय खेळांत फारसे इंटरेस्टच नसल्याने मी त्यातला कवडीचाही अभ्यास करत नाही. विश्लेषणे अभ्यासपूर्ण असोत की ही अशी अभ्यासहीन – सगळी सारखीच असतात, हे त्यातले सत्य पाहावे, ही नम्र विनंती.

--- चं. प्र. देशपांडे.

--- ००० ---

Megha Herur

Solid -  The New Age Theater in collaboration with Bay Area Drama Company invites you to our upcoming play Dhole Tashe  by Champra Deshpande.

Tickets : www.badco.art/tickets

We have 6 shows :

March 8th : 8:00 p.m, PST

March 9th : 2:00 p.m, PST

March 10th : 2:00 p.m, PST

March 14th : 8:00 p.m, PST

March 15th : 8:00 p.m, PST

March 16th : 2:00 p.m, PST

Roshni DattaPrathyay BhandarkarKrishna DasAshwini VishwanathMugdha ManerkarVaishnavi SridharRita Bhatia

#DholeTashe #solidtheaterplays

कोट्यवधी भारतीयांचा प्यारा आवाज -- अमिन सायानी ! बिनाका गीतमाला ऐकणे हे आमचे बुधवार-व्रत होते ! सादरीकरणातले अजब नाट्य ! सलाम !!!

इंग्रजी ' ढोलताशे ' ची झांकी --

Our team is all geared up to entertain you all.

Did you get your tickets : www.badco.art/tickets

March 8 th to March 16 th

Play: Dhol Tashe

Location: The Pear Theatre , mountain view

Playwright: Champra Deshpande

Team Dhole Tashe Solid -  The New Age Theater

Bay Area Drama Company Krishna Das Prathyay Bhandarkar Sandeep K Belliappa Vaishnavi Sridhar Mugdha Manerkar Roshni Datta Rita Bhatia

अनेक क्षेत्रांत असे दर्जेदार काम करत आलेली व्यक्ती विरळाच !

( हा आहे माझा जुना मित्र गिरीश -- )

( गिरीशच्या मुलाखतीचा व्हिडिओ )

एकाच वेळी मराठीत ( पुणे ) आणि इंग्रजीत ( अमेरिका )

वाजणारे --- ( ढोलताशे )

Set building for upcoming English play Dhole Tashe is going on in full swing.

Did you get your tickets : www.badco.art/tickets.

Solid - The New Age Theater Bay Area Drama Company Rita Bhatia Vaishnavi Sridhar Sandeep K Belliappa Prathyay Bhandarkar Roshni Datta Mugdha Manerkar Krishna Das

आता माझी खालील पुस्तके ---

१ चार पुरुषार्थांची चार नाटके

२ वस्तू आणि इतर सहा दीर्घांक

३ पाच अब्सर्ड नाटके

४ खुल्लम खुल्ला ( एकांकिका संग्रह )

५ आवर्तने ( कविता-आशय-आकलन )

पुढील ठिकाणीही उपलब्ध आहेत ---

पुस्तकवाला अँड कंपनी,

पुणे.

फोन -- ८६२४९७७०२९.

आणि

परेश एजन्सी,

अप्पा बळवंत चौक,

पुणे.

फोन -- ८२७५४८५४८५ .

इच्छुकांनी जरूर लाभ घ्यावा.

पेसोआच्या कविता

अनुवाद ० महेश्वर लव्हेकर, प्र ० वर्णमुद्रा पब्लिशर्स

पेसोआ जसा लव्हेकरांचा आवडता कवी आहे तसाच माझाही. त्यामुळे, हे पुस्तक मी खूपच आत्मीयतेने वाचले. प्रख्यात लेखक आणि २००० सालचा नोबेल विजेता, गाओ झिंगझिआन, त्याच्या भाषणात पेसोआबद्दल म्हणाला होता --

“ Fernando Pessoa the most profound poet of the twentieth century “

विसाव्या शतकातला ‘ सर्वांत सखोल आणि गहन कवी ‘ ! तसे तर सखोल आणि गहन हे शब्द बऱ्यापैकी वापरात असतातच. पण, काय असावा या शब्दांचा अर्थ ? आणि एवढे असून असून काय असणार आहे ? आपल्याकडे जसे आपापल्या टोळीतल्या कवीला आपण ग्रेट म्हणतो तसलेच असेल काही. एखादे भयानक, वेदनादायक दु:ख असू शकेल. तशा दु:खाचा अनुभव नीट व्यक्त झाला की सखोल होणारच ती कविता. नास्तिक, बुद्धिप्रामाण्यवादी, पुरोगामी ( हे विशेष हुशार लोक ), तसेच, हिंदुत्ववादी, परिवर्तनवादी, स्त्रीवादी, आधुनिकतावादी, उत्तर-आधुनिकतावादी, स्वच्छंदतावादी, वगैरे सर्वांना हेच वाटेल की सखोल म्हणजे दु:खच असणार ! दारिद्र्याचे असेल किंवा वंचिततेचे असेल किंवा अन्याय सहन करावा लागण्याचे असेल. --- तर हे असे सर्वसामान्य अंदाज ! पण, पेसोआची कविता असल्या प्रकारची ‘ सखोल ‘ नाही. मुळात या कवितेला दु:खाची कविताच म्हणता येणार नाही. हे समजूनच संदीप देशपांडे यांनी मुखपृष्ठ केलेले आहे. हे चित्र ‘ दु:खभावी ‘ नाही. ही सखोलता वेगळी आहे – खुल्या मनाने पाहावी लागेल.

मी चिंता करत नाही यमक जुळेल का नाही याची.
क्वचितच साम्य असतं एकमेकांलगतच्या दोन वृक्षांत.
जसा फुलांना रंग असतो तसाच मी करतो विचार आणि लिखाणही.
पण परिपूर्ण नसतं माझं स्वत:ला व्यक्त करणं,
कारण अभाव आहे माझ्यात दैवी साधेपणाचा,
बाह्यांग हेच एकमेव अंग असण्याचा.
मी पाहतो आणि हलतो आतून,
उताराच्या दिशेने पाणी वाहत जावं तसा.
आणि वाहत्या वाऱ्यासारखंच नैसर्गिक आहे माझं काव्य ...

दु:ख जसे स्थितिशील असते तशी ही कविता स्थितिशील नाही. अमुक एखाद्या व्यक्तिगत अनुभवाचा गौरव करणारी नाही.

प्रस्तावनेत लव्हेकरांनी उल्लेख केला आहे की ओक्ताव्हियो पाझ च्या पेसोआ वरील लेखाचे शीर्षकच – unknown to himself ‘ असे आहे. त्याने अनेक टोपणनावांनी कविता लिहिल्या. जणू ती टोपणनावे म्हणजे वेगळ्याच व्यक्ती होत्या. “ त्याचे उगमस्थान, “ पेसोआ म्हणतो, “ माझ्या मानसिकतेत खोलवर रुजलेला हिस्टेरिया किंवा हिस्टेरिकल नुरास्थेनिया. यामुळे मला स्वत:च्या व्यक्तित्वाच्या बाहेर पडण्याची, त्यापलीकडे जाण्याची ओढ वाटायची. “ ही जगण्यात येणाऱ्या अनुभवांची कविता नसून जगण्याचीच कविता आहे. या ओळी बघा –

जगण्यानं हशील होत नाही काहीच.
किंवा जगण्याविषयी विचार करण्यानं.
किंवा त्याविषयी आपण विचार करतोय या विचारानं.

तो विचारतो – “ माझ्या निद्रानाशी अवस्थेत स्वप्न पाहतोय का मी आयुष्याचं ? “

पेसोआची कविता म्हणजे त्याचे जगण्यातला कोणताही क्षण पाहणे असते. ती अमुक अनुभवाची वा अमुक विषयावरची अशी कविता नसते.

लाट शांतपणे जवळ येत चाललीय

आणि मी काही विचार करतोय असं नाही वाटत मला.

एका वेगळ्याच मितीतून लिहिली गेलेली ही कविता आहे. ही कविता मराठीत येणे हे खूपच महत्त्वाचे आहे. यातल्या सगळ्याच कविता पेसोआच्या सर्वोत्कृष्ट कविता आहेत असे नाही. पेसोआची काव्यसृष्टी हे खरे तर एक प्रचंड विश्वच आहे. त्या विश्वाची उत्तम ओळख घडवण्याचे काम हे पुस्तक नक्कीच करते. लव्हेकर आणि वर्णमुद्रा यांना धन्यवाद !

--- ००० ---

ही भाषा मरू नये यासाठी काय करायला हवे यावर चर्चा करणारे विद्वान प्रत्येक पिढीत निर्माण होत राहोत, हीच सदिच्छा !

एस्टीचे आणि रेल्वेचे वेळापत्रक सांगण्या एवढी भाषा टिकली तरी पुरे -- जगातला आपला दहावा नंबर कुठे जात नाही !

२९-०२-२४.

उत्तर-आधुनिकता आणि मराठी कविता

ले ० मीनाक्षी पाटील, प्र ० पॉप्युलर प्रकाशन.

मराठी कवितेतील आधुनिक ते आधुनिकोत्तर जाणिवांपर्यंतचा अभ्यासपूर्ण आढावा घेणारा ग्रंथ – हे महत्त्व असलेला हा ग्रंथ मराठीत चांगलीच हालचाल निर्माण करील असा आहे. हे तिकडचे आहे, इकडचे नाही – असली वावदूकगिरी कुणी करू नये, असा हा विषय आहे. जागतिकीकरणानंतरच्या मानवी जगण्यात जगभर काही समान सूत्रे दिसतात हे समजून घ्यायला हवे. भौतिक परिस्थितीत जसे काही मोठे, महत्त्वाचे बदल होतात तशा माणसांच्या मन:स्थितीही बदलत जातात, प्रतिक्रिया बदलत जातात. हे असे इझम्स म्हणजे पाहण्याचे, अभिव्यक्तीचे वेगळे प्रवाह असतात. सर्जक लेखकाला वा कवीला हे जाणीवपूर्वक बौद्धिक भान असेल वा नसेल पण साहित्यात, कलेत हे बदलते प्रवाह येत राहतात.

या पुस्तकाचा पहिला औपपत्तिक भाग खूपच अभ्यासपूर्वक मांडलेला आहे. मानवी बुद्धीच्या साहाय्याने माणूस अधिकाधिक चांगला जगू लागेल – हे आधुनिकतेचे प्रमुख सूत्र हळूहळू संशयास्पद होत उत्तर-आधुनिकतेत ते कसे नाकारले गेले, याचा हा मराठी कवितेच्या संदर्भातला आढावा आहे. जगातल्या अनेक विचारवंतांचे या बाबतीतले चिंतन समजून घेत हे लेखन सिद्ध झालेले आहे. " उत्तर-आधुनिकतावादी साहित्यात विविध प्रकारच्या शैली व सांस्कृतिक स्तर, वेगवेगळे वाङमय प्रकार, गांभीर्य व हलकेफुलकेपणा यांची इतकी वैचित्र्यपूर्ण सरमिसळ केली जाते की पारंपरिक वाङमयीन चौकटीत त्याचे वर्गीकरण करणेही अवघड व्हावे. " – हे फार महत्त्वाचे आहे. अशा बदलांना आधी तुरंत नकार देणे ही आपली आवडीची एक डल पद्धत आहे. ती कलाकृती काय कसे व्यक्त करतेय हे

पाहण्याआधी हा वाङमय प्रकार कोणता याचीच चर्चा करत बसणे इथे वारंवार घडते. त्या दृष्टीने हे पुस्तक म्हणजे एक खळबळजनक ऐवज ठरू शकतो. उदाहरणार्थ, " या आधुनिकतावादी कवींनी सौंदर्यवादी भावकवितेच्या परंपरेने रूढ केलेल्या ठरीव साच्याच्या काव्यकल्पनेचा निषेध आणि उपरोध करत आपल्या कवितेत गद्य कल्पनेचा आणि तपशीलाचा सर्रास वापर करून कवितेतील गद्यात्मकतेची प्रतिष्ठा वाढवली. " – हे सत्य घ्या. बऱ्याच अभ्यासकांच्या हे पचनी पडणे अवघड आहे.

संकल्पनात्मक बैठक आधी तयार करून मग इथे मराठीतल्या आठ निवडक कवींच्या संदर्भात त्या संकल्पनांचे अस्तित्व कसे दिसते ते दाखवले आहे. सामाजिक-सांस्कृतिकतेतला उच्च-नीच भेद उधळून टाकणारे नामदेव ढसाळ, जागतिकीकरणानंतर चिन्हमय झालेल्या माणसाच्या जगण्याला मुखर करणारे श्रीधर तिळवे, जागतिकीकरणामुळे झालेले माणसाचे अमानवीकरण आणि वस्तूकरण याचे दर्शन घडवणारे हेमंत दिवटे, महानगरी जीवनातली असुरक्षितता व भय व्यक्त करणारे वर्जेश सोलंकी, एकाच वेळी तीव्र आत्मजाणीव आणि परात्मभावाची जाणीव यांतले द्वंद्व व्यक्त करणारे सलील वाघ, संगणकीकरण, माहितीचा विस्फोट आणि संपर्क-क्रांती यांतून विखंडित झालेल्या जगण्याचा वेध घेणारे सचिन केतकर, अपारंपरिक अभिव्यक्तिपद्धतीतून नव्या भोगवादी जगण्यातली विदारकता दाखवणारे संजीव खांडेकर आणि उलथापालथ, विस्कळितपणा व संभ्रमितपणा यांचे अनुभव व्यक्त करणारे मन्या जोशी – अशा या आठ कवींचा उत्तर-आधुनिक वैशिष्ट्यांच्या संदर्भात विचार करण्यात आलेला आहे.

हे पुस्तक अभ्यासकांनी तर वाचावेच पण स्वत: कवी-कलावंत यांनीही ( सावकाशपणे का असे ना ) वाचावे, असे मला वाटते. विचार, प्रतिक्रिया, अभिव्यक्तिपद्धती हे काहीच अबाधित राहणारे नसते याची जाणीव होण्यासाठी अशी पुस्तके महत्त्वाची असतात यात शंकाच नाही.

--- ००० ---

गाडीच्या वेगाने दृश्य असे बदलते
तर मनाच्या वेगाने जग किती बदलत असेल – ( फोटो ).

पुन्हा उत्तर-आधुनिक ---

रूम नं. १३

ले ० दिग ० दिलीप वेंगुर्लेकर, निर्मिती – पी डी ए , पुणे.

प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन, पुणे या संस्थेने माझी चार नाटके पूर्वी सादर केलेली आहेत – नाणेफेक, एक गगनभेदी किंचाळी, सामसूम आणि जिंदगी ख्वाब है. त्यामुळे, अर्थातच मला या संस्थेबद्दल आत्मीयता आहे. तर ते असो.

कालच मी उत्तर-आधुनिक या विषयावर लिहिले तर आज हे उत्तर-आधुनिक म्हणावे असे नाटक ! याच्या नावातला १३ हा आकडा बघून आपल्याला वाटते की शुभाशुभाबद्दल काही असणार ! आणि रूम नंबर वगैरे म्हणजे ते रहस्यमय असणार ! उत्तर-आधुनिकतावाद हा बुद्धिप्रामाण्यवाद नाकारतो, एवढेच इथे सांगून ठेवतो.

आमची मुले लहान असताना आणि पत्नीच्या भाचे-भाचीला मी एक उंटाची गोष्ट सांगत असे. उंटावर बसलेला व्यापारी आणि वाळवंटातून चाललेला उंट. कधी सकाळ, कधी रात्र, कधी वादळ, वगैरे. मग तो उजवीकडे वळे, मग त्याला लांब एक गाव दिसे. तिथल्या हॉटेलात जाऊन तो उंटाला चारापाणी करे, मस्त आंघोळ करे, वगैरे. पुन्हा सकाळी सुरू. अनंत गोष्ट. मुले रंगून जात. ते सगळे आता मोठे झाले आहेत पण अजूनही त्यांना ती उंटाची गोष्ट आठवते ! तसेच हे नाटक. तुम्हाला गुंगवल्याशी मतलब. तर्क वा कथेचे गांभीर्य वगैरे शोधायचेच नाही.

" ओहोटी लागली की कळते कोण कोण कपड्यांशिवाय पोहत होते, ते ! " तुम्ही सवयीने जरा हसाल पण याचा काही गंभीर अर्थ असावा असे समजून विचारात पडाल. इथे तुम्ही फसाल. या नाटकात अर्थबिर्थ लावत बसायला मनाई आहे. आणि तरीही आपल्या जगण्याचा असाच तर आहे पट हे जाणवून तुम्ही घरी जाताना पुन्हा एकदा हसाल.

उत्तर-आधुनिक चे म्हणणे आहे की सत्यबित्य, सखोलबिखोल, मूल्यात्मक वगैरे असे काही नसते. आपले जगणेही निरर्थक आणि उथळ असते, तशीच कलाही उथळच असते ! काही विनोद चांगले आहेत, काही हालचालींतून विनोद घडतात, पण, बरेचसे विनोद तुमच्या-आमच्यांतले हौशी विनोदवीर करतील तसेही आहेत ! कुछ फरक नही पडता. पहिलाच प्रयोग होता, सफाई येत जाईल. कंप्लीट तथ्यहीन, उथळ, उत्तर-आधुनिक नाटक ! हे निश्चितच समजून-उमजून उत्तर-आधुनिक म्हणून लिहिलेले नाटक नाही. हा काळाचा महिमा आहे. या काळाने त्याची प्रतिकृती या नाटकातून सादर केलेली आहे.

कलाकार सगळे नवीन आहेत, पण, नवखे आणि कच्चे नाही वाटले. वेंगुर्लेकरांनी छान कामे करून घेतलेली आहेत. त्या बबनच्या साथीदार झालेल्या मुलीला अजून खूप मजा करणे शक्य आहे. तिने नाटकात जरा जास्त गुंगून जाणे आवश्यक आहे. बाकीचेही अधिकाधिक सफाई आणत जातीलच.

नेपथ्य, प्रकाश, संगीत नाटकाची रंगत वाढवण्याचे काम करतात.

हे नाटक प्रायोगिक आहे की व्यावसायिक ? प्रायोगिक समजून चौकोनी चेहरे करून नका जाऊ. मजा म्हणून जा आणि आपल्याच जगण्याची झेरॉक्स पाहून खुश व्हा !

या भवसागरात आपणच पोहत आहोत – हे नाटक म्हणजे त्या सागरातली ओहोटी आहे ! यावरून काय समजायचे ते समजा !

पी डी ए झिंदाबाद !

--- ००० ---

छान -- खूप शुभेच्छा ! ( अमेरिकेतल्या ढोलताशे ला ).

प्रयोगाच्या माहोलाचे फोटो –

आनंद आहे ---

" विचारांची लढाई विचारांनीच लढायची " -- म्हणजे काय रे भाऊ ?

इंग्रजी ' ढोलताशे ' ची धामधूम –

Opening night - full house & standing ovation for DHOL TASHE! Do not miss this 'Killer Show'! Two more shows this weekend!! Saturday & Sunday at 2pm.

And 3 shows next week ( Thursday, Friday and Saturday)

Get your tickets now at [www.badco.art/tickets](http://www.badco.art/tickets) ( क्लिप सह ).

' मन ' विषयक –

हा एक एकपात्री दीर्घांक आहे -- जो नीट करेल तो नटसम्राटच !

वर्धन कामत ची जाहिरात.

आजचे –

हा एकपात्री दीर्घांक सादर झाल्याचे हे एकच उदाहरण -- अनेकांनी प्रयत्न केले आणि मध्येच सोडून दिले -- आता सध्याही एक प्रयत्न सुरू आहे -- तपशील नंतर सांगेन -- चालू असलेल्या प्रयत्नाला अर्थातच शुभेच्छा !

ढोल बाजे

Dhol Tashe viewers responses.

Audiences are loving it. You will too.

4 more shows to go.

Tickets: www.badco.art/tickets

Solid - The New Age Theater Bay Area Drama Company

"Traveling is a fool's paradise."

–Ralph Waldo Emerson

' ढोलताशे ' उत्सव पुढे चालू --

Few onstage images of our English play Dhol Tashe.

3 shows done, 3 more to go ( Thursday - 8 pm, Friday - 8 pm, Saturday - 2 pm)

Tickets : www.badco.art/tickets.

Pear Theater mountain view

Pictures by Basab Pradhan

Solid - The New Age Theater Bay Area Drama Company Roshni Datta Krishna Das Prathyay Bhandarkar Vaishnavi Sridhar Rita Bhatia Champra Deshpande Sandeep K Belliappa Mugdha Manerkar The Pear Theatre

एखाद्या छोट्या तपशीलाचाही कसा होतो विचार ---

Story of a Tubelight:

Often overlooked in the spectacle of a dramatic performance are the minute details that go unnoticed. The success of a play truly lies in the unassuming hustle and dedicated efforts of the cast and crew.

As the director of the ongoing play, "Dhol Tashe," I desired to incorporate tube light as a symbolic prop, representing a middle-class Indian home. This seemingly insignificant element, often overlooked as part of the household, holds immense significance in bringing life to the living room.

The Tubelight's illumination made the stage overly bright. No extra screens were available to reduce the intensity. Despite agreeing to leave the prop as is, I was disappointed, which my co-founder, Sandeep K Belliappa, noticed. This decision resulted from many trials and errors.

The next evening, Sandeep K Belliappa worked with the lighting crew, who were unfamiliar with using parchment paper. Despite their skepticism and warnings against his method, he remained steadfast. Before abandoning the idea completely, he made a final attempt, asking me to bring some parchment for the crew to experiment with. To reduce the intensity of the tube light, we wrapped it with multiple layers of parchment paper, and voila!

It created the desired effect, reducing the light's intensity. The tube light now blended seamlessly with the other set elements, resulting in a beautifully lit living room area. Sometimes, giving up in the face of a problem is tempting. However, the solution often emerges unexpectedly if you give it enough time to marinate and think it through.

3 more shows to go [Thursday - 8:00 pm PST, Friday - 8:00 pm PST, Saturday - 2:00 p.m PST]

Tickets: www.badco.art/tickets

जगणे

आपण ज्यांना कलाकृती म्हणतो अशी बरीच नाटके, चित्रपट, एखादी मालिकाही मी त्यातले काहीही मनाला लावून न घेता पाहू शकतो. पण, तरीही, तशाही कलेत क्वचित काही मानवी दु:खाचे वा अगतिकतेचे असे काही क्षण येतात की माझे डोळे पाणावतात. त्या कलेचे अंतरंग, त्यातले कौशल्य हे माहीत असूनही हे घडू शकते. त्यात अर्थात तिथल्या नटनट्यांचीही  कमाल असतेच. विद्याधर ( बाप्पा ) जोशी या माझ्या नट मित्राचा हा व्हिडियो बघताना त्याच्या अभिनयाच्या पूर्ण अनुपस्थितीतही माझे डोळे पाणावले. मराठीतला हा एक उत्तम अभिनेता कोणत्या भयानक संकटातून गेला हे ऐकता-पाहताना खरोखर भावनिक व्हायला झाले !

बाप्पाने माझ्या ‘ ढोलताशे ‘ या नाटकात एक महत्त्वाची भूमिका केली होती. एका बाजूला जरा गंभीर असा नायक आणि दुसऱ्या बाजूला हा जरा उथळ असा त्याचा चुलत भाऊ, असा तो प्रकार होता. बाप्पा अक्षरश: धमाल मजा आणायचा. नंतर कालांतराने हे नाटक भद्रकालीने व्यावसायिकवर आणले तेव्हा त्यांतल्या एका प्रयोगाच्या वेळी तो भेटला होता. त्यात अभिजित गुरु बाप्पाने केलेली भूमिका करत होता. त्या दोघांचे काही क्षण झालेले बोलणे मला सुखावून गेले होते. मी असे झाले होते, तसे झाले होते, असे म्हणतोय म्हणजे हा काही स्मृतिलेख नाहीय. बाप्पा आता चांगला छान आहे – त्याचे बोलणे तर अगदी ना-फरक पाहिल्यासारखेच आहे. अर्थात त्याला पूर्ण बरे होऊन पहिल्या जोमाने काम करायला कदाचित काही काळ  जावा लागणार, असे दिसते. तो गेलाच असता पण आहे याच्या आनंदात मी हे लिहीत आहे. मी इथे खाली दिलेल्या लिंकवर सौमित्र पोटेने घेतलेली बाप्पा आणि त्याची पत्नी वैशाली यांची मुलाखत बघा म्हणजे मी असे भरभरून का लिहू पाहतोय ते कळेल. सगळे नीट चाललेले असताना, चालताना आपल्याला दम लागतोय हे कळणे, मग हळूहळू ते वाढत जाणे, मग तपासणीत असे निघणे की फुफ्फुसात एक पॅच आहे आणि मग कळणे की हा पॅच अशा रोगाचा आहे की ज्यावर काहीही उपाय उपलब्ध नाही, आणि आता तो फक्त वाढत जाणार, किती गतीने वाढेल हेही नक्की नाही ! म्हणजे कधीही निरोप समारंभाची वेळ येऊन ‘ जय हिंद ‘ म्हणावे लागणार – असे संकट !  मग कळणे की यावर एकच मार्ग म्हणजे फुफ्फुसाचे प्रत्यारोपण ! हे कळल्यापासूनचे सगळे तुम्ही प्रत्यक्षच ऐका. असंख्य गोष्टी जुळून आल्या आणि बाप्पा वाचला ! या काळात, ज्यांना उत्तरे नाहीत असे खूप प्रश्न पडत असतात – त्यांची कल्पना करून पाहा. जगणे म्हणजे नुसते वैज्ञानिक दृष्टिकोण असला की झाले, असे नसते. जगण्याचा आणि तत्त्वज्ञानाचा / अध्यात्माचा अति-महत्त्वाचा संबंध असतो हे समजावे असा हा सगळा प्रकार आहे.

एका ठिकाणी बाप्पा म्हणतो की श्वास घेता न येणे याच्यासारखी भयानक गोष्ट नाही. इथे मी थोडे माझेही सांगतो. एरवी मी फारसे कुठे बोलत नाही असेही काही सांगतो. माझ्या वयाच्या सुमारे तिसऱ्या वर्षापासून मी एक अट्टल दमेकरी होतो. बालपण त्यातच करपून गेलेला असा मी माणूस आहे. माझ्याही अनेक तपासण्या, भविष्यवेत्ते वगैरे झाले होते. एका अद्ययावत सर्व मशिनरी असलेल्या ठिकाणी माझ्या तपासण्या झाल्या तेव्हा त्याचा निष्कर्ष असा आला होता की याच्यात शारीरिक दोष काही नाही, हा याचा मानसिक रोग आहे ! ते ऐकून मला राग आला होता, पण ते खरे असणार. मीही अनेकदा जगतोय की मरतोय या लेव्हलला जाऊन आलो होतो. त्यामुळे, श्वास घेता न येणे म्हणजे काय हे मी फर्स्ट हँड जाणतो. एकच अनुभव सांगतो. तेव्हा मी बहुतेक शाळेत असेन. नित्य नियमाप्रमाणे मला आला अटॅक. त्या वेळी डॉक्टर घरी येत असत. त्यांना वडिलांनी आणले बोलावून. बाकी तसे सोपे असायचे.

एक अड्रिनलीन नामक इंजेक्षन दिले की झाले ! जादुई इफेक्ट ! याला पाच मिनिटांपूर्वी इतका त्रास होत होता हे कुणाला खरेही नाही वाटणार. तर ते इंजेक्षन देऊन डॉक्टर गेले, तर पुन्हा थोड्या वेळाने तसाच तीव्र अटॅक ! पुन्हा डॉक्टर आले. ते गेल्यावर पुन्हा तेच. तिसऱ्यांदा ते आले तेव्हा मात्र ते म्हणाले की हा घाबरलेला आहे, त्यामुळे मनाने पुन्हा पुन्हा अटॅक आणतो आहे, आता याला झोपेचे इंजेक्षन देऊन झोपवावे लागेल ! तर, सारांश, हम भी जानते हैं इस जन्नत की हकीकत !

पण नंतर मी यातून जवळ जवळ पूर्ण बाहेर पडलो. एक तर मुंबई सोडणे उपयोगी पडले पण मुख्यत: स्वत:च्या मनाकडे पाहणे, पडणारे प्रश्न समजू शकतात का यासाठी मिळेल ते, मुख्यत: आध्यात्मिक, वाचणे वगैरे मी करत गेलो. मग, या पुरोगामी महाराष्ट्रात बोलू नये असे एक रहस्य मला उलगडले ! मेंदू ट्रान्सप्लांट नव्हे तर ट्रान्सफॉर्म होऊ शकतो ! ते काही एखादा कोर्स करून प्रमाणपत्र मिळवणे नसते तर प्रत्येक वेळी नव्याने घडावे लागते. त्याने खूपच फरक पडला. मी क्लेम काहीच नाही करणार, न जाणो, माझा शेवट पुन्हा त्याच अ-श्वास अवस्थेत होऊ शकेल. पण गेली कित्येक वर्षे मला या त्रासामुळे एक दिवसही पडून राहावे लागलेले नाही. मी फिट आणि खुश आहे ! या एकूण प्रकारावर आधारित माझे एक नाटक आहे – ‘ जणू काही वास्तव ‘. त्या नाटकाचा पाया हे मला दिसलेले रहस्य आहे. खरे तर इथे असले अबौद्धिक नाटक कुणी हातातही धरणार नाही. ते धाडस गिरीश पतकेने केले आणि ‘ आविष्कार ‘ ने त्याच्यावर विश्वास टाकला. त्या वेळी ते नाटक जरा बराच पसारा टाइप होते, आता ते नीट, आटोपशीर केलेले आहे.

आता इथे आणखी एक लिंक मी तुम्हाला देणार आहे. ती म्हणजे स्कॉर्पियो चे उत्पादक महिंद्र यांची. त्यांची मुलगी एक वर्षाची असताना तिच्यावर आलेल्या संकटाची ही कहाणी आहे. अपघातात अधू झालेल्या तिच्या हातावरील उपचारासाठी ते लंडनला गेले, तिथून पॅरिसला गेले. तर तिथला तो महान डॉक्टर म्हणाला, तुम्ही भारतातून आला आहात ना, मग आम्ही ज्यांचे चेले आहोत ते डॉक्टर जोशी मुंबईत आहेत, त्यांच्याकडे तुम्ही जा. ते डॉक्टर जोशी, महिंद्र यांच्या ऑफीसपासून दहा मिनिटांवर होते ! स्त्रियांच्या ब्रेसियरला असतात तसले दोन हुक वापरून काही युक्तीने त्यांनी त्या मुलीवर उपाय केला ! खर्च फक्त रुपये दोन ! ती मुलगी आता उत्तम पियानो वाजवते ! या घटनेतच स्कॉर्पियोच्या निर्मितीचे बीज कसे आहे ते मुळातूनच ऐका.

आपल्याला मूलभूत प्रश्न पडावेत असे प्रसंग आपल्या आयुष्यात येत असतात. पण, शक्य तो त्याकडे दुर्लक्ष करून, ते दडपून जगत राहणे हीच आपली निवड असते. यात कोण कुणाला काय शिकवणार ?

त्या दोन लिंक्स ---

https://www.youtube.com/watch?v=XRbprwgjEpI

आणि ---

https://web.whatsapp.com/

--- ००० ---

WEB.WHATSAPP.COM

web.whatsapp.com

अमेरिकेत घडलेले पुणेरी ' ढोलताशे ' ! ---

A few pics from today's show. Thank you for supporting Dhol Tashe Solid - The New Age Theater and Bay Area Drama Company . Today's show was a sold out event . We have 2 more shows.

Friday: 8:00 p.m PST

Saturday : 2:00 p.m PST

Tickets : [www.badco.art/tickets](http://www.badco.art/tickets)

अमेरिकेत ' ढोलताशे ' ची धूम –

--- प्रयोग हाऊसफुल .

रस्त्यात थांबवून माझ्याशी दोन शब्द बोलावे असे काही व्यक्तींना वाटते -- बहुधा या व्यक्ती थोड्याफार ' सटकलेल्या ' असतात !

धक्का

परवा एकटाच कुठेतरी चाललो होतो. तेवढ्यात मध्येच एकजण स्कूटरवरून आला आणि माझ्याजवळ थांबला. इथे ' साई शिल्प सोसायटी ' कुठे आहे हो ? -- असे त्याने मला विचारले. म्हटले, इकडून डाव्या हाताला वळून पुढे जा -- तुमच्या डाव्या हाताला तीन मिनिटांवर दिसेल. धन्यवाद म्हणून तो जाऊ लागला, पण थांबला. " चंप्र का ? " त्याने विचारले. मी चंप्रच असल्याने हो म्हणालो. " तुम्ही इकडे राहता काय ? छान झाले -- भेट झाली -- " तो म्हणाला मग मीही म्हणालो, वा, धन्यवाद ! त्या माणसाला हा एक सुखद धक्का वाटला असावा, असे दिसले. पण, मला हा त्याच्याहून भारी धक्का होता ! च्यायला, इतकी वाढलीय का काय आपली लोकप्रियता की जातायेता सहज रस्त्यातही कुणी ओळखावे ? ! -- आपल्याला पत्ताच नाही याचा ! याचा मला धक्का बसला होता ! या सुखद धक्क्यात मी पुढे गेलो !

--- ००० ---

माझ्या आधी माझ्या नाटकाने अमेरिका पाहिली ! --- ( अनेक फोटो ).

Thank you for the sold out show Dhol Tashe yesterday. We have one last show today at 2 p.m PST.

8 tickets left. Tickets : www.badco.art/tickets.

Solid - The New Age Theater Bay Area Drama Company Sandeep K Belliappa Krishna Das Roshni Datta Champra Deshpande Prathyay Bhandarkar Vaishnavi Sridhar Rita Bhatia Mugdha Manerkar Sumanth Shantaram

' चार्जुन ' असे गीतेत अनेकदा येते म्हणे -- म्हणजेच ती ४ जूनला सांगितली गेली असे विद्वान म्हणतात ! म्हणूनच ४ जून हा हिंदू मुहूर्त ! ( ४ जूनला निवडणुकीचे निकाल आहेत ).

खूपच आवडलेले दिसतेय हे नाटक तिकडे -- छानच ! ( पुन्हा हाऊसफुल ).

सहावा प्रयोग –

Thanks to Solid - The New Age Theater to have me at their finale performance of DHOL TASHE, yet another spectacular production from Megha Herur and her team

टपून आहेत
पक्षोपक्षींचे
सखाराम बाइंडर !

तिकिटे न मिळालेले नाराज लोक कितपत पावरफुल ठरतील त्यावर निवडणुकांचे अंतिम निकाल अवलंबून आहेत !

"Dhol Tashe" is an extraordinary theatrical masterpiece that captivated me from start to finish, leaving me utterly spellbound for its entire 90-minute duration. This play skillfully navigated the intricate realms of politics, religion, and culture with a delicate touch, seamlessly weaving them together to deliver a subtle yet impactful message. This nuanced approach added layers of depth to the narrative, allowing for a rich and thought-provoking experience. The play had just enough humor to keep things fun and lively.

Moreover, the theater setup itself played a pivotal role in enhancing the overall immersion. Every element, from the set design to the lighting, contributed to creating an atmosphere that enveloped the audience completely. As a front row spectator, I felt transported into the world of the play, fully engaged and emotionally invested in every moment.

And let's talk about the actors! How on earth did they pull off those intense dialogues with such deep expressions flawlessly? It was like they were living their roles. I was completely hooked on every word they said. In a production filled with

standout performances, Roshni Datta's talent shone the brightest. Her portrayal added layers of depth and emotion to an already captivating story.

"Dhol Tashe", presented by Solid - The New Age Theater, was an incredible play that left a lasting impression on me. If you get the chance to see it, don't miss out!

अप्रत्यक्षपणे मदत करणारे -- हीही लोकशाहीतली एक संवैधानिक आणि लोकमान्य शक्ती असते !

" विचारधारा नसेल तर माणसाने राजकारणाच्या फंदात पडूच नये. "
-- ब्रिटिश नंदी, सकाळ.

उत्तम झाला कार्यक्रम ! राहुल पुंगलिया जे बोलले ते अद्वितीय, अति-महत्त्वाचे वाटले !
( मनोज पाठकाच्या ' अधिसत्ता ' या कवितासंग्रहाचे प्रकाशन ).

लौकरच उपलब्ध होईल --- ( नाणेफेक ).

एका राशीचे भविष्य ---
व्हिसाची कामे होतील !

गिरीश रांगणेकर या माझ्या मित्राने केलेली एक उत्तम कामगिरी ---
( रोड सेफ्टी या विषयावर सांगली आर टी ओ साठी फिल्म ).

काठी

सकाळी फिरायला बाहेर पडलो होतो. येताना माझी सूर्याकडे पाठ होती. समोरून येणाऱ्यांवर ऊन पडत होते. ठीक होते वातावरण. तेवढ्यात समोरून एक सुमारे माझ्याच वयाचा माणूस मला येताना दिसला. त्याच्या हातात एक चकचकीत चॉकलेटी पॉलिश असलेली काठी होती. ती तो त्याच्या डोक्यावरून कलात्मकतेने फिरवत होता. ती मस्त चमकत होती. मी घाबरलो. पूर्वी एका वेड्याने निष्कारण त्याच्या हातातला पट्टा फिरवत बक्कलच्या बाजूने माझ्या डोक्यात हाणला होता. आठ टाके पडले होते ! मोठा उपद्व्याप झाला होता. हाही तसाच तर नसेल ? काठी मस्त चमकतीय साल्याची ! करावे काय ? म्हटले आपण पूर्ण सावध राहू. काही नाही होणार. तो जवळ आला तशी त्याने काठी थांबवली आणि ती एका हातात घेतली. दुसऱ्या हाताने माझ्याशी हस्तांदोलान करत तो हसत म्हणाला, " बऱ्याच दिवसांनी दिसताय – ठीक आहात ना ? " " उत्तम ! " मी म्हणालो. " भूक लागतीय ना ? झोप लागतीय ना ? " त्याने विचारले. मी अत्यानंदाने, " हो " म्हणालो. मग, पुढे म्हणालो, " एकमेकांबद्दल आपण सदिच्छा ठेवायच्या

– बाकी चिंताच नाही करायची ! – “ यावर तो माणूस मस्त हसला. “ बरोबर आहे – “ असे म्हणून, हसून, पुन्हा काठी फिरवत तो पुढे गेला. तो जरा लांब जाईपर्यंत मी लक्ष ठेवले.

हल्ली सालं वेडा आणि शहाणा यातला फरकच कळत नाही – असे मनाशी म्हणत मीही निघालो.

--- ००० ---

माणसाला नुसतीच बाह्य परिस्थिती नसून एक मनही असते, हे समजणे हा चांगल्या कलेचा पाया असतो.

अधिसत्ता ( कविता )

कवी ० मनोज सुरेंद्र पाठक, प्र ० पोएट्रीवाला पेपरवॉल पब्लिशिंग.

या कवितासंग्रहाची पहिली आवृत्ती २००६ साली निघाली होती आणि अलीकडेच २०२४ मध्ये त्याची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली आहे. मनोज स्वत:च्या कवितांबद्दल अनेकदा किरकोळीत बोलताना दिसत असला तरी तिकडे दुर्लक्ष करून वाचाव्यात अशा या कविता आहेत. या पुस्तकाच्या परिशिष्टात राहुल पुंगलिया म्हणतात, “ या कविता चांगल्या आहेत कारण मनोज पाठक आपल्या व्यक्तिमत्वाची लुडबुड कवितेमध्ये होऊ देत नाही. आपल्या भावना व विचारांची अभिव्यक्ती करण्यासाठी कवितेची सबब त्याला गरजेची नाही. “  कवीच्या व्यक्तिमत्वाचा म्हणजे त्याच्या भूमिकेचाच गौरव करत राहणाऱ्या आणि स्वत:ची सुखदु:खे व मते एवढेच कवितेचे क्षेत्र सीमित समजणाऱ्या मराठी कवितेत त्यामुळे ही कविता वेगळी ठरते.

या संग्रहातल्या मनोजच्या ईश्वरविषयक कविता हा एक वेगळा चर्चेचा विषय ठरू शकतो. काही तथाकथित धार्मिक मासिकांतून येणाऱ्या कवितांसारख्या या घिस्यापिट्या कविता नाहीत. ईश्वर हा स्वीकारलेला वा नाकारलेला नसून तो ‘ अनोळखी ‘ असण्याच्या या कविता आहेत. तरीही या विषयाला त्याच्या मनात स्थान आहे. मनाचे सगळे मटेरियल हे वैज्ञानिक पद्धतींनी घडत नसते. असंख्य संस्कार, प्रभाव, परिस्थिती आणि कदाचित जनुक रचनाही यांच्या एकत्रित योगाने हे घडत असते. मनोज, त्याच्या जगण्यातले हे ईश्वरी अस्तित्व स्वत:च्या वा वाचकाच्या माथी श्रद्धेच्या रूपात मारत नाही. या नुसत्याच प्रतिक्रिया नसून ते ‘ पाहणे ‘ ही आहे. एका ठिकाणी तो म्हणतो,

कंटाळून तुझ्या असण्यानसण्यासकट
मी तुला स्वीकारतोय
हे हरामखोर ईश्वरा

दुसऱ्या एका ठिकाणी तो म्हणतो,

तुझ्या असण्याने
आशेचे घोडे
दौडतात थकतात

म्हणजे एकरूपता नाहीच. मनाच्या इतर असंख्य कृतींमधल्याच याही कृती आहेत.

या संग्रहातल्या, ‘ तुकडे जुळवताना येवो मरण ‘, ‘ अन्न ‘, ‘ आई दुबोध होत जायची दिवसेंदिवस ‘, ‘ एक संपूर्ण सशक्त अवयव ‘, आणि ‘ मित्रांच्या आले लक्षात ‘  या कविता अधिक एकसंध वाटल्या. काही कवितांत मनोजचे भान

ढळते आणि कवितेचा आशय नीट व्यक्त होत नाही, असे वाटले. ‘ मित्रांच्या आले लक्षात ‘ ही कविता तर एकूण जगण्याचा भेदक गोषवाराच पाहणारी आहे. ‘ अन्न ‘ ही कविता बघा –

मी लिहितोय म्हणजे
कुणाशी बोलतोय ?
किंवा हे जे प्रश्न उभे राहतात भुवया उंचावून
ते कुणाला मागत असतात उत्तरं ?
किंवा सालोसाल मी करतोय काय
या मित्र हरवत चाललेल्या जगात ?
किड्या-मुंग्यांनी ओढून न्यावे
आपल्या सजातीयाचे कलेवर
तसे ओढत नेतो आहे
मी कुणाला ? कशासाठी ?
की आता तेच आहे अन्न
पुढच्या प्रवासासाठी ?

--- ईश्वर असो की माणसे की वस्तू की निसर्ग, प्रत्येक नात्यात स्वत:चे अलग पडत जाणे हा या कवितांचा स्थायीभाव दिसतो. विशेष म्हणजे हा भाव इथे व्यक्तिगत वैशिष्ट्याच्या रूपात येत नसून जणू एका निरर्थक पाहण्याच्या दृष्टीतून येतो. हे मराठीत वेगळे आहे.

--- ००० ---

लौकरच -- एक एकपात्री दीर्घांक – ‘ मन ‘ –

Champra Deshpande यांचा " मन " हा एकपात्री दीर्घांक मला कळल्यापासून मी तो सादर करण्याचा प्रयत्न करीत राहिलो आहे. अजूनही मनात आहे - पण आजपर्यंतचा अनुभव असा की बरेचसे नट हा दीर्घांक अर्ध्यावर सोडून निघून गेले. कारण मन हा दीर्घांक शिवधनुष्य आहे.

मग मी अनेक पात्रांना घेऊन तो दीर्घांक " मनाचे शोक " या नावाने काला घोडा फेस्टिवलला केला. एकच प्रयोग झाला. चांगला वाईट असं पाहिलं गेलं तर वाईट नव्हता झाला प्रयोग.

काल एका ग्रूपवर वाचलं की अभिजित झुंजारराव त्या दीर्घांकाचा प्रयोग करतो आहे. हा दीर्घांक करण्याचं मनात येणं ही मुळात ग्रेट गोष्ट आहे. मन दीर्घांक एकपात्री आहे. पण मन अनेकपात्री असतं. ते पात्र कोण करतंय माहीत नाही. पण जो कुणी तयार झाला त्याला सलाम.

हा दीर्घांक अभिनेत्याने पेलायचा आहे. अभिजित झुंजाररावच्या अभिनय कल्याण या संस्थेला या दीर्घांकाच्या सादरीकरणासाठी मनःपूर्वक शुभेच्छा. --- रवीन्द्र दामोदर लाखे.

स्वातंत्र्यवीर सावरकर ( २०२४ )

हा चित्रपट पाहिला.

रणदीप हुड्डा चा आवाज आणि अभिनय उत्तम.

त्याने घेतलेले कष्टही जाणवतात.

पण

एकाच पोतडीत खूप गोष्टी कोंबण्याचे प्रयत्न

आणि सतत वाजणारे अति-भव्य पार्श्वसंगीत

या दोन गोष्टी या चित्रपटाला मारक ठरलेल्या आहेत.

बाकी राहिला प्रश्न  इतिहासाचा.

इतिहास कधीच माझ्या आवडीचा विषय नव्हता आणि नाही.

निदान दोन महायुद्धांचे तरी नीट अभ्यासून डोक्यात साठवून ठेवावे म्हणून मी अनेकदा प्रयत्न केले.

ते फेल गेले.

मी ‘ इराक ‘ हे नाटक लिहिले तेव्हा त्या विषयाचा खूप अभ्यास केला होता.

ते नाटक माझ्या मते उत्तम लिहून झाले पण आता  ते तपशील गेले आहेत डोक्यातून.

सारांश, इतिहास हा माझा विषय नाही.

त्यासाठी भले भले जंगी पैलवान खूप आहेत आपल्याकडे !

--- ००० ---

१९५८ साली येऊन गेलेल्या ' साधना ' या चित्रपटातला एन. दत्ता यांच्या जबरदस्त संगीताने नटलेला नृत्यसम्राज्ञी वैजयंतीमाला यांचा बेफाम नृत्याविष्कार ---गायिका ग्रेट लता मंगेशकर ---
‘ कहो जी तुम क्या क्या  --- ‘ .

हवी तशी कॉमेंट देणाऱ्याकडे, तिला दिलेले उत्तर वाचायचा सभ्यपणाही असायला हवा, असे वाटते.

इवलेसे रोप  ( दोन अंकी नाटक )

ले ० आणि दिग ० सई परांजपे, निर्मिती --  खेळिया प्रॉडक्शन्स, मुंबई.

“ ते रोप कशासाठी होते नाटकात ? त्याला इवलेसे का म्हटले ? “ असे प्रश्न प्रेक्षकांना पडले नाहीत. अगदीच सरळ माहितीच्या रूपात नसलेले आणि उलगडून  न सांगितलेले प्रेक्षकांनी स्वीकारले, हे छान वाटले. नुसताच थोडाफार जाणवू शकणारा असा अर्थ काहीसा वास्तववादाच्या पुढे गेल्याचे समाधान वाटले. एका साध्या, सामान्य जोडप्याचे हे नाटक. आता दोघेही वयस्कर आहेत पण त्यांचा काही भूतकाळही त्यांच्या बरोबर आहे. वर्तमान आणि भूतकाळ यांत हे नाटक हेलकावत राहते. तीच दोन पात्रे आलटून-पालटून तरुण व वृद्ध अशी दिसत राहतात. मंगेश कदम आणि लीना भागवत यांच्या उत्तम अभिनयाबरोबरच त्यांची वयबदलातली सफाईही दिसत राहते. बाकी रूटीन

असलेल्या आयुष्यात दोनच जरा धक्कादायक म्हणाव्यात अशा घटना घडलेल्या असतात. ( कोणत्या ते नाही सांगत ) नाटक तसे त्या दोघांच्या मृत्यूपर्यंत जाते पण विशेष म्हणजे चक्क एक नाट्यगत खोटेपणा वापरून शेवट गोड होतो ! या नाटकातले सौम्य नाट्य, हलकेसे विनोद आणि विशेषत: इतकी वर्षे टिकलेल्या पति-पत्नी आसक्तीची दृश्ये यांमुळे हे एक गोड, गुलाबी, रोमँटिक नाटक प्रेक्षकांना खुश करत राहते. या नाटकातले रोप आणि शेवटाकडचा नाट्य माध्यमाचा उपयोग हे छान वाटले. आयुष्यात काही घटना घडून गेलेल्या असल्या तरीही त्यांचे प्रभाव टाकून देऊन जगता येऊ शकते, अशा जाणिवेचा शेवट छान वाटला.

लीना भागवत आणि मंगेश कदम हे कसलेले कलाकार आहेत. प्रदीप मुळ्ये यांचे जादुई सादरीकरणासाठीचे आसान नेपथ्य, सुंदर प्रकाश योजना आणि सौम्यसे साजेसे संगीत ! या सर्वांमुळे, भडक नाट्य नसलेला हा प्रयोग प्रेक्षकांना आवडत जातो.

एका साध्या हलक्याफुलक्या वातावरणात, काही आव्हानात्मक आशय वा थोडक्यात म्हणजे ‘ डोक्याला ताप ‘ नको असेल तर  छान आहे हे नाटक. थकल्या-भागल्या मराठी प्रेक्षकांना हे नक्कीच सुखावत राहील.

तसे हे नाटक म्हणजेही एक इवलेसे रोपच आहे.

--- ००० ---

## पुरोगामी आणि अभिव्यक्ती

पुरोगामी लोक हे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे भोक्ते असतात, हे आपल्याला अनेकदा दिसते. पण त्याचबरोबर त्यांच्या मतांपेक्षा वेगळी मते वा आकलन-प्रक्रिया असणाऱ्यांना पाहिले की ते बिथरतात, हेही दिसते. त्यांची जणू सुरक्षितताच धोक्यात येते. या भीतीतून ते लगेच हल्ले सुरू करतात. अपशब्द वापरू लागतात. एखादा लेखक ‘ वेगळा ‘ असेल तर त्याला ते बोटचेपा, पळपुटा, कुंपणावरला, भित्रा, ब्राम्हणी, असे काही म्हणू लागतात. त्यांच्यांतले असले आंतर्विरोध हा विषय वेगळा आहे. इथे मुख्यत: कला-साहित्य-संस्कृती या क्षेत्रांतल्या सर्जक प्रक्रियांबद्दल बोलायचे आहे. कला ही फक्त परिवर्तनाचे साधन असते एवढेच पुरोगाम्यांचे कलेबाबतचे संकुचित ज्ञान असल्याने त्यांचे लक्ष फक्त बाह्य परिस्थितीवर असते. मानवी मनाच्या कृती आणि त्याच्या समस्या यांकडे त्यांचे दुर्लक्ष होत असते. याचा परिणाम असा होतो की दलित-पीडित-वंचित यांचे अनुभव आणि वास्तववाद यांपलिकडचे सर्व कलाक्षेत्र हे असंवेदनशील, आपमतलबी लोकांचे असते, असे ते समजतात. मनाच्या अवस्था, समस्या, प्रक्रिया यांचे भान घेण्यातून येणारी सर्जक प्रक्रिया ही पूर्ण मानवात परिपक्वता निर्माण करणारी आणि पर्यायाने प्रेम आणि सौहार्द यांची निर्मिती करणारी असते, हे त्यांना समजत नाही. त्यामुळे, कलाक्षेत्रात बदलत जाणाऱ्या अभिव्यक्ति-पद्धतींचे त्यांना काही देणेघेणे नसते. त्यांना वास्तववादापलिकडे काही कळत नाही. आधुनिकता, उत्तर-आधुनिकता, अतिवास्तववाद, न-कविता वा न-नाट्य, मृषा ( अब्सर्ड ) कला, अमूर्त कला, अशा सर्व गोष्टींपासून ते फटकून असतात. इंटरेस्टच नसते. त्यामुळे, त्यातले काही कळतही नाही. याचा राग ते ‘ इतर ‘ लेखक-कवींना असंवेदनशील म्हणून काढतात.

संख्येच्या बळावर, साहित्य-कला यांचा असा तिरस्कार असूनही ते या क्षेत्रातल्या मोक्याच्या जागा पकडून बसलेले असतात. ते साहित्य संमेलनाचे अध्यक्षही होतात पण साहित्याची कवडीची समज व्यक्त न करता राजकीय भाषण

ठोकून निघून जातात. पुस्तके कोणती विकत घ्यावी, कोणती अभ्यासाला लावावी, कशावर परिसंवाद घ्यावे वगैरे बाबींवर आणि प्रसिद्धी देण्यावरही त्यांच्या या संकुचिततेचा प्रभाव असतो. त्यामुळे, एकूण भाषेचा समाजातला वापरच अधिकाधिक ढोबळ होऊ लागतो. भाषेच्या सूक्ष्म अर्थांना वाव देणारे लेखन कुणी अभ्यासूही नये आणि तसे निर्माणही होऊ नये, असे त्यांना वाटते. जागतिक वाङ्मयात काय चालले आहे याच्याशी त्यांना काहीच कर्तव्य नसते. यांच्या बोलण्यात सहसा, ' वेटिंग फॉर गोदो ' किंवा त्याचा लेखक बेकेट, पिरांडेल्लो, काफ्का, जॉईस, डिकिन्सन, पेसोआ, एवढेच काय शेक्सपियरही फारसा नसतो. इंटरेस्ट नाही, त्यामुळे अभ्यास नाही, त्यामुळे कळतच नाही, अशी अवस्था. या प्रकारात समीक्षा नष्ट होते. साहित्याच्या मूल्यमापनाच्या शक्यताच नष्ट होतात. काही पुरोगामी लेखक धोरणी असतात. ते बाहेर या टोळीत राहतात पण आपल्याला लिहायचे तेच लिहितात. लेखन सतत राजकीय भूमिकेच्या डबक्यात घोळवत ठेवत नाहीत. तरीही पुरोगामी त्यांना स्वीकारत राहतात.

नीट पाहिले असता, असे दिसते की हे तथाकथित पुरोगामी सोडता, अमुक भूमिका घ्या म्हणून इतर कुणी लेखक-कलावंतांवर दबाव आणताना दिसत नाहीत. प्रत्येक चांगला लेखक स्पष्टपणे आपला पाठीराखा असावा असे त्यांनाही वाटते. पण तसे नसेल तर ते प्रत्येक ठिकाणी ढवळाढवळ करत नाहीत. हे पुरोगामी लोकच लगेच लेखक-कलावंतांची व्यक्तिगत मूल्यमापने सुरू करतात. कालपर्यंत ग्रेट असलेला आज एकदम टाकाऊ होतो ! असुरक्षितता आणि न्यूनगंड यांतून त्यांच्यांत एक प्रकारचा आक्रमकपणा येतो. कोणत्याही सत्ताधाऱ्याला इथे गरिबांचे भले केल्याशिवाय सत्तेवर राहताच येणार नाही. पण आम्हीच तारणहार, आम्हीच काय ते भले करणार अशी पुरोगाम्यांची खात्री आणि त्यातून येणारा कट्टरपणा असतो.

या सगळ्या प्रकारात मुक्त अभिव्यक्ती मार खात जाते. समाजाचा सांस्कृतिक स्तर घसरत जातो. मुख्य म्हणजे भाषेच्या शक्यता शोधणे कमी कमी होत गेल्याने भाषा फक्त उपकारापुरती उरते. मराठी माणसांच्या संख्येमुळे जगात या भाषेचा जो नंबर आहे त्याला नसतो धोका पण भाषा बेजान होत जाते.

हा काही एखादा प्रबंध नव्हे. ही आहेत इम्प्रेशन्स आणि अनुभव. हेही पुरोगाम्यांना सहन होणार नाही आणि क्षणात त्यांची सहिष्णुता खतम होईल याची मला जाणीव आहे. हे मुद्दे मी या ना त्या प्रकारे मांडत आलेलोच आहे. मी स्वत: कुणाचाही दबाव घेत नाही. माझे लेखन आवडले नाही की काही लोक लगेच व्यक्तिगत मूल्यमापनावर येणार याचा मला अंदाज असतोच. मी स्वत:ला ना पुरोगामी म्हणवतो ना हिंदुत्ववादी. पण, तत्त्वज्ञान आणि अध्यात्म ( धर्म नव्हे ) यांच्या चिंतनात्मकतेशिवाय कला-साहित्य हे व्यापकपणे मानवी जगण्याला प्रस्तुत होत नाही, असे माझे आकलन आहे. या दोन्ही गोष्टींचे पुरोगाम्यांना वावडे असते. तसे वावडे बिगर-पुरोगाम्यांना नसते.  कुणा एकाच्या वा कुणा टोळीच्या मताप्रमाणे आख्खे जग होण्याची कदापि शक्यता नाही. हे सत्य समजून घेऊन कला-साहित्य-विचार ही क्षेत्रे मोकळी असण्याची आवश्यकता आहे. अन्यथा सर्वांचेच नुकसान आहे.

--- ००० ---

Champra Deshpande  यांचं ढोलताशे हे नाटक

प्रतिगामींच्या विरोधात नाहीये नि ते नाटक केवळ पुरोगामी विचार प्रसृत करणारं नाटकही नाहीये. मुळात ते कुठला विचार मांडणारं नाटक नाहीये. --- लाखे.

नाव

एका व्हिडिओत जिथे माझे नाव असायला हवे तिथे ते आलेले नाही. एका ठिकाणी माझे भाषण शब्दांकन करून छापले गेले तिथेही शब्दांकनकर्त्याचे नाव आहे पण माझे, भाषणकर्त्याचे नाही. " चांगले काम हे निनावीच असते " असे मी कधी कधी म्हणत असतो -- ते नियतीने ऐकले असावे !

--- ००० ---

हिंस्र आणि क्रूर

मी लिहिलेले डाव्यांना आवडले तर उजवे म्हणतात, याचा अर्थच मी हिंस्र आणि क्रूर असणार. उजव्यांना आवडले तर डावे मला तेच म्हणतात. म्हणजे आख्खा भारत हिंस्र आणि क्रूर आहे की काय ? हिंस्र आणि क्रूर नसलेली माणसे शोधून त्यांना आवडेल तेच लिहावे म्हटले तर कुणी सापडे ना. करावे काय ?

– ० –

चाणक्य ( दोन अंकी नाटक )

मूळ हिंदी लेखक – मिहिर भूता, मराठी अनुवाद – शैलेश दातार, दिग्दर्शक – प्रणव जोशी,

नेपथ्य – संदेश बेंद्रे, पार्श्वसंगीत- निनाद म्हैसाळकर, प्रकाशयोजना- राहुल जोगळेकर,

रंगभूषा - कमलेश बीचे, वेशभूषा - नीरजा पटवर्धन

निर्माते- सुहास दातार, हरिहर केशव म्हैसकर, प्रसाद व्यवहारे

सूत्रधार - दीपक गोडबोले.

हे सगळे उल्लेख करणे अत्यावश्यक आहे, असे हे नाटक आहे.

इतके भव्य, भरजरी नाटक यापूर्वी मी कधी, कोणते पाहिले होते ते आठवत नाही. विविध दृश्यांचे साजेसे नेपथ्य आणि तशीच उत्तम प्रकाशयोजना यांमुळे सुरुवातीपासूनच भव्यतेचा अनुभव येऊ लागतो. निरनिराळे ध्वनी आणि संगीत यांनी नाटक खुलत जाते. रंगभूषा अगदी ती म्हणजे तीच पात्रे, अशी. विशेष उल्लेख वेशभूषेचा करायला हवा. त्याच काळाचा भास निर्माण व्हावा आणि प्रत्येक पात्राचे त्या समाजातले स्थानही जाणवावे अशी विचारपूर्वक केलेली वेशभूषा आहे. या सर्व पोषाखांची कल्पना करून ते सर्व प्रत्यक्षात आणणे हे खरेच विशेष आहे. थोडक्यात म्हणजे अशा ऐतिहासिक नाटकाला लागणारे सर्व काही उत्तम स्वरूपात इथे आहे.

चाणक्य या विद्वान आणि धूर्त ब्राम्हणाच्या प्रमुख भूमिकेत आहे शैलेश दातार. तो माझ्या एका नाटकाच्या तालमी करत होता त्यामुळे मला माहीत होता. ते काही घडले नाही पण या नाटकातला त्याचा उत्तम अभिनय पाहून छान वाटले. या नाटकाचा एकूणच अभिनय विभागही सशक्त आहे. आणि हे सगळे हाताळणारे दिग्दर्शक प्रणव जोशी ! प्रत्येक दृश्य कसून बसवलेले आहे. या नाटकातले संवाद त्या ऐतिहासिक भव्यतेला शोभणारे आहेत. सर्व पात्रांनी ते सहजपणे म्हणणे यातही दिग्दर्शकाची कमाल आहेच. मूळ नाटक हिंदीतले असून त्याचा चांगला अनुवाद शैलेशनेच केलेला आहे. प्रयोग अर्थातच सुविहीत, छान होतो.

अखंड भारताचे उत्तुंग ध्येय चाणक्याच्या मनात असते. ते तो अनेक प्रयत्न करत, कपट-कारस्थानेही करत कसे पुढे नेत राहतो त्याची ही कथा आहे. लोक साधन-शुचितेबद्दल बोलतात पण इथे ध्येय मोठे असणे हेच महत्त्वाचे मानलेले आहे. त्यासाठी कोणतेही उपाय वापरायला हरकत नाही, असे हे तत्त्वज्ञान आहे. नाटकात, खरे-खोटे, कपट , निष्ठा, विश्वासघात, विषप्रयोग, खून – असे सर्व काही आहे. नाट्यमय घटना आणि नाट्यमय संवाद यांमुळे प्रयोग प्रेक्षकांना पकडून ठेवतो.

हे सगळे ठीक पण हे नाटक प्रचारकीही आहे, हे लक्षात घ्यावे लागते. प्रत्येक कलाकृतीत काही एक राजकीय भूमिका असायला हवी असे म्हणणाऱ्यांची अपेक्षा हे नाटक पूर्ण करते. इथली ही भूमिका अर्थातच सर्वांना पटणारी असू शकत नाही. नाटकाला गर्दी होती आणि त्या उपस्थित प्रेक्षकांनी अनेकदा पसंतीच्या टाळ्या दिल्या. शिवाय पुण्यातल्या बीजेपीच्या नेत्या मेधाताई कुलकर्णी यांनीही निम्म्या प्रयोगाला उपस्थिती दिली. नाटकाचा जो हेतू आहे तो साध्य होत राहतो हे दिसतेच.

मी स्वत: मात्र प्रचारकी कला नाकारत आलेलो आहे. भूमिका डावी असो की उजवी, कलाकृती प्रचारकी असली की ती एका मर्यादेत फिट होते असे मला वाटते. मानवी जीवनाचा विस्तार पाहणारी, त्याला अमुक एक वळण वा दिशा न देणारी कलाकृतीच एकूणात मौल्यवान असते असे मी मानतो. त्यामुळे मला हे नाटक ग्रेट वगैरे काही वाटले नाही. ठीक वाटले.

नाटकाच्या सुरुवातीच्या भागात चाणक्याच्या तोंडी ‘ विचारव्याधी ‘ असा शब्द येतो. मला तो महत्त्वाचा वाटतो. एकूणच भूमिका आणि राजकीय कट्टरता या विचारव्याधीच असतात. या व्याधीचा समाजातला अतिरेक आपण अनुभवतो आहोत. दोन्ही बाजूंना तपाशीलांचे ढीग, खंडन-मंडनाचे जंगी उत्सव, खऱ्याखोट्याची गरजच नष्ट होणे, चारित्र्यहनन, आणि अनेक प्रकारची हिंसा दिसते – ही पूर्ण समाजाला लागलेली विचारव्याधीच आहे. दोन्ही बाजूंचे लोक म्हणतील की आमची सत्याची, न्यायाची बाजू आहे, हे सगळ्यांनी मान्य करा म्हणजे ही व्याधी जाईल. एवढे भाबडे तर काही घडणार नाही. आपापल्या उत्तुंग ध्येयासाठी सगळे लढतील, साधनशुचिता वगैरे तत्त्वे निरर्थक ठरतील आणि त्यातून जे घडेल ते घडेल. ‘ तुम्ही माझ्या बाजूचे नाही म्हणजे तुम्ही नालायक आहात ‘ असा या सध्याच्या विचारव्याधीचा सारांश आहे. हे वाचून काही बावळट लोक मला विचारतील की, ते ठीक, पण तुमचे मत काय ? माझे उत्तर असे असेल – योग्य वेळी माझ्या दृष्टीने विचार करून ज्याला द्यायचे त्याला मी मत देईन, पण, कलाकृती ही मतवाली असू नये. जगणेही सतत राजकीय घाणीने परिप्लुत नसावे. शेवटी, ज्याचीत्याची मर्जी !

--- ००० ---

प्रत्येक लेखकाने कुणाला काय वाटते आणि कोणतेही फडतूस राजकीय कट्टर कॉमेंटकार काय म्हणतात याची पर्वा न करताच लिहायला हवे !

सगळ्या समस्यांचे बीज माझ्यात आहे असे मला दिसते -- मी तिकडे लक्ष देतो -- मी अमुक करत नाही म्हणजे हिम्मत नाही असे तुम्ही समजू शकता. चांगल्या कलावंतांना खरी हिम्मत कवटीच्या आत करावी लागते, हे एक दुर्लक्षित सत्य आहे. ०१-०४-२४,

मन…

लवकरच रंगभुमीवर..

नाटक --एक वर्तमान : चं.प्र. देशपांडे : एक काव्यविमर्श

ही एका साहित्यिकाची तत्वचिंतनपर कविता. विस्मयाने स्तंभित होत गुंतून पडावे असे क्वचितच काही वाचनात येते. ही कविता सकृद्दर्शनी निरपेक्ष कालसंबधित वाटली तरी ती व्यक्तीमात्र व जगताचे असणे (being) होणे किंवा घडणे (becoming) तसेच करणे वा कृतीशीलता (doing) असा अस्तित्वाचा समग्र पैस व्यापणारी आहे. यातील कालभाष्य संदर्भप्रचूर असल्याने एका वाचनात कळणारे नाही. परंतु ती कवीने अटीतटीच्या जीवन प्रसंगात राहून मांडलेली एक कैफियत असल्याने एकाच वेळी त्याचे नाट्यविषयक कलाभान व जीवन दृष्टीकोन दर्शवणारी आहे. तत्वतः अनंत (infinite) काळाच्या सान्त (finite) भानाने व्यक्तीच्या जागृतावस्थेत संविद्-जाणिव (conciousness) विलसत असते. त्यात विश्व एक घटित (phenomenon) या रूपाने प्रत्ययास येते. गीतेतील कालसंबधित "अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत । अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ।।२.२८।। तसेच नासदियसुक्तातील सृष्टीपुर्वी सत् असत् काहीच नव्हते इत्यादी आपल्याला परिचीत असते. त्यानुसार 'असणे' किंवा व्यक्त (existence) हे दोन अव्यक्तांच्या नसण्याच्या (void) दरम्यान भासमान होणारे आहे एवढे तरी कळण्यासारखे आहे. थोडक्यात व्यक्त-वर्तमान हे अमूर्त नसून प्रखरमूर्त स्वरूपातील तसेच कालशृंखला भूत-वर्तमान-भविष्य अशा प्रकारची आहे. परंतु या कवितेत आरंभ ते अखेर याचा एक संकल्पित व्यत्त्यास प्रत्ययाला येतो. तो धारणारूप आहे की छद्म उपहासगर्भ आहे असाही प्रश्न पडून जातो. आरंभीच्या कडव्यात कविने वास्तवाची व्याख्या करत त्याची भरवण भूत-भविष्याने घडल्याचे म्हटले आहे. त्याच्या दृष्टीने वर्तमान अस्तित्वातच नाही. ते पुढच्या कडव्यात अधिक स्पष्ट होते (समजतेय का/वर्तमान म्हणजे निव्वळ पोकळी / काहीच नसलेली / ना ग्रह ना तारे ना सूर्य ना पृथ्वी) याचा अर्थ कविचा संकल्पित नाट्यकालावकाश भूत भविष्य व्यापणारा असून त्यामध्ये वर्तमानाला कसलीच जागा वा भुमिका नाही. वर्तमानात जगण्याची कल्पनाही त्याला विसंगत वाटते. त्यामुळे वर्तमानात नाट्य घडविणेही त्याला उलट किंवा विरूद्ध प्रकारातील व म्हणून अशक्य कोटीतील वाटल्यास नवल नाही. पुढच्या ओळीतून क्रमशः वर्तमानाला दिलेल्या नकारांची एक चढती कमानच अनुभवास येते. थोडक्यात कविचा नाट्यावकाश भूत-भविष्याने आधारभूत अशा ज्ञात विश्वातील असून वर्तमानाशी त्याचा संबंध तूटलेला आहे. वर्तमान ही निव्वळ पोकळी असल्याने त्यात शोधण्याजोगे काय असते? असा त्याचा सवाल आहे. त्यामुळे माहितीशोधक संगणकालाही त्यातून काही गवसण्यासारखे नाही अशा निष्कर्षाप्रत कवि येतो. इथे विज्ञानाची वर्तमान संदर्भातील जी अज्ञेयता सूचीत होते ती हतबलता की सैद्धांतिक स्वरूपातील असाही एक प्रश्न समोर येतो. तो अभावितपणे आधुनिक पुंजयामिकीतील (Quantum mechanics) अनिश्चितता तत्वाचे स्मरण करुन देतो.पुढे हे सूत्र नाट्य (की न-नाट्य) विषयातील समावेशक घटकसंदर्भात एक प्रश्नांकन स्वरूपात विस्तारत जाते.यात अशा नाटकाचा दिग्दर्शक नायक नायिका नेपथ्य प्रकाशयोजना प्रेक्षक स्वगत असे बहुतांश घटक प्रविष्ट होत एका व्यापक नकाराचा स्वर बुलंद करताना दिसतात. एवढेच नव्हे तर काही नाटके ( वेटींग फाॅर गोदो, एक शून्य बाजीराव गार्बो (?) व नाटककार

यांचाही उल्लेख केला जातो. अखेरीस नाटक कसे घडायला हवे याची कविला अभिप्रेत भुमिका येते ती -- घडून न घडल्यासारखे व्हायला हवे -- या स्वरूपात. ते पुष्कळच आध्यात्मिक आशयाचे वाटते. तो शांकरभाष्यातील अजातवाद (समर्थांच्या भाषेत ' अगा जे घडलेची नाही)म्हणून प्रसिद्ध आहे. या कवितेतील रूपकयोजनेत नाटकाचे प्रयोजन कालसंदर्भात की कालाचे प्रयोजन नाट्यसंदर्मात की कवितेच्या शिर्षकात आहे तसे दोन्ही अन्योन्याश्रय स्वरूपात असा एक प्रश्न पडून जातो. खरे तर ही संपुर्ण कविताच पृच्छा स्वरूपातील एक प्रश्नमालिका असल्याचे दिसून येते. कवितेचा काहीसा सकारात्मक शेवट सोडल्यास यात कसलेही गृहीतक नाही. असलेच तर ते गणितातील शून्य अभ्युपगमासारखे (Null hypothesis) आहे. याला मृषा किंवा ॲब्सर्ड म्हणता येणार नाही. उलटपक्षी ते अशा प्रवृत्तीचा शोध घेत त्याचे अंतरंग उघड करणारे आहे असे म्हणता येईल. कालावकाश व वर्तमान संबंधित असल्याने या काव्यनिवेदनाला घटितार्थशास्त्रीय म्हणावे की अस्तित्ववाचक प्रश्नांकन करणारी म्हणून याला अस्तित्ववादी म्हणावे की वस्तुनिष्ठा व एकसत्व तर्काभासाला विरोधी जाणारी म्हणून उत्तराधुनिक म्हणावे असा माझ्यासमोर प्रश्न आहे. अर्थातच यात नामांकनाचा सोस नसून प्रवृत्तीचा शोध घेण्याचा प्रयास आहे इतकेच.

Champra Deshpande

मन:पूर्वक धन्यवाद, दरेकर सर !

कविता अशी –

नाटक – एक वर्तमान

न कळता बोलून फायदाच काय
वर्तमानात जगा हा बोध ठीक
पण कळतोय का अर्थ
वास्तवात खरे तर असतात
भूतकाळ आणि भविष्यकाळ
वर्तमान काळ नसतोच
पण आता
उलटे करा म्हणताहेत
भूत भविष्य जाऊ द्या
वर्तमानातच घडवा नाटक
समजतेय का
वर्तमान म्हणजे निव्वळ पोकळी
काहीच नसलेली
ना ग्रह ना तारे ना सूर्य ना पृथ्वी
आहे का असा एखादा संगणक

जो वर्तमानात करेल सर्च
आणि शोधेल काही
माहिती नसलेले
कोण असेल दिग्दर्शक
या नसलेल्या नाटकाचा
कोण करेल याची प्रकाशयोजना
मेंदूबाहेरची
कोणती अभिनेत्री
होईल माता
भावनाहीन
आणि कोणता नायक
म्हणेल स्वगते
नसण्याचे स्वागत म्हणून
प्रेक्षागृहात असतील
एक एक प्रेक्षक
स्त्री असो की पुरुष
ज्यांचे डोळे असतील
कथाबाह्य आणि कसलीच
अपेक्षा न करणारे
बाहेरून काही नकोच आहे
कारण मी म्हणजे एक
खजिना आहे पूर्ण गरीब
हेच तर आहे
उपकाराचे नाटक
आपोआप चालणारे
म्हटले तर उरलेले
गालिब म्हणाला
खयाल अच्छा है
विचारांकडे पाहून तो हसत होता
विचार समजत होते की ते आहेत
येणार कुणीच नव्हते
हे तर नसलेल्या गोष्टींचा

शोध घेणारे नाटक

बेकेट म्हणाला मलाच नाहीं माहीत

तर तुम्हाला सांगू काय

खानोलकरांनी सांगून ठेवले

कोणत्या काठीचे हट्ट चालतील

आणि कोणते नाही चालणार

ते होते बाजीराव पण शून्य उरले

नाटकात खुपसलेल्या सुरीने

मेलेली विद्यार्थिनी

असलेले काही लैंगिक देत होती

की नसलेल्या जगात अंतर्धान पावत होती

एका नाटकात आला संवाद

तू आधी होतास तसाच चालला असतास

नाटक असेच तर घडायला हवे

काहीच न घडल्यासारखे

वर्तमानात

--- 000 ---

To think new thoughts you have to break the bones in your head.

– Jean -Paul Sartre ( हीच ती कवटीच्या आतली हिंमत --- ).

रवीन्द्र दामोदर लाखे

April 3 at 11:21 AM

·

https://www.facebook.com/share/p/FuJJDEXMU22yD134/?mibextid=oFDknk

काल चंप्रंचं हे पुस्तक घरी आलं. यात चंप्रंची महत्त्वाची नाटकं आहेत. ते स्वतःच आपलं पुस्तक प्रकाशित करतात. मराठीतला अत्यंत महत्त्वाचा कवी, नाटककार आणि तत्त्वचिंतक - निरपेक्ष पणे आपला लेखन करीत राहणारा हा माझा मित्र आहे, फिलॉसॉफर आहे नि गाईडही आहे. मूख्य म्हणजे लेखकाआधी तो माणूस आहे. याही पुस्तकाचं मुखपृष्ठ म्हणजे चंप्रनी काढलेला फोटो आहे. कॅलिग्राफी Priya Deshpande ची आहे. यातलं एक नाटक मी केलेलं आहे - तशी त्यांची चार नाटकं मी केली आहेत. शिवाय परिशिष्टात नाटककार चंप्र असा माझा लेख आहे. आपल्या आयुष्यात असा एखादा ग्रेट माणूस असायला फार मोठं भाग्य लागतं - खूप मोठी माणसं पाहिली त्यांचा सहवास मिळाला पण या सम हाच.

नाणेफेक आणि इतर पाच नाटके

हे पुस्तक गेल्या २५ मार्च ला प्रकाशित झाले. इतर काही कामांत व्यस्त होतो, त्यामुळे, त्याच्या विक्रीबाबतची पोस्ट इथे द्यायचे राहिले होते. सदर पुस्तकात खालील नाटके समाविष्ट आहेत ---

ए, आपण चहा घ्यायचा ?

धागेदोरे

नाणेफेक

सध्या तरी शेवट गोड

सामसूम

झालं गेलं विसरून जाऊ

( अर्थात -- क्लॅरिटी )

आणि विशेष म्हणजे

परिशिष्टात रवीन्द्र दामोदर लाखे यांचा, माझ्या नाट्यलेखनाबाबतचा अभ्यासपूर्ण लेख आहे.

हे पुस्तक ३८४ पानांचे असून त्याची किंमत रु.४००=०० ( रुपये चारशे फक्त ) आहे.

सध्या त्याची सवलतीची किंमत रु.३००=०० ( रुपये तीनशे फक्त ) पोस्टेजसह ठेवलेली आहे.

खरेदी करायचे झाल्यास पैसे पाठवण्यासाठी आवश्यक माहिती अशी आहे ---

Chandrakant Prabhakar Deshpande

HDFC BANK Saving Account No.03591000003204

IFSC : HDFC0000359

For G pay : Mahesh Deshpande mbl 9970065875 OR

UPI ID gathaent-3@okhdfcbank

Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा.

धन्यवाद !

गनिमी काव्याचे नमूने

--- विश्वास कणेकर, प्र ० वर्णमुद्रा पब्लिशर्स.

हा संग्रह वाचताना आवडलेल्या ओळी ---

माझ्याबद्दलच्या त्यांच्या अज्ञानातच

मी जगत राहीन ( पान १४ )

खऱ्याखुऱ्या खऱ्यापेक्षा

खोटंखोटं खरंच

खरंखुरं वाटतं ( पान ३४ )

प्रेत नसणे म्हणजे जिवंत असणेच की ( पान ३९ )

तूच आधी गेलीस तर ?

तुझं नसणं

म्हणजे माझ्यात मी नसणं

माझंच जाणं मी पाहणं ( पान ७४ )

आता तरी मास्क काढ मनावरचा

आणि

ये भानावर. ( पपान ९५ )

आठवणींचं शेवाळ वर्तमानावर.

केव्हा यायचं असतं भानावर ? ( पान १०७ )

--- अशा ओळी लिहिणारा कवी त्याचे समस्याप्रधान जगणे उलटेपालटे करून पाहतो आहे, हे जाणवते. तरीही क्वचितच एखादी पूर्ण कविता सलग वा सखोल जाण व्यक्त करते, असे दिसते. दिसणं ( पान ३५ ) आणि खेळखंडोबा ( पान ७५ ) या कविता तशा म्हणता येतील. हे असे का घडत असावे, असा प्रश्न हा संग्रह समोर ठेवूनच विचारता येतो. कवी प्रांजळ असल्याने इथेच काहीसे उत्तर सापडते. याचे काहीसे उत्तर खेळखंडोबा या कवितेत आहे. स्वत:ला बोन्साय करणे स्वीकारल्यावर कविता फुलवणे कशाला ? तसेच आत्मकलेश या पान ९७ वरच्या कवितेत या ओळी येतात –

कधी सुटणार ही माझी कुबट सवय

सांगण्याची ?

त्याच आणि तसल्याच जुनाट शब्दांतून ?

याचे कारण, कविता लिहायची हे ठरलेले आहे, जगणे राहू दे जमेल तसे – असे घडत असावे. हे म्हणजे मग घोड्यापूढे टांगा बांधणे होते. अशा अवस्थेतूनही बरेच कवी जात असणार. या अवस्थेला प्रांजळ आणि खुली अभिव्यक्ती देणारा हा संग्रह आहे.

--- ००० ---

राजन बापट --

आपल्या सर्वांची नाटकांची आवड न संपणारी. नाटकाच्या हौशीबद्दल नव्याने लिहायचं ते काय?

एक पूर्ण नाटक बसवायचं तर त्यामागचा व्याप मोठा. थिएटर बुक करण्याचा खर्च, वेषभूषा-रंगभूषा-नेपथ्य-प्रकाश या सर्वांचा जामानिमा. ते सर्व माहिती असणाऱ्या तंत्रज्ञांची उपलब्धता. नटांनी करायची पाठांतरं, त्यांच्या वाचिक आणि आंगिक अभिनयाचा कस. प्रेक्षक येतील का? तिकिटं काढतील का? पैसे बुडतील की खर्च भरून निघेल? आणि हे सर्व करून शेवटी प्रेक्षकांना ते बरं वाटेल की बहुतांश लोक नाकंच मुरडतील?

हे सर्व प्रश्न अनिवार्य खरे. त्यामुळे नाटक उभं करायचं तर वेळ, परिश्रम, पैसे आणि मानसिक तयारी भरपूर हवी. प्रेक्षकांच्या अभिरुचीचा विचार आला म्हणजे नाटकाच्या विषयांवर. अभिव्यक्तीवर नाही म्हण्टलं तरी थोडासा लोकानुनयी विचार करण्याची गरज आली.

नाट्यवाचनासारख्या गोष्टींमुळे यातल्या बऱ्याच गोष्टीतून सुटका होते खरी. नाटकांचं स्क्रिप्ट वाचतात कसं? कुठल्या संहिता वाचाव्यात? त्यात काही प्रयोग करणं शक्य आहे का? यांसारख्या प्रश्नांची प्रयोगशाळा म्हणजे नाट्यवाचन. वॉशिंग्टनच्या मराठी रसिकांकरता ही प्रयोगशाळा घेऊन येतो आहोत. कधी? कुठे? साधारण किती वेळ? ती सारी उत्तरं सोबतच्या फ्लायरमधे.

ह्या आमच्या उपक्रमाला सर्व नाटककारांनी त्यांची परवानगी दिली ह्याबद्दल त्यांचे अनेक आभार. ह्या नाटककारांमधे पुण्याचे ज्येष्ठ नाटककार चं प्र देशपांडे Champra Deshpande ह्यांचाही समावेश आहे, ह्या सर्व बाबी हुरूप वाढवणाऱ्या आहेत.

नाटकांच्या वाचनानंतर त्यातल्या वाचक कलाकारांशी तुम्हाला संवाद साधता येईल. नाट्यविषयक चर्चा म्हणा, गप्पा म्हणा. आणि हे नेहमीप्रमाणेच चहा कॉफी आणि थोड्याश्या संध्याकळच्या नाश्त्याबरोबर - एका रविवारी दुपारी. सोबत फ्लायर आणि Evite ची लिंक जोडतो आहे. येण्याचं ठरवत असलात तर Evite वर नक्की RSVP पाठवा. सर्वांचं स्वागत आहे. कार्यक्रम विनामूल्य आहे.

https://www.evite.com/event/002EINHTNQ3MC4EWSEPO6ISZTNTP4I

कवी होणे

मी लहान असताना कधी कधी माझ्या वडिलांनी धावत्या लिपीत इंग्रजीत काही लिहिलेले मी बघत असे. आपणही का लिहू नये असे या विचाराने दोनतीनदा तसेच काही उलट्यापालट्या रेषा आणि मध्ये मध्ये थोडी जागा सोडलेली असे गिचमिडून वडिलांना मी त्याचा अर्थ विचारला होता. ते म्हणत, याला काही अर्थ नाही. त्यासाठी आधी इंग्रजी यावी लागते आणि धावती लिपी यावी लागते. यावर मी खट्टू होत असे. पुढे, मला साहित्याची आवड आहे असे गृहीत धरून मी सत्यकथा आणि मुख्यत: त्यातल्या कविता वाचू लागलो. मी त्यावर बारकाईने विचार करत असे. एकूण सूक्ष्म निरीक्षणांती मला असे लक्षात आले की एकमेकांशी संबंध नसलेले शब्द घ्यायचे आणि अर्थाचा आभास निर्माण करण्यासाठी मध्ये मध्ये आठवतील ती क्रियापदे टाकायची की होते कविता. हे माझे ज्ञान मी लगेच अंमलात आणले. तशा सुमारे दहा कविता लिहून दिल्या पाठवून सत्यकथेकडे. त्या एका आठवड्यात उलट टपाली साभार परत आल्या. एकदा नसतील कळल्या त्यांना आपल्या कविता म्हणून पुन्हा एकदा तसाच प्रयोग करून पाहिला. याही वेळी ‘ तुझे ठेव तुजपाशी ’ म्हणून त्याही परत आल्या !

सांगायचे कारण असे की रूटीन घिसेपिटे अनुभव आणि गुळगुळीत आदर्शांच्या कल्पना एवढ्या भांडवलावर कविता होतात असे अनेकांना वाटते, असे दिसते. ते कवितेसारखे लिहिताही येते आणि जरा पैसे असले की त्याचे पुस्तक काढणेही आता फारसे अवघड राहिलेले नाही. ( मी स्वत: काढतोच आहे की माझी पुस्तके ! ) आणि गंमत म्हणजे अनेकांना असे वाटते की असे लिहीत राहिले की एखादा समीक्षक येईल आणि त्याला ग्रेट म्हणेल ! ( तसेही घडू शकण्याचा काळ आहेच ! ) केशवसुतांना कुणी विचारले होते म्हणे की मला कवी व्हायचे आहे तर काय करावे लागेल ? ते म्हणाले होते म्हणे की कविता ही वीज असते, ती भाजूनही काढू शकते, ती आहे का आपली तयारी, हे आधी पाहावे. सार्त्र म्हणतो की सर्जक लेखन करायचे असेल तर मेंदूतली हाडे मोडली जाण्याचा धोका पत्करावा

लागतो ! बरे, ठीक, मला व्हायचेच आहे लेखक वा कवी तर चला, मी आहे तयार तशी वीज हातात धरायला वा मेंदूतली हाडे मोडून घ्यायला, त्यासाठी काय करू ?
आदर आणि प्रसिद्धी मिळवण्यासाठीचा, ' ग्रेट रायटर कैसे बनोगे ', असा हा सोपा मार्ग नाही असू शकत. आधी खरोखरचे जगणे, खरोखरचे प्रश्न, अशीच असणार ती प्रक्रिया. प्रसिद्धीच्या भिकारडेपणातून चांगली कविता नाही लिहिली जाणार ! स्वत:च्या जगण्याकडे गंभीरपणे पाहण्याची आच आणि निकड असणे हेच महत्त्वाचे. गंभीर याचा अर्थ विनोदविरहित नव्हे. आधी जगणेच धगधगते हवे, मग कविता लिहिली जाईल अथवा न जाईल. कविता लिहिणे घडायलाच हवे असे वाटत नसेल तरच सर्जक कविता लिहिली जाऊ शकेल ! ( -- असे वाटते ! )
--- ००० ---

'नाणेफेक' या चंप्रंच्या नव्या पुस्तकनिमित्त बुधवारची आमची संध्याकाळ स्मरणीय झाली! चंप्र सरांबरोबरच्या गप्पा नेहमीच एक समृद्ध करणारा अनुभव असतो. गप्पा किती रंगल्या याचे थोडक्यात वर्णन -- 'कोई हमदम ना रहा', 'अकेला हूं मैं', 'साथी ना कोई मंझिल' अशी माझी काही अतिशय आवडती गाणी आहेत असे म्हणत सर मस्तपैकी गाऊ देखील लागले, म्हणजे बघा.. चंप्रंना आम्ही याची देही याची डोळा गाताना अनुभवले! खरे-खोटे करायचे झाल्यास 'नाणेफेक' आहेच!! ( गिरीश रांगणेकर आणि सुशील शिरसाठ यांच्यासह फोटो ).

मजेदार आठवण -- आता या दोघांच्या संगीत कार्यक्रमात गाण्याची ऑफर आली आहे ! काय काय करणार ? !

Satish Tambe यांच्या एका पोस्टवर दिलेली कॉमेंट ---
कवितेत, हे विशेषण अमूकच विशेष्याचे असा निर्णय होण्याची गरज नाही -- त्या अनिश्चिततेसहच कविता जाणवत जावी. बौद्धिक अनेकार्थता ठीकच पण एकूण भान या अर्थी चांगल्या कवितेला एक ' न कळणारा ' अर्थही असतो. म्हणजे जाणवतो पण त्याचे बौद्धिक निवेदन शक्य होत नाही.

मेहनत तर जोरदार चालू आहे -- प्रयोगाला शुभेच्छा ! ( मन ).

प्रयोगाला होऊ द्यात हो सात वर्षे -- माझी नाटके असतात ---
सदाहरित देव आनंद ! ( रिनोव्हेशन या हिंदी नाटकाचा फोटो ).

घोषणा --- ( गुढी पाडवा पोस्टर – मन ).

कवितेला
थोडे तरी
बातमीमूल्य असावे लागते.

वासकसज्जिका ( कवितासंग्रह )

--- नेहा भांडारकर , प्र ० सायन प्रकाशन.

वासकसज्जिका म्हणजे सर्व काही आवरून, नटून प्रियकराची वाट पाहणारी सुसज्ज नायिका. या कवितासंग्रहातल्या कविता पाच विषयांत विभागलेल्या आहेत. ते विभाग असे --- प्रकृतीपुरुष, स्त्री आणि संस्कृती, अधिक्रमण-स्पर्श-मोक्ष, कविता आणि पाऊस. या संग्रहाच्या नावाप्रमाणेच त्यातल्या कवितांची भाषाही ‘ राजेशाही ‘, लखलखीत आणि जरा जडच म्हणावी अशी आहे. त्यामुळे, अर्थातच ‘ धीरे धीरे चल ‘, अशा पद्धतीने हा संग्रह वाचावा लागतो. ( याला कुणी ‘ वाचकभंजिका ‘ म्हणू नये म्हणजे झाले ! ) एका अर्थाने या कवितेलाच, वाचकासाठी नटूनथटून सज्ज असलेली चमकदार कविताही म्हणता येईल. ही एक प्रकारची स्वप्नील उदात्तता आहे. एकूणात ही स्वच्छंदी – रोमँटिक कविता आहे. कधी आहे तेच उत्तुंग भाषेत व्यक्त करणारी तर कधी कल्पनेने उत्तुंगता निर्माण करणारी. सिनेमात जसे राज कपूर आणि सुभाष घई हे शोमन समजले गेले त्याचप्रमाणे ही भाषेतली आतसबाजी आहे. अहंकार नष्ट होऊन मुक्ती मिळणे हा एक ( माहीत नसलेला असा ) एक मुक्तीचा मार्ग असतो आणि दुसरा म्हणजे आहे हेच जग एका वेगळ्याच स्तरावर असल्याचे कल्पून त्यापासून दूर जाणे, हा. ही कविता या दुसऱ्या मार्गाने जाणारी वाटते. क्वचित कधी ही कविता आहे ते व्यक्त करते – ते पाहून, त्याच्या तुलनेत, या कवितेची मूलवृत्ती अधिकच ठळकपणे जाणवते.

कविता कशी असावी असे वाटते तर अशी –

शब्द अंबर ( पान ९९ )

शब्दांबरावर लटकवावीत<br>
झुंबरं अक्षरांची<br>
प्रज्वलित व्हावेत<br>
अगणित दीप कवितांचे<br>
नवरसाच्या मिलाफाने<br>
झुलावे इंद्रधनूने<br>
सप्तरंगी लेणे कोरून क्षितिजावर<br>
शुभ्र करडे काळे सावळे<br>
तरंगावेत ढगांचे पुंजके<br>
झिरपावे कवीने<br>
होऊन श्रावण<br>
अन गावे रिमझिम गाणे

लेणी, उत्खनन, परंपरागत कल्पना, प्रतिमा अशा मार्गाने ही कविता व्यक्त होत राहते. यात थोडा बदल म्हणजे, क्वांटम थिअरी, चुंबकीय लहरी, लॉग आऊट, स्क्रीन शॉट , वगैरे असे समकालीन शब्दही येतात. जून वा परंपरागत वा काल्पनिक वास्तव आणि आजचे प्रत्यक्ष वास्तव या दोन्हींतही ही कविता वावरते. ही कविता बुद्धिजीवी

कलाप्रेमींच्या आवडीनिवडी जपते. ( पान ६१ ). आदर्श, बोध, वैचारिकता, निवेदन पूर्ण करणे, सारांश सांगणे यांच्या मर्यादा अनेक ठिकाणी पडलेल्या दिसतात, ते यामुळेच असावे. कविता कशी असायला हवी हे जणू ठरलेलेच आहे. त्यामुळे या कवितेत अज्ञातातील झेप क्वचितच दिसते. तरीही खालीलप्रमाणे अनेक मिती असलेल्या, अर्थपूर्ण ओळीही अनेक ठिकाणी दिसतात –

शक्य झाल्यास शोषून घे तू
आर्द्रता माझ्या डोळ्यांतील
अन बरस धरणीवर मनसोक्त
पूर्ण रिक्त होईस्तोवर ( पान ११९ )

तर कधी कोश बनवत राहिले
आयुष्यभर एकांतवासाचा ( पान ३३ )

खोलवर झालेल्या जखमा
त्या जखमांचे व्रण
हव्या नको असलेल्या
दृश्य अदृश्य स्पर्शांचे डाग
कधी कधी विस्मृतीच्या काळोखातून
उजेडात येतात
अधिक गहिरे अर्थ घेऊन ( पान ४० )

या संग्रहातल्या पुढील कविता मला आवडल्या – लॉग आऊट ( पान २३ ), वॉल्टेअरचे तत्त्वज्ञान ( पान ९१ ), घुसमट ( पान १०६ ) आणि निगरगट्ट ( पान १२३ ).

ही कवयित्री नको त्या झगमगाटांच्या मोहांना बळी पडून, प्रत्यक्षातले जगणे ‘ पाहण्याच्या ‘ स्वत:च्या क्षमतांना दडपत आहे, असे वाटले. या क्षमतांना जर उत्स्फूर्त वाव दिला गेला तर खूपच भेदक आणि अर्थवाही कविता तिच्याकडून लिहिली जाईल, असेही वाटले.

--- ००० ---

वासकसज्जिका ह्या कवितासंग्रहावर एक सजग वाचक म्हणून Champra Deshpande सरांनी दिलेली साक्षेपी प्रतिक्रिया महत्वाची वाटते. --- नेहा भांडारकर.

गिरीश पतके यांचा ‘ रंगावाचा ‘ मधला लेख –

--- दिलीप जगताप – भाग २.

इये मराठीचिये नगरी मराठीचे डॉक्टर शेकड्याने आहेत पण नाट्यवाङ्मयाची अभ्यासपूर्ण चिकित्सा करणारा एकही नाही. अशी दुर्दशा कशामुळे होत असावी ? सगळीकडे निर्भय बनो चे नारे असताना, इथे मात्र सभय रहो, असे का घडत असावे ? अभ्यासाचा आळस हे असेल एक कारण किंवा मग कुवतच नसावी. कुवत आणि हिंमत. हिंमतही

लागणार. कारण आपण काही लिहिले तर त्याचे हसे तर नाही होणार ? – हा विचार असणार. आणि नाटककार समजा परिवर्तनवादी नसेल आणि आपण त्याच्यावर लिहिले तर ते एक प्रकारे प्रतिगामित्वाचे बळ वाढवणारे तर ठरणार नाही ? – असेही काही असावे. ते असो. गिरीश पतके हा एक बिगर-डॉक्टर हे काम हिंमतीने करतो आहे.( दुसरे एक बिगर-डॉक्टर आहेत – रवीन्द्र दामोदर लाखे. ) कशाला हवाय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा ? जुन्यांच्या पुण्याईवर ? आज काय स्थिती आहे मराठीची ? असो.

मे' २३ च्या ' रंगावाचा ' मध्ये या लेखाचा पहिला भाग प्रसिद्ध झाला होता. आता हा दूसरा भाग आलेला आहे. आणखी एक तिसरा आणि शेवटचा भाग येणार आहे, असे कळते. दिलीप जगताप हा मराठीतला एक निवडक महत्त्वाचा नाटककार आहे. कोण आपल्याला टाळ्या वाजवते आहे का, कोण बक्षिसे देते आहे का, कुणी कुठे आपल्या एकूण लेखनाची योग्य दखल घेत आहे का – या बाबींच्या फंदात न पडता गेली कित्येक वर्षे मराठी रंगभूमीला महत्त्वाच्या संहिता देत आलेला हा लेखक आहे. शेक्सपियर, सार्त्र, झने अशा अनेक नाटककारांच्या महत्त्वाच्या नाट्यकृती या नाटककाराने मराठीत आणलेल्या आहेत. ( शिवाय स्वत:चीही अनेक नाटके आहेतच. ) नाट्यतंत्र आणि भाषा यांवरच्या त्याच्या हुकमतीमुळे हे सगळे अत्यंत दर्जेदार काम झालेले आहे. अशा या लेखकाच्या लेखनाचा सर्वांगीण आवाका घेण्याचे आणि मराठीत त्याला योग्य ते स्थान देण्याचे काम गिरीश पतके यांचा हा प्रदीर्घ लेख करत आहे. हे काम करायला खूप मेहनत, बुद्धी आणि मर्मदृष्टी लागलेली आहे, हे स्पष्टच आहे. जगताप आणि पतके या दोघांच्याही कामाला मराठीतल्या नाट्य आणि कला विश्वाकडून योग्य तो प्रतिसाद मिळायला हवा. कशाचेच काही देणेघेणे नसल्याप्रमाणे डल, मद्द पडून राहिलेले आपले कलाक्षेत्र अशा कामांनी जागे व्हावे आणि प्रभावित व्हावे, असे वाटते. अन्यथा, अभिजात भाषेचा दर्जा राहील बाजूला, त्या ऐवजी, जाऊ दे, मरू दे असे म्हणायची वेळ येईल !

--- ००० ---

DrNitin H. Deshpande is with Sandhya Kulkarni and

जीवनात कायम राहून गेलेले अनुभव !

पुण्याच्या "पी डी ए " सारखी सांगलीत "एडीए " (Amateur Dramatic Association ) नामक संस्था होती. त्यांच्या वतीने दरवर्षी भावे नाट्यगृहात एकांकिका स्पर्धा भरविल्या जात असत. त्या काळात खूप काही प्रतिसाद नसे पण सांगलीतील नाट्यकर्मी यानिमित्ताने एकत्र येत आणि दोन- तीन दिवस महाविद्यालयांमध्ये जोश भरत असत. आधीचे तालमींचे दिवस वेगळेच.

.

कायम वानवा असायची ती चांगल्या संहितांची (स्क्रिप्टसची) - जी आजही आहे ४० वर्षांनंतर. (आज सकाळी संजय मोने यांनी "मित्र म्हणे " मध्ये हीच री ओढली.) स्पर्धा म्हटलं की पारितोषिके जिंकण्याची हिरीरी अफाट. मग तेवढी रक्कम मिळवून देण्याची ताकद असलेली संहिता हवी. त्यांत आमच्या वालचंद मध्ये अट होती- रंगमंचावर आमच्या

समवेत कॉलेजच्या मुली काम करणार नाहीत( त्यांच्या पालकांची लेखी परवानगी असेल तरच. अन्यथा----) मग स्त्रीपात्र विरहित एकांकिकांची अपरिहार्य शोधाशोध.

.

अशात आमच्या रमेश घोलपने (त्यावर्षीचा जी एस) हट्टाला पेटून, प्राचार्यांची समजूत घालून आमची एंट्री पाठविली. आणि वर त्यांनाच अट घातली- बक्षीस मिळाले तर बक्षीसाच्या रकमेतून महाविद्यालयात "आर्टस सर्कल " सुरु करणार. (पुण्याचा बी जे किंवा मिरज मेडिकल च्या धर्तीवर, त्याच्या उदघाटनासाठी "अष्टविनायक " च्या वंदना पंडीत यांना सांगलीत त्या "अश्वमेध " साठी आल्या असता, भेटून त्यांचा तत्वतः होकारही मिळवलेला) त्यावर्षी पुरुषोत्तम करंडकला दुसरी आलेली चं प्र देशपांडे यांची "इतिहास " एकांकिका त्याने मिळविली. पात्रे -इन मीन तीन, त्यांतही एक मूक !

.

संहितेचे वाचन झाल्यावर काही हौशी मंडळी आपोआप गळाली. चं प्र देशपांडे यांची भाषा ओठांवर चिकटवण्यात तालमीतील ४-५ दिवस गेले. विषय समकालीन असल्याने तालमींना मजा येत होती. समोरच्या विलिंग्डन च्या प्रदीपने (तोही घोलप्याचा नाट्यमित्रच) "काहूर " नामक एकांकिका बसवायला सुरुवात केली होती- पात्रे दोन आणि स्क्रिप्ट खास मुंबईच्या मित्राकडून आणलेले. अंगातलं स्पर्धेचं स्पिरीट अधिकच भिनलं. ताज्या दमाने प्रॅक्टिस केली. रंगीत तालीमही मनाजोगती झाली.

.

तीन दिवस स्पर्धा चालणार होती- तब्बल एकवीस एन्ट्रीज आल्या होत्या.
स्पर्धेचा दिवस उजाडला.(की रात्र उजाडली.) आमची एकांकिका अनुक्रमे तिसरी होती. नाट्यगृह तुफान भरलेलं आणि तरुणाई (त्याही काळी) चेकाळलेलीच असायची. पाडापाडी जोशात सुरु होती.
तितक्यात संयोजकांपैकी एकजण माझ्याजवळ एका व्यक्तीला घेऊन आले. ते साक्षात एकांकिकेचे लेखक -चं प्र होते. खास आमचा प्रयोग बघायला आलेले होते.आमचं टेन्शन वाढलं. त्यांनी आम्हांला शुभेच्छा दिल्या. बोलता बोलता म्हणाले-
" आजवर इतिहास एकांकिका कायम दुसरी आलीय. तुम्हीं तिचा हा इतिहास मोडीत काढावा."

.

प्रयोग झाला- अपेक्षेपेक्षा भन्नाट, आम्हालाही चकित करून जाणारा. नटराज रंगमंचावरील तिघांच्याही अंगी भिनला होता. रंगदेवता आमच्या मदतीला आली होती. एकांकिका झाल्यावर लेखक महोदयांनी आमचे अभिनंदन केले. आम्ही त्यांना दुसऱ्या दिवशी दुपारी वालचंदच्या मेसमध्ये जेवण्याचे निमंत्रण दिले. त्यांनीही ते अगत्याने स्वीकारले.

.

जेवणा अगोदर हॉस्टेल रूममध्ये जयंत असनारेने त्यांच्यासमोर विनोदी पद्धतीने "इतिहास" चा नाट्यांश सादर केला. स्वतःच्या अर्थवाही, धीरगंभीर लेखनाचे असे इंटरप्रिटेशन बहुधा त्यांनीही यापूर्वी बघितले नसावे. अवघ्या बारा तासांच्या अवधीत आम्ही त्यांची एकांकिका त्यांच्यासमोर दोन प्रकारे सादर केली. त्यांना दुसराही प्रयोग (?) आवडला असावा, कारण त्यांनी जयंताचे कौतुक केले.

.

स्पर्धेचा निर्णय जाहीर झाला- " इतिहास " एकांकिकेने तिचा आजवरचा इतिहास मागे टाकत पहिले बक्षीस (रुपये १०००/- साल १९७८-७९) मिळविले होते. ठरल्याप्रमाणे आम्ही "आर्टस सर्कल " ची स्थापना वालचंद मध्ये केली.

ता. क.- या पुढचे "नाट्य" विस्तारभयास्तव उद्याच्या पोस्टमध्ये !

DrNitin H. Deshpande is with Sandhya Kulkarni and

जीवनात कायम राहून गेलेले अनुभव -२ ( नाट्यगृहाबाहेरचे नाट्य)

.

मा. प्र . पु. चा.

.

रिझल्ट अनाउंस झाला. "इतिहास" पहिली आणि प्रदीपची "काहूर " दुसरी ! मात्र सगळी व्यक्तिगत (दिग्दर्शन, अभिनय) बक्षीसे प्रदीपला. सगळीकडे गारेगार वातावरण पसरलं होतं. नाट्यगृह भानावर यायला अंमळ उशीरच झाला. सगळ्यांचा आपापल्या कानांवरचा विश्वास उडाला होता. मी धरून सगळे गृहीत धरून चालले होते- " काहूर " प्रथम आणि "इतिहास" दुसरी !

.

तुम्हांला काय वाटलं -पडदा पडला या इष्टोरीवर? अहो, अजून दुसरा आणि तिसरा अंक व्हायचाय.

"इतिहास " च्या परिघाबाहेर मी होतो- अनाउंसमेंट, मेकअप , लायटींग असलं काहीबाही गरजेनुसार सांभाळत होतो. त्यामुळे नंतरच्या घटनांचा मी आपोआप मूक साक्षीदार (एकांकिकेतील "बाकी " सारखा) झालो.

.

व्यक्तिशः मला "काहूर" जास्त आवडली होती- आमच्यापेक्षाही. पण मला हेही माहित होतं -स्पर्धांचे निकाल कधीच सर्वमान्य होत नसतात. विशेषतः विजेत्यांची संख्या आणि हात हलवत परत जाणाऱ्यांची संख्या हे प्रमाण मी कायम व्यस्त असतं हे मी अनेक स्पर्धांमध्ये अनुभवलंय. स्पर्धा सगळ्यांना खूश ठेवू शकत नाही.

.

प्रेक्षकांचे आणि परीक्षकांचे तराजू वेगवेगळे असतात.

.

त्यामुळे प्रत्येक निकालानंतर अशा विषम लढाया, पार्शालिटीची ओरड, हळहळ, सेलिब्रेशन होतच असते. पण यावेळी हे सर्व तात्कालिक नव्हते. रमेश आणि प्रदीप खरेतर जानी दोस्त, पण निकालाने त्यांच्यात दरी पडली. प्रदीपने डूख धरला. दुसऱ्या दिवशी स्थानिक वृत्तपत्रात बातमी-

.

" रमेश घोलप यांनी एकांकिकेच्या वेळी नारळाऐवजी रुपयाची नोट फाडून रंगमंचाची पूजा केली."

.

अपेक्षित स्फोट झाला. वाचकांचा पत्रव्यवहार वाढला. यानिमित्ताने स्पर्धेच्या निकालावर झोड उठली.

.

या पूर्वनियोजित यादवी मागे रीतसर प्रदीप होता. आमचा ग्रुप स्वस्थ असला तरी निखळ गुणवत्तेवर मिळालेलं यश मात्र दूषित झालं होतं. रमेशच्या कर्तृत्वाचे शेण झालेलं. प्रत्येक ठिकाणी प्रदीप "काहूर" माजवून गेला.

.

पुढील आठवड्यात वरील पार्श्वभूमीवर बक्षीस समारंभ होता. पुण्याहून पी डी ए चे भालबा केळकर (आमचे वालचंदचे भालबा केळकर सरही ए डी ए च्या संस्थापकांपैकी एक होते). अध्यक्ष म्हणून आलेले होते. प्रदीप काळ्या पोशाखात हजर होता. हॉलभोवती त्याची मित्रमंडळी घोषणा देत होती. खालमानेने त्याने त्याची सगळी बक्षिसे स्वीकारली. सगळा समारंभ केविलवाणा ! वरताण म्हणजे त्याने भालबांना एक चिठ्ठी दिली.

.

पडद्यामागच्या या स्टोरीबद्दल पाहुणे सर्वथैव अनभिज्ञ ! तरीही चिठ्ठी वाचून त्यांना अदमास आला, ते मनोज्ञ बोलले- " परीक्षक निवडायचा हक्क स्पर्धकांना नसतो. निर्णय लागल्यानंतर त्यांवर गदारोळ उठविण्यापेक्षा तो खिलाडूवृत्तीने स्वीकारायचा असतो. संयोजकांना मान हा द्यायलाच हवा. परीक्षकांचे निकष हवे तर जाणून घ्या, पण त्यांच्या निर्णयक्षमतेवर विश्वास ठेवा अन्यथा स्पर्धेत उतरू नये. किमान एवढी शिस्त, आचारसंहिता रंगकर्मींनी पाळायलाच हवी."

असं म्हणतात- स्पर्धा नेहेमीच चांगले लेखक, कलावंत, दिग्दर्शक देतात. पण या  स्पर्धेने दिलं - मित्रांमधील न संपणारं वैर !

एकदाचा या वादावर पडदा पडावा म्हणून संयोजकांनी २-३ दिवसांनी आम्हाला त्यांच्या कार्यालयात बोलावले. दोघंही तिथे भांड भांडले.

" माझ्याजवळ त्या नोटेचे दोन तुकडे आहेत."- प्रदीप

"अरे, जा रे, तो वार्ताहर तुझा दोस्त, म्हणून त्या फडतूस पेपरमध्ये काहीही छापून आणलेस."-  इरेला पडलेला रमेश

" माझी हिंमत दाखवू? म. टा. त बातमी आणू की मनोहर मध्ये नोटेच्या तुकड्यांचे फोटो?"

थकेपर्यंत दोघेही भांडले.

.

आता वाटतंय- स्पर्धेने एवढे भयावह वळण घ्यावे? इतके महत्वाचे असतात कां हे व्यक्तिगत जयापजय? मग अभिनयातील आनंदाचे काय करायचे? रंगमंचावरील जगलेले क्षण कशासाठी असतात?

.

कदाचित प्रदीपला पहिलं बक्षीस मिळालं असतं तर एवढं रण झालंच नसतं.

.

रंगमंचावरचं युद्ध सर्वसाक्षीने होत असतं पण इथे नाट्यगृहाबाहेर कोणामुळे झाले?

आजतागायत उत्तर मिळालं नाहीए.

" दृढ निश्चय करणाऱ्या मूठभर लोकांमध्येसुद्धा इतिहास बदलण्याची ताकद असते.

--- महात्मा गांधी. "

--- आज दि. १७-०४-२४ चा पुणे मटा.

(१) हे वाक्य खरेच म. गांधींचे आहे का ? आणि (२) याचा अर्थ काय ?

रवीन्द्र दामोदर लाखे

Champra Deshpande यांची एक कविता ( अभिवाचन क्लिप ).

कविता – स्पर्श.

**१९-०४-२०२४.**

आपल्याला काही म्हणायचे असते.

ते खोडणारा विचार आपल्यालाच सुचतो.

म्हणून आपण काही म्हणत नाही !

२०-०४-२०२४.

आजच्या ' सामना, पुणे ' च्या ' उत्सव ' पुरवणीत --

हिमांशू भूषण स्मार्त यांचा लेख --- ( माझ्या ' वेषांतर ' या एकांकिकेबाबत -- )

" आम्हाला विनाशकारी वाटणाऱ्या

विचारांबरोबर आम्ही गेलो

याचा अर्थ

आम्ही आमचे विचार सोडले

असा नाही होत. "

नाव

पूर्वी बालमृत्यूंचे प्रमाण खूप होते. काहीजण त्याचा अर्थ असा लावत – खरे तर सगळे नियती घडवते. हे विसरून उपटसुंभाप्रमाणे आपल्या मुलाच्या जन्माचा आपण आनंद घेतो आणि त्याचे उत्तम नाव ठेवून जणू काय ते आपलेच कर्तृत्व आहे असे मानतो, याचा नियतीला राग येत असावा, त्यामुळे, चिडून ती आपली मुले मारत असावी. मग यावर, नकोच ती कटकट आणि आपला आनंदी अहंकार, असे म्हणून ते लोक मुलांची नावे धोंडू वा बाळ अशी ठेवत. अशा नावांची मुले जगल्याचे पाहून यामागचे समज दृढ होत. माझ्या, ‘ नातं ‘ या दीर्घांकात खालील संवाद आहे -- अनघा: तुझी फक्त कीव येतेय मला. आणि केलास समजा तू माझा खून, तर पुढं न्यायालयात तुला ज्या अनेक प्रश्नांना तोंड द्यावं लागेल तेव्हा पुन्हा तू शेणामेणाचा होशील.

अनिल: ( जरा वेळ एकटक तिच्याकडे पाहून -- ) विचार प्रश्न.( हे तिला अगदीच अनपेक्षित. कसाबसा तोल सावरते. काही क्षण पाहात राहते. मग पाहातच निश्चयानं उठते. समोर येते. तो आहे तिथे उभा. शांतता.)

अनघा: ( एखाद्या वकिलाच्या निग्रहानं ) नाव काय तुमचं ?

अनिल: अनिल हणमंत नाईक.

अनघा: वय ?

अनिल: एकोणतीस.

अनघा: शिक्षण ?

अनिल: एम..ए.

अनघा: धंदा.

अनिल: मूळचंद मिल्समध्ये कारकून.

अनघा: तुमच्या बायकोचं नाव काय होतं ?

अनिल: अनघा.

अनघा: म्हणजे लग्नात तुम्ही ठेवलेलं ?

अनिल: होय. तिचं पूर्वाश्रमीचं नाव माधुरी होतं.

अनघा: अनघा या शब्दाचा अर्थ काय ?

अनिल: निष्पाप स्त्री.

अनघा: तुम्हाला ती तशी वाटत होती ? निष्पाप ?

अनिल: वाटतही असेल...पण त्यात बहुतेक तशा अपेक्षेचाही भाग होता. आणि हे नाव मी केवळ अर्थाकडे लक्ष देऊनच ठेवलं असं नाही. थोडं नावीन्य -- ही अक्षरं -- आणि ही अक्षररचना हीही मला आवडली असतील. शिवाय नाव म्हणायला सोपं-सुटसुटीत. बायको नवऱ्याला सोपी-सहज असावी.

यात म्हणजे मी विचारी असणे आणि तरीही अर्थापेक्षा नुसत्या अक्षर रचनेचेही मला कोतुक वाटले असेल, असे म्हणणे यातून मी किती साधा, सरळ, समर्थनीय, हे सगळे येते. हे एक सकारात्मक अहंकाराचे वा व्यक्तित्वाचे लक्षण म्हणता येईल. माझ्या ‘ मन ‘ नावाच्या दीर्घांकतल्या व्यक्तीचे नाव नीलकंठ असे देवाचे नाव असूनही त्याचे व्यक्तित्व कमकुवत आहे. तो मानसिक गोंधळाने सदोदित ग्रस्त असतो.  नाव सोनऊबाई हाती कथलाचा वाळा, असे प्रकारही आपण जाणतोच. भाषा शास्त्रज्ञांनी याचाही अभ्यास केलेला आहे की बाबा आधी अर्थ अस्तित्वात असतो आणि मग त्याला एक कृत्रिम शब्द दिला जातो किंवा काय, कशी घडते ही प्रक्रिया. संरचनावाद, उत्तर-संरचनावाद आणि विरचना, यांतून ते पुढे येते. निसर्गातल्या सर्व प्राणी, वस्तू  काही नावासह अस्तित्वात आलेल्या नाहीत, ते आपले कर्तृत्व आहे. शब्द म्हणजे ती वस्तू वा वास्तव नसते. आपल्या संस्कारबद्धतेतून निर्माण होणाऱ्या त्या सगळ्या प्रतिमा असतात. आपले सगळे संबंधही प्रतिमांचेच असतात. प्रत्येक प्रतिमा इतर प्रतिमांच्या विरोधात असणे भाग असते. त्यातूनच सतत संघर्ष, शिव्यागाळी, हिंसा हे घडत राहते. म्हणूनच जे. कृष्णमूर्ती विचारतात की तुम्ही एखाद्या झाडाकडे वा स्वत:च्या पत्नीकडे वा मुलाकडे शाब्दिक प्रतिमेशिवाय पाहू शकता का ? ते असाही प्रश्न निर्माण करतात

की प्रतिमेशिवाय जगणे शक्य आहे का ? आपले जगणे इतके संघर्षमय आणि बिनडोकपणाचे चालू असते की हे प्रश्न समोर येणे अपरिहार्य असते.

आधीच खूप आहेत डोक्याला ताप, आणखी नकोत, असे आपण म्हणणार. बुद्ध किंवा तुकाराम पूर्णपणे जाणून होते की याच प्रश्नांना तोंड द्यावे लागेल. जे टाळटाळ करतील ते वेडे होऊन मरतील. आहे त्या निर्बुद्धपणातच विविधता निर्माण करत राहतील आणि एकमेकांच्या उरांवर बसत राहतील. मी अमुक धर्माचा किंवा मीच खरा मानवतावादी अशा स्वतःच्या प्रतिमा जोपासत एकमेकांना रद्द करत जगणाऱ्या मूर्खांना हे दिसणार नाही. ते त्यातल्या त्यात तरतम आणि आम्हीच कसे मौल्यवान अशा विचारांच्या भ्रमात राहतील . त्यातल्या त्यात ‘ हुशार ‘ बाजू घेत राहतील. अशी बाजू न घेणाऱ्यांना ‘ कुंपणावरचे ‘ म्हणत राहतील.

तुकाराम म्हणतो, हे अभंग मी नाही लिहिले, पेसोआ म्हणतो, या कविता मी नाही लिहिल्या. म्हणजे, प्रतिमेशिवाय जगणे यांना सापडले असेल का ? जाऊ दे. लावू या हे फेटाळून. बाजू घेऊन बोंबलत राहण्याच्या घाणीचे उत्पादन करणे हे आपल्याला नक्की जमण्यासारखे आहे. उंटाच्या ----- एवढी आपली उंचीही नाही आणि कुवतही नाही. मीच खरा समंजस आणि निरागस ही प्रतिमाच बरी आहे !

--- चं. प्र. देशपांडे.

०००

चीनमधली एक कंपनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना वर्षातून दहा मूड-खराब रजा देणार आहे !

धीर धरी रे धीरापोटी
असती मोठी फळे गोमटी
कोणासाठी कोणासाठी
खंडाळ्याच्या घाटासाठी

“If the literature we are reading does not wake us, why then do we read it? A literary work must be an ice-axe to break the sea frozen inside us.”

— Franz Kafka

माझे ' नाणेफेक आणि इतर पाच नाटके ' हे पुस्तक
आता खालील ठिकाणीही उपलब्ध आहे ---
पुस्तकवाला अँड कंपनी,
पुणे.
फोन -- ८६२४९७७०२९.
आणि

परेश एजन्सी,

अप्पा बळवंत चौक,

पुणे.

फोन -- ८२७५४८५४८५ .

कीर्तनास नर हो तुम्ही जागा ।

कीर्तनास नर हो तुम्ही जा, गा ।।

ते आरक्षण रद्द करणार आहेत ।

आम्ही तसे मुळीच होऊ देणार नाही ।।

ते आरक्षण नष्ट करणार आहेत ।

आम्ही तसे कदापि होऊ देणार नाही ।।

फारच छान ।

खूपच छान ।।

--- ००० ---

आवाजाचा नवा मार्ग

एक तर डेसिबल कित्येक पटीत लावता येतातच. तुमच्या कानठळ्या किती बसल्या हे कुणी मोजायला येणार नाही. तक्रार करायची एक तर हिंमत नाही किंवा कंटाळा आहे. होते काय की सलग गाणी लावली की मन कमी डिस्टर्ब होते -- नशा नीट येत नाही. माणूस त्या गाण्याच्या चालीत थोडाफार रमतो. त्या सातत्यात तो नाचूही शकतो -- प्रत्यक्ष वा मनाने. तर आमच्या भागातल्या लोकांनी यावर उपाय शोधून काढला आहे. आवाज जास्तीत जास्त असह्य ठेवायचाच पण आणखी एक करायचे --- कोणतेही गाणे सलग चालू द्यायचे नाही. फक्त एखाद-दुसरी ओळ -- पाचदहा सेकंद फक्त ! शंभर गाण्यांचे तुकडे घ्यायचे. नाच रे मोरा, एक दो तीन, चोली के पीछे, चार आण्याचं पीठ आणलं, नागोबा, वगैरे ! दे धमाल होते ! गाण्याचा फील अजिबात येत नाही -- पयुवर, शुद्ध आवाज ! गाण्यात विचार चालू राहतो -- हा दणदणीत गोंगाट मिळतो ! विचार शिल्लकच नाही राहात ! याला म्हणतात आवाजाची नशा !

--- ००० ---

शेवटाचं नाटक पुण्याचे बुजुर्ग नाटककार चं प्र देशपांडे ह्यांचं "बुद्धीबळ आणि झब्बू" त्यातल्या खट्याळ, चिमटे काढत, माणसांचे इरसाल नमुने दाखवत तुमच्याआमच्या नैतिकतेबद्दल अंतर्मुख करणाऱ्या ह्या नाटकाला रंगवलं होतं बिपिन, अमृता, अनिरुद्ध आणि रूपाली ह्यांनी. ह्या नाटाकातल्या अनेक विनोदांना दणदणीत दाद मिळाली आणि नाटक संपल्यावर टाळ्यांचा कडकडाट.

खडीउकडगाव, झुमरीतलैया आणि मांजरसुंबा

असा आख्खा भारत मी फिरून आलो ! सगळीकडे उत्साह आहे !
जोर लावत राहा -----

एखाद्दिवशी ठीक आहे -- रोजच सकाळी उठून नऊला तुम्ही मीटिंग लावायला लागला तर कसे चालेल ?
असे कसे म्हणतोस मुला ? विकसित करायचाय की नाही भारत ?

संकेतस्थळाचे अद्ययावतीकरण
सुमारे वर्षभर मागे पडलेले हे काम पूर्ण झाले ! ' हाती घ्याल ते तडीस न्या ' हा मंत्र मला अनेकदा वापरावा लागतो. तांत्रिक कामांसाठी सहकार्य उपलब्ध असते ही यातली प्रचंड सकारात्मक बाजू ! बाकी मजकूरविषयक सर्व कामे मी एकहातीच करत असतो ! मराठीत हे कितपत हवेय-नकोय याचा विचार न करता आपण केलेले काम शक्य तो नीट उपलब्ध राहावे, हा प्रयत्न असतो. इतके लिहिताना आपण लाजलो नाही तर ते सुरक्षित करायला कशाला वेगळे तत्त्व वापरायचे, असा हा साळसूद विचार असतो. आता हे काम **२०-०४-२०२४** पर्यंत पूर्ण झालेले आहे. त्या तारखेपर्यंत मी केलेले सर्व लेखन तिथे उपलब्ध आहे.
संकेतस्थळाचा पत्ता ---

काळ भराभर जात राहतो. संभाव्य विश्लेषणांचे मुद्दे तयार करू लागा !

टीव्हीवर एका टक्कलधारी माणसाची मुलाखत चालू आणि खाली जाहिरातीची पट्टी -- अमुक तेल -- लंबे, घने और मुलायम बालोंके लिये !

" माझे विचार क्लियर असतात.
तिकडेही मी प्रामाणिकच होतो
आणि इकडेही मी प्रामाणिकच आहे ! "

बौद्धिक मतभेदांचे आदर्श अंगण ओलांडून लोकशाही आता मनोहारी शत्रुत्वाच्या प्रांगणात विहरत आहे !

Contradictions thy name is human !
म्हणून मला चं.प्र.देशपांडे अनोखे नाटककार वाटतात. त्यांनी या 'भूमिका' प्रकरणाचा अत्यंत नेमका समाचार घेतला आहे. पुरोगामी (तथाकथित) असणे हे सुद्धा भूमिका घेण्यासारखे आहे. माणूस जन्मतः भूमिकावान कुठे असतो ? तो प्रवाही असतो. प्रवाहाला अडथळा करणे किंवा वळण लावणे म्हणजे भूमिका घेणे.

मानवी बुद्धीची निर्मिती नसलेले सगळे निरर्थकच असणार एवढे तर मानवी बुद्धीला सहज समजू शकेल !

लोक सहिष्णू आहेत --- चार जूनची शांतपणे वाट पाहताहेत, बिचारे !

इथे तर्काला अपयश फुटते ---
प्रचंड नाराजी आहे आणि
प्रचंड उत्साह आहे !

लोकशाहीचा पाया असतो --
लोकांचे सामूहिक शहाणपण !

निर्णय

" साहेब एकटेच निर्णय घेतात आणि ते सामूहिक असल्याचे भासवतात ! " -- आजितदादा पवार. यावरून एक गोष्ट आठवली, ती सांगतो. ' सामुदायिक नेतृत्व ' ही संकल्पना कै. यशवंतराव चव्हाण यांनी वापरात आणली. ही संकल्पना समस्यायुक्तच असणार हे मला जाणवले होते. त्या निमित्ताने एकूण जगण्याचा आवाका व्यक्त करावा असे वाटल्याने मी एक एकांकिका लिहिली होती. तिचे नाव होते, ' समुदाय ' ! या एकांकिकेत समुदाय नावाचे एक पात्रच होते -- तेच घेणार निर्णय !

सामुदायिक !

--- ००० ---

आजच्या ( १०-०५-२४ ) पुणे सकाळ मध्ये, अग्रलेखाच्या वर दिलेल्या तुकारामाच्या ओळी --
भेदाभेदमतें भ्रमाचे संवाद । आम्हां नको वाद त्यांशी देऊं ।।
तुका म्हणे अणु तुजविण नाही । नभाहूनि पाही वाढ आहे ।।
पहिल्या दोन ओळी विशेष आहेत. वेगवेगळी, भेदाभेद करणारी मते हे भ्रम आहेत असे म्हटले आहे. त्यांच्याशी वाद-संवाद करायची वेळ माझ्यावर आणू नकोस रे बाबा -- असे म्हणणे काय, विनवणीच आहे ! इथे काही लोक म्हणणार की तुकाराम ढोंगी आणि आपमतलबी होता -- त्याने एक बाजू घ्यायची शिकवण न देता कुंपणावर बसायचा सल्ला दिलेला आहे ! पुढच्या दोन ओळी तर आध्यात्मिकच असल्याने त्या वैज्ञानिक दृष्टिकोणात बसतच नाहीत ! -- हे असले आमचे संत ! सत्याऐवजी पळपुटेपणा शिकवणारे !!!!!

--- ००० ---

Girish Patke is with Champra Deshpande.

·

केवळ मराठीच नाही तर भारतीय रंगभूमीवरील एक महत्त्वाचे तत्त्वचिंतक नाटककार, कवी व ज्येष्ठ मित्र चं. प्र. देशपांडे यांना वाढदिवसानिमित्त खूप शुभेच्छा!

लवकरच प्रसिद्ध होणा-या त्यांच्या "ओळख परेड" या एकांकिका संग्रहात त्यांच्या एकांकिका व नाट्यकृतींवर मी लिहिलेला 'समग्र भानाची शहाणीव देणारे नाटककार- चं. प्र. देशपांडे' हा प्रदीर्घ लेख प्रकाशित होणार आहे. हीच माझ्याकडून त्यांना वाढदिवसाची भेट.

Rajesh Sonawane is with Champra Deshpande.

·

चं. प्र. सर, HAPPY BIRTHDAY !!!
श्रेष्ठ नाटककार, कवी, विचारवंत
चं.प्र. देशपांडे सर यांचा आज वाढदिवस...
काळ जसा पुढेपुढे सरकत जातो,
तसतसे आपले साहित्य आणि साहित्यिक
outdated होत जातात, असा आपला एरवीचा अनुभव.
याला जवळजवळ एकमेव, खणखणीत आणि सणसणीत अपवाद म्हणजे चं. प्र.सर.
सरांचे श्रेष्ठ साहित्य आजही नव्या पिढीशी सुसंवादी आहेच ; पण त्याच्याही पुढे जाऊन वयाच्या ७८ व्या वर्षीही सर सोशल मिडियावर कार्यरत आहेत. तेथील वाद - संवादात हिरीरीने भाग घेत आहेत. स्वतःचे सर्व साहित्य त्यांनी ' चंप्रलेखन ' http://www.champralekhan.com/ या वेबसाईटवर आणले आहे आणि त्याच्या अद्ययावतीकरणाचे जटील, क्लिष्ट कामही नुकतेच हातावेगळे केले आहे. त्यांचा हा उत्साह केवळ तरूणांचाच नव्हे ; तर तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांनाही लाजवणारा आहे.
सर आमचे फेसबुक फ्रेंड आहेत,
हे आमच्यासाठी अत्यंत भूषणावह आहे.
सर, वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा !!
आपणास आरोग्य, दीर्घायुष्य लाभो ......

संभाजी सावंत
चंप्र थोर कवी आहेत, म्हणूनच थोर नाटककार आहेत. मराठीत त्यांच्यासारखा उत्तम सहजवादी नाटककार दुसरा नाही. असल्यास मला माहीत नाही.
चंप्र सर, वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!

Sameer S. Dalvi

·

‘दैनिक महानगर’साठी लिहिलेला हा लेख दोन वर्षांपूर्वीचा असला, तरी चंप्रंच्या वाढदिवसानिमित्त त्याला पुन्हा उजाळा देता येऊ शकतो, असं वाटल्यामुळे पुन्हा देत आहे.

दैनिक आपलं महानगर - सारांश

जगण्यातील गधडेपणाचा शोध -

एकूणच भारतीय रंगभूमीला बहुविध आशयाची नाटकं लिहीणा-या अनेक थोर नाटककारांची परंपरा आहे. पण नाटकं लिहीता लिहीता कवी म्हणून सुद्धा आपली स्वत:ची अशी नाममुद्रा उमटवणारे मराठी नाटककार म्हणून चटकन आठवणारी नावं म्हणजे राम गणेश गडकरी, आचार्य अत्रे आणि वि. वा. शिरवाडकर होत. गडकरी 'गोविंदाग्रज' या टोपणनावाने, अत्रे 'केशवकुमार' या नावाने कविता करीत असत तर शिरवाडकरांचे 'कुसुमाग्रज' हे टोपणनाव आपल्या सगळ्यांच्या चांगलंच परिचयाचं आहे. कुठले नाटककार नाटक लिहीताना कवितेच्या प्रांतातही मुशाफिरी करत होते, हे सांगण्याचं या लेखाचं प्रयोजन नाही. परंतु नाटककार असण्यासोबतच समांतरपणे तितक्याच ताकदीची अभिव्यक्ती कवितेतून करणारे नाटककार मराठी रंगभूमीवर मोजकेच आहेत. इतकंच नव्हे तर, नाटककार हा 'कवी' असणं अपरिहार्यच आहे असं वाटावं, इतपत कवी म्हणून आपली स्वतंत्र प्रतिभा या नाटककारांनी दाखवून दिली आहे. अशा मोजक्या नाटककारांपैकी एक म्हणजे चंद्रकांत प्रभाकर देशपांडे !

नव्वदच्या दशकाच्या अखेरीस 'आविष्कार'च्या माहीमच्या जागेत जे सांस्कृतिक केंद्र दर महिन्याला चेतन दातार चालवत असे, त्याचा मी नियमित प्रेक्षक होतो. तिथे चंप्रंच्या नाटकांशी माझा पहिल्यांदा परिचय झाला. अर्थात, चंप्र त्याच्याही अनेक वर्षे आधीपासून नाटक लिहीत होतेच. पण तेव्हा पाहिलेल्या 'नाणेफेक', 'बुद्धीबळ आणि झब्बू', 'समतोल', 'डावेदार' आणि 'ढोलताशे' या नाटकांमुळे चंप्रंची एक कसदार नाटक लिहीणारे बुद्धिमान नाटककार म्हणून मला आणि माझ्या पीढीतल्या अनेक नाट्यरसिकांना ओळख झाली. पुढे उत्तरोत्तर ती ओळख त्यांच्या इतर नाटकांच्या वाचनातून दृढच होत गेली. असं असलं तरी त्या पलीकडे, नाटककार चंप्रंच्या लेखन व्यक्तिमत्वाचा आणखी एक अनोखा आयाम आहे आणि तो म्हणजे त्यांच्या कविता ! सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे नाटककार हा 'कवी' असणं अपरिहार्यच आहे असं वाटावं इतक्या सहजतेने चंप्र कविता लिहीतात. तेव्हा त्यांच्यातल्या नाटककार आणि कवीचा जो मेळ माझ्या तोकड्या रसिकतेला जाणवला, तो थोडक्यात सांगावासा वाटतो.

नाटककार चंप्र आपल्या जवळ जवळ सगळ्याच नाटकांतून मानवी जगण्यातील ॲब्सर्डिटीचा, त्यांच्याच शब्दांत सांगायचं झालं तर जगण्यातील गधडेपणाचा उभा आडवा तिरकस शोध घेत आले आहेत. त्या शोधातून त्यांना दिसलेला गधडेपणा खुमासदार पद्धतीने संवादांतून सांगणं, हे त्यांच्या नाटकांचं मोठं वैशिष्टय आहे. त्याशिवाय, मानवी संबंधांतील - मग ते समाज म्हणून असोत वा स्त्री-पुरूष म्हणून असोत - गोम आणि गोची त्यातल्या खाचखळग्यांसकट दाखवून देणारी नाटकं हा चंप्रंचा नाटककार म्हणून मोठा विशेष आहे. त्यांच्या संकेतस्थळाला भेट दिली असता आपल्याला प्रश्नांची एक छोटेखानी मालिका दिसते. त्यावर चंप्रंचे असलेले उत्तर हा त्यांचा लेखक म्हणून असलेला पवित्रा अधोरेखित करते. 'मानवी जगण्याचे प्रवाही, कृतिशील भान भाषेत व्यक्त होणे म्हणजे सर्जक लेखन'. चंप्रंचे हे विधान त्यांच्या आजवरच्या लिखाणाच्या तजुर्ब्यावर आधारलेले आहे, असं म्हटलं तर असे सर्जक लेखन करण्यासाठी त्यांना कवितेचा फॉर्म जवळचा न वाटता तरच नवल ! खरंतर नाटक लिहीता लिहीताच समांतरपणे कविता लिहीणं हे चंप्रंच्या लेखन कारकीर्दीच्या सुरूवातीपासूनच असल्याचं आढळून येतं. म्हणूनच नाटककार आणि कवी असा त्यांचा समांतरपणे सुरू असलेला लेखन प्रवास हा त्यांच्या नाटक आणि कवितेतील अभिव्यक्तीचा अन्योन्य संबंध दाखवून देणारा आहे. किंबहुना, दोन अंकी नाटकातून जे साधता येत नाही ते एका

कवितेतून साधता येऊ शकते, अशी जाणीव लेखनाच्या एखाद्या टप्प्यावर चंप्रंना नक्की झाली असावी. त्या जाणिवेतूनच त्यांच्या कवितेचा इतका मोठा पैस ते निर्माण करू शकले असावेत, असं मला वाटतं.

सगळीकडेच वैयक्तिक, सामाजिक आणि परिवर्तनशील आशयाच्या कवितांचा अक्षरश: गदारोळ असतांना चंप्रंच्या कवितेने एक वेगळी वाट चोखाळलेली दिसते, ती म्हणजे नकविता, जिला इंग्रजीत आपण अॅंटी-पोएट्री या संज्ञेने ओळखतो. मध्यंतरी 'नकविता' लिहीणा-या जगभरातील महत्वाच्या कवींच्या कवितांचा अनुवाद करण्याचा प्रकल्प चंप्रंनी हातावेगळा केला. त्या अनुवादावरून त्यांचे नकवितेच्या वेगळ्या वाटेविषयी वाटणारे प्रेम आणि आस्था पुरेपूर जाणवते. उदाहरणादाखल त्यांची स्वत:ची एक कविता इथे उद्धृत करतो,

आपण एकटे होतो
आपण एकटे होतो
तेव्हा आपण खूप केविलवाणे होतो
आपल्याला अपमान सहावा लागतो
तेव्हा आपण खूप केविलवाणे होतो
कुणी फसवते तेव्हा
कुणी बदनामी करते तेव्हा
कुणी क्षुद्र समजते तेव्हा
कुणी गैरसमज करून घेते तेव्हा
कुणी काही आरोप करते तेव्हा
कुणाचातरी खूप राग येतो तेव्हा
कुणाला सुधारायची गरज वाटते तेव्हा
जे जसे आहे ते तसे खटकत राहते तेव्हा
मतभेद समोर येतात तेव्हा
जगात काय बदल व्हायला हवेत
हे आपल्याला जाणवते तेव्हा
सगळी माणसे स्वार्थामुळे आंधळी झाली आहेत
असे वाटते तेव्हा
आपण फार फार केविलवाणे होतो
जितके केविलवाणे तितकेच हिंसक होतो
आपले आपण संतप्त धोक्याचे

वरील कविता ही फक्त त्यांच्या नकवितेचा परिचय करून देण्यासाठी वानगीदाखल उद्धृत केलीय. त्यांच्या संकेतस्थळावर या नकवितांचा खजिना आहे. इच्छुक रसिक www.champralekhan.com या त्यांच्या संकेतस्थळाला भेट देऊन या कवितांचा आनंद घेऊ शकतात. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे चंप्रंनी नाटक आणि कवितेसहीत त्यांचे समग्र साहित्य त्यांच्या संकेतस्थळावर विनामूल्य उपलब्ध करून दिलं आहे. माझ्या माहितीनूसार,

आपल्या साहित्याचं अशाप्रकारे दस्तावेजीकरण करणारे आणि ते रंगकर्मी आणि वाचकांना विनामूल्य उपलब्ध करून देणारे चं.प्र.देशपांडे हे भारतातील बहुदा एकमेव आणि विरळा लेखक असावेत.

नाटक आणि कविता या दोन्ही फॉर्ममधील त्यांच्या अभिव्यक्तीची जातकुळी आणि आशयातील वैश्विकता (Universality) लक्षात घेता चंद्रकांत प्रभाकर देशपांडे हे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे प्रतिनिधीत्व करू शकतील अश्या मोजक्या लेखकांच्या पंक्तीत नि:संशयपणे बसतात, हे इथे नम्रपणे नमूद करावंसं वाटतं.

- समीर दळवी.

वाढदिवसाचे अभिष्टचिंतन, चंप्र !

रवीन्द्र दामोदर लाखे

.

माझे मित्र चंप्र देशपांडे यांचा जन्म दिवस आणि जे कृष्णमूर्ती यांचा जन्म दिवस एकाच दिवशी असतो हा योगायोग नाहीय. चंप्र देशपांडे मध्ये मला नेहमी जे कृष्णमूर्ती ऐकू येतात. पण आवाज चंप्र देशपांडेंचा असतो. अर्थात केवळ पुस्तकी जे कृष्णमुर्ती त्यांच्यात दिसत नाहीत. कृष्णमूर्तींचे तत्वज्ञान आत्मसात करून ते त्यांनी अनलर्न केलेले जाणवते.चंप्र म्हणजे एक दिलखुलास माणूस, एरवी आपल्याला जाणवतही नाही की हा माणूस लेखक आहे. ते कवी नाटककार आहेत याची यत्किंचितही जाणीव त्यांच्या सहवासात आलेल्याला आणि असलेल्याना होत नाही.

त्यांचा आज वाढदिवस आहे.

त्यांच्या आरोग्यपूर्ण दीर्घायुष्यासाठी माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा आणि प्रेम.

वाढदिवसानिमित्त दिलेल्या शुभेच्छांबद्दल सर्वांचे आभार आणि माझ्याही सर्वांना शुभेच्छा !

" --- पुन्हा आमरण उपोषण ! "

--- टीव्ही.

आजही प्रस्तुत ठरणारे आमच्या चिरंजीवांचे बालपणीचे वाक्य -- " अरे, तो कसला मला घाबरतो -- मीच त्याला घाबरतो ! "

मी आस्तिकही नाही आणि नास्तिकही नाही -- धर्मनिरपेक्ष अध्यात्म मला अत्यंत महत्त्वाचे वाटते !

मराठी साहित्यातले स्थान

पूर्वी मराठी साहित्यक्षेत्र, आभासी का असे ना, पण एकमय होते. एखाद्या लेखकावर वा एखाद्या कलाकृतीवर अनेक समीक्षक लिहीत आहेत, असे दृश्य दिसत असे. त्यामुळे, बऱ्यापैकी काम झाल्यावर, साहजिकच, एखाद्या लेखकाला

वाटे की मी ' जाण्यापूर्वी ' माझे साहित्यातले स्थान काय आहे ते मला कळायला हवे. आता तसे कुणा लेखकाच्या मनातही येणार नाही. एक तर विचक्षण समीक्षक फारसे नाहीतच आणि मुख्य म्हणजे हे साहित्यक्षेत्र खूप विखंडित झालेले आहे. आता तुम्हाला तुमचे स्थान कळायला हवे असेल तर तुमचे जे चार चाहते आहेत, ते सांगतील तेच ! बाकीचे वाचणारही नाहीत ! असले स्थान घेऊन काय चाटायचेय ? आता प्रत्येक लेखक स्थानाच्या आणि काळाच्या पलीकडे आहे !

--- ००० ---

मराठी समाजाला आत्मज्ञानाला उपयोगी पडेल अशी पोस्ट --

Rahul Pungaliya

·

मराठी साहित्यिक सांस्कृतिक विश्वाची तोंड ओळख

मराठी सुसंस्कृत साहित्यिक धाटणीचे लोक सनातनी पुरोगामी म्हणवता येतील .यांचे

सनातनत्व सनातनी हिंदुत्ववादाची हुबेहूब उलट प्रतीमा आहे.

धर्माची काडीची कल्पना नसल्यामुळे हे स्वतःला निधर्मी समजतात. विज्ञानाच्या मर्यादा उपयोग आणि परिणाम देखील समजत नसल्यामुळे हे विज्ञानवादी ,अंधश्रद्धा विरोधी असतात. भौतिक विज्ञानाच्या पद्धती मानवी समाज व मन समजून घेण्यासाठी जशाच्या तशा वापरण्याकडे यांचा कल असतो. त्यामुळे सरसकट समतावाद,सामाजिक डार्विनवाद, मेंदूच्या ज्ञानाने मनाची सर्जनशीलतेची प्रतिभेची उकल करणे इथे आढळते.

लब्धप्रतिष्ठित वरिष्ठ, कनिष्ठ, मध्यमवर्गातले असल्याने व्यवस्था अबाधित राहण्यात यांचे हित आहे. त्यामुळे त्यांचा क्रांतिकारी मार्क्सवादाला विरोध आहे. तो विरोध मार्क्सवादाला नसून हुकूमशाहीला आहे, असा पळपुटा युक्तिवाद ते नेहमीच करत आले आहेत.

यांना साहित्य आणि कलांचे पूर्ण अज्ञान आहे .सामाजिक व आर्थिक व्यवहार ,विज्ञान तंत्रज्ञान हे सोडून जे काही उरते त्यासाठी कला असतात म्हणजे भावनांची अभिव्यक्ती करण्यासाठी, आक्रोश करण्यासाठी जीवन सुशोभित करण्यासाठी कला असतात असा यांचा समज आहे. प्रस्थापित जीवन पद्धती न बदलता कलेचा उपयोग व्हावा असा सद्हेतू हे बाळगतात. प्रत्येक गोष्टीचा काही ना काही उपयोग असायलाच हवा असा उपयोजीततावाद यांचे मूळ तत्त्व आहे.

कलेतील समाजजीवन व व्यक्तीमध्ये आमुलाग्र बदल घडवणाऱ्या क्रांतिकारी शक्यता जितक्या बोथट करता येतील,वगळता येतील असा हेतू असल्यामुळे. हे आपल्याला परवडेल अशा मध्यमवर्गीय स्वच्छंदतावादी, माफक विद्रोही वास्तववादी ,मानवतावादी सर्व समावेशक दृष्टिकोन असलेल्या कलेला जोपासतात. प्रौढ साक्षरांना समजेल व थोडी गंमत वाटेल इतपतच प्रायोगिकता त्यांना रुचते.अर्थातच ती कला नुसतीच सुमार नसते, तर ती तेलकट, गुळगुळीत आंजारणारी गोंजारणारी आणि आपल्या योग्यतेची आपल्याला खात्री देणारी असते. थोडक्यात ती नारसीस्टीक आत्मलुब्ध कला असते .

शहरी मध्यमवर्गाची ही कला आणि संस्कृती, समाजातील सर्व स्तरांना वेचक प्रतिनिधित्व देत असते. शहरी मध्यमवर्गात आता सर्वच जाती-जमाती स्त्री पुरुष आणि माजी ग्रामीण जन यांचा भरणा असल्यामुळे सगळ्यांच्याच सोयीचे हे सांस्कृतिक अवकाश आहे. एकमेकांचे कौतुक करणं, सततचा उत्सवी कोडगेपणा ही यांची भावनिक ओळख आहे. पुरस्कार, संमेलनं,प्रकाशनं हे यांचे सण समारंभ आहेत. यांची 'विद्रोही' लोकशाही मूल्यांची मागणी ही देखील गंमतीजमतीची आणि जाता जाता कॅज्युअली करायची बाब आहे. बाकी गुंतवणुकी, फार्म हाऊस चंगळवादी जीवनशैली या गोष्टींमध्ये यांच्यात आणि यांच्या कट्टर राजकीय विरोधकांमध्ये काडीचा फरक नाही. हिंदुत्ववादी जसे दलित विचारवंतांना सामावून घेतात ,सांभाळून घेतात तसेच पुरोगामी देखील एकमेकांना सांभाळून घेतात. त्यांच्यातील विरोध लटकाच राहतो.

थोड्या थोड्या वर्षांनी काही व्यक्तींचे स्तोम माजवणे बडेजाव करणे, थोडक्यात समाजामधले जसे हिरोगिरीचे कल्चर आहे, त्याच पद्धतीचे हे साहित्यिक सांस्कृतिक हिरोंच्या अवतीभोवती असलेल्यांचे कोंडाळे असते.कधी पुल कधी नेमाडे कधी अवचट तर कधी कमल देसाई कोलटकरआणि ढसाळ आणि असे नवे नवे अनेक या यादीत समावेश करता येण्याजोगे

आहेत. जर त्यांना मोठे हिरो मिळाले नाहीत तर एकमेकांनाच ते आलटून पालटून हिरो बनवतात.

या विश्वाची सांस्कृतिक सहनशीलता शून्य आहे. वेगवेगळ्या प्रकारची सेंसरशिप ,सेल्फ सेंसरशिप ,मौलिक साहित्याकडे दुर्लक्ष करणे अशा पद्धती इथे कार्यरत आहेत हिंदुत्ववाद्यांच्या हुकूमशाहीबद्दल बोलण्याचा नैतिक अधिकार यांना नाही. हिंदुत्ववादी रानटी असभ्य आक्रमक आहेत हे तमासगीर बघे आहेत एवढाच फरक. इथे चांगली अस्सल कला फळणे,फुलणे जवळजवळ अशक्य आहे.

' ओळख परेड ' हा एकांकिका संग्रह लौकरच येईल. हे झाले की माझे पूर्ण नाट्यलेखन पुस्तकरूपात उपलब्ध असेल.

हिल्लोळ हरवून आतबाहेरचा ( कविता संग्रह )

--- प्रज्ञा दया पवार -- प्र ० – पॉप्युलर प्रकाशन

हा कविता संग्रह मला नुसताच आवडलेला नसून महत्त्वाचाही वाटतो. याची कारणे मी नंतर देणार आहे. पण, त्याचबरोबर, या निमित्ताने काही लिहिणार आहे.

साहित्यबाह्य क्षेत्रात तेंडुलकर म्हणाले होते की मला बंदूक द्या, मी मोदींना गोळी घालू इच्छितो. त्यांची ऊठबस डाव्यांमध्ये होती, ते डाव्यांचे समर्थक होते. प्रत्येक लेखकाने राजकीय भूमिका घ्यायला हवी आणि ती डावीच असायला हवी, असे वाटणाऱ्यांना हे अर्थातच आवडणारे होते. पण, तेंडुलकर त्यांच्या लेखनात, विशेषत: नाट्यलेखनात अशा राजकीय भूमिकेला बांधील होते का ? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच येईल. त्यांच्या आकलनाप्रमाणे एकूण मानवी जगण्याचा आवाका घेणे हेच त्यांच्या लेखनातून घडत होते. त्याशिवाय ते ‘ सखाराम बाइंडर ‘ सारखे नाटक लिहू शकले असते का, हा प्रश्नच आहे. ‘ कन्यादान ‘ तर विवाद्य ठरल्याचे इथे आठवते. तसेच उदाहरण मी सतीश तांबे यांचेही देईन. ते फेसबुकवर बरेचसे डावे बोलताना दिसतात, बीजेपीच्या विरोधात असतात, पण, ही राजकीय भूमिका त्यांच्या कथालेखनावर स्वार होत नाही. उदाहरणार्थ, त्यांची, ‘ पळवाटा वाटा

पाताळाच्या ‘ ही कथा वा अन्य बऱ्याच कथा बघा. अमुक एक वैचारिक ठामपणा अभिव्यक्त न करता त्यांच्या कथा खुलेपणाने जगणे ‘ पाहणाऱ्या ‘ आहेत. तसेच कवितेतले उदाहरण द्यायचे झाल्यास, राहुल पुंगलिया यांचे देता येईल. ते स्वत:ला गांधीवादी म्हणवतात पण कोणत्याही वैचारिक साच्यात वा निष्कर्षात त्यांची कविता अडकलेली नसते. कोणतेही चांगले लेखन हे व्यक्तिगत मतांच्या मर्यादेत बद्ध नसते, हाच याचा अर्थ. लेखक जेव्हा खुला असतो, मानवी जगण्यातल्या समस्यांना वैचारिक अंतिमता देणारा नसतो तेव्हाच तो काही मौल्यवान निर्मिती करू शकतो, हेच अनेकदा दिसून येते. जगातल्या अनेक मोठमोठ्या कलावंतांनीही हे सांगितलेले आहे.

‘ हिल्लोळ – ‘ या कवितासंग्रहात अनेक कविता या अशा ‘ मानवी ‘, अमुक एक वैचारिक दिशा न देणाऱ्या आणि म्हणूनच अधिक व्यापक आशयाच्या आहेत, असे मला जाणवते. स्त्रीच्या कविता असून त्या स्त्रीवादातही बद्ध होत नाहीत. सर्व स्त्री-पुरुषांना आणि कोणत्याही व्यक्तीला जगण्यात प्रस्तुत ठरतील अशा या कविता आहेत. हिल्लोळ म्हणजे दु:ख वा वेदनायुक्त कल्लोळ वा गोंधळ. असा गोंधळ अनुभवत नाही असे कुणीच नसते. इथे तो निर्ममपणे ‘ पाहिला ‘ जातो, हे विशेष आहे. प्रज्ञा दया पवार या पुरोगामी विचारांच्या, जगण्यात तशा तीव्र प्रतिक्रिया देणाऱ्या म्हणून आपल्याला माहीत असल्या तरी त्यांची ती प्रतिमा मनात बाळगून वाचू नयेत अशा बऱ्याच कविता या संग्रहात आहेत. यामुळेच, यातल्या बऱ्याच कविता या वाचून ‘ संपत ‘ नाहीत. यासाठी उदाहरणादाखल मी, ‘ आतला दरवाजा ‘ ( पान २४ ), ‘ नसलेल्या परमेश्वरासारखं ‘ ( पान ५१ ), ‘ पुनर्लेखन ‘ ( पान ६० ), ‘ गेली सगळी संबोधनं वाऱ्यावर उडून गेली ‘ ( पान ६३ ), ‘ गुहेच्या तोंडाशी ‘ ( पान ६६ ), ‘ तुला नाही चेहरा कुठलाच ‘ ( पान ७३ ) आणि ‘ हिल्लोळ हरवून आतबाहेरचा ‘ ( पान १६९ ) या कवितांचा उल्लेख करेन. मला या कविता विशेष वाटतात. अशा आणखीही कविता या संग्रहात आहेत.

या कविता जर एखाद्या विचारसरणीने प्रेरित नाहीत तर मग त्या कवयित्रीची व्यक्तिगत सुखदु:खे वाचकांच्या मनात परावर्तित करणाऱ्या आहेत का ? एखादा मूड, एखादी मन:स्थिती सांगणाऱ्या आहेत का ? तर तसे गुंतणेही इथे जाणवत नाही. इथे पूर्ण ‘ पाहून ‘ बाजूला होणे आहे. अनुभव हे सत्य, असत्य वा कल्पित असतील – त्यामुळे हे नुसते फोटोग्राफिक चित्रणही नाही. मनाचे गोंधळ, भ्रम, आभास यांनाही इथे वाव आहे. खालील कविता पहा –

पुनर्लेखन

सनी लिओनी नाव असलेली स्त्री
मी असले
तरी मी ती नाही.
माझं नाव सांगताच मला आरपार न्याहाळणाऱ्या नजरा
तिच्याचसाठी असतात या उघड सत्याने
माझा जीव भांड्यात पडतो नि मला घायाळही करतो.
एक सेक्शुअल ऑब्जेक्ट
बनून राहण्याचं
मुक्तमोकळं स्वातंत्र्य लिओनी जगते.
तिच्या बेडरूमच्या खिडक्या थेट आकाशातच सताड उघडतात

तिच्या चादरीवर

भांडवली मऊशार पिसं

स्वतःला टांगून घेतात

वासनेच्या निळ्याजांभळ्या फुलांचं मत्त रान

दौडत जातं रक्तातून

तिच्या निव्वळ असण्याने आभासी.

ती एकटी असताना काय करत असेल

पुरुषांचे अतींद्रिय आकार छळत असतील का तिला स्वप्नातही ?

मीच आहे पिकासोची वीपिंग वुमन

भयानक दुःखाच्या शरीरात राहणारी

जसं मला वाटतं कैकदा

तसं वाटत असेल का तिलाही ?

गच्च भरलेल्या विहिरीतून

उसळावेत पाण्याचे प्रपाती लोट

नि क्षणार्धात कोरड्याठाक् विहिरीतून

वर सरसरत यावा स्वतःचाच अनोळखी आवाज

चकित

भयचकित

ऐकतेय सनी लिओनी

एक तीक्ष्ण खिळा

लपवून ठेवलाय तिने हातात

रात्रभर खोदत असते ती टोकदार अग्राने

सगळे गाढ झोपेत असताना

तो प्राचीन अंधारलेला खंदक.

स्वातंत्र्याचे करुण डोळे

चमकून उठतात

पलीकडे नेणारं भुयार

नाहीच सापडत कधी सनी लिओनीला

सनी लिओनी नाव असलेली स्त्री

मी असले

तरी मी ती नाही

छे .. छे .. हे तिचं पुनर्लेखनही नाही

अथवा

माझंही.

ही काही करमणुकीसाठी लिहिलेली उथळ कविता नाही. जगण्यासाठी वापरात येणाऱ्या मानवी प्रतिमांचा खेळ ही कविता मांडते. कुणाचीही कोणतीही प्रतिमा असूही शकते आणि नसूही शकते ! कोणतीही प्रतिमा स्वीकारली तरी तिला कशाचीही पुनरावृत्ती म्हणता येत नाही. आलटून पालटून येणाऱ्या या कदाचित भासमय प्रतिमांतून ही कविता प्रतिमेच्या सत्यतेचा प्रश्न समोर आणते. यापुढची प्रत्येक वाचकाची कविता ही त्याची स्वतंत्र असू शकते. ज्या शक्यता आपल्या जगण्यात नाहीत त्या असूही शकतात असा भासमय व्यूह तयार करून ही कविता, एक प्रकारे, सर्वच प्रतिमांचे अस्तित्व धोक्यात आणते. ही चिंतनशीलता कोणताही कवी जाणीवपूर्वक, ठरवून आणू शकणार नाही. मन खुले सोडण्याची कलेतली सिद्धी त्यासाठी असावी लागणार.

अशा, वैचारिक भूमिकावादी नसलेल्या पण मानवी जाणयुक्त असलेल्या बऱ्याच कविता या संग्रहात आहेत. या कविता सामाजिक-राजकीय हेतू बाळगणाऱ्या वा अमुक बाजू घेणाऱ्या नाहीत. या सर्व माणसांसाठी आहेत. हे सगळ्यांचे जगणे आहे. कलाबाह्य, व्यावहारिक क्षेत्रात कोणतेही मतभेद असोत, या कविता सर्वांनीच आत्मीयतेने वाचाव्यात अशा आहेत. कलेच्या असण्यातून हेच सौहार्द आणि समज निर्माण व्हावी हीच तर कलेची मूल्यात्मकता. म्हणूनच. वाचकांनी, कलवंताच्या आपल्याला आवडणाऱ्या वा न आवडणाऱ्या प्रतिमेचे ओझे घेऊन कोणतीही कला वा कविता पाहणे चुकीचे ठरते. ही समज सर्वच वाचकांनी बाळगायला हवी. कोणत्याही कलावंताचे अमुक वागणे वा विचार पटत नाहीत म्हणून त्याला बाद करणे हे कलेतली प्राथमिकही समज नसल्याचे लक्षण आहे.

--- ००० ---

ओळख परेड

हा एकांकिका संग्रह आता विक्रीसाठी उपलब्ध आहे.

ओळख परेड

( एकांकिका संग्रह )

--- चं. प्र. देशपांडे

समाविष्ट एकांकिका

दंगल

ओळख परेड

समस्या सोडवण्याचा सराव

समुदाय

अस्तित्व

स्टालिन

ट्रेलर

खडक

जोडपी

ऑफीस

रिलीफ

आणि

परिशिष्टात गिरीश पतके यांचा लेख

पाने २८६ – किंमत रु.४००=००

सवलतीची किंमत रु.३००=०० ( पोस्टेजसह )

पैसे पाठवण्यासाठी ---

Chandrakant Prabhakar Deshpande

HDFC BANK Saving Account No.03591000003204

IFSC : HDFC0000359

For G pay : Mahesh Deshpande mbl 9970065875 OR

UPI ID gathaent-3@okhdfcbank

Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा.

माझ्या उपलब्ध पुस्तकांची माहिती ---

| पुस्तकाचे नाव | किंमत रु. | सवलतीची किंमत रु. |
|---|---|---|
| १. आवर्तने | | |
| ( कविता-आशय-आकलन ) | ४५० | ३४० |
| २. चार पुरुषार्थांची चार नाटके | ६०० | ४५० |
| ३. वस्तू आणि इतर | | |
| सहा दीर्घांक | ४०० | ३०० |
| ४. पाच ॲब्सर्ड नाटके | ५०० | ३७० |
| ५. खुल्लम खुल्ला | | |
| ( एकांकिका संग्रह ) | ४०० | ३०० |
| ६. नाणेफेक आणि | | |
| इतर पाच नाटके | ४०० | ३०० |
| ७. ओळख परेड | | |
| ( एकांकिका संग्रह ) | ४०० | ३०० |
| एकूण --- | ३१५० | २३६० |

यांतील कोणतेही एक वा अनेक पुस्तके सवलतीच्या निर्देशित किंमतीत मिळतील. सवलतीची प्रत्येक किंमत पोस्टेजसह आहे.

एकूण रु. ३१५० ची ही सात पुस्तके सवलतीत रु. २३६० ला पूर्ण संच विकत घेणाऱ्यास ‘ तंबाखूची टपरी ‘ हा जगातल्या ५८ कवींच्या काही कवितांच्या अनुसर्जनांचा कविता संग्रह मोफत मिळेल.

पैसे पाठवताना ते कोणत्या पुस्तकासाठी वा पुस्तकांसाठी की पूर्ण संचासाठी पाठवले आहेत, ते स्पष्ट करावे.

पैसे पाठवण्यासाठी ---

Chandrakant Prabhakar Deshpande

HDFC BANK Saving Account No.03591000003204

IFSC : HDFC0000359

For G pay : Mahesh Deshpande mbl 9970065875 OR

UPI ID gathaent-3@okhdfcbank

Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा.

चलो दिल्ली --

माझ्या ' बुद्धिबळ आणि झब्बू ' या नाटकाचा हिंदी अनुवाद ' आंख मिचौली ' या नावाने २२ व २३ जूनला दिल्लीत सादर होत आहे.

जे तिकडे असतील त्यांनी पाहण्याचे जमवावे.

-- ००० ---

'मन'

Written by Champra Deshpande

Directed by Abhijeet Zunjarrao

Solo performance by Ramesh Wani

Premier at

Godrej Dance Theatre

NCPA

Sunday, 16th june 5pm

Tickets available at box office and book my show.

Do come and do share to your groups and friends.

@highlight

अभिनय, कल्याण आणि विजयलता प्रोडक्शन यांचं Champra Deshpande लिखित 'मन' हे नवीन नाटक दीर्घांक स्वरूपात रंगभूमीवर सादर करतोय.

या नाटकाची प्रस्तुती Rajeshri Shinde Bruce Guthrie 'एनसीपीए' ची असणार आहे.

या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग दिनांक १६ जून २०२४ रोजी, संध्याकाळी ५ वाजता, गोदरेज डान्स थिएटर् नरीमन पॉइंट्, एनसीपीए इथे सादर होणार आहे.

'मन' हा दीर्घांक स्वरूपात सलग १०० मिनिटांचा एकपात्री नाट्यानूभव असणार आहे. अभिनेता Rammesh Wani यात प्रमुख भूमिका साकारतोय.

याची तिकिटे book my show वर उपलब्ध झाली आहेत.

https://in.bookmyshow.com/plays/mann/ET00396072

अधिक माहितीसाठी एनसीपीए बॉक्स ऑफिस संपर्क +91 22 66 223754

नम्र विनंती आहे की आजवर माझ्या नाटकांना जसा प्रतिसाद दिलात तसा याही नाटकाला आपण भरभरून प्रतिसाद द्यावा.

आजच आपली १६ जून ही तारीख, वार रविवार आणि वेळ संध्याकाळी ५ राखून ठेवा.

आमच्या सोबत तुम्हा सगळ्यां करता हा वेगळा अनुभव असेल हे नक्की. तेंव्हा तुमच्या हाउसफुल प्रतीसादाची आम्ही सगळेच वाट बघतोय!!

□

| निरीक्षक | अंदाज |
|---|---|
| अ | ३०० |
| ब | ४१५ |
| क | १५० |
| ड | ०९८ |
| ई | २५० |
| फ | ५०३ |
| एकूण | १७१६ |
| सरासरी | ०२८६ |

बरेचजण म्हणताहेत, मरू द्या, काय गडबड आहे, बघू ४ ला !

Sameer S. Dalvi is with Champra Deshpande.

१३ वर्षे झाली ते समजले सुद्धा नाही चंप्र !

अभिरूचीला एक वळण दिलंत तुम्ही. मनस्वी धन्यवाद !!

समकालीनता

मराठी साहित्यात वास्तववाद म्हणजे अजूनही सर्वेसर्वा आहे. काय म्हणावा वास्तववादाचा अर्थ ? बदलत्या भौतिक परिस्थितीवर आधारित असणे ? जुन्या काळातले अनुभव असले तरीही ते ‘ दिसणाऱ्या ’ माहितीरूप निवेदनातून येणे, असेही एक असेल. पण, मुख्यत: वास्तव हे, जुने असो वा नवे, ते लेखकाच्या प्रतिक्रियेसहच येते. हे लक्षात घेतले तर अमुक एक वास्तव म्हणजे वास्तव, असे म्हणता येत नाही. आज लिहिणाऱ्या प्रत्येक लेखकाचे वास्तव वेगळे असते. आज लिहिणाऱ्या दोन चांगल्या लेखकांचे उदाहरण घेऊ. प्रणव सखदेव आणि रवींद्र पांढरे, हे लेखक बघा. त्यांच्या लेखनाचे अनुभवद्रव्य म्हणा की दिसणारी माहिती म्हणा, ही खूपच वेगळी आहे. याच पद्धतीने प्रत्येक लेखकाचे वास्तव वेगळे असते. हे लक्षात न घेता साहित्याची समकालीनता ही संकल्पना काहींना मूल्यात्मक वाटते, असे दिसून येते. एका ढोबळ अर्थाने प्रणव सखदेवच्या साहित्यात समजा समकालीनता आहे, असे आपण म्हटले, तर, जेव्हा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावाचा काळ येईल तेव्हा ते साहित्य कालबाह्य समजावे लागेल का ? हा एक प्रश्न तर आहेच पण काही अधिकच हेकट आणि संकुचित कल्पनाही दिसतात. समकालीन वास्तव हे लेखकाच्या मतासह, भूमिकेसह यायला हवे, ही ती कल्पना. म्हणजे आजच्या लेखनात, उदाहरणार्थ, मोदींच्या हुकूमशाहीबाबत राग वा विरोधकांच्या पोटदुखीबाबत कीव व्यक्त व्हायला हवी. इथे, एक सुचवायचे आहे की या सर्व कल्पना संकुचित, साहित्याला रटाळ करणाऱ्या आहेत.

जयंत पवार हे माझे मित्र होते, पण, त्यांचे विचार मला पटत होते, असे नव्हे. त्यांनी असा एक प्रश्न मांडला होता की वास्तव आता इतक्या वेगाने बदलते आहे की ते लेखकाला समजून त्याच्या लेखनातून व्यक्त होईपर्यंत जुने होते आहे ! मुळात, आधी वास्तव समजून घ्यायचे आणि मग ते आपल्या प्रभावासह मांडायचे – ही साहित्याची कल्पनाच खोटी आहे. प्रत्येकाचे वास्तव वेगळे असते याचा अर्थच वास्तव समजणे असे काही सत्य अस्तित्वात असू शकत नाही. आणि साहित्य म्हणजे स्वमतयुक्त वास्तवाची मांडणी किंवा त्या त्या काळाचे डॉक्युमेंटेशन वा दस्तावेजीकरण हे पटण्यासारखे नाही. दस्तावेजीकरण आता इतर अनेक मार्गांनी होत असते, ती जबाबदारी आता साहित्याने झटकायला हरकत नाही.

आपण वास्तव समजून घेण्यासाठी वा ते नोंदण्यासाठी साहित्यनिर्मिती करतो वा साहित्याच्या संपर्कात येतो ही समजूतच मुळात फार थिटी आहे. ऐतिहासिक वा पौराणिक कलाकृती, शेक्सपियरची नाटके, कोणत्याही इतर प्रांतांतली वा देशांतली नाटके आपण का वाचतो वा पाहतो ? त्यात वास्तवनिरपेक्ष आणि लेखक-निरपेक्ष अशी मानवी जगण्याच्या भानाची प्रक्रिया असते म्हणून. आणि हे जगातल्या सर्वच मौल्यवान साहित्याबाबर खरे आहे. वास्तव कोणते आहे, अनुभव कोणता आहे याला महत्त्व देण्याच्या बालिशपणामुळेच काहीजण असे समजतात की निव्वळ अनुभव धारावीतल्या जगण्याचा असल्यामुळेच काही साहित्य एखाद्या मध्यमवर्गीय अनुभवक्षेत्र असणाऱ्या साहित्याहून महत्त्वाचे असते.

माझे एक नाटक सत्तरच्या दशकातल्या हिंदी सिनेमाच्या खोट्या, रचित डोलाऱ्यातून घडत जाते. एकजण म्हणाले की आता ते आजच्या काळाशी मॅच होत नाही तर दुसरे एकजण म्हणाले की हे कधीही ‘ आजचे ’ असणारे नाटक आहे. एक-दोन नाटकांत युनियन-मॅनेजमेंट संघर्षाचे वातावरण आहे – एकजण म्हणाले की आता कुठे उरलाय युनियनबाजीचा काळ ? त्याच्याहून किरकोळ उदाहरण म्हणजे माझ्या एका नाटकातल्या काळात फक्त लँड लाइन

फोन होते, मोबाइल नव्हते ! म्हणजे गेले ते नाटक रद्दीत ? असे होत नसते. कलेचा प्रमुख सर्जक प्रवाह म्हणजे काय, हा प्रश्न स्वत:ला विचारला पाहिजे.

--- 000 ---

रवीन्द्र दामोदर लाखे

.

Champra Deshpande तुमच्या इतिहास एकांकिकेची आठवण सतत येत राहील.

घाटकोपरच्या जाहिरात फलक कोसळण्यापासून ते दिल्लीतील बालरुग्णालयाच्या आगीपर्यंत ज्या ज्या दुर्घटना घडल्या आहेत त्या सर्वांमध्ये एक समान धागा आहे .

तो धागा आहे भ्रष्टाचाराचा. या धाग्याने एक दुर्गंधयुक्त फुलांची मृत्यूमाळ निर्माण केली आहे . ती दुर्गंधयुक्त फुले म्हणजे नोकरशाही , पोलीस आणि राजकारणी .

'Governments may come and go , beaurocracy is permanent'

या जगप्रसिद्ध नियमाला अनुसरून नोकरशाही राजकारण्यांना झुलवीत असते . निवडून आलेले लोक (?)प्रतिनिधी बराच पैसा खर्च करून तिथे स्थानापन्न झालेले असतात . पुढच्या निवडणूकीत निवडून येऊ अशी खात्री नसल्याने मिळालेल्या पाच वर्षांत झालेली भांडवली गुंतवणूक आणि त्या वरील व्याजासकट नफा हे किमान उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवून हे महान लोकं कारभार सुरू करतात . या वेळी त्यांच्या असे लक्षात येते की या गुंतागुंतीच्या शासन व्यवस्थेबद्दल आपल्याला काहीही माहिती नाही . राजकारण्यांचे हे वैगुण्य नोकरशहांना बरोब्बर माहित असते . ते ' साहेबांना ' सांगतात ," तुम्ही काळजी करू नका साहेब , आम्ही कशासाठी आहोत . आम्ही तुम्हाला सांभाळतो , तुम्ही आम्हाला सांभाळा!"

इथेच nexus , मिली भगत , परस्पर हित संरक्षण वगैरे शब्दांनी मंडीत केलेला भ्रष्टाचार सुरू होतो .

ही जी व्यवस्था निर्माण झाली आहे त्यात सामान्य माणसाला कोणतेही स्थान नाही . कितीही क्षुल्लक दर्जाचं शासकीय काम असलं तरी तुम्हाला एका सांखळीतून जावे लागते . तुमच्या ओळखीच्या एखाद्या 'सद्गृहस्थाला' तुम्ही गाठता आणि तो तुम्हाला शासकीय कार्यालयाच्या आसपास फिरत असलेल्या एजंटला भेटवतो . हा एजंट म्हणजे भ्रष्टाचाराच्या hierarchy मधला सर्वात

शेवटच्या पायरीवरला असला तरी तो सर्वात महत्त्वाचा असतो कारण तो गिऱ्हाईक पकडतो . पुढचं सगळं सांगणं न लगे !

चं.प्र. देशपांडे यांची ' इतिहास ' ही एकांकिका हा विषय अत्यंत परिणामकारकपणे मांडते . मी ही एकांकिका १९८४ साली यशस्वीरीत्या दिग्दर्शीत केली होती .

पोलीस डिपार्टमेंट हा वेगळा विषय आहे .

पूर्वी राजकीय कार्यकर्त्यांची प्रतिष्ठा त्याचे राजकिय तत्त्वज्ञान , आकलन आणि अभ्यास यावर अवलंबून असायची . आता मात्र राजकारणात पुढे यायचं असेल तर पोलीस स्टेशन मध्ये तुमची किती प्रतिष्ठा आहे याला सर्वस्वी महत्त्व

आहे . पोलिसी गुन्ह्यात अडकलेल्या तथाकथित कार्यकर्त्यांना सोडवून आणणे हे राजकारणी लोकांचे आद्य कर्तव्य असते .

या सगळ्या मध्ये सामान्य माणूस भरडला जातो हे खरे असले तरीही आपणसुद्धा आरशात पाहिले पाहिजे . कळत नकळत आपण या व्यवस्थेत सामिल झालो आहोत . अनेक वेळा दुसऱ्यांच्या समस्येकडे ' आपल्याला काय करायचंय ' या attitude ने दुर्लक्ष करतो . पण ' जात्यामधले दाणे रडती , सूपातले हसती ' ही अवस्था तात्कालिक असते . कधी ना कधी तुम्ही जात्यात जाणारच .

धन्यवाद .

Every ideology is contrary to human psychology.

— Albert Camus, 1913-1960, French writer, Nobel 1957

' मीच एक शहाणा '

ही भावना टोकाला गेलेले दोनचार लोक माझ्या मित्र यादीत आहेत. ते काय करतात, तर माझ्या वॉलवर चाललेल्या चर्चेत मध्येच येऊन एक अत्यंत खोचक, उपरोधिक, कुत्सित व रोगट कॉमेंट टाकून पळून जातात. पळून जातात असे म्हणावे लागते कारण, त्यांच्या कॉमेंटला मी दिलेले उत्तर वाचण्याचा -- त्याची दखल घेतल्याचे लाईक देण्याचा -- सभ्यपणा त्यांच्याकडे नसतो. मग, येतात कशाला ते भाग घ्यायला ? तर कारण एकच -- मला जे समजते त्यापेक्षा वेगळे असे जगात असूच कसे शकते काही, याचा संताप त्यांना व्यक्त करायचा असतो. कट्टर मतांनी चर्चा होत नसते. चर्चेत भाग घ्यायचा तर जरा लवचिकता असावी लागते, दुसऱ्यांची मतेही ऐकून घेण्याचा धीर असावा लागतो. तो त्यांच्याकडे नाही, हे स्पष्ट आहे. मग, मी हा त्रास का सहन करावा, असा मला प्रश्न पडतो. यापुढेही ते असेच करत राहिले तर, अनिच्छेने का असे ना, त्यांना ब्लॉक करणे हा एकच मार्ग मला स्वीकारावा लागेल. इलाज नाही. फेसबुकवर आपण एकमेकांच्या मित्रयादीत आहोत, तर असे घडू नये, असे वाटते.

--- ००० ---

The world doesn't make sense, so why should I paint pictures that do?

Pablo Picasso

--- असं कसं, असं कसं ? मग, भूमिका कशी आणि कसली घेणार तू ?

कुंपणावरचा, पलायनवादी, असंवेदनशील मेला ! □

भोपळे चौक,

भ्रमानंद रोड,

भारत !

( लोकसभेच्या निवडणुकीच्या निकालाचा दिवस ! )

फोटो सौजन्य –

गिरीश रांगणेकर -- हॉटेलचालक, कुरियरचालक, संपादक, चॅनेलमध्ये विशेष काम, मुलाखतकार, लेखक, एका नामवंत विद्यापीठात विभागप्रमुख, नंतर आणखी एका नामवंत विद्यापीठात डीन, लघुचित्रपटकर्ता, माहितिपटकर्ता, प्रचारपटकर्ता, वगैरे – असा हा माझा एक हरहुन्नरी मित्र –

हे, ते, आणि इतर सर्वच, प्रथमच एकमताने म्हणताहेत की

लोकशाहीचा विजय झाला आहे !

विश्लेषण --

तो खोटा प्रचार प्रभावी ठरला --

हा खोटा प्रचार प्रभावी ठरला नाही !

राजकारणातल्या नैतिकतेच्या कल्पना कालौघात प्रगत आणि उदार होत आलेल्या आहेत -- संकुचित राहिलेल्या नाहीत !

काल दि. ०७-०६-२४ रोजी ' मन ' ची तालीम पाहिली !

१६-०६-२४ ला याचा मुंबईत प्रयोग होणार आहे !

हे काही ' वेगळे ' घडेल, हे नक्की !

डॉ. सौ. मेधा सिधये यांच्या खालील दोन पुस्तकांचा प्रकाशन समारंभ पुण्यातल्या श्रेयस हॉटेलमध्ये आज दि. ०९-०६-२४ ला सकाळी झाला. प्रकाशक, आपले रंगावाचा वाले वामन पंडित : ---

१. मराठी नाट्यविचार -- विविध रूपे आणि

२. नाट्यभाषिते ( संपादन ).

त्या वेळी काढलेला फोटो ( सौजन्य -- प्रख्यात चित्रकार रवी मुकुल )

फोटोत डावीकडून -- डॉ. सौ. मेधा सिधये, डॉ. अनंत देशमुख, प्रेमानंद गज्वी आणि मी.

तीन ज्येष्ठ नाटककार - प्रेमानंद गज्वी, चं. प्र. देशपांडे आणि अजित दळवी – यांच्यासोबत ( गिरीश पतके )

Facebook

Abhijeet Zunjarrao is feeling excited with Ashutosh Diwan and

29 others

.

.

एकेक नाटक उभ करण हे दिव्य आहे. नाटक खेळताना प्रत्येकाला हा अनुभव येतोच येतो.

गेली अनेक वर्ष 'मन' मनात घोळत होतं.

Champra Deshpande यांना अनेकदा करतो करतो सांगून बरेचदा तालमी सुरू करून नाटक काही पुढे सरकल नाही. काही ना काही कारणाने मन करायच मनातच रहायच. कारण हे नाटक तस सगळ्यांच बाबतीत फार अवघड आहे. आणि म्हणूनच ते करायच होतं खर तर.

चंप्रंच लिखाण त्यांच्या website वर मोफत उपलब्ध आहे. त्यामुळे अनेकांनी मन वाचलं असेलच. नाटक होतंय कळल्यावर अनेकांनी नाटक वाचून नाटक पहायची इच्छा सुद्धा व्यक्त केली आहे. हे छानच झालं.

आता सगळ जुळून आलं आहे.

#विजयचौगुले निर्माता म्हणून उभे राहीले आहेत.

'मन' निमित्ताने कळत्या वया पासून ज्या नटाला काम करताना बघत आलो. ज्याच काम पाहून मोहित झालो त्या Rammesh Wani या प्रचंड क्षमता असलेल्या नटाला दिग्दर्शित करण्याची आयतीच संधी या निमित्ताने मिळाली आहे. इतक्या वर्षांपासून मनातलं नाटक नटाच्या माध्यमातून रंगभूमीवर प्रत्यक्ष सादर होत असताना बघणे म्हणजे कोणत्याही दिग्दर्शका करता सोहळा असतो. काहीसा तोच अनुभव रोज तालमीत येतोय. तुम्हाला हा अनुभव प्रत्यक्ष प्रयोग पहाताना नक्कीच येईल. खोटं नाही अगदी मनातल सांगतो आहे. मनापासून.

दादा. थँक्स फॉर धीस ट्रीट. अनेकांनी नकार दिल्यावर दादा सारखा दादा कलाकर काम करायला तयार झाला यातच सगळं आलं. त्याने या नाटका करता जबाबदारीने घेतलेली मेहनत जबरदस्त आहे. तुम्ही नाटक पहाल तर तुम्हाला ती नक्कीच जाणवेल. अर्थात पहिल्या प्रयोगाची धाकधूक आम्हा सगळ्यांच्या मनात सुरू आहेच. प्रयोग रंगण वा फसण त्या त्या दिवशी काय होईल यावर अवलंबून आहे. पण प्रोसेस जास्त महत्त्वाची मानावी आणि काम करत रहावं.

आमची टीम सोबत आहेच.

Shreyasi Vaidya Manali Rajeshree Omkar Uttam Jadhav आणि Shyam Chavan श्याम दादा जी जादू रंगमंचावर पेरणार आहे ते प्रत्यक्ष पहाण मजेशीर असणार आहे. Sumeet Patil ने अभ्यासपूर्ण नेपथ्य उभारल आहे. Dinesh Joshi यांचे चिरंजीव कृष्णा- देवा सारखी तरुण संगीतकार जोडी या निमित्ताने जोडली गेली. Pratikesh More आणि abstract digital यांनी जाहीरातीची बाजू सांभाळली आहे. Trupti Zunjarrao वेषभूषा आणि उलेश खंदारे रंगभूषा अशी महत्वाची बाजू सांभाळत आहे. Prabhakar Mathapati या मित्राने मनाचा ठाव घेणारे गाणे लिहून दिले आहे.

पहिला शुभारंभाच प्रयोग एनसीपीए सारख्या महत्त्वाच्या संस्कृतीक केंद्रात होतो आहे त्या करता Rajeshri Shinde, Bruce Guthrie यांचे मनापासून आभार!

सरते शेवटी पण महत्त्वाच.

एल. डी. सोनावणे महाविद्यालय, कल्याण यांचे आम्ही सगळे ऋणी आहोत. तालमी करता जागा मिळवण हा मामला जरा तापदायक असतो तो सोनावणे महाविद्यालयाने अलगद सोडवला.

आम्ही सगळे मिळून तुम्हाला नम्र विनंती करतोय आपण हा प्रयोग खरंच चुकवू नका

शुभारंभाचा प्रयोग

रविवार, दिनांक १६ जून

संध्याकाळी ५ वाजता

गोदरेज डान्स थिएटर, नरीमन पॉइंट, एन.सी.पी.ए

मुंबई

(तिकीटांसाठी लिंक व एन.सी.पी.ए बॉक्स ऑफिस नंबर कॉमेंट मधे.)

ज्या कवितेचा अर्थ सांगता येतो ती कविता कमी आणि निबंध जास्त असते -- राहुल पुंगलिया, पान १६२, साहित्यातील मिथके.

प्रख्यात नाटककार आणि मराठीतील महत्त्वाचे परंतु दुर्लक्षित कवी श्री चं प्र देशपांडे यांनी मिथकावरील माझ्या एका लेखातील एक विधान आज सकाळी त्यांच्या फेसबुक भिंतीवरती उद्धृत केले. त्याला उदंड प्रतिक्रिया मिळाल्या. यातील सर्वच प्रतिक्रिया मूळ लेखातील संदर्भ पाहिल्याशिवाय होत्या.

त्यामधील बहुतेक प्रतिक्रिया त्या विधानाला, अर्थ समजून न घेता,उडवून लावणाऱ्या, ते विधान पटले असले तरी यात नवे काय आहे? अशी विचारणा करणाऱ्या,आणि प्रसंगी कुचेष्टा करणाऱ्या, उथळ अशा होत्या. त्यामुळे त्यांचा प्रतिवाद करणे गरजेचे नाही. तरी देखील या प्रतिक्रिया मराठी वाङ्मय व्यवहारातील काही महत्त्वाचे कल दर्शवणाऱ्या आहेत. एक सामाजिक विदा म्हणून त्यांचे महत्त्व आहे. काही प्रतिक्रिया मात्र त्या विधानाला दिलेला प्रामाणिक प्रतिसाद होता. म्हणून या लिखाणाचा प्रपंच!

मिळालेल्या प्रतिक्रिया ज्या क्षुल्लक आणि थिल्लर होत्या, त्यांची वर्गवारी करणे शक्य आहे.ढोबळमानाने लोकशाहीवादी, सापेक्षतावादी आणि परंपरावादी या तीन प्रकारात सर्व कमेंट्ट्स बसतात.

१.लोकशाहीवादी मंडळींचे असे म्हणणे दिसते की कवितेचे कुठल्याही प्रकारे नियमन करू नये. कवितेची व्याख्याच करू नये. आणि प्रमाण व अप्रमाण ठरवणारे निकष कवितेबाबतीत असू नयेत. कविता हे सर्वांसाठी मुक्त संचाराचे क्षेत्र असावे. कविता लिहिण्यासाठी काही पात्रतेची गरज नाही. चांगली किंवा वाईट कविता हे निकष असू शकत नाहीत. कविता हा संवाद किंवा अभिव्यक्तीचाच थोडासा वेगळा म्हणजे आडव्या ऐवजी उभं लिहिलेला आणि अलंकृत असलेला प्रकार आहे.त्यामुळे कवी त्याच्या भावना, वृत्ती व विचार सांगण्यासाठीच लिहितो आणि वाचकाला ते समजून घेणे निव्वळ क्रमप्राप्तच नाही तर तो त्याचा मूलभूत मानवी हक्क आहे.

आता,जर कविता संवाद किंवा अभिव्यक्ती असली, तर तो संवाद गद्यात आणि सर्वसामान्य माणसे करतात त्या पद्धतीने छापील माध्यमातून आडवा, थेट, अलंकार, प्रतिमा आणि काव्यातील प्रचलित शब्द न वापरता का केला

जात नाही? हा संवाद अशा विचित्र उभ्या पद्धतीने का केला जातो? याचे उत्तर लोकशाहीवादी, मानवाधिकारवादी लोकांकडे नसते.

तसेच इतर कला जशा की शिल्पकला, चित्रकला,हिंदुस्तानी शास्त्रीय गायन व नृत्य यामध्ये हा व्यक्ती स्वातंत्र्याचा आणि लोकशाहीचा जयघोष का केला जात नाही? ज्ञान विज्ञानाची क्षेत्रे व तंत्र कौशल्यात तर लोकशाहीचा संवादाचा आणि अभिव्यक्तीचा आग्रह बिलकुलच धरला जात नाही. डॉक्टरच्या अनाकलनीय बोलण्यापुढे भयभीत रुग्ण मुंडी हलवतात. तिथे अर्थाचा आग्रह धरत नाहीत. तसेच शास्त्रज्ञांच्या पायाशी लोळण घेतात. आपल्याला शष्प न कळले तरी कृष्णविवरांचे कौतुक करतात. सिंग्युलॅरिटी चा काही न कळता भक्तीभावाने उल्लेख करतात .शेअर मार्केट आणि वित्तीय भांडवल याचे अर्थशास्त्र न कळता देखील, (कवितेत हिरीरीने अर्थाची मागणी करणारे लोक), भरपूर पैसे कमवतात. असे का याचेही उत्तर या लोकांकडे नसते. उपरोल्लिखित सर्व क्षेत्रे अतिशय प्रमाणित , नियमबद्ध आणि स्पष्ट व्याख्या केलेली असताना केवळ साहित्य क्षेत्राचे प्रमाणीकरण किंवा नियमन आणि साहित्याची विशेषतः कवितेची व्याख्या करायला प्रचंड विरोध का असतो? साहित्यामध्ये हवशा, नवश्या आणि गवशांना मोकळं रान हवं असा आग्रह का असतो? या प्रश्नाचे उत्तर द्यायला हवे.

याचे एक उत्तर मला असे दिसते की साहित्य हे मऊ क्षेत्र आहे म्हणजे ते सॉफ्ट फील्ड आहे.आणि मऊ लागले की कोपराने खणा ही सहज वृत्ती असते. आपल्या नवसाक्षर समाजात साहित्य हे कमीत कमी श्रम, तयारी, व अभ्यासात अभिव्यक्त होण्यासाठी सोपे माध्यम आहे. लिहिता वाचता आले की कवी लेखक व नाटककार होता येते.आणि तरी देखील ते सत्ताधाऱ्यांसाठी निरुपद्रवी असे क्षेत्र आहे .साहित्य क्षेत्रातील आक्रोश व टाहो चुचकारून, पुरस्कार देऊन मॅनेज करता येतात.ते व्यवस्थेला पाठबळच पुरवतात.

त्यामुळे साहित्याची स्वायत्त बांधणी आणि अनाकलनीयता, काठिण्य सर्वसामान्यांसाठी व सत्ताधाऱ्यांसाठी धोकादायक असणारे आहे. सर्वसामान्य माणसाला संवाद साधल्याचे व अभिव्यक्त केल्याचे फसवे समाधान साहित्य तत्काळ पुरवते. ते विद्रोहाचा कंड शमवते व तरी देखील निरुपयोगीच असते. साहित्याला भाषेपेक्षा एक वेगळे सत्व, सत्ता शास्त्रीय स्थान व प्रयोजन आहे अशी धारणा प्रस्थापित लोकांना नकोशी वाटते. त्यांना साहित्य एक छंद किंवा समाजातील सांस्कृतिक सजावट म्हणून असणे सुरक्षित वाटते. साहित्याचे संभाषित संवादी असले, अर्थपूर्ण असले तर त्यांचा अहंकार सुखावतो. त्यांना भाषेवरती,( आडव्याच नाही तर उभ्या देखील आणि शिवाय अलंकारिक देखील,) नियंत्रण असल्याने सुरक्षित व आरामशीर वाटते.

त्यामुळे अनाकलनीय कवितेला ते प्रचंड घाबरतात. कारण ती कविता त्यांना धक्कादायक ठरू शकतील असे अर्थ आपल्या गर्भात बाळगते.त्यांचे नेहमीचे सुखासीन, रुटीन जगणे चालू राहील इतकेच चवीपुरते साहित्य त्यांना हवे असते. साहित्य स्वतःला सुसंस्कृत कलासक्त घोषित करणारी गोष्ट असते. साहित्याच्या मूलगामी प्रश्नांना ते सामोरे जाऊ शकत नाहीत .ही मध्यमवर्गीय, सुमार माणसे साहित्याला स्वतःच्या खालच्या पातळीवरती खेचतात.

अपूर्ण --- राहुल पुंगलिया.

Sameer S. Dalvi

.

‘शब्द आणि वाक्ये वा ओळी यांच्या साहचर्यातून, क्रमवारीतून व आंतरसंबंधातून व्यक्त होणारी संसूचक अर्थवलये एका परिपूर्ण आशयाप्रत पोचवणारा एकसंध भाषिक मजकूर म्हणजे कविता'.

कविता लिहू पाहणाऱ्या, वाचू पाहणाऱ्या आणि अनेकदा प्रयत्न करून झाल्यावर पुन्हा नव्याने ती लिहू आणि वाचू पाहणाऱ्या कुणालाही, कविता म्हणजे काय किंवा कविता कशास म्हणतात या प्रश्नाचे उत्तर शोधण्यात जो गोंधळ (केऑस)  हाती लागतो, त्या गोंधळातून त्याचे बोट धरत, त्याला वाट दाखवण्याचे काम चं. प्र. देशपांडे यांची कवितेची उपरोक्त व्याख्या करते, असे मला वाटते. 'तंबाखूची टपरी आणि अनेक अनुसर्जित कविता' या त्यांच्या कवितासंग्रहातल्या, जगभरातील ५८ कवींच्या अनेक कविता एका संग्रहात वाचताना या व्याख्येचा प्रत्यय पानोपानी येतो. कवितेविषयी असलेल्या आपल्याकडील साहित्यिक आणि सांस्कृतिक समज-अपसमजांना दुरुस्त करत, कवितेच्या प्रांतात गांभीर्याने रमू पाहणाऱ्या कुणालाही अत्युत्तम दर्जाचे दिशादिग्दर्शन करू शकेल, असा कविता विषयक मौलिक ऐवज त्यांनी या संग्रहाच्या माध्यमातून आपल्या हाती दिला आहे, त्याबद्दल त्यांचे मानावे तितके ऋण थोडेच ! माझ्यापुरती या ऐवजाची मौलिकता काय ते मी थोडक्यात सांगायचा प्रयत्न करतो.

आजवर जे काही चाळीस चव्वेचाळीस वर्षांचे जगलो, त्यात 'एखाद्या व्यक्तीचा वा घटनेचा मला जो काही अनुभव आला' किंवा 'एखाद्या व्यक्तीने वा घटनेने मला जो अनुभव दिला' असं म्हणत, असा अनुभव देण्याची जबाबदारी समोरच्या व्यक्ती किंवा घटनेवर ढकलून, मी म्हणजे कुणीतरी स्वायत्त आणि सार्वभौम व्यक्ती आहे, असा वृद्धिंगत झालेला माझा समज चंप्र त्यांच्या प्रास्ताविकात मांडलेल्या काव्यतत्त्वात दुरुस्त करून देतात. (या संग्रहात केलेले प्रास्ताविक सुद्धा समग्र कवितेच्या संदर्भात आपले कालातीत मूल्य राखून आहे) ते म्हणतात, अनुभव म्हणज काय तर जगण्यातल्या घटितांना - घटनांना येणारा व्यक्तीचा प्रतिसाद वा प्रतिक्रिया. म्हणजेच मी जे धरून चालल़ो होतो त्याच्या नेमके उलट. अनुभव हा प्रत्येक व्यक्तीच्या शारीर-मानसिक घडणीवर - प्रोग्रॅमिंगवर - कंडिशनिंगवर अवलंबून असतो. त्यामुळे, अनुभवाला सत्याचे मूल्य असू शकत नाही. मी स्वायत्त आणि सार्वभौम असण्याच्या माझ्या समजूतीला सुरुंग लावणारे हे काव्यतत्त्व माझ्या दृष्टीने मौलिक आहे. सध्याच्या पोस्ट मॉडर्न कालखंडात हरारी सारख्या मानववंशशास्त्रज्ञाने देखील या तत्त्वाला आपल्या लिखाणातून दुजोरा दिल्याचे अनेकांनी वाचले असावे. पण कवितेच्या संदर्भात खूपच आग्रही भूमिका घेऊन आपल्या साहित्यिक पर्यावरणात वावरत असलेल्या लोकांनी या तत्त्वाची कितपत दखल घेतली आहे, याबद्दल शंकेला प्रचंड वाव आहे. असो. माझ्यापुरते सांगायचे झाले तर या संग्रहात ज्या कविता अनुसर्जनासाठी निवडल्या आहेत त्यात, वर उल्लेख केलेल्या काव्यतत्वाचे पुरेपूर दर्शन चंप्र आपल्याला घडवतात.

वानगीदाखल मूळ इटालियन कवी, अलेसिओ झानेलीची त्यांनी अनुसर्जित केलेली एक कविता इथे देण्याचा मोह होतो आहे,

प्रतिबिंब

आपण सगळे इतर सगळे आहोत

आपल्यापैकी प्रत्येकजण

आपण जे काही आहोत वा जगण्यात
जिथे पोचतो
तेही इतर सगळ्यांमुळेच घडते
प्रत्येकजण - एकेकटा कुणीच नाहीय --
आपण इतर प्रत्येकाचे
यश आणि अपयश आहोत
आपण इतर प्रत्येकाचे
सुख आणि दुःख आहोत
आपल्याव्यतिरिक्त
इतर प्रत्येकाच्याही
जगण्याचा परिणाम आहोत
आपल्या प्रत्येकात
इतर सगळेही प्रतिबिंबित आहेत
आपण प्रत्येकजण
इतर सर्वांची बेरीज आहोत
निरपवादपणे
आपण प्रत्येकजण
दुसऱ्या कुणाचीच
आपल्याला साक्ष नसेल
तर आपण कुणीच नसू
आणि काहीच नसू

---

ही आणि संग्रहातील अशा अनेक कविता म्हणजे चं. प्र. देशपांडेंच्या अनुसर्जनाचे सौंदर्य म्हटले पाहिजे. सगळ्या कवितांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्या त्या कवितेला योजलेली समर्पक अशी शीर्षके ! एखाद्या कवितेचे आकलन तिच्या पहिल्या वाचनात न झाल्यास ती कविता तिच्या शीर्षकाचे स्मरण ठेवत दुसऱ्यांदा वाचावी. असे केल्याने तिचे आकलन होण्यास मदत होते असा माझा अनुभव आहे. या संग्रहातल्या बहुतांश कविता मी अश्या पद्धतीने दोनदा तीनदा वाचल्या. त्यानंतर जे काही आकलन झाले त्यातून स्रोत भाषेत योजलेल्या शब्दांचा अंदाज येतो. शिवाय, लक्ष्य भाषेतील अनुसर्जनातले भाषा सौंदर्यही प्रकर्षाने जाणवते. अनुक्रमाच्या बाबतीतही सुरुवातीच्या झानेली पासून ते शेवटच्या निकॅनोर पारा पर्यंत कवितांची केलेली योजना खासच आहे. जिज्ञासूंनी हा कवितासंग्रह वाचल्यास अनुक्रमाच्या अनुषंगाने पाराच्या कवितेचे सर्वात शेवटी केलेले उपयोजन चं. प्र. देशपांडेची कवी आणि अनुसर्जक म्हणून असलेली धारणा स्पष्ट करते.

आजवरच्या माझ्या वाचन प्रवासात दोन पुस्तकांनी खांद्यावरच्या झोळीत कायमस्वरूपाचे स्थान पटकावले होते. पहिले डॉक्टर धर्मवीर भारतींचे 'अंधा युग' आणि दुसरे जयंत पवारांचे 'पासवाला'. 'तंबाखूच्या टपरी' निमित्ताने त्यात आणखी एका सोबत्याची भर पडली आहे.

तंबाखूची टपरी आणि अनेक अनुसर्जित कविता

चं. प्र. देशपांडे

©□समीर दळवी

Abhijeet Zunjarrao is with Datta Patil and
15 others
at NCPA Mumbai.
· Mumbai ·

आमच्या ' मन ' या नाटकाबाबतचे दोन अभिप्राय नम्रतापूर्वक आपल्या सार्वांच्या माहितीसाठी --

पुढील प्रयोग कल्याण, दादर, नाशिक, पुणे

***

अभिजीत झुंजाररावचं पुन्हा एक नाटक पाहिलं.

काल परवा दत्ता पाटील यांचं 'कृष्णविवर' आणि आज चं. प्र. देशपांडे यांचं "मन" नावाचं, एन.सी.पी.ए.ला अभिजित झुंजारराव ने दिग्दर्शन केलेलं. त्याला लगेच कळवलं, "अभिजीत, लागोपाठ पाहिलेल्या तुझ्या दोन चांगल्या नाटकाचं 'भूत' माझ्यावरून अजून उतरत नाही. तूच ह्याला जबाबदार आहेस, चांगली नाटकं करून". हे नाटक खरंतर चं.प्रं.चं जुनं नाटक आहे. नाटक बघताना आजतागायत कुणी केलं कसं नाही, याचंही नवल वाटत राहिलं. पण त्यातलं माणसाच्या मनाच्या विदिर्णतेचे/शतखंडिततेचे सूत्र आजच्या म्हणजेच उत्तर आधुनिकतेतल्या मानवी अवस्थेला, त्यातल्या कारूण्याला कवेत घेणारं आहे, किंबहुना ते सार्वकालीकच आहे, हे विशेष. योग्य वेळी केलाय अभिजीतनं हा दीर्घांक. शिवाय अशा कलाकृतींना स्थळकाळवेळेचं बंधन नसतं. फक्त अशा कलाकृती शोधण्यासाठी नजर असावी लागते नि मूळात स्वतःच्या प्रेमातून बाहेर पडावं लागतं कलावंतानं. त्यासाठी कलावंतानं पराकोटीचं 'अस्वस्थ' असावं लागतं. सध्या तरी हे मला अभिजीत झुंजाररावच्या कामातून दिसतंय, पुढचं मला माहित नाही. कलावंताचा विशिष्ट माध्यमाचा शोध घेण्याचा हा प्रयत्न अखेरीस जीवनाचाच समग्र शोध घेण्याच्या प्रयत्नांपर्यंत पोहचला पाहिजे. त्यासाठी  केवळ विशिष्ट माध्यमापेक्षा माणसांचं 'जगणंच' कलावंताची सामग्री असायला /बनायला हवीत. सगळ्या मोठ्या कलावंतांचं असंच होतं. आपल्याकडच्या जी.ए.,तेंडुलकर,एलकुंचवार,आळेकर आणि चं.प्र.देशपांडे (आणि अन्य काही थोडेच) ह्यांच्याबाबतीत हे दाखवता येईल.

"मन" हा एका मध्यमवर्गीय माणसाचा एकालाप आहे. अर्थात म्हणजेच एकपात्री स्वगताचं हे नाटक.

सुरूवातीला मुख्य पात्राचा (नि एकमेव असलेल्या) जरा वरचा स्वर लागला. पण नंतर मात्र आख्खं नाटक दिग्दर्शक अभिजीत झुंजाररावने छान लयीत सादर केलं. म्हटलं तर हा एक प्रयोग (experiment) होता. नेपथ्यकार, संगीतकार, प्रकाशयोजनाकार, अभिनेता रमेश वाणी आणि अर्थातच दिग्दर्शक अभिजीत झुंजाररावने हा

experiment चांगला पेललाय. अभिजीत झुंजारराव हा वेगवेगळ्या शैलीत नाटकं सादर करणारा आजचा अभ्यासू दिग्दर्शक आहे. तो नाट्यमाध्यमाशी निष्ठावंत तर आहेच पण कलावंताच्या झपाटलेपणातून नाट्यमाध्यमाचा शोधही घेतोय आणि समीक्षकांपुढे नवी आव्हाने निर्माण करतोय. मराठी नाटकांना अर्थपूर्ण योगदान देणा-या ह्या दिग्दर्शकाचे प्रत्येक नाटक, त्यातल्या चुकांसह, पहायला हवे, असं माझं मत आहे. आपल्या प्रयोग सादरीकरणाने तो नाटकाच्या विकासाच्या खूप शक्यता समोर आणतो नि आपण समृद्ध होतो. खूप बोललो पण हे बोलायला नि सांगायलाच हवे, निदान मी तरी.

नीलकंठ कदम, डोंबिवली

कवी आणि समीक्षक

***

चं. प्र. देशपांडे लिखित अभिजीत झुंजारराव दिग्दर्शित 'मन' हा एकपात्री नाट्यप्रयोग म्हणजे मनाच्या गुंतागुंतीचा वेगवेगळ्या आयामांतून घेतलेला चिंतनीय वेध आहे. नीलकंठ या नायकाच्या मनाचा प्रवास या नाटकाच्या केंद्रस्थानी आहे. वैयक्तिक जीवन, व्यावसायिक जीवन, सामाजिक संबंध अशा मनाच्या अनेक कप्प्यांत तयार झालेल्या गाठी आणि त्यांचा गुंता सोडवण्याचा हा वैचारिक प्रवास आहे. नाटकात गुंफले गेलेले नायकाच्या मनाचे पदर एकरेषीय नाहीत; तर रोजच्या जगण्यातल्या छोट्या-मोठ्या प्रश्नांना भिडताना ते त्याच्या नकळत जटिल होत जातात. त्यांचा गुंता सोडवताना नायक कधी कोलमडतो, कधी भावनतिरेकाने उन्मळतो, तर कधी नेटाने उभा राहतो. कधी मनात खोलवर झिरपलेल्या अस्तित्ववादी प्रश्नांचा मागोवा घेत मनाचा तळ उपसतो. मनातील मुक्त विचारांना भीतीची वेसण घातली जाते का, विचारांवर कळत- नकळत कसली दडपणे लादली जातात, सामाजिक बांधिलकीचेही कधी ओझे होऊ शकते का, चिंता, काळजी, राग, मत्सर अशा भावनांनी बांधून ठेवलेले मनातले पिंजरे कधी उघडले जातात का, अशा विविध प्रश्नांची उत्तरे हे नाटक शोधत जाते व प्रेक्षकांना एका उत्तम नाट्यप्रयोगाचा अनुभव देते, लेखन, दिग्दर्शन, अभिनय, नेपथ्य यात सरस असलेला हा प्रयोग मनाच्या गुंतागुंतीची अनेक द्वारे प्रेक्षकांसमोर उघडत नेतो आणि चिंतनाला प्रवृत्त करतो. वेगळे काही पहायचे असेल तर 'मन' अजिबात चुकवू नका.

डॉ. अंजली जोशी

सायकोलॉजिस्ट

कधी घडूच शकणार नाही असे वाटत असलेली, हे नाटक सादर करण्याची घटना, अभिजित, रमेश आणि त्यांच्या टीमने घडवून आणली -- याचा, लेखक म्हणून मला आनंद आहे. कालचा पहिलाच प्रयोग होता. चर्चा होत राहतील, अधिक सफाई येत जाईल. हे घडणे सोपे नव्हते हे इथे नमूद करून ठेवतो.

Surendra Vithal Darekar is feeling welcome with रवीन्द्र दामोदर लाखे and 24 others

.

.

अभ्यासोनी प्रकटावे :

काल चं.प्र.देशपांडे यांनी डॉ.राहुल पुंगलिया यांच्या लेखातील कवितेच्या संदर्भातील एक विधान उद्धृत केल्यावर वाचकांनी त्यावर विविधांगी प्रतिक्रिया दिल्या. त्याला अनुलक्षून पुंगलिया यांनी त्याचे काहीसे सडेतोड स्पष्टीकरण देखील आज दिलेले आहे. या निमित्ताने एक प्रश्न चर्चेत आला हे आजच्या परिस्थितीत स्वागतार्ह म्हणावे लागेल. इथे महत्वपूर्ण बाब म्हणजे हे विधान देशपांडे यांनी मागील पुढील संदर्भाशिवाय दिले असे वाचक धरून पुंगलिया यांचे मत आहे. पण फेसबुक ट्विटर सारखी catchy माध्यमे लक्षात घेता ते काहीसे स्वाभाविक वाटते. त्याची तयारी आपण ठेवली पाहिजे असे वाटते. देशपांडे यांचा यामागील हेतू संभावित होता हे देखील त्यांनी वाचकांच्या प्रतिक्रियेवरील समारोपात जे म्हटले त्यावरून स्पष्टच आहे.(ठीक आहे. अनेकांचे अनेक प्रतिसाद आलेले आहेत. हे अपेक्षित होतेच. म्हणून तर ही पोस्ट दिली. आता मला हे वाक्य का महत्त्वाचे वाटते ( आणि पटते ) ते सांगतो. कविता ही निव्वळ विचारक्रिया नसते. एकरेषीय नसते. ती पूर्णतेत -- व्यामिश्रतेच्या भानात -- असते. ते भान म्हणजे एकरेषीय विचारक्रिया नसते. भावनाही अशीच वर्णनात्मकतेत सापडू शकते. विचार, भावना, मते हे सर्व व्यक्तिगत असते. भान हे पूर्ण मानवजातीचे असते. सखोल, मौल्यवान कविता ही अशी ' सर्वांची ' असते. एखाद्या उताऱ्यात तिचा अर्थ सापडू शकत नाही. निबंध हा विचाराने समजावा अशी अपेक्षा असते. कवितेत ती प्रक्रिया नसते. असो.) मला वाटते देशपांडे हे गंभीर प्रवृत्तीचे लेखक विचारक असून ते अशा प्रकारची मुल्यभानात्मक टिप्पणी एक सूत्र पकडून सातत्याने करत असतात.मला स्वतःला त्यातील प्रतिभानाचा (intuition) भाग विचारणीय वाटत आलेला आहे. त्यावर मी स्वतंत्र टीपण करण्याचा अव्यापारेषु व्यापारही प्रसंगी केलेला आहे. उदाहरणार्थ त्यांनी प्रज्ञा दया पवार यांच्या पॉप्युलर प्रकाशीत ' हिल्लोळ हरवून आतबाहेरचा' संग्रहातील 'पुनर्लेखन' या कवितेच्या निमित्ताने मांडलेला एकुणच अभिप्राय महत्वपूर्ण आहे. मला स्वतःला तो आजच्या बहुतांश काव्यविषयक भुमिकेचा मागमूस नसलेल्या व पुष्कळच उथळ उत्सवी बेसूर वातावरणात दिलासा देणारा वाटला. ही कविता देखील प्रत्ययशील चिंतनाचा एक नमुना म्हणावी अशीच आहे. अशा कवितेची अनेक आकलन-आस्वादने संभवतात याविषयी पण दुमत असायचे कारण नाही. देशपांडे यांनी या टीपणात कवितेचा 'एकात्म अनुभव' विचारात घेऊन आशय संदर्भात केलेली काही विधाने तत्वज्ञानीय ज्ञानमिमांसेकडे संकेत करत असल्याचे जाणवते. टीपणात आरंभीच्या परिच्छेदात काही मराठी लेखकांची उदाहरणे देऊन ते "कोणतेही चांगले लेखन हे व्यक्तिगत मतांच्या मर्यादेत बद्ध नसते. लेखक जेव्हा खुला असतो, मानवी जगण्यातल्या समस्यांना वैचारिक अंतिमता देणारा नसतो तेव्हाच तो काही मौल्यवान निर्मिती करू शकतो हेच अनेकदा दिसून येते. जगातल्या अनेक महान कलावंतांनीही हे सांगितलेले आहे." अशा निष्कर्षाप्रत येतात. नंतर प्रस्तूत कवितेच्या आशय संबंधाने कवयित्रीच्या अभिव्यक्तीच्या वा भुमिकेच्या अंगाने ते काही प्रश्न उपस्थित करतात.यात जर "एखादी विचारसरणी बिंबविण्याचा हेतू नसेल तर व्यक्तिगत सुखदुःख वा मनःस्थिती संक्रामित करण्याचा हेतू आहे काय? पण यात तशा प्रकारची कसलीच गुंतवणूक नसून उलटपक्षी अनुभवाला समक्ष होत त्यापासून सुटका मोकळीक करून घेणे आहे. ते देखील येथे तटस्थ साक्षीभावाने घडत नसून गोंधळ भ्रम आभासाने युक्त आहे " म्हणत अखेरच्या दोन परिच्छेदात ते कवितेत अवतीर्ण होणाऱ्या प्रतिमेच्या संदर्भात तसेच अर्थनिर्णयन व संभाव्य आस्वादनाबाबत काही महत्त्वपूर्ण विधाने करतात. यातील प्रतिमेचा पुनरावृत्त होत भासमान व्यूह तयार करून स्वतःचेच अस्तित्व प्रश्नांकित करण्याचा भाग तात्विक दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे. इथे

टीपणकारांना प्रत्यक्ष जगण्यात नसलेल्या तरी अनुभवाच्या संभाव्य शक्यतांची कवितेतील प्रतिमांकित चिंतनात्मकता कविमनाच्या खुलेपणाची कलासिद्ध कसोटी वाटते. या प्रक्रियेत स्वतःचे अस्तित्व व सत्यता धोक्यात आणण्यातून प्रतिमेची निर्णायकता सिद्ध होतांना दिसते. आशयदृष्ट्या कवितेतील निवेदन व्यवहारिक हेतूने बाधीत नसणे हे एक प्रकारे खऱ्याखुऱ्या कलात्मकतेने सर्वांना व्यापकतेने उपलब्ध असणे होय. अशा 'कलात्म असण्या' तून सौहार्द आणि समज निर्माण व्हावी हीच तर कलेची मूल्यात्मकता असेही ते म्हणतात. मला वाटते हेच मत देशपांडे यांनी कमी अधिक फरकाने पुंगलिया यांच्या विधानावरील प्रतिक्रियेच्या उपरोक्त समारोपात अधोरेखित केलेले आहे. या निमित्ताने आजच्या गतीशील काळात केवळ ओळींदरम्यान(Between the lines) वाचण्याची पारंपरिक सवय टाकून आशयबंध दरम्यान (Between the context) वाचण्याची आंतरसंहितात्मक inter(con)textual सवय लागणे व त्यासाठी तसदी घेणे आवश्यक आहे असे वाटते. पुंगलिया यांनी आपल्या सडेतोड तरी संयत प्रतिक्रियेत हेच मांडण्याचा उपक्रम केलेला आहे असे वाटते. यावर पुष्कळच बोलता येईल. परंतु विस्तारभयास्तव येथे थांबणे उचित होईल. तथापि अंकेक्षण संकेताला धरून चूभूदेघे.

याला म्हणतात नाटक पोचणे ---

मन झाले ओझे...

सुप्रसिद्ध नाटककार, कवी चं. प्र. देशपांडे यांनी लिहिलेला 'मन' हा दीर्घांक नुकताच बघितला. काही वर्षांपूर्वी तो सरांच्या वेबसाईटवरून 'फ्री डाऊनलोड' करून वाचला होता.

आपलं मन विचारांवर विहरत असतं, ते आपल्या कह्यात नसतं आणि याची सवय अंगवळणी पडलेली असते. तरीपण, शब्दांतून व्यक्त केलेलं ते वाचताना आश्चर्य वाटलं की संदर्भ वेगळे असले तरी इतकं कसं काय ते आपल्या मनाशी मिळतं जुळतं वाटतंय?

त्यामुळेच त्याच्या सादरीकरणाविषयी उत्सुकता होती.

सांगायला आनंद होतोय की, अभिनय, कल्याण आणि विजयलता प्रॉडक्शन्स निर्मित दीर्घांकातून माणसाच्या मनातला हा गुंता सलग शंभरेक मिनिटं जराही न थांबता सादर करणं हे आव्हान अभिनेता रमेश वाणी आणि दिग्दर्शक अभिजीत झुंजारराव यांनी उत्तमरित्या पेललं आहे.

दीर्घांकाच्या पहिल्याच दृश्यासंबंधी नाटककाराने लिहिले आहे -- "पडदा उघडतो तेव्हा नीलकंठ समोर बसलेला. काहीसा थकलेला. पण विचारचक्रात. योग्य त्या ठिकाणी बिझनेस व विश्राम यावे. सतत सलग बोलणे नसावे."

या ठिकाणी दिग्दर्शकाने नायकाला जी क्रिया करताना दाखवलं आहे तिथेच त्याच्या मानसिकतेची अशी काही चुणूक दिसते, जी पुढे संपूर्ण वेळ तशीच टिकवून ठेवण्यात दिग्दर्शक यशस्वी झाला आहे.

रंगमंचावर एकदाही काळोख न करता, विंगेत न जाता वयातला जो बदल (सुरुवातीला ३५-४० आणि नंतर ६२-६३) दाखवला आहे तोही अनोखा आहे.

नाटककार लिहितात --

"स्थळ: घर किंवा एखादी भौमितिक आकारांची रचना."  नेपथ्यकार सुमित पाटील यांनी साजेसं नेपथ्य केलं आहे. जाडजूड दोरखंड, घड्याळाचे आकडे - काटे, पोपटाचा पिंजरा, बाल्कनीचं रेलिंग, इ. पूर्ण रंगमंच व्यापणारं आणि अडकलेल्या मोकाट मनाचा  वावर अन् सुटकेसाठी वृथा धडपड दर्शविता यावी यासाठी ते चपखल झालं आहे.
संगीतकार कृष्णा - देवा यांचं पार्श्वसंगीत आणि या जोडीतील देवा यांचं स्वरार्त गायन हेदेखील त्या त्या मनोवस्थेला सार्थ व्यक्त करणारं झालं आहे.
संपूर्ण प्रयोग (अतीवापराने गुळगुळीत झालेला असला तरी हाच शब्द) देखणा! अन् तोही NCPA च्या मिनी थिएटरमध्ये मोजक्या जाणकारांच्या उपस्थितीत बघताना आनंद झाला.
लेखक चंप्र त्यांच्या कुटुंबीयांसह, सुप्रसिद्ध मनोविकारतज्ज्ञ आणि लेखिका डॉ. अंजली जोशी, सुप्रसिद्ध दिग्दर्शक गिरीश पतके, सुप्रसिद्ध नाटककार प्रेमानंद गज्वी, सुप्रसिद्ध अभिनेते शैलेश दातार.
'मन ' म्हटलं की सर्वांत पहिल्यांदा आठवतात सं. रामदास स्वामींचे मनाचे श्लोक, बहिणाबाईच्या आणि इतर कवींच्या कविता, भावगीतं, गाणी.
मनाचे श्लोक सांगतात की मन 'व्यर्थ चिंता' वाहते तसेच 'बहु हिंडता सौख्य होणार नाही'.
मनाने काय करावे अन् काय करू नये, मनाला शिस्त कशी लावावी,  मनातल्या सुख-दुःखाच्याकडे कसं बघावं अथवा बघू नये हेही सुचवतात. यासाठी मनाला श्रीरामाच्या चरणी अर्पण करावं  असं रामदासस्वामी म्हणतात.
कविता - गीतांमधून मनाच्या प्रतिमा साकारल्या आहेत. मन 'पाखरू पाखरू',  मन 'उभ्या पिकातलं ढोर', मन 'काळोखाची गुंफा', मन 'तेजाचे राऊळ', मन 'उधाण वाऱ्याचे' इ.
मनाचे हे श्लोक अन् या प्रतिमा कशा तयार झाल्या?
मनाच्या हालचालींमुळे.
मनाच्या हालचाली म्हणजे काय?
मनात येणारे असंख्य विचार.
हे विचार नक्की काय स्वरूपाचे असतात? ते मनात का येतात? त्यांच्याशिवाय माणूस जगू शकतो का? मनात विचारांची आवर्तनं सुरू असताना माणसाचं जगणं - वागणं कसं असतं?
त्यांचे त्या माणसावर, त्याच्या नातेसंबंधांवर कसे अन् काय परिणाम होतात?
'मन' दीर्घांक मनाच्या हालचाली आपल्या पुढ्यात तंतोतंत उभ्या करतो.
या हालचालींना अमुक एक विषय किंवा दिशा नाही. सतत उलट सुलट, वेड्यावाकड्या विचारांत अडकलेल्या. मात्र एक गोष्ट अधोरेखित होत राहते की हे मन प्राप्त परिस्थितीबाबत असमाधानी असूनही नाईलाजाने तिचा स्वीकार करता करता त्यातच अधिकाधिक गुरफटत गेलं आहे. ऐन उमेदीच्या काळात आणि निवृत्तीनंतरही हे असंच!
विचारांच्या कोलाहलातून सुटका व्हावी कशी? एकीकडे 'मेलो तर बरं' म्हणावं. पण मनात मरणाची भीती आणि ते दूर पळालं म्हणून हायसं वाटणं.
यातल्या काही जागा खास नाटककाराच्या असलेल्या, जसं की ---
"चुकलेल्या क्षणांचं अहिंसक आयुष्य आहे माझं! हेच माझं नशीब? हे? मला ज्या ज्या वेळी जे जे वाटलं ते ते मी केलंच नाही! मग मला ते तसं वाटण्याचा उपयोग

काय होता? आपण जे करू शकतो तेवढंच खरं तर माणसाला वाटलं पाहिजे! सगळी अस्तित्वात न आलेल्या क्षणांची स्मृतिचित्रं का सांभाळत बसलोय मी ? आणि आत्ताच्या क्षणांचं तरी मी काय करतोय ? त्या क्षणांसाठी हेही क्षण वेस्ट करतोय ? "

पुरुष असो वा स्त्री -- मनाच्या गुंताड्यातून सुटका होण्यासाठी, मन:शांतीसाठी ओंकार साधना - भगवद्गीतापठण शिकणं, गायन - वादनात मन रमवणं, एकलकोंडा स्वभाव असूनही समाजात जगता यावं म्हणून इतरांच्यात मिसळणं

अन् पुन:पुन्हा दुष्ट विचारचक्राच्या विळख्यात सापडणं.

माणसाच्या मनाचा इतका सखोल आलेख क्वचितच कुणी मांडला असावा...

चित्रा राजेंद्र जोशी - १७.६.२४

'मन' या नाटकाचे पुढील प्रयोग

शनिवार दिनांक २९ जून

रात्री ८:३० वाजता

आचार्य अत्रे रंगमंदीर, कल्याण

सोमवार दिनांक १ जुलै

रात्री ८:१५ वाजता

शिवाजी मंदिर, दादर

शुक्रवार दिनांक १२ जुलै

रात्री ७:३० वाजता

श्रीराम लागू रंगावकाश, पुणे

नाशिक, गोवा, कोल्हापूर लवकरच!!

Dinesh Jadhav is with Shyam Chavan and

2 others

The mind game....

आयुष्य हा मनाचा खेळ आहे, हे त्रिकालाबाधीत सत्य आहे आणि ते आपणच तयार केलेले आपल विश्व असत! पण हे सत्य आपणाला बऱ्याचदा उमगत नाही, जर हे अनुभवायचचं असेल तर चं.प्र. देशपांडे सरांचा चा "मन" हा दिर्घांक आपल्याला जरूर पहावयास हवा. तुमच आयुष्य प्रेरणादायी असेल, निरर्थक असेल कि सर्वसाधारण असेल हे ठरविण्याचा सर्वस्वी अधिकार हा तुमच्या मनाचा असतो. किंबहुना आपण त्याला तो अधिकार देतो आहे कारण आपण त्या मनाच्या जाळ्यात पुर्णतः अडकलोय. हॅट्स ऑफ चं.प्र. सर! फार मार्मिक पणे तुम्ही सर्वसामान्य माणसाच्या मनाच विवेचन अगदी ठळकपणे मांडलत दीर्घांकात. हा दिर्घांक तुम्हाला अस्वस्थ करतो कारण यात सतत तुम्ही स्वतःला शोधत असता. 100 मिनिटे एक अभिनेता तुम्हाला त्याच्या मनात चाललेल्या विचारांची

घालमेल मांडत असतो आणि आपण त्यात आपल प्रतिबिंब उत्कटपणे पाहत असतो हा सुरेख अनुभव आपणास दिलाय "मन" च्या टिम ने. लेखक म्हणुन चं.प्र. देशपांडे सर ग्रेट आहेतच पण दिग्दर्शक अभिजीत झुंजारराव ने ज्या पद्धतीने त्याला रंगमंचीय अविष्कार दिला आहे त्याला तोड नाही. नेपथ्य हे खुपच बोलके आहे आणि त्याला जबरदस्त साथ मिळाली आहे शाम चव्हाण च्या लाईट्स ची आणि संगीतकाराची. हा प्रयोग पाहील्या नंतर मी रमेश वाणी या कलाकराचा जबरदस्त फॅन झालोय. 100 मिनिट त्यांनी प्रेक्षागृहातील रसिकांना खिळवून ठेवलय ते ही मनाच्या अनाकलनीय भावनांच्या हिंदोळ्यावर. हा दिर्घांक कस आहे अभिनेत्याचा, दिग्दर्शकाचा आणि ईतर तंत्रज्ञ मंडळींचा जो चांगला जमुन आलाय. प्रयोगशील नाटक असल तरी त्याला व्यावसायिक दृष्टीकोनातुन आपण पाहायला हव कारण हेच अनुभव आपल्या मनाच्या कोपऱ्यात साठुन आपल आयुष्य समृध्द करत असतात हे मनात साठवुन घ्या.

संपुर्ण टिमला मनापासुन शुभेच्छा □

' मन ' च्या पहिल्या प्रयोगापूर्वी -- एन सी पी ए च्या वास्तूत ---

Abhijeet Zunjarrao

Your new experimental play " Mind", it is a solo performance, no entry, no exist, no darkness, onces curtain opened it dropped at the end, the play continued for 100 minutes, without makeup, without costume changes, you showed transformation of character on his face as per age lapses in play, the theme of play is quite strange, infinite mind, expression of mind, psychosis of mind, I think play has uncovered real face of human beings, you have always choosen different path for directing such a play, you have created your own style of direction that is less trodden by other ,you are really praiseworthy for it, you have gifted talented artist to theare like Ramesh wani, you have explored gem, he is really a great artist who played such a wonderful and marvellous role, C P Deshpande Sir is a great playwright, I liked his buddhibal and zabu, it was a great play, I think because of you, playwright dared to find out new avenues in writing plays, you have won strong support of audience, you have been enjoying good reputation and earned good name for your Theatre group, I extend my best wishes to all of your colleagues, all technicians, all backstage artist and who directly and indirectly helped you, you will grow like waxing moon day by day.

- Sudhakar madhukar Gadhave

Playwright, Khandala Talukha, Khandala Dist Satara

Mobile Number 9881026476

‘ मन ’ बाबतचे अभिप्राय ---

नेपथ्यकार, संगीतकार, प्रकाशयोजनाकार, अभिनेता रमेश वाणी आणि अर्थातच दिग्दर्शक अभिजित झुंजाररावने हा experiment चांगला पेललाय.

--- नीलकंठ कदम ( कवी आणि समीक्षक )

चं. प्र. देशपांडे लिखित अभिजित झुंजारराव दिग्दर्शित ‘मन’ हा एकपात्री नाट्यप्रयोग म्हणजे मनाच्या गुंतागुंतीचा वेगवेगळ्या आयामांतून घेतलेला चिंतनीय वेध आहे.

वेगळे काही पहायचे असेल तर 'मन' अजिबात चुकवू नका.

--- डॉ. अंजली जोशी ( सायकोलॉजिस्ट )

अभिनय, कल्याण आणि विजयलता प्रॉडक्शन्स निर्मित ‘ मन ‘ या दीर्घांकातून माणसाच्या मनातला हा गुंता सलग शंभरेक मिनिटं जराही न थांबता सादर करणं हे आव्हान अभिनेता रमेश वाणी आणि दिग्दर्शक अभिजित झुंजारराव यांनी उत्तमरीत्या पेललं आहे.

--- चित्रा राजेंद्र जोशी ( सी. ए. )

१०० मिनिटे एक अभिनेता तुम्हाला त्याच्या मनात चाललेल्या विचारांची घालमेल मांडत असतो आणि आपण त्यात आपल प्रतिबिंब उत्कटपणे पाहत असतो हा सुरेख अनुभव आपणास दिलाय "मन" च्या टीम ने.

--- दिनेश जाधव ( एक नाट्यकर्मी )

नक्की आणि लौकरात लौकर बघा .. आपलंच ‘ मन ‘ ..

योगेश खांडेकर ( अभिनेता )

अप्रतिम, अद्वितीय, विलक्षण, अशक्य, भारी, सुंदर – अशी अनेक विशेषणे कमी पडतील इतका असा हा एक जबरदस्त प्रयोग आहे ! ‘ मन ‘ !

--- विजय घाडगे ( प्रेक्षक, मुंबई )

Rahul Pungaliya is with रवीन्द्र दामोदर लाखे and

पाच दिवसांपूर्वी श्री चं प्र देशपांडे यांच्या एका पोस्टमुळे काहीशी चर्चा झाली होती त्याला मी किंचितसे उत्तरही दिले होते. आता माझे पूर्ण म्हणणे इथे मांडत आहे---

प्रख्यात नाटककार आणि मराठीतील महत्त्वाचे परंतु दुर्लक्षित कवी श्री चं प्र देशपांडे यांनी मिथकावरील माझ्या एका लेखातील एक विधान आज सकाळी त्यांच्या फेसबुक भिंतीवरती उद्धृत केले. त्याला उदंड प्रतिक्रिया मिळाल्या. यातील सर्वच प्रतिक्रिया मूळ लेखातील संदर्भ पाहिल्याशिवाय होत्या.

त्यामधील बहुतेक प्रतिक्रिया त्या विधानाला, अर्थ समजून न घेता,उडवून लावणाऱ्या, ते विधान पटले असले तरी यात नवे काय आहे? अशी विचारणा करणाऱ्या,आणि प्रसंगी कुचेष्टा करणाऱ्या, उथळ अशा होत्या. त्यामुळे त्यांचा

प्रतिवाद करणे गरजेचे नाही. तरी देखील या प्रतिक्रिया मराठी वाङ्मय व्यवहारातील काही महत्त्वाचे कल दर्शवणाऱ्या आहेत. एक सामाजिक विदा म्हणून त्यांचे महत्त्व आहे. काही प्रतिक्रिया मात्र त्या विधानाला दिलेला प्रामाणिक प्रतिसाद होता. म्हणून या लिखाणाचा प्रपंच!

मिळालेल्या प्रतिक्रिया ज्या क्षुल्लक आणि थिल्लर होत्या, त्यांची वर्गवारी करणे शक्य आहे.ढोबळमानाने लोकशाहीवादी, सापेक्षतावादी आणि परंपरावादी या तीन प्रकारात सर्व कमेंट्स बसतात.

१.लोकशाहीवादी मंडळींचे असे म्हणणे दिसते की कवितेचे कुठल्याही प्रकारे नियमन करू नये. कवितेची व्याख्याच करू नये. आणि प्रमाण व अप्रमाण ठरवणारे निकष कवितेबाबतीत असू नयेत. कविता हे सर्वांसाठी मुक्त संचाराचे क्षेत्र असावे. कविता लिहिण्यासाठी काही पात्रतेची गरज नाही. चांगली किंवा वाईट कविता हे निकष असू शकत नाहीत. कविता हा संवाद किंवा अभिव्यक्तीचाच थोडासा वेगळा म्हणजे आडव्या ऐवजी उभं लिहिलेला आणि अलंकृत असलेला प्रकार आहे.त्यामुळे कवी त्याच्या भावना, वृत्ती व विचार सांगण्यासाठीच लिहितो आणि वाचकाला ते समजून घेणे निव्वळ क्रमप्राप्तच नाही तर तो त्याचा मूलभूत मानवी हक्क आहे.

आता,जर कविता संवाद किंवा अभिव्यक्ती असली, तर तो संवाद गद्यात आणि सर्वसामान्य माणसे करतात त्या पद्धतीने छापील माध्यमातून आडवा, थेट, अलंकार, प्रतिमा आणि काव्यातील प्रचलित शब्द न वापरता का केला जात नाही? हा संवाद अशा विचित्र उभ्या पद्धतीने का केला जातो? याचे उत्तर लोकशाहीवादी, मानवाधिकारवादी लोकांकडे नसते.

तसेच इतर कला जशा की शिल्पकला, चित्रकला,हिंदुस्तानी शास्त्रीय गायन व नृत्य यामध्ये हा व्यक्ती स्वातंत्र्याचा आणि लोकशाहीचा जयघोष का केला जात नाही? ज्ञान विज्ञानाची क्षेत्रे व तंत्र कौशल्यात तर लोकशाहीचा संवादाचा आणि अभिव्यक्तीचा आग्रह बिलकुलच धरला जात नाही. डॉक्टरच्या अनाकलनीय बोलण्यापुढे भयभीत रुग्ण मुंडी हलवतात. तिथे अर्थाचा आग्रह धरत नाहीत. तसेच शास्त्रज्ञांच्या पायाशी लोळण घेतात. आपल्याला शष्प न कळले तरी कृष्णविवरांचे कौतुक करतात. सिंग्युलॅरिटी चा काही न कळता भक्तीभावाने उल्लेख करतात .शेअर मार्केट आणि वित्तीय भांडवल याचे अर्थशास्त्र न कळता देखील, कवितेत हिरीरीने अर्थाची मागणी करणारे लोक, भरपूर पैसे कमवतात. असे का याचेही उत्तर या लोकांकडे नसते. उपरोल्लिखित सर्व क्षेत्रे अतिशय प्रमाणित , नियमबद्ध आणि स्पष्ट व्याख्या केलेली असताना केवळ साहित्य क्षेत्राचे प्रमाणीकरण किंवा नियमन आणि साहित्याची विशेषतः कवितेची व्याख्या करायला प्रचंड विरोध का असतो? साहित्यामध्ये हवशा, नवश्या आणि गवशांना मोकळं रान हवं असा आग्रह का असतो? या प्रश्नाचे उत्तर द्यायला हवे.

याचे एक उत्तर मला असे दिसते की साहित्य हे मऊ क्षेत्र आहे म्हणजे ते सॉफ्ट फील्ड आहे.आणि मऊ लागले की कोपराने खणा ही सहज वृत्ती असते. आपल्या नवसाक्षर समाजात साहित्य हे कमीत कमी श्रम, तयारी, व अभ्यासात अभिव्यक्त होण्यासाठी सोपे माध्यम आहे. लिहिता वाचता आले की कवी लेखक व नाटककार होता येते.आणि तरी देखील ते सत्ताधाऱ्यांसाठी निरुपद्रवी असे क्षेत्र आहे .साहित्य क्षेत्रातील आक्रोश व टाहो चुचकारून, पुरस्कार देऊन मॅनेज करता येतात.ते व्यवस्थेला पाठबळच पुरवतात.

त्यामुळे साहित्याची स्वायत्त बांधणी आणि सर्वसामान्यांसाठी व सत्ताधाऱ्यांसाठी अनाकलनीयता, काठिण्य हे धोकादायक असणारे आहे. सर्वसामान्य माणसाला संवाद साधल्याचे व अभिव्यक्त केल्याचे फसवे समाधान साहित्य

तत्काळ पुरवते. ते विद्रोहाचा कंड शमवते व तरी देखील निरुपयोगीच असते. साहित्याला भाषेपेक्षा एक वेगळे सत्व, सत्ता शास्त्रीय स्थान व प्रयोजन आहे अशी धारणा प्रस्थापित लोकांना नकोशी वाटते. त्यांना साहित्य एक छंद किंवा समाजातील सांस्कृतिक सजावट म्हणून असणे सुरक्षित वाटते. साहित्याचे संभाषित संवादी असले, अर्थपूर्ण असले तर त्यांचा अहंकार सुखावतो. त्यांना भाषेवरती,( आडव्याच नाही तर उभ्या देखील आणि शिवाय अलंकारिक देखील,) नियंत्रण असल्याने सुरक्षित व आरामशीर वाटते.

त्यामुळे अनाकलनीय कवितेला ते प्रचंड घाबरतात. कारण ती कविता त्यांना धक्कादायक ठरू शकतील असे अर्थ आपल्या गर्भात बाळगते.त्यांचे नेहमीचे सुखासीन, रुटीन जगणे चालू राहील इतकेच चवीपुरते साहित्य त्यांना हवे असते. साहित्य स्वतःला सुसंस्कृत कलासक्त घोषित करणारी गोष्ट असते. साहित्याच्या मूलगामी प्रश्नांना ते सामोरे जाऊ शकत नाहीत .ही मध्यमवर्गीय, सुमार माणसे साहित्याला स्वतःच्या खालच्या पातळीवरती खेचतात. साहित्याबद्दल पद्धतशीर विधाने करून काही एक व्यवस्था शोधण्याचा प्रयत्न केला म्हणजेच साहित्याचे आत्मावलोकन करून जाणिव वाढवायचा प्रयत्न केला तर ते बऱ्याच जणांना खपत नाही. हे क्षेत्र अनियंत्रित असावे. इथे काहीशी मोकळीक मिळावी अशी अपेक्षा आहे. इतर कुठेच अशी मोकळीक मिळत नाही. आधुनिक समाज वैज्ञानिक, तांत्रिक, प्रशासकीय आणि लष्करी पद्धतीने साकार झालेला आहे. समाजामधील स्वातंत्र्य नाममात्र आणि फसवे आहे.विज्ञाने व तंत्रज्ञाने संघटित सत्ताकारणाच्या गरजांनुसार आणि मागणीनुसार "सत्य" व "वस्तुनिष्ठ तथ्यांचा" शोध घेतात हे आता लपून राहिलेले नाही.

मालमत्ताधारक वर्गाच्या हिताचे , विकासाचे कार्यक्रम राबवताना सत्ताधाऱ्यांनी सर्वसामान्यांची सहमती मिळवण्यासाठी 'विशुद्ध ज्ञान','निर्विवाद,केवल सत्याचा शोध' हे आदर्श सिनिकली वापरलेले असतात. खरे तर सर्वच सामाजिक राजकीय आदर्श हे गोरगरिबांच्या रक्त व घामाने डागाळलेले असतात. हे देखील आता सामान्य ज्ञान झालेले आहे .आणि हे असेच चालणार असा अटळ दैववादी विश्वासही जनतेमध्ये तयार झाला आहे. आता कोणालाच कशाचेच आश्चर्य वाटत नाही.

या पार्श्वभूमीवर कला क्षेत्र विविध अभिरुचींना पटेल असे मनोरंजन पुरवणारी एक यंत्रणा व बाजारपेठ झाली आहे. मराठी साहित्याबद्दल हे प्रकर्षाने जाणवते.जसा, विज्ञानाचे कार्य आणि महत्व सर्वसामान्यांच्या गळी उतरवण्यासाठी, "सत्य, ज्ञानासाठी ज्ञान, कुतूहल, वस्तुनिष्ठता" इत्यादी मिथ्या मूल्यांचा, जे विज्ञानाच्या प्रत्यक्ष प्रॅक्टीसमध्ये म्हणजे आचरणात बिलकुल दिसत नाहीत, त्यांचा आयडिओलॉजिकल वापर केला जातो. त्याचप्रमाणे साहित्यात देखील,"अभिव्यक्ती, कलेचा आस्वाद, सौंदर्यानुभव ,मानवतेच्या मूल्यांचा पुरस्कार, व्यक्तिनिष्ठता, भावनिकता, व्यक्ती स्वातंत्र्य, कल्पनाशक्ती, प्रतिभा, अंतर्मनाचा आविष्कार, प्रामाणिक संवाद इत्यादी मिथ्या मूल्यांचा आयडिओलॉजिकल वापर केला जातो.साहित्यातील नोकरदार (विद्यापीठीय व शासकीय ) आणि विविध साहित्य व्यावसायिकांना (यामध्ये प्रकाशक विक्रेत्यांबरोबर लेखक, कवी, नाटककार देखील आले) या आयडिओलॉजीला पूरक व्यवहार करावा लागतो. साहित्याच्या आयडिओलॉजीमुळे समाजामधील स्वातंत्र्याचा अभाव, लोकशाहीच्या रूपातील छुपी हुकूमशाही, दडपशाही, व्यक्तीच्या मनाचे व बुद्धीचे माध्यमे व ज्ञान विज्ञान उद्योगाकडून केले गेलेले कंडीशनिंग (संस्कार),परात्मता, अनुभव, समाधान व आनंदाचे क्रयवस्तूमध्ये झालेले रूपांतर या गोष्टी झाकल्या जातात. साहित्य व्यावसायिक म्हणजे लेखक आणि साहित्याचे उपभोक्ते म्हणजे वाचक या दोघांनाही समकालीन

घटनांना दिलेले थेट अपरीष्कृत प्रतिसाद म्हणजेच संवाद वाटू लागतो.त्यामुळे आज, वाचक उपभोक्त्यांच्या भावनिक वैचारिक गरजा भागवून घेण्याचे,साहित्य हे साधन झाले आहे.

ज्यांचा आग्रह कवितेने संवादी असावे आणि अर्थ निर्णयन वाचकाच्या मर्जीने चालावे असा आहे ते, भाषा,हे संवादाचे पारदर्शक माध्यम आहे हे गृहीत धरतात.आधुनिक काळात आणि कदाचित आधुनिकपूर्व समाजांमध्ये देखील भाषा पारदर्शक नाही व बहुतेक कधीच नव्हती. थेट संवाद हे मिथक आहे, आणि होते. वर उल्लेख केल्याप्रमाणे ज्ञान विज्ञान व इतर क्षेत्रांत विविध विचारधारांचे प्रवाह (आयडीओलॉजीकल फोर्सेस ) भाषेला अपारदर्शक व विशिष्ट कल असलेले, पक्षपाती माध्यम बनवतात. संवादाचे दोन्ही ध्रुव म्हणजे मी (सब्जेक्ट) आणि  वास्तव या दोन्ही गोष्टी दूषित झाल्या आहेत . 'मी ' आपल्या भावना व मनस्थितीच्या प्रामाणिक अभिव्यक्तीचा प्रयत्न करून वा आत्ताच्या व्यामिश्रतेचे समग्रभान ठेवून भाषेला पुन्हा एकदा संवादी व पारदर्शक बनवू शकत नाही.

थोडक्यात साहित्यिकाने आपले 'मी 'पण अबाधित व स्थिर आहे असे समजून, गृहीत धरून "आपण वास्तवाचा वेध प्रयत्नाने घेऊ शकतो" या भ्रमातून बाहेर यायला हवे. आधुनिक कवितेच्या सर्जन प्रक्रियेत व आस्वाद प्रक्रियेत समीक्षात्मक, चिकित्सक व सर्जनशील वृत्तींची सरमिसळ झालेली आहे. त्यामुळे कविता म्हणजे उत्स्फूर्त भावनांचा आविष्कार अशा संकल्पना आता कालबाह्य झालेल्या आहेत. कवितेचे निर्माण करताना त्याच कवितेची समीक्षा होत असते. या दोन्ही गोष्टी एकाच वेळी कवी करत असतो . आपल्याच कवितेच्या पायाखालचा आधार खेचणे अशी विघातक कृती करण्याची धूर्त लकब कवीला वापरावी लागते. त्यामुळे चांगली कविता ही संवाद व अर्थाच्या स्वतःच निर्माण केलेल्या शक्यतांचे विघटन करत पुढे जाते.

ही आत्मघाताची व आत्म चिकित्सेची भूमिका न घेणारे लिखाण सहजच विविध सत्ता संबंधांच्या आ वासून बसलेल्या  घशांत सहजच जाते. या कवितेसाठी धोकादायक बनलेल्या आणि अतिशय चित्त थरारक (एक्साईटिंग) काळात संस्कृत काव्यशास्त्रातील वाच्यार्थ, लक्षणा व व्यंजना फारसे उपयोगाचे असू शकायचे नाहीत . कारण या अलंकारिक कारागिरीमध्ये भाषेला गृहीत धरण्याची मुभा होती. आजसारखी व्यक्तीत्व, भाषा व संस्कृतीवर पूर्ण अंमल गाजवू पाहणारी सामाजिक आर्थिक व्यवस्था त्या काळात नव्हती. तेंव्हा भाषेवरती कौशल्यपूर्वक काम करून कवितेला अनुरूप आणि विशिष्ट व्यंगात्मक, परोक्ष अर्थ निर्माणाच्या शक्यता  होत्या. आज भाषा (म्हणजेच सामाजिक व सांस्कृतिक तथ्ये व मूल्ये) इतकी निसरडी व
बेभरंवशाची झाली आहेत की भाषा आपल्याला वापरते आहे का आपण भाषेला वापरत आहोत हे कळेनासे होते.

त्यामुळे चांगल्या कवितेत सुलभ संवादाच्या मिथकाला छेद दिला जातो. चं प्र देशपांडेंनी उद्धृत केलेल्या  विधानाला काही सापेक्षतावादी किंवा बहुलतावादी प्रतिक्रिया आल्या. त्यांचे म्हणणे असे होते की कविता अनेक प्रकारच्या आहेत आणि वाचकही अनेक प्रकारचे. त्यामुळे दोन्ही, कविता आणि त्यांचे अर्थ, अनेक असू शकतात. एकच एक अर्थ असावा अशा अपेक्षेची सक्ती नको. बाजारपेठेतील उत्पादन ग्राहकाने कसे वापरावे हे त्याचे तो ठरवतो. हे वस्तू वापरण्याचे स्वातंत्र्य भांडवली लोकशाहीमध्ये सुखद वाटते. साहित्य देखील या प्रकारची वापराची वस्तू असल्यासारखी ही अपेक्षा आहे. साहित्य हेतूपूर्वक संवाद सुलभतेला आव्हान देते . हीच साहित्याची सामाजिक बांधिलकी आहे. आणि असे साहित्य त्यामुळे सगळे आलबेल नाही याची जाणीव करून देते.

वरील विवेचन जर काही प्रमाणात ग्राह्य असले तर बहुसंख्य साहित्य जे संवादी व अर्थवाही आहे त्याचे स्थान व दर्जा (स्टेटस) काय ?

असा प्रश्न उभा राहतो .हे मुख्य प्रवाहातले साहित्य आहे. ते आपल्या समाजाच्या वैचारिक व राजकीय भूमिकेचे निदर्शक आहे. आजच्या घडीचे मध्यमवर्गीय (जरी त्यातील काही पूर्वाश्रमीचे दलित वंचित असले तरी) साहित्याचे जनक व उपभोक्ते आहेत.त्यांनी आत्ताची अधीमान्यता असलेली, प्रभुत्वशाली सांस्कृतिक व्यवस्था स्वीकारलेली आहे. या व्यवस्थेत ते आपल्या परीने भर घालीत असतात. प्रचलित मुख्य प्रवाहातील साहित्याचा मूलभूत खोटेपणा त्यांच्या लक्षातही  येणार नाही इतका अंगवळणी पडला आहे. किंवा ती स्थितीशरणता व अप्रामाणिकपणा ही या साहित्याची बेसलाईनच आहे.

पूर्ण

Facebook

Girish Rangnekar is with रवीन्द्र दामोदर लाखे and

.

"कुठेही जा, कितीही फिरा, तुम्ही एकाच ठिकाणी असता - मन! सगळ्या घटना, अनुभव, सुखदुःख घडण्याचे एकच ठिकाण - स्थळ फक्त मन! कुठं जाणं नाही आणि येणं नाही. जगणं म्हणजे फक्त मनाची हालचाल! तसं बघितलं तर प्रॉब्लेम एकच! आपलं माईंड! आपण उगीच प्रॉब्लेम्सची मोठी संख्या सांगत बसतो!" नाटकातले हे संवाद कुणाला अध्यात्मिक वाटतील तर कुणाला आधुनिक!

मराठीतले विद्वान कवि आणि नाटककार चं. प्र. देशपांडे यांनी पूर्वी लिहिलेली २२ नाटके/दीर्घांक आणि २३ एकांकिका अलिकडल्या २-३ वर्षात टप्प्या टप्प्याने पुस्तक रूपात प्रसिद्ध केल्या आहेत. "मन वेगळं, विचारसरणी वेगळी, अवेअरनेस वेगळा आणि जगणं वेगळं " - मराठीतल्या कोणत्याही साहित्य प्रकारात तशी अभावाने आढळणारी  ही स्पष्टता, हा दृष्टिकोन याची थेट मांडणी चंप्र आपल्या प्रत्येक नाट्यकृतीतून करतात!

"दंगल" या त्यांच्या एकांकितेत अंतर्मुख करणारे रोखठोक सवाल येतात - "सगळीकडूनच सगळं असं संघर्षमय का? आणि असंच जर आहे तर आम्ही संघर्षमय जगलो असं सांगण्यात तरी काय अर्थ आहे? दुसरं कसं जगू शकणार होतो?" मानसशास्त्रात रस असणाऱ्यांना सरांचे लेखन नेमकेपणाने उपयोगी पडेल. चंप्र म्हणतात – "आपल्या जगण्यात आर्थिक प्रश्न किंवा एखादा महत्त्वाचा संघर्ष केंद्रस्थानी नसून केंद्रस्थानी आहे तो फक्त आपल्या मनाचा गोंधळ आणि याला शरीरातली रसायने कारणीभूत असतात!".

त्या त्या पुस्तकासाठीचे प्रूफ रिडींग, त्याचे मुखपृष्ठ, ब्लर्ब पासून ते त्याचा बार कोड तयार करण्यापर्यंतची सगळी प्रोसेस चंप्रंनी एकहाती पार पाडली आहे. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर "दिग्दर्शन, कथा, पटकथा, संवाद, संगीत, गाणी, अभिनय - सबकुछ किशोरकुमार, असा हा प्रकार आहे." त्यांच्या प्रत्येक पुस्तकातल्या "ऋणनिर्देश" पानावर त्यांनी अन्य मातब्बर नावांसोबत माझ्या नावाचा देखील आवर्जून उल्लेख केला आहे. प्रत्येक पुस्तक छापून आले की आमची भेट ठरलेली असायची. त्या प्रत्येक भेटीत चंप्र सहीनिशी ते ते पुस्तक मला भेट देखील देत आले आहेत.

सरांनी भेट दिलेली ही सर्व नाटके आणि एकांकिका संग्रह मी त्या त्या वेळी टप्प्या टप्प्याने वाचत गेलो. सर्व पुस्तकांतली मिळून अंदाजे दीड-दोन हजार पाने असतील ज्याची ओळ अन ओळ मी तन्मयतेने वाचलेली आहे. माझ्या अनुभवानुसार ॲसिडिटी वाढली की आपल्या मनात नकारात्मक विचार यायला लागतात. तर्काने विचार करायचा झाल्यास, ॲसिडिटीच्या विरुद्ध गुणधर्म असलेल्या अल्कलीचे इनपुट/ अन्न जर अशा वेळी पोटाला मिळाले तर मनातले विचार बदलू शकतात. मनाचे प्रश्न, मनोव्यापार जर असे आपल्याला नीटपणाने उमजले, आऊट ऑफ कंट्रोल परिस्थितीमध्ये जर आपण त्रयस्थपणाने त्याकडे असे पाहायचे ठरवले तर असंख्य अडचणी, यातनांमधून आपली सुटका होऊ शकते. अशी सुटकेची संधी चंप्र सरांची नाटके आपल्याला प्राप्त करून देतात.

"नाणेफेक आणि इतर ५ नाटके" या पुस्तकात दिग्दर्शक, कवि रविंद्र लाखे यांचा लेख आहे. त्या लेखात लाखे म्हणतात – "नाटकातून कुठलीही एकरेषीय अर्थनिश्चिती होवू नये असा अंतस्थ हेतू चंप्रंच्या मनात असतो. चंप्रंच्या नाटकाचा नायक मन आहे पण नाटकात मनाला महत्व नसून मनाच्या सलग, उलटसुलट किंवा एकमेकांच्या विरुद्ध घडणाऱ्या हालचालींना महत्व आहे. चंप्रंचे कोणतेही नाटक हे प्रेक्षकांचे भान हरवण्यापेक्षा त्यांना भानावर आणणारे असते!"

दिग्दर्शक गिरीश पतके यांचा देखील प्रदीर्घ लेख चंप्रंच्या "ओळख परेड" या एकांकिका संग्रहात समाविष्ट आहे. त्यात पतके लिहितात - "चंप्र सरांसाठी सर्जिक साहित्य वा नाटक ही चंगळ नसून जगण्याच्या आकलनाची गंभीर प्रक्रिया असते. -- चंप्रंना स्वतःला विविध प्रकारच्या व्यक्तिमत्त्वांच्या निर्मितीत रस नसतो तर त्या व्यक्तींच्या मनांत चाललेल्या घडामोडींशी, त्यातील नाट्याशी रस असतो. -- चं. प्र. देशपांडे हे केवळ मराठी रंगभूमीवरील महत्त्वाचे नाटककार नाहीत तर भारतीय रंगभूमीवरील महत्त्वाचे नाटककार आहेत. त्यांच्या अनेक नाट्यकृती आता पुस्तक रूपाने उपलब्ध झालेल्या आहेत. त्या विविध भाषांमध्ये भाषांतरित-रूपांतरीत होणे आवश्यक आहे."

चंप्रंच्या प्रत्येक नाटकातून, एकांकितेतून वाचक म्हणून आपल्याला सखोल काही मिळत राहते! उदाहरणार्थ - "बुद्धीचे एकूण काम हे माणसाच्या जगण्यातलं अपयशी काम आहे. संपूर्ण जगण्याचा आवाका बुद्धीला घेता येत नाही. माणसाची सगळी नाती संघर्षमय आहेत आणि त्याला बुद्धीने उत्तर देता येत नाही. बुद्धीने प्रश्न सुटायचे असते तर सीमा प्रश्न, मानवी जगण्यातले प्रश्न सुटले असते. --- All reactions create problems.--- स्वतःच्या मनाच्या कंडिशनिंगचे प्रश्न सुटले की सगळे प्रश्न सुटणार!" चं.प्र. सरांची कमालीची वैचारिक स्पष्टता आपल्याला अक्षरशः मोहवते!

माणूस जेवढा आपल्याला दिसतो त्याच्या पलीकडे आपल्याला न दिसणारा केवढा तरी पसरलेला असतो. एखादी ठराविक भूमिका न घेता, अश्या न दिसणाऱ्या माणसाचा, त्याच्या मनाचा शोध घेणारे चंप्रंचे असे लिखाण इतर नाटककारांपेक्षा म्हणूनच वेधक आणि महान ठरते. त्यांच्या "ओळख परेड" या एकांकिकेत एक संवाद आहे - "काय झालं असतं-नसतं याला काही मर्यादा नाही. प्रत्यक्षालाच फक्त मर्यादा आहे. या प्रत्यक्षाच्या मर्यादेतच जगायचं आहे. या प्रत्यक्षाच्या चक्रातून सुटका नाही. आपली शरीरं, आपले अनुभव हेच सगळं प्रत्यक्ष रे! जाणार कुठे!."

त्यांच्या प्रत्येक पुस्तकातल्या प्रत्येक नाट्यकृतीमधून मला भावलेले काही संवाद इथे प्रस्तुत करत आहे -

चार पुरुषार्थांची चार नाटके -

१. ढोलताशे -

मन सारखं असे उत्सवात गुंतवल्यामुळं आणि अशा प्रकारे मनाला उत्सवाचं प्रदूषण झाल्यामुळे आयुष्याची काय हानी होते हे कसं कळत नाही?

अहंकाराच्या समर्पणाला भक्ती म्हणतात -- इथं तर अहंकाराचीच करमणूक चाललीय!

आनंद हा सारखा असा बाहेरून ओरबाडून हावरटासारखा खात राहावा असं वाटणं हा वेडेपणा नाही वाटत?

खरं शोधणारा घातक नसतो -- खोटं टिकवणारा घातक असतो.

सारखं दुसऱ्यांची मनं सांभाळत बसायची पध्दत घाणेरडी आहे एवढं माझ्या लक्षात आलेलं आहे. ती पध्दत पटली तर सारखं स्वतःच्याच विरुध्द वागावं लागतं.

सारखं काही ना काही साजरं करत जगायच्या रोगट पध्दतीला नकार द्यायचाय मला.

२. इराक -

ज्या विषयावर खूप मतभेद शक्य नाहीत असे विषय कलाक्षेत्रात इंटरेस्टिंग होत नाहीत. मानवी मूर्खपणाला खूप वाव असायलाच हवा!

स्वतःला भारतीय म्हणायला इथं सगळेच तयार आहेत, पण स्वतःला हिंदू म्हणवून घ्यायला काही कोटी लोक तयार नाहीत -- त्याचं काय करायचं?

कुठलीही आयडेंटिटी फिक्स करायला गेलं की हिंसेची बीजं आलीच!

वाघावर एकवेळ स्वार होता येईल पण उतरणं अवघड असतं!

माणसाचं मनच भांडवलवादी आहे, ते सतत काही ना काही जमा करत असतं -- अन्याय, सुख, दुःख, मान, अपमान, वगैरे!

३. बुद्धिबळ आणि झब्बू -

नुसते मनांचे सहवासही उत्सव होऊ शकतात.

तुला सांगतो, तुझ्या डोळ्यांतल्या तीव्र स्त्रीत्वानं मला अगदी घट्ट पकडून ठेवलं आहे. हा नजरेच्या स्पर्शाचा परिणाम. पण प्रत्यक्ष स्पर्श असतो त्याचेसुध्दा इतके हजारो प्रकार आहेत की काही विचारू नकोस ! एखाद्या ख्याल गायकीसारखं सुचत जातं एकेक. मैफल द्रुत लयीत कधी गेली ते कळतही नाही.

ज्ञानामुळं अधिकाधिक सूक्ष्मपणा येतो. सगळ्या पध्दती अधिकाधिक गुंतागुंतीच्या आणि सुंदर होत जातात.

' मी तुझं चुंबन घेतोय' किंवा ' मिठीत घेतोय' – हीच लेव्हल ते गाठतात आणि ते बायकांना नाही चालत – बाहेर कितीही पॉप म्यूझिक असलं तरी इथे शास्त्रीय संगीतच लागतं! नोमतोम, रागविस्तार -- हे सगळं पद्धतशीर व्हावं लागतं --

ज्याला स्वतःच्या वागण्याबद्दल गुप्तता ठेवावी लागते तो इतरांबद्दल संशयी आणि सावध असतो.

४. जणू काही वास्तव –

सगळी दुःखं, वेदना, संघर्ष, हिंसा यांचा उगम या मेंदूच्या नियंत्रण-ताणातून होतो.

एकमेकांपेक्षा वेगवेगळे विचार आणि वेगवेगळे स्वभाव तर असतातच! प्रॉब्लेम्स निर्माण व्हायला तेवढं पुरेसं आहे! प्रॉब्लेम्सशिवाय कुणाला जगताच येत नाही!

पराभव पचवता येणार नाही.  आपण विजयाला चटावलेले आहोत.

सगळे धर्म सतत मानसिक भाषेत बोलत राहिले! म्हणजे -- प्रेम, भीती, व्देष, हाव, हिंसकपणा, वगैरे.

काय काय कळावं असं माणसाला वाटत असतं. काळाच्या ओघात त्याला कळत जातं की काही कळायची गरजच नसते.

वास्तवाचे स्वरूप जाणून घेण्याची इच्छा हाच कला, तत्त्वज्ञान आणि विज्ञान यांना एकत्र आणणारा दुवा आहे.

एकच गुरुकिल्ली अशी सापडली पाहिजे की सगळे संघर्ष गळून पडतील.

पाच ॲब्सर्ड नाटके -

१. दिनकर पुरोहिताचा खून -

तुमचा लवकरच खून होणार आहे आणि हे तुम्हाला माहीत आहे, असं समजून मुलाखत घेतो मी तुमची.

२. एक गगनभेदी किंचाळी -

चांगलं म्हटलेलं पेलत नाही तुला.. लगेच वाहवत जातेस तू...

३. घोकंपट्टी -

जनरली माणसं एकमेकांशी हलकटपणानंच वागतात हे मला समजलेलं आहे. याचे तपशील किती भरायचे डोक्यात ?

माणसाचं मन म्हणजेच आंतर्विरोध ही साधी गोष्ट तुम्हाला समजू शकली नाही - आयुष्य संपत आलं तरीही!

अमेरिकेचे अध्यक्ष माझ्याहून खूपच मोठे ठरतात, कारण माझ्यापेक्षा खूपच प्रचंड विसंगती ते पेलतात !

लोक काय करतात, मी तंबाखू सोडली, मी तंबाखू सोडली -- असं म्हणत मानसिकदृष्ट्या सोडतच नाहीत तंबाखू!

सोडायचं पण मनानं धरून ठेवायचं मग काय अर्थ आहे?

४. गोळ्या काढलेलं पिस्तुल -

माझा खून होईपर्यंत माझा रोल आहे.

आई वारलेली दाखवायची आणि लगेच प्रेमगीत घ्यायचं -- असं करता येत नाही. गोष्ट कितीही बनावट चालते, पण सातत्याचा नियम पाळावाच लागतो.

माणूस हा मुळातच एक खोटा, अन्याय करणारा किंवा अन्याय सहन करणारा प्राणी आहे. आपण शक्यतो अन्याय करणाऱ्याच्या भूमिकेत असावं, असं माझं एक आपलं मर्यादित तत्वज्ञान आहे.

सूड, क्रोध, प्रेम, सहानुभूती -- अशा सगळ्या मनाच्या सवयी लक्षात घेऊनच रचावी लागते गोष्ट! जगण्याची ही फक्त एकच पध्दत उपलब्ध आहे का, हा प्रश्न आपण प्रत्यक्ष जगतानाही विचारात नाही, मग गोष्टीत का विचारावा !

५. ट्रायल –

हे नाटक अनुवादित असल्याने अशी वाक्ये इथे अप्रस्तुत ठरतात.

नाणेफेक आणि इतर ५ नाटके -

१. ए आपण चहा घ्यायचा? -

कितीही मोठा आवाज परवडतो पण माणसाचा त्रासिकपणा मिसळलेल्या आवाजाइतकी घाणेरडी गोष्ट जगात कुठली नसेल.

माणसं आवडीनिवडी फिक्स करत जातात ! खाद्यपदार्थ, त्यांच्या चवी, कपडे, त्यांचे रंग, एवढंच काय, विचार कुठले आवडतात ते पण फिक्स करत जातात! अरे बाबांनो, जितकं जास्त फिक्स होत जाल तितकं दुःख वाढवून घ्याल आयुष्यात! पण ऐकणार नाहीत! आपल्या आपल्या कामात खूप हुशार होतात पण जगण्याच्या कामात ढ !

लोक म्हणतात, खून करणं, हाणामारी करणं वगैरे असंस्कृतपणाची लक्षण आहेत -- आणि सुसंस्कृतपणाची लक्षणं म्हणजे ही --आपली चाललीयत ती --हळूहळू सडत राहणं म्हणजे सुसंस्कृतपणा -- प्रत्येक प्रश्न विचार करकरून पिसत राहणं आणि हळूहळू सडत राहणं --

मन सतत शून्यावर राहीलं पाहिजे.

२. धागेदोरे -

पारंपरिक सकाळ होते आहे. पारंपरिक ऊन पडत जाणे.. पारंपरिक सनई वगैरे... पारंपरिक धोंडी पारंपरिक साफसूफ करतो आहे.....

३. नाणेफेक –

भावना कमी म्हटल्यावर विचार जरा जास्त येणारच!

आपल्या विचाराच्या कक्षेत येणाऱ्या शक्यता या सगळ्या शक्यता आहेत असं समजायचं काही कारण नाही.

लोकशाहीइतका मुत्सद्दी प्रकार कुठं नसेल!

माणूस स्वतःचे निर्णय बेधडकपणे घेत असतो. पण आपल्याला आपुलकी वाटणाऱ्या दुसऱ्या माणसांचे निर्णय घ्यायला घाबरतो.

४. सध्या तरी शेवट गोड –

सध्या मी तुझं कोणतंच बोलणं अंतिम धरून चालत नाही.

सततच कल्पनाशक्ती सळसळती ठेवून वागावं लागेल.

५. सामसूम –

आदर्शवादी असण्यातही शरीरातली रसायनं कारणीभूत असतात!

तू नं सध्या एक ठराव -- सारखं चकित होत बसायचं नाही!

अन्याय दिसला की चवताळणं, धावून जाणं हे जर खरं असतं ना तर सगळीकडं सारखी धावत चाललेलीच माणसं दिसली असती !

६. झालं गेलं विसरून जाऊ (क्लॅरिटी) -

भाषा काही एखादी विचारसरणी लक्षात घेऊन तयार होत नाही! आणि या देशात इतकी गरिबी असूनही आपल्या फायद्याचं काय हे बहुसंख्यांना न कळणं हे नशीबच नाही तर काय! एक पगारवाढीचे करार सोडले तर महत्त्वाचे विषय काय, तर -- विचारस्वातंत्र्य आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य! कुणाला गरज असते यांची?...मुख्य काय?

वस्तू (७ दीर्घांक) -

१. बुद्धिबळ आणि झब्बू -

विवाहपूर्व सेक्स हवाच म्हणे नाहीतर घरात एखादं वाद्य वाजवून बघणाऱ्याला एकदम एखाद्या ऑर्केस्ट्रात वाजवायला सांगितल्यासारखं होतं.

विशेषत: हे असं गोलागोलांचं डिझाईन असलं ना की साडी नेसण्याच्या पद्धतीमुळे ते गोल कुठंही येऊ शकतात. कुठंही आले तरी ते करेक्टच वाटतं, हे कसं काय? पण तुझे तर करेक्टच आलेत म्हणा.

२. डावेदार -

प्रतारणेचं ओझं नकोय मरताना!

३. मन -

शब्दांची गर्दी होणं, गोंधळून जाणं, वेड होणं, आपल्याला जे कळतंय तेच अंतिम सत्य आहे आणि तेच बहुजनहिताचं आहे असं वाटणं हेच जिवंतपणाचे लक्षण आहे.

एका विचाराचा तथ्यहीनपणा कळला काय आणि दहा लाख विचारांचा तथ्यहीनपणा कळला काय काय फरक असणार आहे! शून्य ते शून्य!

परिस कसा टच करेल त्याचं सोनं करतो, तसं माझं माईंड! टच करेल त्याचे प्रश्न तयार करणारं!

खरंतर मी थकलोय.. सतत हा डोक्याचा कारखाना चालूच! याच माईंडनं पुनर्जन्म होईल? नकोच वाटतोय? दुसऱ्या जरा चांगल्या माईंडनं चालेल !

यशस्वी होणाऱ्या खूप लोकांना माईंड चांगलं मिळालेलं असतं याबद्दल मला शंकाच नाही ! मग त्यांचं काय कर्तृत्व? मला खूप छोटं जग हवंय -- खूप माणसं, खूप प्रसंग नकोयत त्यात ! एखाद्या धूमकेतूसारखं बाहेरनं काही येऊन माझ्या जगावर आदळू नये, असंच मला वाटत असतं! पण वाटून उपयोग?

एका ठराविक वयानंतरही केस काळे राहिलेली माणसं क्रूर असतात, असं चिनी अंगलक्षण सांगतं म्हणे! कारण त्यांना दुसऱ्यांची काळजीच नसते, असं त्यांचं म्हणणं!

४. नातं -

खरं तर त्या माणसाचे आभारच मानते मी मनातनं... मला हवा होता तसा पुरूष तू नाहीस हे कळून आलं मला त्याच्यामुळं...बरं झालं, त्याला वाटमारीचा हेतू सोडून ही वेगळीच इच्छा झाली

५. निर्मिती -

वरवर सरळ, साध्या दिसणाऱ्या गोष्टी एखाद्या भयानक टोकाकडे नेत असतात. वरवर कंटाळवाण्या दिसणाऱ्या गोष्टींतून एखादा खूनही आकाराला येत असतो.

वातावरणातली भयानकता फक्त दबा धरून असते... आणि मग एकच क्षण असा येतो की, घडून गेलेल्या गोष्टींचे वेगळेच अर्थ दिसायला लागतात.

हसणाऱ्या व्यक्ती निःस्वार्थी, नि:स्पृह वाटतात. हा आयुष्यातला सर्वात मोठा धोका आहे…

६. प्रेमच म्हणू याला हवं तर -

ट्रूथ रिपीटेड इज अ लाय !

आचार्य रजनीश म्हणतात की विनोदाशिवाय हसा ! हसण्यासाठी विनोदाची गरज नाही !

७. वस्तू -

कन्फ्युजन म्हटलं की मनाचा कणखरपणा जातो, मिळमिळीतपणा येतो.

खुल्लम खुल्ला (एकांकिका संग्रह) -

१. बस –

नावांचा माणसांवर थोडाफार परिणाम होत असावा. अमुक एका माणसाचे नाव हे नसून दुसरं असतं, तर तो असाच असता असं वाटत नाही.

२. डावे -

आपापल्या विचारसरण्या घेऊनच जातात सगळे विद्युतदाहिनीत!

३. इतिहास -

रस्त्यावरून चालताना पायांखाली स्वच्छ मोकळा रस्ता असला तरी पायांवर अपमानित देह आहे त्याचं काय?

४. खुल्लम खुल्ला -

ज्याच्यावर भाळून केलं लग्न तोच आयुष्यभर प्रॉब्लेम होऊन बसलाय.

५. संसाराणूपेंडघार -

तू रागावलीस की माझ्या तळपायात धडधडायला लागतं.

६. सत्य -

स्वतः शिवाय दुसऱ्या कुणालाच माहीत नसलेले आपले गुन्हे क्षम्य असतात की गुन्ह्याच्या अपराधी जाणिवेचा त्रास हेच त्याचं शासन असतं?

७. सेक्स -

प्रत्येक वेळी स्त्री शरीरानंच सामील झाली पाहिजे, असं काही नसतं. नुसते मनांचे सहवासही उत्सव होऊ शकतात.

८. स्थळ दिवाणखाना -

महिन्याला दोनचार अपमान या पगारात परवडतात.

माझं समजा बावीस हजार एकशे सदतीस एकूण प्रश्नांचं आयुष्य आहे! मी आत्ता पंधरा हजार पाचशे त्र्याण्णवव्या प्रश्नावर आहे! आणि सध्या मला सात महत्त्वाचे प्रश्न आहेत! त्यांचं महत्त्वच कसं जोखायचं? समजा प्रश्न नंबर तीन हा सगळ्यांत महत्त्वाचा आहे -- मग मी माझ्या उपलब्ध वेळातला जास्त वेळ त्याला द्यायला नको? प्रश्न नंबर दोन किंवा सातच चुकून जास्त वेळ खाऊन जातो!

स्वतः राजकारण करणं किंवा राजकारणावर प्रभाव टाकायची क्षमता असणं या दोनच खरं तर सर्वात आदरणीय गोष्टी आहेत.

शब्दांची गर्दी होणं, गोंधळून जाणं, वेडं होणं, आपल्याला जे कळतंय तेच अंतिम सत्य आहे आणि तेच बहुजनहिताचं आहे असं वाटणं -- हेच जिवंतपणाचं लक्षण आहे.

सत्याचं फार बिनचूक वर्णन लक्षात यायला लागणं म्हणजेच वेडेपणा!!

एका विचाराचा तथ्यहीनपणा कळला काय आणि दहा लाख विचारांचा तथ्यहीनपणा कळला काय - काय फरक असणार आहे ! शून्य ते शून्य!...

कसली आलीयेत तत्त्वं ! सर सलामत तो तत्वं पचास!

९. वेषांतर -

जगायला सारखं प्रोत्साहन कशाला हवंय तुला ! तुझं जगणं चांगलंय, तुझं जगणं चांगलंय -- असं सारखं दुसऱ्यांनी म्हणायला कशाला हवंय!

१०. विरहवेदना -

मला तर वाटतंय की आपण फक्त एक तपशील आहोत एकूण परिस्थितीचा. परिस्थितीच फक्त जगत असते.

एखाद्या भव्य मंडपात लग्न सोहळा चालू असल्यासारखा वेदनेचा उत्सव माजवायचाय तुला --

कविता म्हणजे पैसे मिळवायच्या कामात अडथळे आणणारी वस्तू.

११. एकत्र -

माशा मारल्यापेक्षा गप्पा मारलेल्या बऱ्या की! अहो कुणाचा जीव घेतल्याचं पाप तरी नाही त्यात --

म्हणजे च्यायला जगण्याच्या पद्धती दोनच दिसतात एक म्हणजे प्रश्न पडू देत जगणं आणि दुसरी म्हणजे प्रश्न दडपत जगणं!

१२. मासोळी -

भयानक महाखुनी आपल्या दाराशी उभे आहेत – समजा एक लाख अमरीश पुरी, दोन लाख परेश रावल!

ओळख परेड (एकांकिका संग्रह) -

१. दंगल -

सगळे प्रश्न एकत्रितपणे एका क्षणात पाहता आले पाहिजेत! आणि पाहताक्षणी ते नाहीसे झाले पाहिजेत!

२. ओळख परेड-

स्वस्थ बसणं हे स्वतःचं महत्व माजवणारं बोलणंच आहे एक प्रकारचं!

जन्माला येताना काही माणूस ठरवून येत नाही की, आपल्याला खून करायचाय म्हणून किंवा आपल्याला खून होऊन मरायचेय म्हणून!

३. समस्या सोडवण्याचा सराव -

फक्त समस्यांची वेगवेगळी रूपं हीच आपल्या वेगवेगळ्या आयुष्यांची वैशिष्ठ्य म्हणायची का?

मुलींनी जर पुरुषांच्या दिसण्याला महत्त्व देऊ नये असं तुमचं मत आहे तर मग तुम्ही स्वतः सुंदर मुलीवर प्रेम करायचा प्रयत्न का करता?

नुसतेच कुठले विचार जिंकतात याच्यावरच काही आयुष्य चाललेलं नसतं.

४. समुदाय -

अन्यायाचा प्रतिकार जेव्हा कमीत कमी वेळात करायचा असतो आणि ताबडतोब न्यायाची प्रस्थपना करायची असते तेव्हा संतापण्याशिवाय दुसरा मार्ग नसतो.

५. अस्तित्व -

आपल्याला जे अनुभवापासून ज्ञान मिळतं त्यात एक संगतवार घटनाक्रम असणार. बाहेरच्या लहरी शरीरात-- म्हणजे मेंदूकडे जात असणार. आणि ते ज्ञान एका विशिष्ट ठिकाणी मुद्रित होत असणार. या प्रक्रियेचा आम्ही शोध घेत आहोत. जेव्हा हे पूर्ण होईल तेव्हा ज्ञानाच्या रेकॉर्डस् निघतील. आणि त्या मुद्रित ज्ञानलहरी मेंदूत सोडण्याची सोय होईल. मेंदूची क्षमता वाढवण्याचे मार्ग सापडतील. आणि मग शाळा, शिक्षक, प्राध्यापक वगैरेंची जरूरच

लागणार नाही. यंत्रात डोकं ठेवलं की एकेका वेळी एकेका विषयाचा प्रगाढ पंडित करता येईल प्रत्येकाला. सगळी मानवजात प्रचंड ज्ञानी होऊन जाईल.

६. स्टालीन-

का जास्त लोकांपेक्षा कमी लोक बिनमहत्त्वाचेच असतात?

एक मिनिट हे एक वर्षापेक्षा महत्त्वाचं असतं का? दहा वर्षे ही शंभर वर्षांपेक्षा महत्त्वाची असतात का?

ज्या ध्येयाच्या आड इतकी माणसं येतात ते ध्येय बाळगावंच का माणसानं? माणसांच्या संख्येला काहीच महत्त्व नाही?

परिस्थिती माणूस घडवते हे जितकं खरं आहे तितकंच माणूस परिस्थिती घडवतो हेही खरं आहे. विनाशसुद्धा निर्मितीरूप असू शकतो.

७. ट्रेलर -

मी शब्दांपेक्षा कृतीवर जास्त भर देणारा माणूस आहे. माझ्या कृतीचा अनुभव न घेता माझ्या शब्दांवरून माझ्याबद्दल मत बनवू नका.

सगळी दुनिया समजल्यासारखे मतं सांगतात हरामजादे! मतं सांगायला भडवे सदोदित तयार!

८. खडक -

कुठल्याही खऱ्या गोष्टीत कसलाही 'पणा' नसतो; तिचं उभं राहणं किंवा अस्तित्वात असणं हे कुठल्याही कण्यावर अवलंबून असत नाही.

९. जोडपी -

ही नाती साली सगळी निश्चितता निर्माण करतात. आपल्या नात्यांत आपल्या मर्यादा गोठलेल्या असतात.

१०. ऑफिस -

खरा परमेश्वर तो आतला लेका! तू नुसता देव्हाऱ्यातला परमेश्वर! स्वतःच उदबत्ती लावायची आणि पडणारी राख बघत बसायचं!

११. रिलीफ -

आपल्या आवडीनिवडी आणि आपले फायदे-तोटे यांच्या व्यतिरिक्त कोणी करू शकतो विचार? मुळात असा विचार असू तरी शकतो का?

----

चंप्र त्यांच्या काही काही नाटकांतून आत्ता नाटक सुरू आहे याचं भान प्रेक्षकांना देत राहतात. त्यांचा स्त्रियांच्या मानसशास्त्राचा देखील अतिशय सूक्ष्म अभ्यास आहे हे जाणवत राहते. 'खलास' हा शब्द त्यांना प्रिय असावा, तो बऱ्याचदा संवादांत डोकावतो. 'नुस्खे', 'भागधेय', 'गुंताडा', 'लटांबर', 'सेन्स ऑफ वंडर', 'जागतिक निर्लज्ज साले' असेही काही हटके शब्द/शब्द प्रयोग आपली शब्द संपत्ती वाढवतात, भाषा समृद्ध करतात.

चंप्रंची व्यक्त व्हायची स्वतःची एक चंप्र स्टाईल आहे. नमुन्यादाखल काही संवाद/वाक्ये इथे प्रस्तुत करतो आहे -

- कुठलीही कपॅसिटी, न वापरता पडून राहू नये!
- ती स्वतः तशी भयंकर सूक्ष्म आहे.

• ते स्मूथनेसला टोकरणारे ठरले असते.

• हा निर्णय घेताना माझ्या मनात वैचारिक घर्षण झालंच नाही असं नाही.

• मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे आणि एकूण पुस्तकांची उपलब्धता नष्ट होणे हे एकाच वेळी घडेल असे दिसते.

चंप्र एके ठिकाणी म्हणतात - "आपले विचार आणि भावना या काही स्नायूपेशींतून उगम पावतात आणि आपल्या शरीरातली रसायनं त्यांचं नियंत्रण करतात." हा लेख वाचत असताना आपल्या मनात झालेल्या विचार - भावनांच्या निर्मितीकडे जर आपण डोळसपणे पाहू लागलो, त्यापाठी काही रसायने कार्यरत असतात याची देखील दखल घेऊ लागलो तर अशी लाभलेली सजगता मानवी जगणे सुकर व्हायला मोठी मदत करणारे ठरणार आहे. कलेच्या माध्यमातून स्वतःच्या मनावर ताबा मिळवून देणारे चंप्रंचे साहित्यातले हे योगदान श्रेष्ठ आहे. किंबहुना, पुलित्झर अथवा साहित्यातल्या नोबेलच्या तोडीचे आहे, नव्हे काय?

चंप्र सरांनी त्यांच्या नाटकांमधून मांडलेल्या मनोअभ्यासाचे सर्वांनी चिंतन केले पाहिजे. एखादा विचार दीर्घकाळ धरून ठेवणे महाकठीण. आपण विसरतो आणि आपण काय विसरलो ते देखील विसरतो. विचारधनाचे असे हे डॉक्युमेंटेशन म्हणूनच तर करावेसे वाटले!

- डॉ. गिरीश रांगणेकर

काल गिरीश रांगणेकर यांनी इथे चंप्र देशपांडे यांच्या नाट्यकृतीतून काही संवाद देऊन उत्तम आढावा घेतला होता. याच आढाव्यात मी 'ओळखपरेड' पुस्तकासाठी लिहिलेल्या प्रदीर्घ लेखाचाही उल्लेख त्यांनी केलाय.

तो मूळ प्रदीर्घ लेख जिज्ञासूंनी वाचावाच पण तत्पूर्वी त्या लेखातील एक भाग इथे द्यायला हरकत नाही. तो पुढीलप्रमाणे -

------------------

खुल्लमखुल्ला व ओळखपरेड या संग्रहातील २३ एकांकिका व ९ नाट्यकृतींचे वाचन केल्यानंतर चंप्रंच्या नाट्यलेखनाची मला जाणवलेली वैशिष्ट्ये खाली नमूद केली आहेत -

०१) आपणाकडे नाट्यात्मकता मोजण्याचे जे काही मापदंड परंपरेने चालत आलेले आहेत, त्या रूढ मापदंडांत मोडणाऱ्या या संहिता नाहीत.

०२) त्यांच्या कोणत्याही एकांकिकेतील वा नाटकातील कथानक हे अनावश्यक बाह्य घटनांची मागणी करीत नाही.

०३) किंबहुना मानवी आयुष्यातील दैनंदिन जगणे जगत असताना कोणत्याही व्यक्तीला ज्या प्रश्नांना सामोरे जावे लागते अशा प्रश्नांचा सखोल उहापोह चंप्रंच्या नाटकांतून/ एकांकिकेतून केलेला असतो.

०४) तो प्रश्न कथानकाच्या मध्यवर्ती सूत्रासारखा असतो. तसेच त्या प्रश्नाच्या आजूबाजूचे, वरचेखालचे सर्व प्रदेश साकल्याने या नाट्यकृतीतून दृगोचर होत जातात. हे प्रदेश कोणत्याही स्थलकालाशी संबंधित नसतात तर ते अनेकदा मानवी मनाच्या अंधाऱ्या वा ज्यांचा फारसा विचार केला जात नाही म्हणून दुर्लक्षित केलेल्या मानसिक अडगळीतील असतात.

०५) कोणतीही पात्रे म्हणजे विशिष्ट स्वरूपाची एकच एक अशी व्यक्तिमत्वे नसतात. त्यांना त्यांची त्यांची म्हणून काही खास अशी शारीर वा सौंदर्यात्मक वैशिष्ट्ये नसतात. म्हणजेच त्यांची पात्रे ही ठरावीक नायक अथवा नायिका नसतात किंबहुना ती पात्रे एन्टी कॅरेक्टर असतात.

०६) रूढ नाट्यमय घटना किंवा सुरुवात, मध्य, शेवट अशी पारंपरिक पद्धतीची नाट्यरचना चंप्रंच्या नाटकात दिसून येत नाही. किंबहुना असे म्हणणे अधिक योग्य ठरेल, की या नाट्यरचनेच्या तंत्रात न अडकतादेखील त्यांनी निवडलेल्या नाट्यविषयाच्या अंतरिक सुरचनेमुळे ते महत्त्वाचे व वैशिष्ट्यपूर्ण नाटककार ठरतात. ते तपशीलवार व्यक्तिचित्रणाची काळजी घेत नाहीत. अमुक एक पात्र सुष्ट व अमुक एक पात्र दुष्ट असे त्यांच्या नाटकात नसते. ते त्यांनी निवडलेल्या प्रसंगाकडे अत्यंत तटस्थतेने पाहतात. पात्रांच्या स्वभावचित्रणापेक्षा त्या त्या प्रसंगातील माणसांच्या जगण्यातील प्रश्नांचा, त्यातील प्रक्रियेचे अंतरिक भान त्यांना नाटककार म्हणून महत्त्वाचे वाटते.

०७) त्यांच्यासाठी सर्जक साहित्य वा नाटक ही चंगळ नसून जगण्याच्या आकलनाची गंभीर प्रक्रिया असते. त्यांनीच म्हटल्याप्रमाणे, त्यांची पात्रे ही कोणत्या ना कोणत्या स्वभावबद्धतेत असतात, त्यांनी निवडलेला नाट्यप्रसंगातील प्रश्न अथवा पात्रांच्या जगण्याच्या प्रक्रियेचे भान देणारे समग्रावधानी संवाद हे त्यांचे मुख्य भांडवल असते. एक प्रकारचे प्रमेय मांडून ते लिहीत असले तरी, स्वतःच्या वैयक्तिक सुखदुःखांचे अनुभव प्रेक्षकांच्या वा वाचकांच्या मनात परावर्तित करण्यासाठी चंप्र लिहिताना दिसत नाहीत. त्यामुळे अनुभवांचे संचित, शोध या संकल्पना त्यांच्या नाटकातील आशयसूत्रांबाबत कामाच्या ठरत नाहीत.

०८) अनुभवाची समृद्धता, व्यक्तिमत्वाची समृद्धता, व्यासंग यांचे महत्त्व मान्य केले तरी त्यात सर्जकता असतेच असे नाही. केवळ या गोष्टी आहेत म्हणून कलाकृती महत्त्वाची ठरत नाही. सर्जकता म्हणजे मानवी मनाच्या अराजकतेचे एकात्म भान. आणि हे भान चंप्रंमधील नाटककाराकडे असल्याने कोणतेही बाह्य अवडंबर न माजवता केवळ अंतरिक एकात्म भानामुळे त्यांची नाटके सर्जक आणि म्हणूनच महत्त्वाची ठरतात.

०९) कोणत्याही रूढ नाट्यमय घटनांचा आधार न घेता, दैनंदिन जगण्यातील एखाद्या घटनेचा, प्रसंगाचा, त्यातील विविध स्तरांचा विचार करून त्यांचे हळुवारपणे सूक्ष्म पापुद्रे उलगडून दाखवणे हे चंप्रंच्या एकूणच लिखाणाचे वैशिष्ट्य आहे. भावना आणि विचार, विचार आणि विचार, उक्ती आणि कृती यातील द्वैत त्यांना नाटककार म्हणून भावते. त्या त्या विशिष्ट प्रसंगातील भान प्रक्रिया उलगडून दाखवतांना त्या त्या प्रश्नांच्या संदर्भातील त्यांनी निवडलेला कोणताही नाट्यप्रसंग हा नंतर केवळ एक पार्श्वभूमी म्हणून शिल्लक राहतो. त्या घटनेतील तपशीलांपेक्षा जगण्याचं, सभोवतालच्या वास्तवाचं भान, एक प्रकारचे नवीन आकलन, शहाणीव चंप्रंची नाटके देतात.

१०) हे भान किंवा आकलन केवळ त्या त्या नाट्यप्रसंगापुरतं मर्यादित नसतं तर एकूणच जगण्याच्या संदर्भातील 'सत्याचे श्रेयस' असते आणि हे श्रेयस समग्रावधानी असते. हे समग्रावधानी भान कुठल्याही अनुभवाला Justify करत नाही किंवा Condemn देखील करत नाही. ते आशयपूर्णतेकडे जाते आणि तोच नाटकाचा उत्कर्ष बिंदू (Climax) असतो. रूढ पारंपरिक 'नाट्यात्म विधान' (Dramatic Impact) देखील चंप्रंची नाटके देताना दिसत नाहीत, ती पात्रांच्या समस्येवरील उपाय अथवा त्यांच्या प्रश्नांचं निराकरण सांगत बसत नाहीत. याबाबतीत केवळ एकाच नाटकाचा अपवाद करणे आवश्यक आहे आणि ते नाटक म्हणजे 'जणू काही वास्तव'! या नाटकात नाटककार

चंप्र उपाय सूचवतात कारण, ते नम्रता या पात्राला (म्हणजेच नाटककारालादेखील) गवसलेले कार्यात्मक सत्य आहे, व ज्यामुळे एकूणच मानवी संघर्षांचं मूळ नष्ट होईल अशी तिची धारणा आहे.

११) 'जणू काही वास्तव' तसेच 'घोकंपट्टी' या नाटकांत वास्तव तसेच अ-वास्तवातील आतंरिक सुसंगती असलेल्या तुकड्यातुकड्यांच्या दृश्यांची रचना, भास आभासात्मक पात्ररचना, लोकप्रिय अशा विविध गाण्यांचा तसेच हिंदी चित्रपटातील लोकप्रिय व्यक्तिरेखांचा जाणिवपूर्वक वापर चंप्रंनी केलेला आहे. या प्रकारची नाट्यरचना ही त्या त्या नाटकातील आशयाला पूरक ठरणारी आहे.

१२) मराठी नाटकात प्रेक्षकांना एक लिंक लागतेच. ही पात्रे, यांचे असे झाले, मग असे झाले… अशी! बहुसंख्य प्रायोगिक म्हटली जाणारी नाटकेही हे बंधन स्वीकारताना दिसतात. चंप्रही खऱ्या-खोट्या पद्धतीने बऱ्याचदा हे स्वीकारतात. कधी ते स्वीकारल्याचा आभासही तयार करतात.

१३) सुरुवातीच्या काही एकांकिका व नाटकांचा अपवाद वगळता नाटककार म्हणून चंप्र दिग्दर्शकाला फारशा सूचना देत नाहीत. त्यांच्या नाटकातील कंस जर पाहिले तर त्यांची संख्या जवळपास नगण्य असल्याचे जाणवेल. तसेच ते नेपथ्यरचना, प्रकाशयोजना वा इतर तांत्रिक बाबतीत देखील फारसे आग्रही दिसत नाहीत. कारण त्यांच्या नाटकातील शब्द व त्यातील मोकळ्या जागांमधील अर्थ नीटपणे पोहोचले तर नाट्य प्रेक्षकांपर्यंत पोहोचायला अडचण येत नाही, याची त्यांना जाणीव असते. ही नाट्यमयता मराठी रंगभूमीवर मान्यता प्राप्त असलेल्या ढोबळ नाट्यमयतेपेक्षा भिन्न आहे.

१४) चंप्रंच्या संहितेत जर सुधारणा करण्याची आवश्यकता भासली आणि चंप्रंना जर मुद्दा पटला तर ते अत्यंत प्रामाणिकपणे दिग्दर्शकाला सहकार्य करणारे नाटककार आहेत. त्यांच्या मते कोणतीही कलाकृती कधीच परिपूर्ण नसते. त्यामुळे ते त्या क्षणाला, किंवा त्या परिस्थितीत आवश्यक असेल तितक्या सुधारणा करून देतात. असे बदल केल्याने नाटकातील आशयाची प्रतवारी कमी होत नाही. नाट्यरचना कधीच परिपूर्ण होत नसली तरी तिच्यातून येणारे आकलन मात्र परिपूर्ण असू शकते, असे चंप्र मानतात.

१५) त्यांच्या नाटकातील पात्रांसारखीच त्यांची नाट्य भाषा ही खास चंप्रंच्या शैलीची असते. चंप्रंची शैली म्हणजे पात्रानुसार त्यांची भाषा जरी ढोबळ मानाने बदलत नसली तरी त्यात रचनेची वीण असते, ती समजून घ्यायला, त्यातील अर्थांच्या विविध छटा समजून घ्यायला, ती पात्रे जिवंत करण्यासाठी दिग्दर्शकाला, कलाकारांना विशेष प्रयत्न करावे लागतात. आणि भाषेची ती वीण उकलल्याशिवाय चंप्रंची नाटके 'दिसत' नाहीत. भाषा, शब्द यांबाबतची एक प्रकारची प्राथमिक तयारी असावी लागते.

१६) चंप्रंची नाटके कोणा विशिष्ट पात्रांची नसतात किंवा ती एक प्रकारे लेखकाचीच भाषा बोलतात असे अनेकजण म्हणत असतात परंतु त्यात फारसा अर्थ नाही कारण चंप्रंना स्वतःला विविध प्रकारच्या व्यक्तिमत्वांच्या निर्मितीत रस नसतो तर त्या व्यक्तींच्या मनांत चाललेल्या घडामोडींशी, त्यांतील नाट्याशी रस असतो…त्यांची भाषादेखील त्या त्या पात्रानुसार थोडीफार बदलताना दिसते.

१७) त्यांच्या लेखनाचा विचार करताना त्यांची कलेबाबतची संकल्पना अधिकाधिक विकसित होत असल्याचे लक्षात येते. माणसातील दुःख, संघर्ष, हिंसा यांचे मूळ कारण मनाच्या अराजक अवस्थेत असून त्यापासून सुटका करणे

कलेचे उद्दिष्ट असते याचे भान त्यांना आहे. समग्र भानात मनाची एकविध जाण अभिप्रेत आहे. त्यांच्या दृष्टीने तोच मोक्ष आहे. मुख्य म्हणजे हा मोक्ष आध्यात्मिक नाही तर शारीरिक आहे असे आग्रही प्रतिपादन 'जणू काही वास्तव' मधील नम्रता या पात्राचे आहे.

१८) नाटकातील पात्रांच्या जगण्याच्या आपापल्या तर्करचना असतात. त्यांच्या संबंधांची ही नाटके असतात. भावनिकता कमी असते. कुठल्याही पात्राची अथवा पात्रसमूहाची बाजू घेतलेली नसते. परंपरागत नीतीकल्पनांचा, धर्मकल्पनांचा, अस्मितांचा पुरस्कार नसतो. कोणत्याही परिवर्तनाच्या हेतूने लेखन केलेले नसते. ते स्थितिवादीही नसते. सत्-असत, चांगले-वाईट, नायक-खलनायक, काळे-पांढरे असे झगडे नसतात. गौरव वा हेटाळणी नसते. संदेश नसतो. समाजमान्य शेवटाचा प्रयत्नही नसतो. काही प्रश्नांच्या संदर्भात पात्रे आपापल्या पद्धतींनी वागतात, झगडतात, तडजोडी करतात, सुखी-दुःखी होतात. या सर्व गोष्टींचे भान व्यक्त होत राहते.

१९) प्रेक्षकांना भारून टाकणे, नाटक अंगावर येणे, उदास वा निराश करणे, मनात अपराधी भाव दाटवून खट्टू करणे अशा प्रकारचा नाट्यानुभव ही नाटके प्रसारित करीत नाहीत. ती आशावादी वा निराशावादी नसतात.

२०) त्यांच्यासाठी सर्जक साहित्य, नाटक वा कला ही चंगळ नसून जगण्याच्या आकलनाची गंभीर प्रक्रिया आहे. जगण्याच्या प्रक्रियेचे भान देणारे समग्रावधानी संवाद हे आपल्या नाटकांचे प्रमुख वैशिष्ट्य आहे, सर्जकता म्हणजे मनाच्या अराजकतेचे एकात्म भान असे ते मानतात. आणि हे भान त्यांच्यातल्या नाटककाराकडे असल्याने कोणत्याही विचारसरणीचे वा इझम्सचे बाह्य अवडंबर न माजवता केवळ आंतरिक एकात्म भानामुळे त्यांची नाटके तपशीलांपेक्षा जगण्याचे, सभोवतालच्या वास्तवाचे समग्रावधानी भान व्यक्त करणारी, शहाणीव देणारी आणि म्हणूनच महत्त्वाची ठरली आहेत.

२१) मूळ प्रश्न हे मटेरिअलचे किंवा वस्तूरूपाचे म्हणजेच तपशीलांचे नसून इसेन्सेचे म्हणजे मूलद्रव्याचे असतात म्हणूनच रूढ नाट्यलेखन तंत्रामध्ये न अडकता किंवा त्याचा फारसा विचार न करता ते नाट्यलेखन करताना दिसतात. थोडक्यात कसे मांडले आहे, कोणता फॉर्म वापरला आहे यापेक्षा काय मांडले आहे, त्यातील आशय किती मूलभूत स्वरूपाचा आहे याची ते अधिक दखल घेतात. या सर्व नाटकांचा कच्चा माल (मटेरिअल) कल्पित आहे मात्र त्यातील आशय हा जगणे सांगणारा किंवा जगण्याला सखोलतेने भिडणारा आहे.

ही सर्व वैशिष्ट्ये पाहता ही नाटके 'निरुपयोगी' असतात असे म्हणायला हरकत नाही. निरुपयोगी म्हणजे ही नाटके करमणूक करणारी असली तरी त्यात करमणूकप्रधानता नसणे तसेच या नाटकांना सामाजिक-राजकीय परिवर्तनाचे हत्यार म्हणून न वापरणे इत्यादी भौतिक असे दिसणारे उपयोग सांगता येत नाहीत. परंतु होकारात्मक भाषेत सांगायचे तर, ही नाटके एक, समज-भानयुक्त रिलॅक्सेशन देतात असे म्हणता येईल. यालाच समग्रतेची कला म्हणता येईल.

- गिरीश पतके

कळत-नकळत कविता बोधप्रद होणे
ही कवीची सर्वात मोठी समस्या असते !

Rajesh Sonawane is with रवीन्द्र दामोदर लाखे and Champra Deshpande.

.

चं. प्र. देशपांडे सर

आणि

रवींद्र दामोदर लाखे सर

यांच्या वाङ्.मयीन, वैचारिक पोस्ट

विचारप्रवर्तक असतात.

त्यांच्या विचारांशी तुम्ही भलेही सहमत नसाल ;

पण विचारांचा तळ गाठण्यास या पोस्ट भाग पाडतात, हे मान्य करावे लागेल.

आजकालच्या हायस्पीड टेक्नो काळात खरोखरच ही फार मोठी गोष्ट आहे.

आता तुम्ही म्हणाल, तरूण पिढी अशा पोस्ट वाचते काय?

मी म्हणतो. वाचत नसेल तर, वाचण्याची शिफारस

करूया तुम्ही - आम्ही.

अनेक मान्यवर साहित्यिक, विचारवंत फेसबुकवर सध्या महत्त्वाच्या वाङ्.मयीन, वैचारिक पोस्ट लिहित आहेत, ही चांगली गोष्ट आहे.

नव्या पिढीला आपण असे सकस वाचण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

" मला भाषा थोडीफार येतेच. आता मी रोज थोडा गंभीर विचार करणार आहे. म्हणजे मला लेखक होता येईल ! "

" अनुभव असतोच गाठीशी. शिवाय माझा स्वभाव जरा विनोदीही आहे. त्यामुळे, मी लेखक व्हायचे नक्की केले आहे ! "

" मुलांच्या आग्रहामुळे माझ्या चरित्राचं पुस्तक काढलं आहे. ३०० पानांचं आहे. तुम्हाला देणार आहे वाचायला ! "

" माझी बायकोही करते कविता. तिचा पहिला कवितासंग्रह काढलाय. तुम्हाला वाचायला देणार आहे ! "

" आमच्या नात्यातले एकजण खूप विनोदी लिहितात. त्यांचे एक हस्तलिखित मी देणार आहे तुम्हाला वाचायला !अभिप्रायासाठी ! "

" आमच्या एका कर्तबगार नातेवाईकाची पंच्याहत्तरी आहे. हा मी त्यांच्यावर लिहिलेला लेख -- जरा चांगल्या भाषेत द्या ना करून ! "

" दुसऱ्या महायुद्धावरचं एक पुस्तक आहे माझ्याकडे. फार बेस्ट आहे. तुम्हाला देतो वाचायला ! "

" नर्मदा परिक्रमेवरचं एक सुंदर पुस्तक आहे माझ्याकडे. तुम्हाला हवेय का वाचायला ? "

Shailesh Sonar

आताच कल्याणला 'मन' चा प्रयोग पाहून आलोय. चंप्रंच लिखाण तर १९९८-९९ पासून वाचतोय आणि काही एकांकिका करण्याचाही विचार त्यावेळेस केला होता. पण ते काही जुळून आलं नाही. आणि पुढे नाटक करण्याशीही संबंध तुटला...आजचा प्रयोग प्रचंड आवडला. Abhijeet Zunjarrao ह्यांनी हा दिर्घांक केला ह्यासाठी त्यांच अभिनंदन आणि तो खूप उत्तम अनुभव प्रेक्षक म्हणून आम्हाला मिळवून दिल्याबद्दल मनापासून आभार. #रमेश वाणी कुठे होतात तुम्ही? संधीचं सोनं केलंत. मला जे वाटलं ते तुम्हाला प्रत्यक्ष भेटूनही सांगता आलं. ह्याआधी कुठल्याच नाटकानंतर मी असं कुणाला भेटून काही बोललो नाही. पण, आज मला राहवलं नाही. 'मन'चे अनेक प्रयोग होत राहोत आणि हे नाटक जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावं. मनापासून शुभेच्छा□□□

AI – artificial intelligence – कृत्रिम बुद्धिमत्ता

त्याला विचारले की बाबा, चांगली कविता म्हणजे काय ? उत्तरादाखल त्याने सविस्तर, उत्तम विवेचन केले. माझ्या आवडीचे एलियट आणि व्हिटमन  या कवींची नावेही उदाहरणादाखल त्यात होती. खरोखरच छान होते उत्तर. पण, एका बाबतीत मात्र आपल्या मराठीपेक्षा वेगळेपणा दिसला. मराठीत कसे, सामाजिक-राजकीय परिवर्तनाची भूमिका असल्याशिवाय असूच नाही शकत चांगली कविता -- ते मात्र त्याने वगळलेले दिसले. तो डेटा त्या यंत्रात भरणाऱ्या कमिटीवर बहुतेक तिथे मराठी माणूस घेतला नसावा !

माझी पुस्तके खालील ठिकाणी विक्रीसाठी उपलब्ध आहेत ---

१

परेश एजन्सी,

अप्पा बळवंत चौक,

पुणे.

फोन -- ८२७५४८५४८५ .

आणि २

पुस्तकवाला अँड कंपनी,

पुणे.

फोन -- ८६२४९७७०२९.

Avinash Kolhe

.

चं. प्र. देशपांडे (जन्म:१९४६) यांची नाटकं वेगळी असतात. काल 'मन' बघितले. खुप वर्षांपुर्वी त्यांचे "ढोलताशे" बघितले होते. 'मन' या एकपात्री नाटकात एक मध्यमवर्गीय मध्यमवयीन विवाहित एका मुलीचा बाप असलेली व्यक्ती केंद्रस्थानी आहे. हा माणूस लोकलने प्रवास करतो, ऑफिसमधील युनीयनमध्ये यथाशक्ती सहभागी होतो आणि तरीही ठार एकटा असतो. त्याला अनेकदा 'कशासाठी जगायचं' हा प्रश्न त्रस्त करतो. नाटकाचा प्रयोग दिग्दर्शक अभिजित झुंजाररावने फार कल्पकतेने उभा केला आहे. खास उल्लेखनीय म्हणजे नेपथ्य (सुमीत पाटील), प्रकाश योजना (श्याम चव्हाण) आणि अभिनय (रमेश वाणी). दोन तासांचा एकपात्री प्रयोगात प्रेक्षकांना खिळवून ठेवणं अवघड आहे. अशा अनवट नाटकाचे निर्माते विजय चौगुले यांचे विशेष आभार.

कालच्या, शिवाजी मंदिर, दादर च्या प्रयोगानंतर आलेला आणखी एक अभिप्राय ---
दुसऱ्यांचा मनाचा विचार करता करता कधी स्वतःच्या मनाचा विचार केलाय का ? खूप प्रश्न ही असतील मनात...या सर्व प्रश्नांची उत्तरं मिळतील नाही मिळतील पण मनात वाहत जाणारा हा प्रश्नांचा प्रवाह कुठल्या दिशेने गेला पाहिजे त्यासाठी नक्की बघा मन
- अभि आगवणे

धर्म, शांतता, संघर्ष आणि हिंसा

“What we call religion is merely organized belief, with its dogmas, rituals, mysteries and superstitions. Each religion has its own sacred book, its mediator, its priests and its ways of threatening and holding people.
Most of us have been conditioned to all this, which is considered religious education; but this conditioning sets man against man, it creates antagonism, not only among the believers, but also against those of other beliefs.
Though all religions assert that they worship God and say that we must love one another, they instill fear through their doctrines of reward and punishment, and through their competitive dogmas they perpetuate suspicion and antagonism.”
― Jiddu Krishnamurti, Education and the Significance of Life

कोणताही धर्म म्हणजे नुसती एक शाब्दिक-वैचारिक ओळख असते. तो एक समूह असतो – टोळी असते. तिचा भाग असण्यात माणसाला सुरक्षितता वाटते. या अशा अलगतेमुळे वेगवेगळ्या धर्मांची माणसे एकमेकांपासून दुरावतात. एकमेकांच्या संघर्षात असतात. कोणत्याही धर्माचे अनुयायी तो तो धर्म जगत नसतात. धर्म हा निर्भय आणि शांत असतो असे म्हटले तर अशी टोळी ही भय आणि हिंसा यांवर आधारलेली असते. याचा अर्थ धर्मच न मानणारे लोक शांत, सज्जन, शहाणे असतात असा मुळीच नाही. त्यांची सुरक्षिततेची हत्यारे वेगळी असतात, इतकेच. या एकूण अवस्थेमुळेच माणूस जगाची वाट लावत जातो – विध्वंस करत जातो. हे पाहता, मध्येच चार माणसांना बाजूला

घेऊन, तुमच्या जगण्यात शांतता नाही, असे म्हणणे हे बालिशपणाचे ठरते. ती तर ते म्हणणाऱ्याच्या जगण्यातही नसते. श्रद्धांनी आणि विचारांनी ‘ वेगळा ‘ जगणारा माणूस अशांतच असतो.

--- ००० ---

त्या वेळी पुण्यात असणारे नाट्यकर्मी, मित्रमैत्रिणी, हितचिंतक आणि प्रेक्षक,

-- जरूर पहा -- रमेश वाणी यांनी घडवलेले काही अपवादात्मक –

( prayog 12-07-24 )

हे नाटक बराच पल्ला मारेल याची खात्री वाटते –

Fine writers do psychoanalysis

“There’s my life, why not, it is one, if you like, if you must, I don’t say no, there has to be one, it seems, once there is speech. No need of a story, a story is not compulsory, just a life. That’s the mistake I made, one of the mistakes, to have wanted a story for myself whereas life alone is enough.”

Samuel Beckett, Stories and Texts for Nothing, 1955

ठकीशी संवाद

( दीर्घांक ) -- ले ० सतीश आळेकर, दिग्द० अनुपम बर्वे, निर्मिती – अमेय गोसावी.

मजेशीर आहे नाटक. मला आवडले. आयनेस्को च्या ‘ द न्यू टेनंट ‘ ची आठवण व्हावी असे अनेक पार्सल्सच्या खोक्यांनी भरलेले नेपथ्य आणि दोनच पात्रे – धनी आणि ठकी. अमुक एक सलग गोष्ट वा एखादा निश्चित विषय असे काही नाही. कोरोना काळातल्या लॉक डाऊनमुळे कंटाळलेला माणूस आणि तो आहे करमणुकीच्या शोधात. एवढेच. नाटकातले त्याचे सुरुवातीचे स्वगत उत्तम आहे. कंटाळा म्हणजे काय ? तो येतो म्हणजे कुणाला येतो ? मग मी कोण ? अशा नेहमी टाळल्या जाणाऱ्या प्रश्नांचे हे स्वगत आहे. गंमत सुरू होते ती गडकऱ्यांनी दिवाकरांना एक लखोटा देण्यापासून. त्यातून मग, दिवाकर, त्यांचा मुलगा, वि. वि. बोकील, दि. बा. मोकाशी, तेंडुलकर अशी एक हास्यास्पद परंपरेची साखळी विणली जाते. ही एक प्रकारे विश्लेषक समीक्षेची टवाळीही म्हणता येते. पण, मजा येते. असे खूप आहे. निरनिराळ्या काळांचा आणि संस्कृतींचा अभ्यास यांचीही थोडी टर उडवली जाते. मजा येते. एकूणात या नाटकातला करगोटा अमर होत जातो. सगळे सांगत नाही बसत. मेलडी खाओ और खुद जान जाओ !

सुव्रत जोशी आणि गिरिजा ओक अप्रतिम ! स्वच्छ वाणीची सुंदर तरुणी आणि उत्तम संवादफेकीचा वयस्कर इसम – बेष्ट जोडी ! ही त्याची कोण वगैरे न विचारता पाहात जायचे नाटक. ( शेवटी होतो तो रहस्यभेद. ) यात टिळक, गांधी, सावरकर, नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी असे अनेक उल्लेख येतात. बाबरी, गोंध्राही येते. पण, हे नाटक

अमुक एक भूमिका घेऊन प्रचार करते आहे, असे मला वाटले नाही. सर्वच गोष्टींना एका क्षुद्र परिसाचा स्पर्श घडवून त्यांना हास्यास्पद करणारे हे नाटक आहे. मजा येते.

संगीत, नेपथ्य, भरपूर प्रकाश योजना आणि समोरच्या पडद्यावर दिसणारी जुनी-नवी दृश्ये यांनी नाटकाची खुमारी वाढत राहते. आणि त्याचा रिचनेसही वाढत राहतो.

एकूणात सर्वांगसुंदर, सुविहित, देखणा प्रयोग होतो !

हे मराठीतले एक वेगळ्या प्रकारचे विनोदी नाटक आहे. निरनिराळ्या वादांच्या, अभ्यासाच्या आणि व्यक्तिगत कंटाळ्याच्या व एकाकीपणाच्या जाचातून थोडाफार विसावा देणारे. पण हे काही ॲब्सर्ड नाटक नव्हे. करगोट्याच्या स्पर्शाने अनेक गोष्टी हास्यास्पद करत जाणे याला ॲब्सर्ड वा मृषा नाट्य नाही म्हणता येणार. मृषा नाट्यात पूर्ण जगण्यातल्या अतार्किकतेची, निरर्थकतेची जाण व्यक्त होत असते. मोठ्या गोष्टी हास्यास्पद होणे वेगळे आणि लहान-मोठ्या हा भेदच मावळून सगळे जगणेच गधडेपणाचे जाणवणे वेगळे.

शेवटी ठकी म्हणते, पंचप्राणातला शेवटचा पाचवा प्राण जाताना निरोप म्हणून हात नका हलवू – लोकांना वाटायचे, मरताना तुम्ही काँग्रेसच्या भूमिकेत होता ! – हे छान वाटले !

--- ००० ---

रमेश वाणी

या अभिनेत्यासाठी

बघा -- ' मन ' !

" माझे डेथ सर्टिफिकेट माझ्याकडे आहे. बाबांनी मला पुन्हा जिवंत केले आहे. आता माझी नुकसान भरपाई मीच घेईन ! "

मोठी इमारत. करा घर-सजावट पण कॉलम-बीमला धक्का न लावता. नाहीतर सगळेच गाडले जाल सौंदर्याच्या ढिगाऱ्यात !

लोकवाङ्मय गृह

[11:07 am, 11/7/2024] +91 98192 45972: ढोलताशे । चं. प्र. देशपांडे । दुसरी आवृत्ती

पाने : ९२ । किंमत : २२५/-

▪ ऑनलाईन खरेदीसाठी लिंक :

https://lokvangmaybooks.in/.../%e0%a4%a2%e0%a5%8b%e0%a4.../

▪ संपर्क : ८४५४०४९०३६ । ०२२-२४३७६०४२

"...माणूस दुःखी होण्याची पद्धत जर जगभर एकच आहे तर त्यातून बाहेर पडण्याची शक्यता म्हणजे धर्म-एकच असला पाहिजे. अनेक धर्म कसे असतील? आणि धर्मात गर्दीचं काय काम? स्वतःला एकटं पाडण्याचं काम प्रत्येकानं

स्वतः केलेलं आहे; तसंच तो एकटेपणा टाकणंही प्रत्येकाला स्वतःला करावं लागेल. गर्दी, प्रदर्शन, उन्मत्तपणा यांचा धर्माशी काहीही संबंध नाही..."

[11:36 am, 11/7/2024] CHAMPRA Deshpande:

11-07-24.

२-०७-२४ च्या पुण्यातल्या प्रयोगानंतर –

"मन"

नाटक फक्त निमित्त.

आपणच आपल्या मनाचं पोस्टमार्टम करतो या दिड तासात.

माझ्याच मनातले मनोव्यापार माझ्याच समोर कुणीतरी तटस्थपणे मांडतोय , त्याची चिरफाड करतोय किंवा मीच समोरुन तटस्थपणे पहातोय..इतका समरसपणा.

सुख-दुख,चांगलं-वाईट ,नैतिक-अनैतिक,पाप-पुण्य.

भिती-साहस, हिंसा-अहिंसा,

..या सगळ्या संमिश्र भावनांबरोबर समाज, कुटूंब, नात्यांसह जगतानाच्या चिंता,ओघाने येणारे संघर्ष,

त्याच जगण्यातले प्रश्न आणि त्या त्या वेळची उत्तरे.

...पून्हा प्रश्न... पून्हा तेच ते.

सारा वरवरचा गुंताळा....नेमकं कुठून येतं हे ?

कि असलं काही नसतंच मुळी?

नाटक पाहिल्यावर सुधीर मोघे यांच्या कवितेतील या ओळी आपसूकच आठवल्या...

चेहरा मोहरा ज्याचा कधी कुणी पाहिला नाही

धनी अस्तित्वाचा तरीही याच्याविण दुसरा नाही

मन मनास उमगत नाही, आधार कसा शोधावा

एक समृद्ध नाट्यानुभव.

खूप प्रयोग व्हायला हवेत.

आपापल्या शहरात, गावात पुढील तारखांवर लक्ष ठेवा आणि वेळ काढून पहा.

धन्यवाद आणि शुभेच्छा.

चं.प्र. सर, अभिजीत झुंजारराव जी, रमेश वाणी सर आणि संपूर्ण टीम "मन"

टीप : रमेश वाणी या अभिनेत्यानं जे काही केलंय ते अलौकिक होतं...जिवंत अनुभवासाठी जरुर जाच...बाकी सगळं बोनस !

लौकरच उपलब्ध होत आहे ---

औट घटकेचे राज्य

( कवितासंग्रह )

यात समाविष्ट ---

मनोगत

पहाट ( २५ कविता )

तुकाराम ( २५ कविता )

गालिब ( १४ कविता )

चित्रकार व्ही. एस. गायतोंडे ( १५ कविता )

तीन स्वर ( ३ कविता – कुमार गंधर्व,

भीमसेन जोशी व सैगल )

आणि

‘ मराठी कविता ‘

आणि मराठीत प्रथमच एका कवितासंग्रहात --

गद्य कविता ( ५७ कविता )

होय, गद्य कविता !

गद्य कविताच ! ! !

' राजकीय द्वेष हिंसेकडे नेतो ' -- बलाढ्य लोकशाहीला झालेले नवे ज्ञान !

' सहिष्णुता महत्त्वाची ! ' -- हेही एक नवे ज्ञान !

जुन्या आठवणींना उजाळा देणारा ‘ मन ‘ वरचा अभिप्राय –

१२-०७-२४ च्या पुण्यातल्या ‘ मन ‘ च्या प्रयोगाला अनिल आणि स्वरूपा खोपकर आले होते. नंतर त्यांचा अभिप्रायही त्यांनी पाठवला आहे, तो खाली देत आहे.

काही वर्षांपूर्वी अनिलने माझे ‘ एक गगनभेदी किंचाळी ‘ हे नाटक राज्य नाट्यस्पर्धेत टेल्को कलासागरतर्फे सादर करून गाजवले होते. त्याचे नंतर त्यांनी अनेक प्रयोगही केले होते. गाभा ॲब्सर्ड पण हाताळणी वास्तव असे ते एक धमाल नाटक आहे. खूप मजा यायची. त्यांची त्या वेळी कलाकारांची ४० जणांची टीम होती. चाळीचा दणदणीत सेट होता ! बर्वे नामक कलाकार ( नाव आठवत नाही ) त्यातली प्रमुख भूमिका उत्तम करत. खोपकरांनी त्या प्रयोगासाठी घेतलेली मेहनत आणि सादर केलेला अप्रतिम, सफाईदार प्रयोग अजून माझ्या लक्षात आहे ! त्यांचा हा ‘ मन ‘ बद्दलचा अभिप्राय –

प्रिय अभिजित,

"मन" चा प्रयोग पाहून थक्क झालो!

लिखाणापासून ते सादरीकरण! सर्व उत्तम!

शिवधनुष्य उचलण्या सारखं धाडस होत व ते सर्व पातळ्यांवर लिलया उचललं गेलं याचा आनंद मोठा आहे!

चं. प्र. च लिखाण अंतर्मुख करत व मानवी मनाला विचार प्रवृत्त करणारं व थेट मनाचा ठाव घेणारं आहे.

लेखकाने लिहिलेल्या शब्दांचा, वाक्यांचा व स्वल्प विराम, प्रश्न चिन्ह या सारखी सर्व अवतरण चिन्हांचा योग्य अर्थ समजून तू आरखलेल्या जागा व त्यांच्या अर्थ योग्य रितीने पोचविण्याचे काम या गुणी नटाने - रमेश वाणी केले आहे!

अतिशय अवघड संहिता असूनही रमेशने त्याचं सोनं केलं आहे!

तुझं, रमेश व सर्व कलाकारांचे मनापासून अभिनंदन!

- अनिल खोपकर

अभिनेता, दिग्दर्शक

आनंदक्षण

आमची नात ( मुलीची मुलगी ) चि. सौ. दुर्गा इंग्लंडमधल्या वारिक विद्यापीठाची डॉक्टर झाली !!! आत्ताच तो सगळा लाईव्ह पदवीदान समारंभ पाहिला ! डोळे आनंदाने पाणावले ! विशेष म्हणजे, पूर्ण मानवजातीला उपयोगी पडू शकेल अशा आरोग्यशास्त्रीय संशोधनात ती काम करत आहे ! आमची लाडकी नात !!!

--- ००० ---

प्रख्यात नाटककार अजित दळवी यांचा ' मन ' बाबतचा अभिप्राय ---

मन

"तुम्ही कुठेही हिंडा, फिरा तरी तुमचा मुक्काम एकाच ठिकाणी असतो. ते असतं स्थळ मन"या अर्थाचं चिरंतन सत्य सांगत चं प्र देशपांडेंच्या "मन" या दीर्घांकाची सुरूवात होते आणि मग "नीळकंठ" या पात्राच्या माध्यमातून ते मनाच्या खोल तळाशी बुडी मारत आपल्याला घेऊन जातात. मनाला छळणारे अनेक प्रश्न, आठवणी, हरपलेले क्षण यांच्या दर्शनातून एक सशक्त नाट्य उभं राहतं!जयंत्या, पुण्यतिथ्या यातला फोलपणा तर आपल्याला परिचित असतो पण आजच्या काळातल्या कथित व्यक्तिस्वातंत्र्याची आणि सामाजिक बांधिलकीची चं प्र जी चिरफाड करतात ती विचार करायला लावते! त्यामुळे अनेकांना नीळकंठच्या जागी आपण आहोत असं वाटलं तर आश्चर्य नाही!!

हे नाटक रंगभूमीवर उभं करणे आव्हान आहे. एकच पात्र. शंभर मिनिटांचा सलग कालावधी. पण करायला कठीण असलेलं नाटक दिग्दर्शक अभिजित झुंजारराव यांनी अत्यंत चांगलं बांधले आहे. नेपथ्याच्या मदतीनं नीळकंठला फिरतं ठेवून नाटक रेंगाळणार नाही याची काळजी घेतली आहे. त्याला श्वास घ्यायला जागा दिली आहे. आणि हे करताना आशयाला धक्का लागू दिला नाही. घरातल्या पोपटाच्या पिंजऱ्यात गाळीव (की पाळीव?) प्रश्न ठेवण्याची कल्पना दाद देण्यासारखी आहे. तशीच दोरखंडाचा वापर करीत प्रकाशयोजनाकाराच्या साहाय्यानं साकारलेली "तळ्यात मळ्यात"ची कल्पनाही मजेदार आहे.

पण अखेर नाटकाची सगळी मदार नीळकंठची भूमिका करणाऱ्या रमेश वाणींवर आहे. मोठी दमसांस अपेक्षीणारी ही भूमिका त्यांनी ताकदीने निभावली. त्यांचा अभिनय, वावर सहज होता. नीळकंठच्या मनातली खळबळ प्रेक्षकांपर्यंत पोचवण्यात ते यशस्वी झाले. वयातल्या बदलांनंतर प्रश्न असतानाही माणसाचं मऊ होत जाणं त्यांनी प्रभावीपणे

दाखवलं. नाटक काही वर्षांपूर्वी लिहिलेलं आहे असं ऐकलं. पण अशी नाटकं शिळी होत नाहीत. त्याचा ताजा प्रयोगही बघावा असाच आहे!

अजित दळवी

लेखक-अभिनेते-दिग्दर्शक असलेले हे आमचे मित्र काय म्हणतात ते बघा ---

'मन'

मनाला भुंगा लावणारं लेखन. सर्वार्थाने सुंदर नाटक.

- किरण यज्ञोपवित

'औट घटकेचे राज्य ' हा कविता संग्रह आता विक्रीसाठी उपलब्ध असून त्यात इतर कवितांबरोबरच, मराठीत प्रथमच, ५७ गद्य कविता आहेत. त्याची किंमत रु.३०० असून सवलतीची किंमत रु.२२५ ( पोस्टेजसह ) आहे. पैसे पाठवण्यासाठी ---

Chandrakant Prabhakar Deshpande

HDFC BANK Saving Account No.03591000003204

IFSC : HDFC0000359

For G pay : Mahesh Deshpande mbl 9970065875 OR

UPI ID gathaent-3@okhdfcbank

Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा.

--- ००० ---

' मन ' बाबतचा हा आणखी एक विशेष अभिप्राय --

"मन"

"परिस टच करेल त्याचं सोनं करतो, तसं माझं माईंड! टच करेल त्याचे प्रश्न तयार करणारं!"

"यशस्वी होणाऱ्या खूप लोकांना माईंड चांगलं मिळालेलं असतं! मग त्यांचं काय कर्तृत्व?"

"एका विचाराचा तथ्यहीनपणा कळला काय आणि दहा लाख विचारांचा तथ्यहीनपणा कळला काय! शून्य ते शून्य!"

"खरंतर मी थकलोय.. सतत हा डोक्याचा कारखाना चालूच! याच माईंडनं पुनर्जन्म होईल? नकोच वाटतोय? दुसऱ्या जरा चांगल्या माईंडनं चालेल!"

खूप वर्षांनी एकपात्री दीर्घांक पाहिला "मन" नावाचा. हा दीर्घांक आहे तब्बल दीड तासाचा. भल्या भल्यांची भंबेरी उडवू शकेल असे सादरीकरण! मुळात मी हा दीर्घांक आधी वाचलेला होता आणि वाचल्यावर मला असं वाटून गेलं की अश्या जटिल लिखाणाचा एकपात्री रंगमंचीय अविष्कार केवळ अशक्य आहे. पण तो झाला आणि पाहून मन हरखून गेलं! अतिशय कल्पक दिग्दर्शन आणि दमदार अभिनय. लेखन श्रेष्ठ की दिग्दर्शन की अभिनय हा गुंताडा उरतोच. असा हा अस्सल हटके प्रयोग "मन" लावून पाहायलाच हवा!

-डॉ. गिरीश रांगणेकर

बजेटचे एक विद्वत्ताहीन आकलन –

१ सरकार शब्द पाळणारे आहे – उदा. बिहार आणि आंध्र प्रदेश.

२ सरकार विरोधकांना मान देणारे आहे – उदा. विरोधकांचेच विचार बजेटात कॉपी-पेस्ट करणे.

३ सत्ताधारी आणि विरोधक यांच्या एकमताचे बजेट असल्याने आरडाओरडा आणि टीका यांत बचत होईल.

४ संघर्ष कमी झाल्याने प्रेम आणि सौहार्द यांचे उत्पादन वाढेल.

५ इकडे सामील झाल्यास फायदा होतोच होतो या विचाराचा ग्राफ उंचावेल.

६ आपण हरलेलो नसून जिंकतच चाललो आहोत हा दिलासा विरोधकांत स्थिरावत जाईल.

७ लोक आणि मार्केट नॉर्मल आणि समाधानात राहतील.

--- ० ---

हे अत्युत्तम काम अनेकांना आवडलेले आहे ! धन्यवाद, प्रिया !

रमेश वाणी या अभिनेत्यानं जे काही केलंय ते अलौकिक होतं...जिवंत अनुभवासाठी जरुर जाच...बाकी सगळं बोनस ! धन्यवाद आणि शुभेच्छा.

चं.प्र. सर, अभिजीत झुंजारराव जी, रमेश वाणी सर आणि संपूर्ण टीम "मन"

- संजय सपकाळ.

रविवार २८ जुलै, संध्याकाळी ७:३० वाजता

यशवंत नाट्य मंदिर (तळ मजला, मिनी थिएटर)

लेखक : चं. प्र देशपांडे Champra Deshpande

दिग्दर्शक : अभिजित झुंजारराव Abhijeet Zunjarrao

कलाकार : रमेश वाणी Rammesh Wani

मोबाईल तिकीट बुकिंग साठी : +91 99875 56862

प्रयोगा करता संपर्क : +91 9967085505

#नाटक #मन

#mannmarathinatak #natakmarathi #manna #rameshwani

आणि आता नातजावई चि. श्रीजय !

परवा नातीने डॉक्टरेट मिळवल्याची पोस्ट दिली होती -- तसेच आज नातजावई ! आरोग्यशास्त्राशी संबंधित संगणक शास्त्रात डॉक्टरेट ! तेच वारिक विद्यापीठ !

जय हिंद !

--- ० ---

मन

उद्या रविवार,

संध्याकाळी ७:३० वाजता

यशवंत नाट्य मंदिर, दादर

(तळ मजला मिनी थिएटर)

आणि

पुढील शनिवार, दिनांक ३ ऑगस्ट

संध्याकाळी ६ वाजता

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

तिकीटांसाठी संपर्क

9987556862

' सजग ' च्या संपादकांचे सजग निरीक्षण ---

धन्यवाद, सतीश ! माझे लेखन तयार आहे. एकेक फायनल करत जायचे आणि पुस्तक काढायचे. या निमित्ताने सगळे फायनल होते. टाईपिंग, मुद्रितशोधन माझेच असते. अनुभवाने एकूण प्रक्रिया कळली आहे. दुसरे कुणी प्रकाशक करतो म्हणणार आणि महिनो न महिने लावणार -- मला यातून लौकर मोकळे होऊन पुढेही काही लिहायचे आहे. त्यामुळे हा मार्ग पत्करला आहे. प्रती मोजक्याच काढतो. काही खपतात. शेवटी कॉलेजेस, वाचनालये आणि इच्छुक अभ्यासक यांना देऊन संपवणार.

Satish Tambe

मराठीतील प्रकाशन व्यवहाराची स्थिती

गेल्या काही वर्षांमध्ये झपाट्याने बदलत चाललेली दिसते आहे.

विशेषतः कविता संग्रहाच्या बाबतीत

एखाद्या प्रकाशन गृहाचा टिळा लावून

स्वखर्चाने पुस्तक काढायचा प्रघात वाढत चाललेला दिसतोय.

ह्यामध्ये प्रकाशकाने काही प्रमाणात

वितरणाची जबाबदारी घेणे अभिप्रेत असते.

पण गेल्या काही वर्षांमध्ये - विशेषतः कोरोनानंतर -

ऑनलाइन वितरण करण्यासाठी अनेक जण

पुढे सरसावत आहेत.

तर ह्या नवीन वातावरणात

' प्रिंट ऑन डिमांड ' सारखी मोजक्या प्रती काढायची

मुद्रणसुविधा उपलब्ध झाल्यावर

काही वितरकांच्या सहकार्याने
स्वत:च पुस्तक काढण्याची शक्यता
कवी -लेखकांच्या दृष्टीपथात आलेली दिसते आहे.
ह्याचे उत्तम उदाहरण आहे ते म्हणजे
Champra Deshpande ह्यांचे.
त्यांनी काही वर्षांपूर्वी एक वेबसाइट सुरु करून
आपले समग्र साहित्य त्यावर अपलोड केले होते.
नंतर त्यांनी एखादादुसरा संग्रह प्रकाशकांकडून काढला.
आणि आता तर ते स्वत:च आपले लिखाण
पुस्तकरूपाने प्रकाशित करू लागलेले दिसतात
व त्याला प्रतिसादही चांगला मिळत असावा.
त्यांचा ह्या संबंधातील अनुभव
हा एका नव्या वाटचालीची
सुरुवात ठरू शकेल.
तर सोशल मीडिया पश्चात कविता वाचकांसमोर जाण्यासाठी
जशी संपादकांची गरज जवळपास नाहीशी होत चालली आहे ,
तीच स्थिती हळूहळू कथा -कादंबरी वगैरे फिक्शनसाठी
प्रकाशकांची होऊ शकेल .
अशा स्थितीत ' चिकित्सा/ समीक्षा ' महत्वाची ठरू शकेल
पण तिची गळचेपी होऊन आता बरीच दशके झाली !
एकुणात अंदाधुंदी / बजबजपुरी वाढेल, अशी लक्षणे आहेत.

Satish Tambe
'मन' कुणाला चुकलंय ?!
रामदास स्वामींनी 'अचपळ मन माझे नावरे आवरिता'
असं कबूल करत ' मनाचे श्लोक ' लिहिले.
बहिणाबाईनी ' मन वढाय वढाय ' म्हटलं
विंदा करंदीकरांनी ' माझ्या मना बन दगड ' म्हणत
मन घट्ट नसल्याचं आणि बदलू शकत असल्याचं सूचित केलं.
ज्याच्या कवितेत 'मन' हा शब्द नसेल असा कवी क्वचितच सापडेल.
किंबहुना ' मनाच्या विविध स्थिती मोजक्या शब्दात नेमकेपणे दाखवते '
हीच तर कवितेची एक थोरवी मानली जाते.

साहजिकच Champra Deshpande हे निष्ठावान कवी आणि नाटककार ह्यांची अनेक वर्षांपूर्वी लिहिलेली आणि शिवधनुष्य समजली जाणारी संहिता अलीकडच्या काळातील आघाडीचा प्रायोगिक दिग्दर्शक Abhijeet Zunjarrao रंगमंचावर आणतो आहे हे कळल्यावर ते बघायचं हे तात्काळ ठरलं होतं.. तर ते काल जमवता आलं.

पुस्तकावर लिहिताना ते आपल्या हाताशी सहजपणे उपलब्ध असू शकतं तसं नाटकाच्या बाबतीत होत नाही. त्यामुळे ' मन ' चा प्रयोग आठवून मनामध्ये काय तरंग उठले त्यातील काही इथे नोंदवत आहे

- पडदा नसल्यामुळे नेपथ्य आधी, म्हणूनच नीट पाहायला मिळाले. ते मोजके, सूचक आणि लक्षवेधक वाटले.त्यामध्ये काहीतरी चिन्हात्मक सांकेतिकता होती

त्यातील काही घटकांचा संदर्भ शेवटपर्यंत कळला नाही. जसं की मागच्या बाजूला असलेल्या दोऱ्यांवर १,२,३,४,६ हे अंक होते. त्यातून ५ का वगळण्यात आला होता त्याची संगती लागली नाही. कदाचित तो पडला असावा असंही वाटलं. पण एकुणात नेपथ्याचे वेगळेपण उठून दिसत होते.

-- प्रयोग सुरु झाल्यावर काही

वेळातच असं वाटलं की ह्याला दीर्घांक म्हणण्याऐवजी महानाट्यछटा का नाही म्हणायचं? मग एकपात्री प्रयोग, स्वगत अशा एकेक संज्ञा मनात अवतरू लागल्यावर त्यांना वेळीच आवरतं घेण्यासाठी ठरवलं की ह्याच्याकडे एक सादरीकरण म्हणून बघूया.

-- मध्येच वाटलं की ह्या संहितेचं अभिवाचन केलं असतं तर ? ह्या प्रश्नाचं उत्तर शेवटी सापडलं ते असं की ह्याचं अभिवाचन केलं असतं तर संहितेचा आशय खूपच कमी पोचला असता. तो पोचवण्यात दिग्दर्शक अभिजितची कल्पकता,रमेश वाणींची अभिनयकुशलता, तसेच नेपथ्य,प्रकाशयोजना , संगीत वगैरे अन्य घटकांचेही लक्षणीय योगदान आहे.

--रमेश वाणी ह्यांना मी ह्यापूर्वी नाटकात कधी बघितल्याचे आठवत नाही.

पण रंगमंचावरील त्यांचा वावर , हालचाली , हावभाव,आवाजातील चढउतार, शब्दोच्चार वगैरे अभिनयाचे सर्व पैलू हे खिळवून ठेवणारे होते. मुळात त्यांनी विग का घातला आहे ते कळत नव्हते जे नाटकाच्या शेवटच्या भागात कळले. बाकी त्यांना सिगारेट ओढायला का लावली व ती त्यांनी दोन झुरके मारून विझवली हे जरा गमतीशीर वाटलं. सलग दीड तास रंगमंचावर त्यांनी दाखवलेले अभिनय कौशल्य पाहून दिवंगत अभिनेता गिरीश साळवी ह्याने अभिनित केलेले गिरीश पतके दिग्दर्शित विजय तेंडुलकरांचे ' चौऱ्याऐंशी पावसाळ्यांचा जमाखर्च ' हे नाटक आठवले.

-- बाकी ह्या नाटकात ' मन ' ह्या विषयावर जे समोर आणलं आहे ते

चं प्र देशपांडे ह्यांच्या वैचारिकतेत-विशेषतः गेल्या काही वर्षांमध्ये - फेसबुकसारख्या समाजमाध्यमांवर ते एकुणातच भूमिकेच्या मर्यादा दाखवणाऱ्या पोस्ट्स टाकत असतात त्याच्याशी एवढे सुसंगत आहे की हे त्यांचे स्वगतच आहे असे अध्येमध्ये जाणवत राहते.

--प्रापंचिक चौकटीतील सुखदुःखे , अडीअडचणींसह जगताना व्यक्तीच्या व्यवहारांवर समाजाच्या असलेल्या दडपणामुळे त्याच्या मनाची कशी त्रेधातिरपीट उडते हे त्यांनी अशा पद्धतीने दाखवायचा प्रयत्न केला आहे की पाहणाऱ्याला आपल्याही मनातील वैचारिक गोंधळ दाखवणारा आरसा समोर धरला आहे असं वाटावं.

' युनियन' म्हणजे संघटनांकडून होणारा छळवाद ,'प्रेमाचा त्रिकोण' त्यातून मनात उफाळून आलेली पण मनातच जिरवून टाकावी लागलेली हिंसेची भावना ,

'सामाजिक बांधिलकी' वगैरे घटक त्यासाठी प्रयोगभर वापरले आहेत.

-- चं प्र देशपांडे ह्यांच्या आजवर पाहिलेल्या / वाचलेल्या नाटकांमध्ये

जो नेटका बांधलेला प्लॉट , बौद्धिक वाक्यांची पखरण असायची, तसं ह्या संहितेत नाही. ही संहिता काहीशी absurd स्वरूपाची वाटते. बहुदा त्यामुळेच ही संहिता रंगमंचित करायला अनेक वर्षे कुणी धजावले नसावे. असो.

-----------------------------

तर सुरुवातीला म्हटल्याप्रमाणेच हे आहेत ' मन' पाहून मनात उठलेले काही तरंग.

ही काही ह्या नाटकाची समीक्षा नव्हे. एक 'नाटक' म्हणून ह्याचे मूल्यमापन करणे मला शक्यच नाही. पण ज्यांना वेगळे काही बघायची इच्छा आहे त्यांना हे सादरीकरण काहीतरी देऊन जाईल हे नक्की !

नंतर उठलेला आणखी एक तरंग असा होता की

' मग्न तळ्याकाठी ' हे बहुतेकांना जरी नाटक म्हणून फसलेले वाटले

तरी काहींना ते conceive करायला अवघड असा प्रयोग होते हे मान्य होते,

तसेच ' मन ' च्या बाबतीत घडू शकते.

'मन' ही एक अथांग गूढ एंटीटी आहे, ही जाणीव असूनही

त्यामध्ये डोकावण्याचा प्रयत्न केल्याबद्दल व प्रेक्षकांच्या मनातही

मनाबद्दलचा वैचारिक गोंधळ जागवल्याबद्दल

चं प्र देशपांडे, अभिजित झुंझारराव , रमेश वाणी व संबंधित अन्य रंगकर्मींचे अभिनंदन.

धन्यवादपूर्वक ---

Arun Kadam

esnrdoSotp87icc674824a4h9fhfi1f

h

m9guft332iaiafg59m71

4

i530lgu

.

□□□□□□□□□□□

*'मन वढाय वढाय'*

मराठी प्रायोगिक नाट्यचळवळीतील महत्वाचे जेष्ठ नाटककार 'चं. प्र. देशपांडे' यांनी साधारणत: तीसेक वर्षापूर्वी लिहिलेला 'मन' हा एकपात्री अनवट दिर्घांक , ताज्या दमाचा दिग्दर्शक अभिजीत झुंजारराव प्रदीर्घ काळानंतर पहिल्यांदाच रंगमंचावर सादर करीत असून त्यात आमचा मित्र रमेश वाणी हा प्रमुख भूमिका साकार करत आहे , हे कळल्यापासून या प्रयोगाबद्दल कुतूहल जागं झालं होतं.

त्यामुळे काल यशवंत मिनी थिएटरमध्ये तो प्रयोग पहाण्याची संधी घेतली आणि तरुणाईतील दिग्दर्शक , कलावंत , प्रकाश योजनाकार , नेपथ्यकार आणि त्यांची सगळी रंगकर्मी टीम नाटक या कलाप्रकाराकडे कसे पहातात, याची एक झलक दिसायला मदत झाली. कालच्या प्रयोगाचा हा सगळ्यात महत्वाचा लाभ म्हणता येईल.

वास्तविक चं.प्रं.चा हा दिर्घांक तीसेक वर्षापूर्वीच लिहिलेला असल्याने तो लेखकाच्या आणि समाजाच्याही तत्कालीन sensibility आणि समस्यांचा आलेख मांडणारा असणे क्रमप्राप्त होते. तथापि , चं.प्रं. चं नाटककार म्हणून महत्व इथूनच अधोरेखित व्हायला सुरुवात होते. कारण काही मोजके तत्कालीन तपशील आणि संदर्भ वगळले तर या दिर्घांकात व्यक्त होणारं 'मन' हे सहजपणे समकालीनत्वाच्या कसोट्या पार करुन आजच्या प्रेक्षकांपर्यंत भिडण्याची असोशी प्रकट करते , हेच याचे वैशिष्ट्य आहे. नाटक आशयदृष्ट्या एखाद्या विशिष्ट काळाशी बध्द नसणं , ही नाटककाराच्या मोठेपणाची खूण असते. दिग्दर्शक म्हणून अभिजीतनेही प्रमुख पात्राची वेशभूषा आणि एकूण मेकअप (पात्राचे वय आधी ३५-४० आणि उत्तरार्धात ६२-६३ दिसावे अशी लेखकाची सूचना आहे) याच्या मदतीने नाटकाचा काळही तीसेक वर्षापूर्वीचा establish करण्याची योजकता दाखवली असली तरी त्याच्या कालातीत असण्याला धक्का लागणार नाही याची दक्षताही घेतलेली आहे , हे आवर्जून नमूद करतो.

अर्थात हे नाटकाच्या आहार्य अंगाचे काही प्राथमिक तपशील झाले. इतर अंगांबाबत थोडे सखोल विवेचन आवश्यक आहे.

मूळात 'मन' हा दिर्घांक म्हणजे एका दुभंगलेल्या मनाचे विषण्ण स्वगत आहे. याचा नायक निळकंठ हा कनिष्ठ मध्यमवर्गीय स्तरातील, जगण्यातले सगळे टक्केटोणपे खाताखाता मनाचे संतुलन पार बिघडण्याच्या अवस्थेपर्यंत पोहोचलेला , परीस्थिती आणि समाजाला विटलेला एक सर्वसामान्य माणूस आहे. मात्र आपल्याला सामान्य म्हटलं जातं याचा तीव्र तिटकाराही त्याच्या बोलण्यातून अधूनमधून डोकावत रहातोच.

त्याची आजारी पत्नी अंथरुणाला खिळून आहे आणि मुलीच्या भवितव्याची काळजी त्याला पोखरत आहे. परंतू त्याला भेडसावत असलेली ती एकमेव काळजी नव्हे. उलट त्याच्या आयुष्याचे , मनाचे , मेंदूचे आणि दिवसाचे चोवीस तास हे संसार , पत्नी , मुलगी , नोकरी , साहेब , युनियन , मित्र , मैत्रीण , नातेवाईक या सारख्या असंख्य लहानमोठ्या काळज्यांनी अखंडपणे व्यापलेले आहेत. त्याच्या सभोवतालच्या प्रत्येक माणसाचं अस्तित्व त्याला रोजचं जगणं असह्य करणारा दाहक अनुभव देण्यासाठीच जणू राबत आहे.

तथापि , हे सगळं नाटकातून मांडताना नाटककाराने मुद्दामच त्याची जिगसॉ पझल सारखी रचना करुन नायकाच्या मनाची 'तळ्यात की मळ्यात' अशी होणारी आंदोलनं पकडण्याचा प्रयत्न केला आहे. (तशा अर्थाची एक लक्षणीय मूव्हमेंटही नाटकात आहे)

अर्थात नायकाचा एकूण प्रवास कुठून कुठपर्यंत होत जातो , हाच या सतरा पानी स्क्रिप्टच्या शंभर मिनिटे सलग चालणाऱ्या एकपात्री प्रयोगातील उत्कंठावर्धक भाग असल्याने , तो रहस्यभेद मी करणार नाही. परंतू नाटकाच्या एकूण परीणामासंदर्भातील साधकबाधक बाबींबाबत अवश्य बोलणार आहे.

सर्वप्रथम लेखक - दिग्दर्शक यांच्याबद्दल बोलूया.

एखादा विषय नाटककाराच्या मनाशी येतो , तेव्हा तो त्याचा आवश्यक आकृतीबंध आशयानुसार घेऊन येतो. नाटकातील पात्रे , स्थळ , प्रसंग हे आशय अधिकाधिक अधोरेखित होत जाईल या अनुषंगानेच नाटककार निवडतो किंवा निवडला जातो.

त्यामुळे जेव्हा एखादा विषय एकपात्री दिर्घांकातून मांडावा असे नाटककार ठरवतो , तेव्हाच त्याच्या मर्यादा आणि आवाका त्याच्या मनात स्पष्ट झालेला असतो. एकपात्री दिर्घांक हा एखाद्या शास्त्रीय गायकाने आपला राग आळवत न्यावा आणि त्याच्या क्रमाक्रमाने उलगडत जाणाऱ्या टप्प्यांमधून हलकेहलके एक निश्चित स्वरुपाचे चित्र प्रेक्षकांसमोर स्पष्ट होत जावे अशी अपेक्षा असते. क्वचित आवश्यकतेनुसार त्यात आलेल्या घटना/प्रसंग/निवेदनाची रचना वा मांडणी Nonlinear किंवा विशिष्ट क्रमाने न जाणारी अशी असंबद्ध भासली तरी अंतिमत: तो त्या सगळ्या प्रसंगांच्या 'कोलाज' मधून एक परीणामकारक आकृतीबंध रचत असतो , असे जाणवते. तथापि हा परीणाम साधण्यासाठी सादरीकरणातील (कलावंत आणि प्रेक्षक यांच्यातील) एकतानता निर्माण होणे अपरिहार्य असते. याद्दष्टीने पाहिले असता 'मन' या दिर्घांकात लेखनतंत्राच्या दृष्टीने एक महत्वाचा अडसर निर्माण होतो , ज्याचा उल्लेख करणे क्रमप्राप्त आहे.

या 'मन' मध्ये पुर्वार्धातील पस्तीशीतल्या नायकाच्या मनाची बिथरलेली अवस्था आणि उत्तरार्धात ढासळलेली अवस्था दाखवताना एका टप्प्यावर चं.प्रं. नी नायकाचे वय एकदम वीस वर्षांनी वाढवले आहे. या वयातील बदलातून येणारे काही तपशील वगळता नाटक म्हणून चं.प्रं.नी नेमकं काय वेगळं साध्य केलंय , हे पुरेसं स्पष्ट होत नाही. प्रयोगात नटाने प्रेक्षकांसमोर वेशभूषा आणि मेकअप बदलून वाढत्या वयाचा आभास निर्माण करण्याच्या क्लृप्तीचा प्रेक्षकांवर काही काळ प्रभाव पडत असला तरी अंतिमत: होणारा परीणाम हा आशयात मोलाची भर घालत नसल्याने तो एखाद्या नाटकात प्रवेशागणिक नेपथ्य बदलण्याची औपचारिकता पुर्ण करण्यासारखा गिमिकी आणि म्हणूनच बिनमहत्वाचा ठरतो.

अशा बाबी प्रेक्षकांची अनुभव घेण्यातील एकतानता भंग करतात आणि प्रयोगाच्या एकसंधपणाला मारक ठरतात. तथापि, दिग्दर्शकाने या गोष्टीचा विचार न करता (प्रयोगाच्या शेवटी कर्टनकॉलमध्ये व्यक्त केलेल्या मतानुसार) चं.प्रं.चे अवघड शैलीतील नाटक सुसह्य होण्यासाठी काही , Pentomimic business आणि हालचालींवर भर दिल्याचे जाणवते. वास्तविक सर्वप्रथम लिखाणात अध्याहृत असणारे यथायोग्य सुप्त बिझनेस बारकाईने हुडकणे अतिशय गरजेचे असते. ते शोधून त्यांचा अंतर्भाव प्रयोगात केल्यानंतरच, आशय अधिक फुलवण्यासाठी Pentomimic business वापरले जावेत असा रुढ संकेत आहे. मात्र तसे न करता नाटकाच्या संहितेत अध्याहृत असणाऱ्या between the lines ऐवजी वेगळे काही वापरल्यास (हे 'मन'चे स्क्रिप्ट वाचून झालेले मत आहे) प्रेक्षकांसमोर एक अनाकलनीय गुंता निर्माण होत जातो , ज्यातून नेमक्या उद्दिष्टापर्यंत पोहोचणे बिकट होत जाते.

याचबरोबर आणखी एक धोका संभवतो. काही वाक्यांचे संदर्भ वा अर्थ फिरवून प्रयोगात वापरले जातात. यातून क्वचित हशा उत्पन्न होण्यापलीकडे आशयाची बांधणी करण्यासाठी फार मदत होताना दिसत नाही.

प्रमुख भूमिका करणारे रमेश वाणी यांच्यासोबत तीसेक वर्षापूर्वी प्रत्यक्ष काम करण्याचा योग आल्याने त्यांच्याशी जुनी मैत्री आहे. त्यांच्या अभिनयातील सहजता मला परीचित आहे. मात्र इथे पुर्वार्धातील तुलनेने तरुण निळकंठ रंगवताना त्यांनी लावलेला वरचा सूर मूळ व्यक्तिरेखेची द्विधावस्था अधोरेखित न करता त्रागा अधिक दर्शवते की काय , अशी शंका जास्त येत होती. त्यामानाने उत्तरार्धात साठीतला निळकंठ समजून घेणे अधिक सोपे जात होते. अर्थात याचाही पहिला दोष लेखकाकडेच जातो. मात्र नटाने नाटकाचा आरंभसूर योजताना Atmost सावधगिरी बाळगायला हवी , याकडे मी लक्ष वेधू इच्छितो.

रमेशने पुर्ण शंभर मिनिटे अखंड बोलत रहाण्याची मागणी करणाऱ्या या प्रयोगात टिकवून ठेवलेली एनर्जी मात्र अफलातून आहे. अधल्यामधल्या काही जागाही त्याने टचिंग केल्या आहेत. परंतू तरीही व्यक्तिरेखेचा मानसिकदृष्ट्या संहिताबरहुकूम ढासळलेला (प्रयोगबरहुकूम क्रमशः ढासळत जाणारा नव्हे) अंडरकरंट दाखवणे , ही गरज पुर्ण करण्याच्या संदर्भात अधिक विचार होणे अत्यावश्यक आहे. कारण 'मन वढाय वढाय,  किती हाकललं तरी भेदक वास्तवाशी टकरा घेतंच आणि उध्वस्तही होत रहातं' , हा चटका लावणारा अनुभव संक्रमित करणं महत्वाचं आहे.

बाकी शाम चव्हाण यांची प्रकाशयोजना अगदी समर्पक होती (तरी यशवंत मिनीमध्ये स्पॉट्स कमी वापरल्याचे म्हणाले) या नाटकात प्रकाशयोजनाकाराचे महत्त्व आशयातले चढ-उतार दाखवण्यासाठी फारच उपयुक्त असल्याने दिग्दर्शकाकडून थोडा अधिक फ्रि-हॅन्ड शामला मिळावा असे वाटते.

कृष्णा - देवा या द्वयीचे पार्श्वसंगीत अतिशय कल्पक आणि अनेक सुप्त जागा प्रकट करणारे अर्थवाही होते.

यात वापरलेले सुमीत पाटील यांचे नेपथ्य मात्र फारच प्राथमिक स्तरावरचे प्रयोग करणारे वाटले. आपल्याकडे एकांकिका आणि नाटक या दोन स्वतंत्र माध्यमातून अनुभव देण्यातील फरकात नेपथ्य नेमकी कोणती भूमिका वठवते, यावर सखोल विचारमंथन होण्याची आवश्यकता आहे. 'मन'चे नेपथ्य खर्चिक असले तरी एकूण दृश्यपरीणामाचा विचार करता एकांकिकेसारखे अधिक वाटते (आणि त्यामुळेच प्रयोगावरही त्याचा Everlasting impact साधला जात नाही) हा दोष नेपथ्यकार आणि दिग्दर्शक या दोघांच्याही माथी जातो.

असो. शेवटी नाटक हा प्रयोग असतो आणि कुणावर त्याचा कसा परीणाम होतो , हे ज्याची त्याची व्यक्तिगत आवडनिवड , समज , अभिरुची , अनुभव याचा परिपाक असतो हे मान्य करावेच लागते , पण तरीही .......

अभिजीत आणि रमेशसह त्यांच्या संपूर्ण टिमला एक अनवट अनुभव दिल्याबद्दल धन्यवाद आणि प्रयोगांच्या पुढील वाटचालीस मन:पूर्वक सदिच्छा

धन्यवाद,

-- *अरुण कदम* २९/०७/२४

कवीने आनंदयात्री असणे हे जुने झाले आहे काय ? कशामुळे ?

गरिबी, अपमान, जवळचे कुणी जाणे, फसवणूक आणि आजारपण या पाच दु:खांत मराठीतली किती टक्के कविता बसेल ?

मन

पुढील प्रयोग

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड यांच्या संयुक्त विद्यमाने

शनिवार ३ ऑगस्ट

संध्याकाळी ६:०० वा.

स्थळ :

महाराष्ट्र सेवा संघ

सु. शं. गोखले सभागृह

महाराष्ट्र सेवा संघ

नेहरू मार्ग

मुलुंड (पश्चिम)

आणि

केशवराव गोरे स्मारक ट्रस्ट गोरेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने

शनिवार १७ ऑगस्ट

संध्याकाळी ६:०० वाजता

स्थळ:

मृणालताई गोरे दालन,

पहिला मजला

केशव गोरे स्मारक ट्रस्ट, आरे रोड, गोरेगाव (प.)

तिकीट दर १५० /- रूपये मात्र

Google Pay Number

+91 99875 56862

समीक्षा

मन

ऋणी आहे श्री. Bhalchandra Kubal आणि दैनिक प्रहार

**

आज संध्याकाळी ६ वाजता मन चा प्रयोग आहे महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

आणि त्यानंतर

दिनांक १७ ऑगस्ट, संध्याकाळी ७ वाजता, केशवराव गोरे स्मारक ट्रस्ट, गोरेगाव.
सहज शक्य झाले तर नक्की या!!

"मन" नाजुकशी मोती माळ

मनाचा अभ्यास म्हटला कि पहिला आठवतो तो फ्रॉईड. मानसशास्त्राचे सखोल पृथ्थक्करण करणारा मनोतज्ञ म्हणून त्याचे सिद्धांत आपण अभ्यासतो तेंव्हा १९ व्या शतकात मनाचा इतका सूक्ष्म विचार इतक्या विस्तृत पातळीवर कुणी करुन ठेवला असेल असे वाटत नाही. जागरुक मन (चेतनमन), अचेतन मन आणि अवचेतन मन असे तीन भाग पाडल्यावर जाणीवा निर्माण करणाऱ्या जागरुक मनाबाबत आपण लिहितो, बोलतो, संवादतो. जगभरातील ८०% साहित्य हे जागरुक मनाशी संबंधित आहे. चं.प्र. देशपांडे देखिल 'मन' या एकल नाट्यातून निळकंठ या पात्राच्या तोंडून जगण्यासंबंधीचे अनेक प्रश्न मांडतात. या प्रश्नांद्वारे जागरुक मनाच्या अनेक अवस्थांची उकल होता होता एका व्यक्तिच्या जीवनाचा आकृतीबंध आपल्या समोर उभा रहातो. चं. प्रं. च्या नाटकांबाबत नेहमी हेच गुढ कायम राहिले आहे. त्यांना खुप काहीसे सांगायचे असावे असा संशय समीक्षकांना येत असावा आणि मग या लिखाणावर व्यक्त होणारा प्रत्येक भाष्यकार स्वतःची व्याख्या (इंटरप्रिटेशन) मांडत रहातो. चं. प्र. ना खरंच असे काही सैद्धांतिक मांडायचे आहे का ? फ्रॉईडच्या आडून एखाद्या नव्या मनःसत्याचा आविष्कार सादर करायचा का ? किंवा जागरुक मनाच्या अवस्था मर्यादित स्वरुपात सादर केल्यास त्या अधिक प्रभावाने प्रेक्षकांपर्यंत पोचतात का ? तर अशा प्रश्नांची उत्तरे देण्यापेक्षा निळकंठ या पात्राचा वयाच्या दोन टप्प्यांवर स्वतःच्या जगण्याबाबतचा दृष्टीकोण, एवढाच त्यातून अर्थ निघू शकतो, असे माझे निरीक्षण सांगते. निळकंठ त्याच्या सोशिओ इकॉनॉमिक (सामाजिक अर्थशास्त्र) व कौटुंबिक चढउतारांबाबत बोलताना आढळतो. त्याचं मन या दोन्ही विषयांबाबत कायम इंटिमेट पद्धतीने थेट प्रश्न उपस्थित करत रहाते, आणि त्यामुळेच प्रेक्षक त्या प्रश्नांना स्वतःशी रिलेट करु पहातात. मग साऱ्या आविष्काराची स्पेस फक्त आणि फक्त निळकंठाच्याच मनाची होऊन जाते. म्हणूनच वर म्हटल्याप्रमाणे चं. प्र. ना या "मनातून" फार काही सैद्धांतिक वगैरे मांडायचे नसावे. तसे असते तर सामाजिक, आर्थिक तथा कौटुंबिक मुद्यांनुसार त्यांनी शारीरिक मुद्दा का मांडला नाही ? मनाच्या दुर्बिणीतून ते जेंव्हा या तिनही मुद्ग्यांकडे पहातात, अशावेळी निळकंठाचे शरीर हे मनाशी निगडीत नाही का ? उलट शारीरिक क्रियांचा मनाच्या अवस्थेशी गहिरा संबंध जोडला गेला आहे, असे फ्रॉईड सांगतोच कि...! उदाहरणार्थ निळकंठाची एखाद्या व्यक्तिशी आलेल्या शरीर संबंधाची जाणीव आर्थिक, सामाजिक किंवा कौटुंबिक मनोविश्लेषणापेक्षा अधिक गडद होऊ शकली असती, परंतु एकंदर नाट्याचा परिवेश पहाता चं. प्र. ना त्या वाटेला जायचेच नाही, असे निळकंठाच्या एकंदर व्यक्त होण्यातून जाणवत रहाते. समाज रचनेच्या आधाराने बायकोचा उल्लेख व संदर्भ जरुर येतो परंतु तो कौटुंबिक बांधिलकी व्यक्त करण्याच्या उद्देशाने, शरीरधर्माच्या दृष्टीकोणातून नाही. त्यामुळे निळकंठाचे मन जीणीवे पर्यंतच सीमित आहे हे अधोरेखित होते. नेणीवांचा त्यास लवलेशही नाही. आत्मरुपी, परमात्म्य, अद्वैत सिद्धांत, अध्यात्मिक चिंतन आदी संज्ञांच्या वाटेला निळकंठाची नेणीव जात नाही. म्हणूनच व्यावहारीक जगाने वाढून ठेवलेले विष प्राशन करुनही जगायची धडपड करणारा निळकंठ कुठेही क्लिष्ट वाटंत नाही. आरंभ ते अंततः निळकंठ कळतो, आकळतो आणि साकळतो सुद्धा...!

मी एखादे नाटक बघतो, ते मनापासून आवडते. मग मी त्यावर व्यक्त होतो. अगदी जाणून बुजुन नाही तर समाज माध्यमावरील माझ्या स्पेसमधे माझी जी काही बरी वाईट रिॲक्शन आहे, ती लिहून काढतो. मला शब्दमर्यादांचे भान नसते अथवा त्या केवळ नाटकाबाबतचे काहीही (अगदी वैचारीक सुद्धा) माझ्या लिखाणातून मी जगासमोर आणतो. आता, नाटक बघणे ते त्यावर लिहिणे या मधल्या प्रवासात माझ्या मनाला ज्या जाणीवांनी घेरलं होतं त्या मोकळ्या होतात. तेच जर एखाद्या अदृष्य शक्तीच्या अंमलाने मी हे लिखाण करतोय असा समज मला "नेणीवे"कडे घेऊन जातो. मन बघताना, निळकंठाचे जे जसे आहे तसे मी तुमच्या समोर मांडतोय आणि केवळ मांडतोय...! त्यासाठी जजमेंटल होण्याची गरज नाही, मांडणीच्या प्रोसेसचा तो एक भाग समजावा बस इतका सोपा या नाटकाचा पट मला वाटतो.

हे नाटक सादरीकरणासाठी निवडणं यातच अभिजित झुंजाररावच्या दिग्दर्शकिय प्रगल्भतेची बाजू कळून चुकते. सातत्याने मुख्य पात्राकरवी रंगमंच खेळता ठेवण्याची पद्धत सैरभैर विचारांच्या पात्राशी पूर्णतः तर्कसंगत आहे. काही काही मुव्हमेंट्स तर इतक्या लाजवाब आहेत कि त्यावर सेपरेटली लिहावे लागेल. निळकंठच्या वयोमानाच्या बदलाचा प्रसंग तर विशेष लक्षात रहाण्याजोगा वठलाय आणि त्यास शाम चव्हाणची प्रकाशयोजना अत्यंत पुरक ठरलीय, केवळ सुरुवातीचा मेणबत्तीसाठी लाल रंगाच्या प्रकाशाचा केलेला वापर सोडल्यास संपूर्ण नाटक टंगस्टन सोर्सच्या इंटेंसिटीवर खेळण्याचा प्रयोग पाहिला आणि दिलीप कोल्हटकरांची आठवण झाली. त्यानी विजयाबाईंच्या आणि एक दोन नाटकांना एकही रंग न वापरता प्रकाशयोजना केली होती. आजच्या नव्या पिढीने शाम चव्हाण, अभिजित झुंजारराव, उल्लेश खंदारे आणि सुमीत पाटील या नव्या दमाच्या पिढीकडून बरंच काही शिकावं असं हे "मन" आहे. आणि सरते शेवटी रमेश वाणींशिवाय हे "मन" भरुन येत नाही, कदाचित येणारही नाही. आजवरच्या त्यांच्या नाटकातील विनोदी आणि मालिकांमधून सादर होणाऱ्या भूमिकांपेक्षा फारच अफाट आणि रमेश वाणींच्या संपूर्ण कारकिर्दीला अधोरेखित करणारी हि निळकंठाची भूमिका आहे. दिग्दर्शकाने दिशा दाखवल्यानंतर दोन पावले पुढे गेल्याने रंगमंच होल्ड करण्याची ताकद रमेश वाणी आणि अभिजित झुंजाररावने दाखवून दिलीय. कृष्णा -देवा यांचे संगीत आणि प्रभाकर मठपती यांचे गीतही या एकूण रसायनात विरघळून गेले आहे, फक्त नेपथ्य हि एकच अशी बाजू कि जी इतर तांत्रिक अंगांप्रमाणे एकजीव झालेली नाही. या नाटकातील नेपथ्यासाठी वापरात आणले गेलेले एलिमेंट्स नकळत जड झाले आहेत. त्यामुळे ते प्रत्येक प्रसंगात मणामणाने आदळंत रहाते. सूचक व कल्पक नेपथ्य असूनही ते स्वतःची भूमिका मांडण्यात कमी पडते, असे माझे निरीक्षण सांगते.

न उमगलेल्या माझ्या आयुष्याच्या प्रश्नांना मनाने कसं सामोरं जायचं ? यांचे पोस्टमार्टेम वगैरे न करता चं.प्र. नी मांडलेला धांडोळा "मनाने मनोराज्य" करतो, यात शंकाच नाही.

भालचंद्र कुबल

धन्यवाद महेंद्र तेंरेदेसाई सर!

"आपल्या शरीरातला सगळ्यात भिकारचोट अवयव कुठला सांग?"

"भिकारचोट अवयव?...... नाही बा.... नाही सांगता येत."

"मन !"

“मन? कसं काय बुवा? मन तर चांगलं असतं.. मन मोठं असतं.. “

“मन मोठं असतं? मन कोतं असतं.. “

“नाही रे मन निर्मळ असतं.. मन विचारी असतं.. “

“मन भित्र असतं.. मन संशयी असतं.. “

“मन स्वप्नील असतं.. मन मिळावू असतं..”

“मन बेरड असतं.. मन कपटी असतं..”

“ मन प्रेमळ असतं.. मन ठाम असतं..”

“घंटा ठाम असतं?.. मन द्विधा असतं..मन चंचल असतं.. मन सत्ताधीश असतं.. तुमच्या शरीरातले कुठलेच अवयव मनाविरुद्ध काम करू शकत नाहीत. साला तो विचार, तो सुद्धा मनापासून करावा लागतो. मनाविरुद्ध केलात की लोचा झालाच समज.. अरे मन नुसतच भिकारचोट नसतं, ते धोकादायकही असतं.. आणि आपलंच नाही समोरच्याचं ही तसंच असतं.. म्हणून सतत आपल्याला समोरच्याच्या मनाचा विचार करावा लागतो.. त्याला काय वाटेल?.. तो काय म्हणेल? समाज.. समाज काय म्हणेल?.. तुम्ही सतत या प्रेशर खाली. तुला माहितीय, शरीराला होणारे ९५% टक्के रोग हे सायको सोमाटीक असतात? माणूस दारू सिगरेटमुळे जसा मरतो, तसा.. किंबहुना त्याहीपेक्षा जास्त तो विचार करून मरु शकतो. हे माहितीय तुला?”

चं. प्र. देशपांडेंचं 'मन!' हा दीर्घांक काल पहिला. आमच्या महाराष्ट्र सेवा संघात त्याचा प्रयोग केला आम्ही. काल तो पाहिल्यावर हे असेच काही संवाद मनात येऊन गेले.

चं. प्र. कुठल्यातरी निळकंठचं मन तुमच्यासमोर उलगडतात.. सामान्य नीलकंठ.. अकरा ते सात नोकरी करणारा.. स्वाती नावाची बायको आणि मृण्मयी नावाची मुलगी असलेला.. त्रिकोणी कुटुंबं.. त्याआधी आणखी एक त्रिकोण त्याच्या आयुष्यात आलेला.. जो आपल्यापैकी अनेकांच्या आयुष्यात येतो.. प्रेमाचा त्रिकोण.. तिच्यासमोर आपलं प्रेम व्यक्त करायला घाबरलेला.. पण त्याचवेळेस त्या तिसऱ्याचा काटा काढायचा विचार करणारा.. भित्रा.. सामान्य.. जो मेला तर त्याची पुण्यतिथी साजरी होणार नाही अशा निळकंठचं मन चं. प्र देशपांडे तुमच्यासमोर ह्या दीर्घांकात उलगडतात.. 'मन' निळकंठाचं आणि 'शरीर' रमेश वाणी या नटाचं. आता त्या मनाचं कौतुक करावं की रमेश वाणी नावाच्या त्या शरीराचं..?

इतकी वर्ष तो दीर्घांक कोणी केला नव्हता.. साला मनाला काही किंमत नाही हेच खरं.

पण असंही नाही.. कदाचित ते कुठल्याही शरीरात जाऊन चालणार नव्हतं.. ते रमेश वाणीच्या शरीराची वाट बघत असावं.. नक्कीच.. कारण त्याशिवाय ते इतकं जीवंत वाटलंच नसतं.. चं. प्रं च्या विचारातला उपरोध (खरं तर इंग्रजीतला sarcasm हा शब्द मला जास्त भावतो.) नर्म विनोद (to be specific, Humour) समाजभान, तत्वज्ञान, मनातली complexity (व्यामिश्रता हा शब्द अती व्यामिश्र वाटतो). उदा. मनाचे हे दोन संवाद बघा-

“विकृत माणसांची एक संघटनाच उभी राहिली पाहिजे.... निर्भयपणा येणार कसा त्याशिवाय. पॉवर शिवाय विकृतीला कोण महत्व देणार. म्हणजे हे धंदे करावे लागणार, विचार स्वातंत्र्याचे. त्यापेक्षा आपली आहे ती बांधिलकी परवडली. किमान आपण नॉर्मल आहोत असं दाखवत तरी राहाता येतं.” हा एक, तर दूसरा –

“दीड महिन्यात भगवत गीता समजून सांगणारा कोर्स लावलाय. फी रुपये पाचशे. परवडत ना? ५००/- रुपयात भगवत गीता काय वाईट आहे. साधारणपणे दोन अडीच दिवसांत एक अध्याय पूर्ण होतो म्हणे. याचा फायदा होईल असं वाटतंय मला..... गीता तर काय हो शक्तिमानालाही उपयोगी पडते. अर्जुनाला नाही का, उपयोगीच पडली ना? मग? बरं स्वतः श्रीकृष्णही, शक्तिमानच होते. त्यांनाही गीता माहीत असणं उपयोगीच पडलं. विशेषतः अर्जुनाला सांगता आली. नाही तर काय सांगितलं असतं? आणि आता तर काय किती तरी लोकांना त्याचा फायदा होतोय..”
रमेश वाणी हा ह्युमर.. ह्यातला sarcasm तंतोतंत उभा करतो. इथे त्याच्या अभिनयाचं पृथकरण करणार नाही.. म्हणजे त्याचा वाचिक.. कायिक.. वगैरे असलं काही सांगणार नाही.. तुम्ही तो पाहून अनुभवाच. दीड तास हा पठ्या तुम्हाला दूसरा विचार करायला देतच नाही.. म्हणजे तुमचीही स्वाती.... मृण्मयी असणार.. पण तो त्यांचाही विचार करायला देत नाही. यापेक्षा एखाद्या नटाचं आणखी काय महत्व असतं राव? सुदृढ शरीरातच सुदृढ मन वसतं हे कालचा प्रयोग पाहून पटलं.
आमच्या महाराष्ट्र सेवा संघात जेंव्हा कुठल्या नाटकाचा प्रयोग होतो तेंव्हा तिथे तुम्हाला तंत्राचा फार आधार घेता येत नाही. म्हणजे प्रकाशयोजना करता येत नाही.. नेपथ्याला फार वाव नाही.. पार्श्वसंगीत नावापुरता.. म्हणजे तुमच्यासमोर होणारा प्रयोग हा जवळजवळ नेकेड (Naked) प्रयोग असतो. तुम्ही, तो नट आणि नाटककार.. पण मनच्या प्रयोगात आणखी एक अदृश्य अस्तित्व तुम्हाला सतत जाणवतं.. ‘दिग्दर्शक’. दिग्दर्शक अभिजीत झुंझारराव. आणि ते ही ह्या तांत्रिक गोष्टी हाताशी नसून.
तुम्हाला सात सुर ठाऊक असतात.. पण प्रत्येकाला त्यातून बंदिश बांधता येईलच असं नाही. अभिजीतने हा दीर्घांक एखाद्या बंदिशीसारखा बांधला आहे. विलंब लयीत सुरू झालेलं नाट्य मध्यम लयीत येऊन तीव्र लयीत समेवर येऊन संपत.. आणि तुम्ही श्वास घेता. बरं आणखी एक गंमत अभिजीतने केली आहे. प्रत्येक लयीत उरलेल्या लयीचा अनुभव तो तुम्हाला देत रहातो. त्यामुळे त्या दीर्घांकाला एकसंधपणा आलेला आहे. काळ गेल्याचा.. निळकंठाच्या आयुष्यातील सरलेली वर्ष दाखवण्यासाठी अभिजीतने वापरलेली क्लृप्ती निव्वळ अप्रतिम.
एक गंमत,  नेपथ्याने निर्माण केलेली अनेक स्थळं, आणि त्या स्थळातून नीलकंठचा वावर आणि त्याच्या चेहऱ्यावरचे विभ्रम अधोरेखित करण्यासाठी श्याम चव्हाण यांनी कशी प्रकाशयोजना केली असेल, याचे आडाखे कालचा प्रयोग पाहताना एखादा नाट्य अभ्यासक बांधत असेल. त्याचे हे आडाखे, पाहिजे तर, पुढचा फुल्ल लाइटचा प्रयोग पाहून तो तपासू शकेल. आणि खात्री आहे की श्याम चव्हाणने त्यांचे बरेच आडाखे उधवस्थ केल्याचा सुखद अनुभव त्यांना मिळेल. कारण श्याम चव्हाण हे आजच्या घडीला एक बिनीचे प्रकाशयोजनकार मानले जातात.
शारीरक आरोग्याइतकं मानसिक आरोग्य जर तुम्हाला महत्वाचं वाटत असेल तर तुम्ही 'मन' चा हा प्रयोग चुकवणार नाही.
महत्वाची सूचना : ह्या नाटकाचा पुढचा प्रयोग १७ ऑगस्ट, २०२४ला गोरेगावच्या मृणालताई गोरे दालनात संध्याकाळी ६.००वा. होणार आहे. मनापासून बघा!
दुसरी सूचना : ह्या नाटकाच्या प्रयोगाची जाहिरात वर्तमानपत्रात येईलच असं नाही. ती तुमच्यापर्यन्त सोशल मिडियातून येईल.. आली की वाचा.. ती वाचून तुम्ही प्रयोगाला जाच, पण ती जाहिरात फॉरवर्डही करा. आणि हे असं प्रत्येक प्रायोगिक नाटकांबद्दल करा.

= महेंद्र तेरेदेसाई

रवीन्द्र दामोदर लाखे is with Priya Deshpande and
3 others

औट घटकेचे राज्य या चंप्रंच्या कविता संग्रहात तुकारामावर पंचवीस कविता आहेत. त्यातली ही कविता अवघा तुकाराम तुम्हाला देते. तुकाराम इतका अंतर्बाह्य कळलेला दुसरा कुणी  कवी मला माहित नाही. काही अंशी दिलीप पुरुषोत्तम चित्रे हे एक कवी आहेत.

तुकाराम सार

तुकाराम सार ऐका हे अपार
जगण्याचा भार टाकावया ॥ १ ॥
मन हेच केंद्र फेका हो बाहेर
देवाचे माहेर स्वतःच व्हा॥ २ ॥
देवाचे अस्तित्व म्हणजे नास्तित्व
रिकामीक सत्त्व जगण्याचे॥ ३ ॥
वनांतरी जाणे सुखांना मुकणे
नको मुळी सुकणे संसाराचे॥ ४ ॥
ठायीच बैसोन करा एकचित्त
घरी सत्य वित्त सहजची॥ ५ ॥
फावला एकांत एकविध भाव
अवघेंचि भेव नष्ट आता॥ ६ ॥
स्मरणाच्या साठी वेळचि नसावी
सर्वकाळ व्हावी भेटगाठ॥ ७ ॥
भेद तो नासला अहंकार गेला
चित्ती देव आला हेचि सर्व॥ ८ ॥
देव तेंचि पुण्य अदेव ते पाप
रिकामे ते माप असू द्यावे॥ ९ ॥
आता व्हावे जल देवाची जी मर्जी
जावे मनमौजी सर्वांसवे॥ १० ॥
अवघेंचि शुभ माझे नाही काही
मला नाही काही क्षोभचिंता॥ ११ ॥
लागला हा झरा अखंडचि वाहे
तुका म्हणे ध्यावे पूर्ण विश्व॥ १२ ॥

प्रत्यक्ष कृतीचे सुंदर सौष्ठव

शब्दाचा गौरव कामा न ये॥ १३॥

तुका म्हणे आता निवांतचि राही

पाहिले ते पाही परतोनी॥ १४॥

- चं. प्र. देशपांडे

Shared with Public

सुवर्णसंधी

अरे वा ! छान ! उत्तम ! सुवर्णसंधी !

चक्क भारताच्या राजकीय राजधानीत

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन !!!

‘ साहित्यात राजकारण वर्ज्य नसते ‘ या वाक्याचा

महा-उपयोग करून घेण्याची संधी !

तेवढे एक वाक्य म्हणून साहित्य हा प्रकार वर्ज्यच करायचा !

कंप्लीट भाषण राजकीय करायचे !

नाही तरी मराठीत थोडेफार लिहिणारा आणि मुख्य म्हणजे

निर्भीड, निर्भय, सडेतोड आणि विवेकी

असे राजकीय भाषण करणाराच हवा अध्यक्ष !

तसेही आता साहित्याचे फारसे महत्त्व कुठेही राहिलेले नाही.

पुस्तके खपत नाहीत, वाचनालये बंद पडताहेत !

तर, सध्या मराठी साहित्यात काय चालले आहे वगैरे

मुळीच न बोलणारा आणि भाषणात एकाही जिवंत लेखकाचे नाव न घेणारा

असा अध्यक्ष सत्वर शोधू लागा ! ऑक्टोबरमध्ये निर्णय घ्यायचा आहे !

पण एक लक्षात ठेवा – हे आहे ९८ वे संमेलन –

म्हणजेच लौकरच १०० वे येईल ! त्या वेळी अधिक तगडा लागेल

साहित्य वर्ज्य करणारा ! तो सध्या राखीव ठेवा !

जरा दुय्यम पैलवानाला खेळवा सध्या !

बेळगाव प्रश्न आणि मराठीला अभिजात भाषेचा दर्जा

या दोन गोष्टी लावून धरा !

इतकी संपन्न संमेलने घेणारी जगात दुसरी भाषा नाही !

फक्त प्रकाशक लोक जरा प्रॉब्लेम करताहेत –

येणार नाही म्हणताहेत तिकडे पुस्तके विकायला !

जाऊ द्या !

पुस्तकांचाही नाही तरी संबंध तुटतच आलाय या संमेलनाशी !
तीही प्रक्रिया पूर्ण करण्याची ही एक सुवर्णसंधी आहे !
पूर्ण अस्मितेने म्हणा – जय मराठी !!!
--- ००० ---

रवी सावंत

' आविष्कार ' आणि रवी-रसिक हे नाते अतूट होते ! त्यात रवी-रसिक मधला रवी म्हणजे रवी सावंत ! माझ्या अनेक नाटकांना जेव्हा जिथे जसा हवा तसा प्रकाश ( आणि नेपथ्यही ) देणारा माणूस ! कै. काकडे काका गेल्यानंतर तर मला वाटते, ' आविष्कार ' च्या बऱ्याच व्यावहारिक कामांची धुराही तो सांभाळत होता ! मराठी रंगभूमीच्या दृष्टीने हे शंकर-जयकिशन मधला जयकिशन जाणे आहे !
या प्रिय मित्राला दिलखुलास मैत्रीचा रामराम !
--- ००० ---

‘ महाराष्ट्रात सांस्कृतिक अवनतावस्था ‘

या शीर्षकाने आज दि. ०७-०८-२४ च्या पुणे मटात आलेल्या डॉ. सुधीर रसाळ यांच्या मुलाखतीतून --
‘ सत्यकथा ‘ या मासिकावर खूप टीका झाली; पण कुठल्याही भाषिक संस्कृतीमध्ये एक प्रमाणक असलेले मासिक आवश्यक आहे. त्याचे संपादक अतिशय जाणकार हवेत. त्याचा परिणाम म्हणजे, कुठल्या लेखकाचे साहित्य वाचावे, हे वाचकाला कळते. दर वर्षी निघणाऱ्या ५० कादंबऱ्या वाचून चांगली कादंबरी कोणती, हे नंतर ठरवणे शक्य नाही.
( --- असे अनेक महत्त्वाचे मुद्दे या मुलाखतीत आहेत. इथल्या चर्चेसाठी हा मुद्दा घेतला आहे. )
--- ००० ---

साहित्याचे मूल्यमापन

"The 'greatness' of literature," Eliot observes, "cannot be determined solely by literary standards," but "whether it is literature or not can be determined only by literary standards" ("Religion and Literature," Essays Ancient 93).
आणि डॉ. रसाळ सरांचे मत --- “ मात्र साहित्याचे मूल्यमापन करताना आपल्याला वाङमयीन निकषच लावावे लागतील असे ( त्यांनी ) दर वेळी ठणकावून सांगितले आहे. “ – आज दि. ०८-०८-२४ च्या पुणे सकाळ मधील प्रा. विश्वास वसेकर यांच्या लेखातून.
--- हा विषय जरा अवघड दिसतो. अभ्यासकांनी कृपया यावर प्रकाश टाकावा.
--- ००० ---

साहित्य अकादेमी पुरस्कार

आजच्या, ०९-०८-२४ च्या, पुणे सकाळ मध्ये एक खास बातमी आहे. पण, ' साहित्य अकादेमीतील सूत्रांनी नाव न सांगण्याच्या अटीवर ही माहिती दिली ' असे म्हटले आहे. त्यामुळे, बातमी खरी की खोटी, कोण जाणे ! सारांश असा आहे की आजवर त्या त्या भाषेतले तज्ज्ञ, विद्यापीठे आणि साहित्य संस्था या पुरस्कारासाठी पुस्तकांची शिफारस पाठवत. पण, त्यात गटबाजी होते असे आरोप होत असल्याने ती पद्धत बदलणार आहे. स्वत: लेखक, प्रकाशक वा एखादा वाचकही या पुरस्कारासाठी पुस्तकाची शिफारस करू शकणार आहे ! ते म्हणतात, शिफारशी जास्त आल्या तर येऊ देत -- परीक्षकांची संख्या वाढवू !

-- हे असे झाले तर मी पाठवेन माझे एखादे पुस्तक !

--- ००० ---

केशवराव भोसले रंगमंदिर

माझे पहिले जमलेले नाटक, ' एक गगनभेदी किंचाळी ' हे प्रसन्न कुलकर्णींच्या दिग्दर्शनाखाली, ' टू फ्रेंडस थिएटर युनिट ' या संस्थेतर्फे आणि नंतर ' प्रत्यय ' तर्फे कोल्हापूरच्या केशवराव भोसले रंगमंदिरात सादर झाले होते ! त्या प्रक्रियेत त्या वेळी सहभागी असणाऱ्यांना त्याच्या खूप सकस आणि मजेदार आठवणी असणार आहेत ! ते रंगमंदिर कोल्हापूरची शान होते ! ते जळून खाक होणे हे प्रचंड नुकसान आहे ! ते पुन्हा तिथे नव्या दिमाखात उभे राहो, हीच सदिच्छा !

--- ००० ---

या दोन बंधूंचे पाठीराखे एकमेकांना असे भिडतील अशी काही वर्षांपूर्वी कुणी कल्पनाही नसती केली ! याला नियती म्हणावे की अपघात ?

तळ – Bottomland.

स्वप्नील ऋषिकांत शेटे यांचा लघुचित्रपट.

( निर्मिती -- जेजुरी आर्टस अँड मेडिया वर्क्स. )

विषय सामाजिक बांधिलकीचा – दलितांवरील अन्याय-अत्याचाराचा आहे. त्यातली स्त्री आणि तिची मुलगी यांचे निर्घृण खून कसे झाले हे प्रेक्षकांना दाखवलेले आहे – शंकेला जागाच नाही – म्हणजेच बाजू घेतलेली आहे. अशा असंख्य घटना घडत असणारच आहेत, त्यामुळे, बाजू घेणे योग्यच आहे. ‘ हे फार वाईट आहे, मानवतेला काळिमा आहे, क्रूर आहे ‘ अशा प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया इथे नक्कीच येतात. रसेलने त्याच्या एका निबंधात असे उदाहरण दिले आहे की नाटक पाहताना लहान मुलांच्या हत्यांबाबत तिडिक, तिरस्कार जाणवणारे लोक बाहेर गेल्यावर, आपल्या सरकारमार्फत चाललेल्या तशाच कृत्यांना समर्थन देत असतात ! तरीही, अन्याय, क्रौर्य यांचे दर्शन घडवून काही मानवी मूल्यांची जाणीव प्रेक्षकांना देत राहणे महत्त्वाचेच आहे, हे कुणालाही मान्य होईल. हे तसेच काही आहे असे समजून मी सुरुवातीला हा चित्रपट ‘ माहीत असणे ‘ या विभागात पाहिला. माझी कलेबाबतची धारणा वेगळी असल्याने, यावर माझा अभिप्राय विचारणे म्हणजे माझी परीक्षा घेणे तर नसेल, अशीही शंका येऊन गेली. पण, विचार करता माझ्या लक्षात आले की हा चित्रपट नुसतेच अन्यायाचे दर्शन घडवून एका भूमिकेची भलावण करत नसून त्याहून अधिक आवाक्याचे काही करतो आहे. वडील निवर्तलेले आणि आई व बहीण यांचे खून झालेले असा

भाऊ फक्त उरलेला. जमिनीच्या वादावरून झालेले खून अट्रोसिटी कसे म्हणावेत असा प्रश्न इन्स्पेक्टर विचारतो. पुरावा उपलब्ध नाही, शिवाय काहीजण या कायद्याचा दुरुपयोगही करतात, हे लक्षात घेता लगेच एक्शन कशी घेणार, हा त्याचा प्रश्न असतो. त्यात, मालदार, सवर्ण आरोपी न्यायालयाबाहेरचाही एक डाव खेळतात. ते त्या मुलालाच विनयभंगाच्या आरोपात अडकवू पाहतात. या सगळ्या प्रकारात शेवटी त्याला गप्प बसावे लागते ! शेवटी उद्वेगाने तो जमिनीवर काटकी आपटताना दिसतो. ही मन:स्थिती असंख्य लोकांना अनुभवावी लागते, हे आपल्या लक्षात येते. सत्ताधाऱ्याच्या जुलुमापुढे झुकावे लागणे ! ' मै इन्साफ मांगता नही हूं , छीन लेता हूं ' अशा अमिताभच्या वाक्याला आख्खा भारत टाळ्या वाजवतो याचे कारण हेच आहे. पण, प्रत्यक्षात अमिताभ होणे अशक्य असते.

हा चित्रपट थोडक्या वेळात, मानवी जगण्यातल्या मूलभूत प्रश्नाला हात घालतो, असे मला वाटते. बहुसंख्य नात्यांत, देशादेशांतही गुमान सहन करण्याची अवस्था का येते ? मी हा चित्रपट दुसऱ्यांदा पाहिला तेव्हा त्याचा हा आयाम लक्षात आला. जिथे जिथे मानवी जगण्यात अशा अवस्था येतात तिथे तिथे कोणतीही बौद्धिक उत्तरे उपलब्ध नाहीत, हे दिसते ! म्हणजे माथेफिरू व्हा किंवा युद्ध करा ! जगभर अशा मन:स्थितीत मानवजात होरपळत असेल तर यांतल्या प्रत्येक एकेका प्रश्नावर स्वतंत्र उत्तर सापडू शकेल ? – हा प्रश्न इथे समोर येतो. या दृष्टीने पाहता या लघुचित्रपटाचा आवाका मोठा आहे, हे समजते !

--- ००० ---

माझ्या पुस्तकांच्या विक्री किंमतींबाबत माहिती ---

| पुस्तकाचे नाव | प्रकाशन दिनांक | पाने | किंमत रु. | सवलतीची किंमत ( पोस्टेजसह ) |
|---|---|---|---|---|
| १. आवर्तने | | | | |
| ( कविता-आशय-आकलन ) | २०२३ | २३२ | ४५० | ३४० |
| २. चार पुरुषार्थांची चार नाटके | १०-०८-२२ | २९८ | ६०० | ४५० |
| ३. वस्तू आणि इतर | | | | |
| सहा दीर्घांक | २०-१०-२३ | ३२१ | ४०० | ३०० |
| ४. पाच ॲब्सर्ड नाटके | २५-११-२३ | ३८५ | ५०० | ३७० |
| ५. खुल्लम खुल्ला | | | | |
| ( एकांकिका संग्रह ) | २०-१२-२३ | २६७ | ४०० | ३०० |
| ६. नाणेफेक आणि | | | | |
| इतर पाच नाटके | २५-०३-२४ | ३८४ | ४०० | ३०० |
| ७. ओळख परेड | | | | |
| ( एकांकिका संग्रह ) | ०७-०६-२४ | २८६ | ४०० | ३०० |
| ८. औट घटकेचे राज्य | ०२-०८-२४ | १९८ | ३०० | २२५ |
| ( कवितासंग्रह ) | | | | |

एकूण --- ३४५० २५८५

रु.२५८५ चा वरील आठ पुस्तकांचा पूर्ण संच विकत घेणाऱ्यास ' तंबाखूची टपरी ' हा जगातल्या ५८ कवींच्या काही कवितांच्या अनुसर्जनांचा कविता संग्रह मोफत मिळेल.

प्रत्येक सवलतीची किंमत पोस्टेजसह आहे.

पैसे पाठवण्यासाठी ---

Chandrakant Prabhakar Deshpande

HDFC BANK Saving Account No.03591000003204

IFSC : HDFC0000359

For G pay : Mahesh Deshpande mbl 9970065875 OR

UPI ID gathaent-3@okhdfcbank

Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा.

--- ००० ---

भूमिका ( गद्य कविता )

लोक म्हणायला लागले की म्हणे आता नुसताच धूर्तपणा नको, निश्चित भूमिका घ्या. आता हे टोकावर आले. ठीक आहे, म्हटले सांगावीच भूमिका. पत्रकार परिषदच घेतली. मागचे सोडा पण मराठ्यांना आरक्षण मिळावे असेच आमचे मत आहे. पण एक लक्षात घ्या, सगळे आपलेच आहेत – समाजासमाजात कटुता वाढायला नको. ते टाळायला हवे. यासाठी एक सर्वपक्षीय बैठक घ्यावी मुख्यमंत्र्यांनी. मराठ्यांचे जरांगे, ओबीसींचे भुजबळ यांनाही बोलवावे. शिवाय धनगर, मुसलमान यांचे प्रतिनिधीही येऊ द्यात. सगळ्यांनी मिळून ठरवले तर मार्ग निघेल. आमचे अर्थातच सहकार्य राहील. सगळ्यांना आरक्षण मागायचा अधिकार आहे. यातून तेढ न वाढता समंजसपणाने मार्ग निघावा. ५० टक्क्यांहून जास्त आरक्षण नसावे असे कोर्ट म्हणते पण ही ५० टक्क्यांची मर्यादा उठवण्याची आता वेळ आलेली आहे. हे काम केंद्राने करायला हवे. इतके दिवस खुला प्रवर्ग हा नियम होता आणि आरक्षण हा अपवाद होता. एका काळापर्यंत ते ठीक होते, पण आता काळ बदलला आहे. इथे आपण जमू, चर्चा करू, सर्वांचा मान राखू आणि कटुता टाळण्यासाठी समंजसपणाच्या मार्गाने जाऊ. ती ५० टक्क्यांची मर्यादा उठवण्याचे काम केंद्राने केले की सहज सुटतील हे प्रश्न. फार तर काय होईल, लगेच इथल्या इथे काही होऊ शकणार नाही या समंजसपणाला आपण येऊन पोचू. पण ते पोचणे सर्वांचे असेल, कुणा एकाच्या दडपणाचे नसेल. अर्थात, त्यानंतर आपण केंद्रावर दबाव टाकूच. वाटल्यास, त्यासाठी आंदोलनही करू. असे झाल्यास केंद्रही कदाचित कटुता टाळण्याचे कारण सांगून सर्वांना बोलवायचा मार्ग काढेल. असे झाले तर मग कटुतेचाही दबाव आपण घेणार नाही. काळाची पावले ओळखून भूमिका बदलाव्या लागतील, कायदेही बदलावे लागतील.

ते मोहम्मद युनूस पक्के धर्मनिरपेक्षतावादी आहेत. ते नक्कीच तिथली हिंदू-मुस्लिमांमधली कटुता कमी करतील. भारतानेही यासाठी बांगला देशाला सहकार्य करावे. समन्वयवादी आणि समावेशक दृष्टिकोण असला की समंजसपणाचे मार्ग निघू शकतात.

आता काही भूमिकावाले म्हणतात की ही भूमिकाच नव्हे. असले समावेशक, गुळगुळीत असणे म्हणजे भूमिका नव्हे. भूमिका ही कुणाचीतरी बाजू घेणारी आणि ती बाजू न पटणाऱ्यांच्या विरोधातलीच असायला हवी. समंजसपणा महत्त्वाचा की न्याय महत्त्वाचा, हाच खरा महत्त्वाचा प्रश्न आहे.
म्हणजे तेढ निर्माण करावी का ? आमच्यासारखे नेते कधीही त्या मार्गाने जात नाहीत, हे लक्षात घ्या. हल्ली काळच असा बिघडलाय की समंजसपणाला लोक धूर्तपणा म्हणायला लागले आहेत. आणि समंजसपणात का नसावा सर्वहिताचा धूर्तपणा ? आणि धूर्तपणाशिवाय कसे असेल राजकारण ?
तर ते सगळ्यांना बोलवायचे बघा तातडीने. जनसमुदायाच्या मागणीचे प्रश्न सुटायलाच हवेत !
--- ००० ---

"मन"चे पुढील प्रयोग गोरेगाव -केशव गोरे स्मारक सायं.६:००वाजता
२४ ऑगस्ट वाशी -विष्णुदास भावे रात्र ८: ३०वाजता
२५ ऑगस्ट नाशिक - कालिदास रंग मंदिर रात्र ९:३० वाजता

**मन**
आज शनिवार दिनांक १७ ऑगस्ट २०२४ रोजी संध्याकाळी ६ वाजता, केशव गोरे स्मारक ट्रस्ट, गोरेगाव, मुंबई इथे ! शक्य असेल त्यांनी जरूर बघा -- अद्वितीय मेहनतीशिवाय घडणे शक्य नाही, असा हा नाट्यप्रयोग आहे !
--- ० ---

Vijay Nikam
.
चंप्र देशपांडे हे महाराष्ट्रातले एक महत्वाचे नाटककार. पात्रांच्या मनाचा चक्रव्यूह भेदून त्याची व्यूहरचना प्रेक्षकांपर्यंत आत्म् निरिक्षणार्थ पोहोचवण्याची त्यांची शैली आकर्षक आहे यात शंका नाही.

"मन ' हा त्यांचा जुनाच दीर्घांक. आठवणींच्या रूपानं व्यक्तीच्या भावविश्वात लपवलेल्या अनेक जखमा आयुष्यभर नकळत सांभाळणाऱ्या सामान्य माणसाच्या मनातला उकिरडा उपसणे हे अवघड कार्य चंप्र नी नेहमीप्रमाणे प्रभावीपणे केलंय आणि वर वर विसंगत वाटणाऱ्या मनातली संगती शोधायचं, रंगकर्मी ना खुणावणारे गोड आव्हान, दिग्दर्शक अभिजित झुंजारराव आणि अभिनेते रमेश वाणी यांनी जिद्दीनं स्वीकारलंय आणि पार ही पाडलं आहे. खूप कौतुक! गोरेगाव येथील रसिक प्रेक्षकांनी त्यांना टाळ्यांनी गौरवलं तेंव्हा याचं सार्थक झालं. रवींद्र पाथरे, राजीव जोशी, संजय डहाळे, अभिनेते जगन्नाथ निवांगुने, सुहास शिरसाट, वर्षा दांदले, संभाजी सावंत अशा दिग्गजांनी हजेरी लावलेल्या प्रयोगाने सर्वांना आनंद दिला.

सामान्य असण्याचा न्यूनगंड आणि परिणाम म्हणून भूतकाळात झालेली भावनिक कुचंबणा व आत्मसन्मानाची गोची , कुंठित होऊन पोसणे हा अनेक सामान्यांचा वैचारिक दिनक्रम असतो. भावनांचे मूळ

तपासता न आल्यानं , इच्छा असूनही न थांबवता येणाऱ्या विचारांच्या लाटा नी असहाय झालेली एक व्यक्ती , हे चंप्रंचे प्रमुख आणि एकमेव पात्र. एकाच वेळी , समाजाला आणि स्वतःच्या मनाला ही घाबरत जगणे हे याचं भागधेय! आपण नेमकं स्वतःचं मत जपतोय की इतरांचे हे न कळून गोंधळलेले एकाकी ' मन '!!

भूतकाळातल्या वेदना बरोबरच भविष्यातल्या काल्पनिक भित्यांमुळे रक्तबंबाळ होऊन स्वतःपासून पळू पाहणारं पण त्यात अपयश येऊन वैफल्याने ग्रासलेले सशासारखे भित्रे मन,अस्थिर आणि चंचल नसेल तरच नवल!!स्वतःच्या मनाशी साम्य आढळल्यास योगायोग समजावा.

अशा उत्तम प्रयोगाच्या आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या मृणाल गोरे स्मारक मंचाच्या श्री. ठाकूर आणि इतर अधिकाऱ्यांचे आभार! प्रयोगशील नाटकांसाठी ही जागा उत्तम आहे. रंगकर्मींनी लाभ घ्यावा.

अभिजित झुंजारराव आणि रमेश वाणी यांना ( त्यांच्या संपूर्ण संचासह ) अनेक शुभेच्छा आणि उत्तम प्रयोगाबद्दल अभिनंदन! ' मन ! ❤

एखादा कलावंत काळाच्या पुढचा असतो, म्हणजे काय ? जीए, खानोलकर, नेमाडे हे तसे होते काय ? आता ते काळाच्या मागे पडले काय ?

मन

पुढील प्रयोग

शनिवार दिनांक २४ ऑगस्ट

दुपारी १:३० वाजता

मेहता कॉलेज ऑडीटोरियम, सेक्टर १९, ऐरोली

आणि

रविवार दिनांक २५ ऑगस्ट

रात्री ९:३० वाजता

कालिदास कला मंदिर, नाशिक

प्रयोगासाठी संपर्क ०९९६७०८५५०५

अभिनय, कल्याण

लौकरच हा कवितासंग्रह विक्रीसाठी उपलब्ध असेल. त्या वेळी सवलतीची किंमत वगैरे तपशील सांगण्यात येईल. ( यानंतर एकामागोमाग एक असे आणखी ७-८ कवितासंग्रह येतील. )

सध्या या संग्रहाचे ' मनोगत ' खाली देत आहे --

लिफाफे

मनोगत

एखाद्या कवीने एखादी कविता १७ व्या वर्षी लिहिली की ५७ व्या वर्षी हे महत्त्वाचे नसते. त्याचप्रमाणे कवितेतल्या अनुभवाचा कच्चा माल म्हणजे अनुभव हा ग्रामीण आहे की शहरी, सुशिक्षिताचा आहे की अल्प शिक्षिताचा, वेश्या वस्तीतला आहे की रेल्वे वसाहतीतला, विमानदलातला आहे की मर्चंट नेव्हीतला, भारतातला आहे की बांगला देशातला यालाही काही महत्त्व नसते. त्यावर कलेची श्रेष्ठता वा मूल्यात्मकता ठरत नाही. अनुभव कोणतेही आणि खूप वेगवेगळे असू शकतात. वास्तववादी असण्याचा पुरस्कार करत काही लोक, जमा झालेला अनुभव जसाच्या तसा व्यक्त करणे महत्त्वाचे – अशी बालिश धारणा बाळगण्याचा घोटाळा करत असतात. वंचितांबाबत सहानुभूती असणे म्हणजे ते लिहितील त्याला कलेतले माहात्म्य बहाल करणे नव्हे. अनुभव हे कलावंताचे जगण्याबाबतचे आकलन व्यक्त करण्याचे माध्यम असते, हे लक्षात घ्यायला हवे. अनुभव इतके टोकाचे भिन्न असू शकतात की एकाचा अनुभव दुसऱ्याला पोचणे अवघडही असते आणि ते अप्रस्तुतही ठरू शकते, अनुभव कोणताही असला, कसाही असला तरी वाचकाला वा प्रेक्षकाला तो ' कल्पनेने ' समजून घ्यायचा असतो, हे कलाव्यवहारातले महत्त्वाचे सूत्र विसरता येणार नाही.

तसाच एक बावळट समज अनुभवाच्या काळाबद्दलही असल्याचे दिसून येते. कलेतला अनुभव हा समकालीन असला पाहिजे, अशी ती मागणी असते. समकालाचा अनुभवही स्थलकालपरत्वे आणि व्यक्तिपरत्वे वेगवेगळा असतो. कलेतला काळ हा प्रामुख्याने मानसिक काळ असतो.फक्त घड्याळाच्या काळातली आणि एखाद्या तात्कालिक समस्येपुरती, अशी कला मर्यादित नसते. १९५० सालातल्या अनुभवविश्वावर एखादी कादंबरी आधारित आहे म्हणून ' आज ' ती जुनी वा अप्रस्तुत होत नाही. तिच्यातले सर्जकतेचे तत्त्व हे तिला कालातीतता बहाल करत असते. तसे नसेल तर कला म्हणजे नुसता त्या त्या काळाचा दस्तावेज असे होऊन बसते. विशेष म्हणजे ही बावळटपणाची धारणा बाळगणारे ' हुशार ' लोक आत्मविश्वासयुक्त दिसून येतात. साहित्य वा कला प्रकाशित करताना त्याची एक्सपायरी डेटही स्पष्ट करावी, असे म्हणण्यासारखे झाले हे ! जगातले कोणतेही मौल्यवान चित्रकार, लेखक, कवी या असल्या निर्बुद्ध तत्त्वाला बांधील नसतात.

अनुभव कसाही असो वा कोणत्याही काळातला असो त्याच्यातल्या तपशीलांशी वा त्याच्या देहाशी कल्पनेने जुळवून घेणे हे वाचकाकडून घडावेच लागते. अन्यथा ६०-७० वर्षांपूर्वी लिहिले गेले म्हणून ' वेटिंग फॉर गोदो ' हे नाटक आज जुने वा अप्रस्तुत ठरवावे लागेल. आशय हा अनुभवात नसून त्याच्या प्रवाही आकलनप्रक्रियेत असतो, हे पाहायला हवे.  असो.

इथे आणखी एक मुद्दा विचारात घ्यायला हवा. ' कलाकृतीने काही दिले पाहिजे ' हा तो मुद्दा. अमुक नाटक पाहिले पण हाताला काही लागले नाही, असे कुणी म्हणते, तेव्हा काय म्हणायचे असते ? कलाकृती बोधप्रद असायला हवी की माझ्या विचारांना /  मतांना सपोर्ट देणारी असायला हवी की दारूचे व्यसन सोडवणारी असायला हवी की मला अहिंसक करणारी असायला हवी ? की एकूणच एक जबाबदार नागरिक घडवणे हे कलेचे काम आहे ? की आपल्या धर्माची वा इतिहासाची अस्मिता जागवणे हे कलेचे काम आहे ? की ती सामाजिक-आर्थिक न्यायाची प्रस्थापना करण्याची एक वैचारिक दिशा सुचवणारी असायला हवी ? कविता वाचून काही हाताला लागले पाहिजे म्हणजे काय ? नीट पाहता असे दिसून येते की कलेकडून असणारी ही मागणी, आपला स्वभाव, आपले विचार, आपली मते,

आपल्या आवडीनिवडी, आपल्या नैतिकतेच्या कल्पना – या संदर्भात असते. चांगली कलाकृती हे असे सर्व साचे नाकारणारी असते, हे लक्षात घ्यायला हवे.

आता या संग्रहातल्या काही कवितांबद्दल. ‘ अजन्म ‘ ही दीर्घकविता मी १९६३ साली कॉलेजात जाण्यापूर्वी लिहिलेली होती. ती नंतर त्याच वर्षी ‘ अभिरुचि ‘ मासिकात प्रसिद्धही झाली. त्या कवितेबरोबरच आणखीही काही कविता लिहिलेल्या होत्या. कॉलेजात मराठीला आमचे प्रा. शंकर वैद्य सर होते. त्या कविता पाहून कॉलेजात त्यांनी माझा काव्यवाचनाचा कार्यक्रम ठरवला. माझ्या कवितांवर, मराठी एम ए च्या एका विद्यार्थिनीने अभ्यासपूर्वक बोलावे, असेही ठरलेले होते. त्या कार्यक्रमामुळे, आपण लिहितो आहे ते बरे असणार, हे मला कळले. त्यानंतर वैद्य सरांच्या घरीही माझे जाणे-येणे होत असे. एकदा डॉ. सरोजिनी वैद्य यांनी एका युवा कार्यक्रमात आकाशवाणीवर कविता वाचायचीही मला संधी दिली होती. माझ्या कविता वाचून पाहाव्यात असे सरांनीच मौजेत सुचवले होते. त्यातूनच पुढे, १९६३ मध्येच माझी ‘ झुंजुन गेल्या सरी ‘ ही कविता ‘ सत्यकथे ‘ त आली. ती माझी सत्यकथेत आलेली पहिली कविता. या कवितेने, काही वर्षांनंतर माझ्यावर चकित व्हायची वेळ आणली होती. काही निमित्ताने एकदा माझी प्रा. रवींद्र किंबहुने यांच्याशी ओळख झाली – त्या वेळी, सत्यकथेत आलेली माझी पहिली कविता हे सांगून त्यांनी ती कविता पाठ म्हणून दाखवली होती ! ६३ साली मी १७ वर्षांचा होतो आणि ‘ कदाचित डोळस ‘ ही दीर्घकाविता ‘ अभिरुचि ‘ त आली तेव्हा मी २१ वर्षांचा होतो. त्यामुळे, अर्थातच कोणत्याही प्रकारची कौतुकाची सवलत दिली जाऊ शकत नाही. कवितेची गुणवत्ता ही या बाह्य तपशीलांशिवायच पाहिली जायला हवी.

‘ ती ‘ या कवितेला एका स्पर्धेत पहिले पारितोषिक मिळाले होते. ‘ अनुवाद ‘ ही कविता महाराष्ट्र टाइम्सने, दोन रविवारी प्रकाशित झालेल्या, आधुनिक कवितांच्या त्यांच्या स्पेशल विभागात निवडली होती. पुढे काही दीर्घकवितांना सत्यकथेत स्थान मिळाले. दोनदा तर सत्यकथेचा पूर्ण कविता विभाग हा माझ्याच कवितांनी व्यापलेला होता.

सारांश, सुरुवातीपासूनच असा प्रोत्साहक स्वीकार मिळत गेला !

सुमारे १९७५ सालापर्यंतच्या माझ्या निवडक कविता या संग्रहात आहेत. आधीच निवडून ठेवलेल्या कवितांतूनही काही कविता वगळलेल्या आहेत. त्या सर्व कविता माझ्या, ‘ कोरी कविता ‘ आणि ‘ नि:शब्दक्रीडा ‘ या, माझ्या संकेतस्थळावरच्या संग्रहांत उपलब्ध आहेत.

दोनचार ओळींच्या कवितेसाठी आख्खे पान द्यायचे सौंदर्य मला फारसे पटत नसल्याने ‘ लघुकविता ‘ हा एक वेगळा प्रकार करून त्या तशा कविता एकत्र छापल्या आहेत.

वाचकांकडून या कविता खुल्या दिलाने वाचल्या जावोत, ही इच्छा व्यक्त करून थांबतो.

--- चं. प्र. देशपांडे.

--- ००० ---

आज ---

मन

शनिवार दिनांक २४ ऑगस्ट

दुपारी १:३० वाजता

मेहता कॉलेज ऑडीटोरियम, सेक्टर १९, ऐरोली

Kabir Jagtap

कोण म्हणतं #मन पाहता येत नाही ?

आज मी पाहिलं किंबहुना अनुभवलं❤.

खूप सुंदर दीर्घांक #मन आज ऐरोलीला बघितला. लेखक Champra Deshpande सरांचे तूफान लेखन , अभिजीत झुंजारराव सरांचे अप्रतिम दिग्दर्शन आणि Ramesh Wani सरांचा सर्वांना भारावून टाकणारा सहजसुंदर अणि तितकाच परिणामकारक अभिनय.प्रत्येकाने पहावा असा दीर्घांक कारण प्रत्येकाच्या मनाला स्पर्श करणारा अनुभव आहे हा !

खूप खूप धन्यवाद Abhijeet Zunjarrao सर या कलाकृतीसाठी❤.

मन

सुंदर प्रयोग, अभिनय आणि संवाद भन्नाट, सकाळपासून डोक्यात जे सगळं सुरू ते नीलकंठ दाखवत होता, शांत झाले पाहून. पडलेले प्रश्न नाट्यरूपात दिसले.

- रेश्मा ठोसर

मन

( दीर्घांक )

--- नाशिकच्या प्रयोगानंतर ---

अतिशय उत्तम प्रयोग. रमेश वाणी यांचा कमाल अभिनय व चंप्रंचे ताकदीचे व विचार प्रवृत्त करणारे लेखन यांनी अस्वस्थ तर केलेच पण हलवुन जागे केले. अधिकाधिक प्रयोग होवोत ही शुभेच्छा!

- रघुनाथ फडणीस, नाशिक

उगीच आपले माझ्या एका कवितेतल्या ओळी --

दुःखाने मेलो तरी बेहत्तर असे म्हणायची

सवयच लावतात सगळे आपापल्या मुलांना

आणि यावर बारमालक खुश असतात

उगीच आपले असेच माझ्या दुसऱ्या एका कवितेतल्या ओळी ---

रेल्वे प्रवासात रात्री सगळे झोपेत असताना

एकच दिवा चालू असतो

आणि प्रेयसीला ते माहीत असते

माझे लेखन फालतू आहे -- हा पाया मनात पक्का धरून वाचले तरी चालेल ---

1 Year Ago

See your memories

Shared with Public

एका चर्चेत, डॉ. सुधीर रसाळ यांच्या कॉमेंटवर मी दिलेला प्रतिसाद ---

" सर, मला जे दिसते ते असे -- मराठी भाषा, ती बोलणाऱ्यांच्या संख्येमुळे जगात 5 वी की 12 वी राहील, पण, साहित्यकला म्हणून ती नष्ट होत चाललेली आहे. लौकरच दार्शनिक तत्त्व असणारे साहित्य इथे कालबाह्य ठरणार आहे. याची खेदखंत कुठे फारशी दिसत नसल्याने ही प्रक्रिया वेगाने होईल असे वाटते. त्यामुळे, ज्याला जे समजते, महत्त्वाचे वाटते, ते त्याने करावे आणि आपण वाळवंटात मुतलो, असे समजून विसरून जावे, असा ' विकासकाल ' चालू आहे ! या परिस्थितीला प्रतिकार न करता आपले काम करत राहणे -- असे माझे चालूआहे. ( म्हणजे, तुम्ही काय स्वत:ला तारणहार समजता की काय, असे म्हणत काहीजण यावर उसळून येतील, हे मला माहीत आहे. ) सगळेच नष्ट होणार आहे, हेच खरे समाधान ! "

Sudheer Rasal

तुमचे हे म्हणणे मला मान्य आहे. Mi जी समीक्षा लिहिली तिला अनुकूल अथवा प्रतिकूल प्रतिसाद मिळाला नाही. आपण कोणासाठी लिहितो याचे उत्तर मिळत नाही. तरीही मी लिहितो. कारण मनात आलेले विचार गप्प बसू देत नाहीत.

एकूणच सर्वत्र थोडीफार विनोदबुद्धी शाबूत राहावी, या मानवतावादी इच्छेने ---

गंधमादन ( पूर्ण कविता )

एक महत्त्वाचे परीक्षण --- nAtyaraMg, lokasattA, ravIMdr pAthare.

प्रत्येकाचे वास्तव वेगळे का असे ना

पण वास्तववाद महान आणि फँटसी खोटी !

' अभिजात ' साहित्य आणि ' अभिजात ' भाषा यांतल्या ' अभिजात ' या शब्दाचा अर्थ एकच असतो का ? नसेल तर काय फरक असतो ? मराठीत अभिजात साहित्य निर्मिती होत असते का ? गेल्या काही काळातली उदाहरणे कोणती ? की अभिजात साहित्य निर्मितीचा काळ संपलेला असूनही भाषा अभिजात आहे ? मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे म्हणजे काय ? भाषेचा दर्जा हा मूल्यात्मक असतो की वर्णनात्मक ?

सध्या ' अभिजात ' या शब्दाची एक क्रेझ ( अभिजात मराठीत त्याला ' एक वेड ' म्हणू ) दिसत असल्याने हे प्रश्न पडतात !

पै बाई

आपले मित्र राजेंद्र मंत्री आणि मी आमची शाळा एकच – डी ए व्ही हायस्कूल, मालाड, मुंबई. आजच्या शिक्षकदिनानिमित्त आलेली त्यांची पोस्ट पाहून छान वाटले. त्यावरून त्या वेळच्या आमच्या मराठीच्या उत्तम शिक्षिका पै बाईंची आठवण निघाली. त्या मराठी फारच छान शिकवत. त्यांच्या बाबतीतला एक किस्सा सांगतो. दिवासातला शेवटचा तास चालू होता  आणि तो मराठीचा होता. पै बाई विंदा करंदीकरांची एक कविता शिकवत होत्या. छान चालले होते. त्या कवितेत एक ओळ अशी होती की ‘ घर अमुचे आकाश ‘ म्हणजे आकाश हेच आमचे घर आहे, वगैरे. इथे माझ्या डोक्यात काही वेगळेच चमकले ! मी म्हणालो, “ बाई, याचा अर्थ उलटाही होऊ शकतो – घर हेच आमचे आकाश -- असा ! “ यातला शाब्दिक शॉक बाईंना  खूपच पोचला ! त्या जबरदस्त हसायला लागल्या. टोल पडून वंदे मातरम सुरू झाले तरी त्यांना हसू आवरत नव्हते ! डोळ्यांतून पाणी येईपर्यंत त्या हसत होत्या !

माझ्या एखाद्या विनोदाला मिळालेली सर्वांत पहिली प्रचंड दाद म्हणजे तीच !

या निमित्ताने पै बाईंच्या स्मृतीला सादर अभिवादन !

--- ००० ---

' कवितेची भाषा ' या विषयावर मराठीत कोणकोणते लेखन उपलब्ध आहे ?

Patke is with Rajendra Chavan and

'कनक रंगवाचा'चा ऑगस्ट २०२४चा ताजा अंक काल मिळाला. या अंकासाठी बालरंगभूमी संदर्भातील 'बालनाट्य शिबिर अनुभव आणि अपेक्षा' हा स्वतंत्र विभाग डॉ. राजेंद्र चव्हाण यांनी संपादित केला आहे. या क्षेत्रातील अनेक नामवंत यात लिहिते झालेले आहेत. जरूर वाचावा.

तसेच ज्येष्ठ नाटककार, कवी चं. प्र. देशपांडे यांच्या एकांकिका व काही नाटके यांवर मी लिहिलेल्या 'समग्र भानाची शहाणीव देणारे नाटककार - चं. प्र. देशपांडे' या प्रदीर्घ लेखातील भाग १ देखील अंकात प्रकाशित झाला आहे. हा लेख एकंदरित तीन भागात प्रकाशित होणार असून पुढील दोन भाग येत्या अंकांमध्ये अनुक्रमे येतील. आपल्या प्रतिक्रिया मिळाल्या तर आनंद आहेच.

ट्रोल

माझ्या दृष्टीने, माझ्या सोयीसाठी मी ट्रोलची व्याख्या केलेली आहे, ती अशी -- दिलेल्या पोस्टचा विषय सोडून, पोस्टकर्त्यावर द्वेषमूलक अशा व्यक्तिगत कॉमेंट देतो तो ट्रोल.

मी स्वतः इथे फेसबुकवर माझ्या कोणत्याही राजकीय विचारांचे प्रदर्शन वा प्रचार करण्यासाठी वावरत नाही. परंतु, माझ्या पोस्टमुळे किंचित जरी शंका आली किंवा ते स्वमताच्या विरोधी वाटले तरी काही ट्रोल इथे त्यांचा धंदा सुरू करतात, असे अनेकदा दिसून येत आहे. मी सहसा कुणाला अनफ्रेंड वा ब्लॉक करत नाही. वस्तुतः माझी ५००० ची मर्यादा संपलेली आहे, तरीही, नवीन फ्रेंड घेता यावे म्हणून मी कुणाला उडवत नाही. परंतु, आता, यापुढे, माझ्या पोस्टवर कुणी, वरील व्याख्येप्रमाणे ट्रोलगिरी केली तर त्या व्यक्तीला कोणतीही पूर्वसूचना न देता रामराम करायचे मी ठरवलेले आहे. कारण त्या ट्रोलांच्या दृष्टीने माझी फ्रेंडशिप ही ' वाईट ' च असणार आहे.
असे करावे लागत आहे त्याबद्दल तशा ट्रोलांची आधीच माफी मागून ठेवतो.
धन्यवाद !
--- ००० ---

महत्त्वाची पोस्ट ---
Nisarg Deshmukh
.
.... माणसाला मान / प्रसिद्धी याचं एवढं obsession का आहे ? .... काहीही अर्थ नसलेल्या या गोष्टी साठी लोकांनी जीव पण दिले . कोणी झुरणी लागून मेले . का ?

याची कारणे माणसाच्या मनाशी आहेत , पण मन म्हणजे काय . जनावरांना पण असते का प्रसिध्दीचे एवढे वेड ?

... मनाचा मोठा सबंध behaviour pattern शी येतो . ..
आणि हा behaviour pattern बहुतेक मानव जातीचा सारखा आहे कारण त्यांची DNA ची संरचना सारखी आहे . Dna मधील साधर्म्य मुळे , सगळी माणसे प्रसिद्धी साठी येडी झालेली असतात .

.... Evolutionary adaptation असा काही तरी त्याला शब्द आहे . पण माणसांची गुणधर्मे ... म्हणजे केवळ मानसन्मानाची आवडच नव्हे तर इतरही ... उदाहरणार्थ आपल्या नेत्याला अंतिम मानणे , कोणाला तरी follow करणे ,
हे सगळे dna मध्ये झालेले Evolutionary adaptation
हे होमोसीपीयन्स संस्कृतीत झाले . त्यावेळी टोळीचा नेता , त्याचा आदेश प्रमाण मानला जात असे . म्हणून आजही लोक
' आदेश ' अंतिम मानतात . नेता, हुकूमशहा लोकांना प्रिय असतो , याचे कारण आपल्या DNA मध्ये झालेले Evolutionary adaptation . याच टोळी प्रमुखाची जागा नन्तर , ईश्वर कल्पनेने घेतली . आणि या मानव रुपी ईश्वराची
माणसे चक्क 'भक्ती ' करू लागले ते आजतागायत . ही भक्ती भावना देखील DNA मध्ये झालेले Evolutionary adaptation च , असे मी नाही , संशोधन सांगते . भक्ती म्हणजे ब्रम्हांड मन आणि मानवी मन यांना जोडणारा

पूल आहे की काय , असे मला अनेक दिवस वाटत होते . अजूनही वाटते .

मानव संस्कृती साधारण पावणे दोन लाख वर्षांपूर्वी उदयाला आली . आणि प्रचंड सामाजिक असणे त्या वेळची गरज होऊन बसली . समाजा शिवाय स्वतंत्र असे अस्तित्वच नव्हते .

माणूस समाजाला एवढं अनन्य साधारण महत्व का देतो हे गूढ वाटते . लोक काय म्हणतील ? हे एवढे महत्वाचे का ?  का प्रसिद्धी न मिळाल्या मुळे अनेक सिने नट नट्या खंगत गेले . खोल नैराश्यात गेले ... जीव पण दिला ..

याच कारण मानवी मन . पण म्हणजे काय ... तर  DNA .

दुसरा फॅक्टर यातला इगो आहे .  उगीचच वाटत की

हा इगो हा  universal consciousness चा भाग असणार कारण  ,मानवी अहंकार , नीट पाहता गूढ आहे . अहंकारी माणसाला आपण काहीतरी , वेगळेच आहोत .... व जणू माझ्या अहंकारातूनच हे ब्रम्हांड निर्माण झालं .

अधिक योग्य शब्दांत हे पोहचण्यासाठी , नाटककार एलकुंचवार यांचे हे वाक्य इथे कामाला येईल .

कैफियत मधील तो अहंकारी चित्रकार म्हणतो  ,

" मी महामानव . माझी किंकाळी विश्वात महासंगीत होऊन दिव्यास्त्रासारखी लखलखत फिरत राहील "  म्हणजे माणुस स्वतःला कुठेतरी ब्रम्हांडनायकच समजायला लागतो . आपल्याला असे का होते , असे भास का होतात त्याचे त्यालाही समजत नाही .

आता हे evolutionary adaptation आहे की universal consciousness  ??????

ब्रम्हांड निर्माण झालं तेव्हा पासूनच ते कॉन्शस व सृजनशील होते . बिग बँग नन्तर एक उष्ण धुके निर्माण झाले होते .

कालांतराने उष्णता कमी झाल्यावर इलेक्ट्रॉन्स , वगैरे सब ऑटोमिक पार्टीकल निर्माण झाले .  पुढे हायड्रोजन ऍटम... नन्तर हेलियम ... आणि त्या पुढील इतिहास सर्वश्रुत आहे . की कसे स्टार्स निर्माण झाले . आणि मग ही ऊर्जा जीवनात रूपांतरित होण्यासाठी केविलवाणी धडपड करू लागली . एक मास्टर प्लॅन आखला . अमिनो असिड्स व इतर घटकां पासून , सूक्ष्म जीवन

निर्माण झाले . किंवा निर्माण होते . होत असते . ही एक प्रोसिजर आहे .

.... जर जीवन हे ब्रम्हांडाचा आविष्कार आहे तर मानवाचा अजब इगो हा ... ईश्वरीय तर नव्हे ? इथे ईश्वर म्हणजे ब्रम्हांडा चा निर्माता अश्या अर्थाने नसून , ब्रम्हांड हाच ईश्वर ... ब्रम्हांडाचा मॅनेजर हा तिसरा कोणी नसून , खुद्द तो स्वतःच आहे .

त्याची अस्तित्वाची प्रचंड धडपड आणि गरज फार केविलवाणीच वाटते . येनकेन करून जीवन चालू ठेवा हा नियम काय माणसाने थोडीच बनवलाय . तो तर ' आदेश ' आहे .  सगळी बायोलॉजी त्या आदेशानुसार चालू राहिली .

म्हणजे एवढे सगळे प्राणी किडा मुंगी मधमाश्या जे जीवनाची जीवघेणी धडपड करतात ... ती धडपड खरेतर हे ब्रम्हांड जन्मापासूनच करत आले आहे .  ब्रम्हांड सृजनशील का राहते ? ते स्वस्त , स्तब्ध , मुर्दाड का नाही ?  या सृजनशील स्वभावा मागे अहंकार आहे की काय ? बर जे निर्माण होते ते केवळ आणि केवळ सुंदरच . इलेक्ट्रॉन सुंदर , अणू सुंदर . हे सगळे मानवी स्वभाव आणि ईश्वराचा स्वभाव या संदर्भात बघतोय .

काही प्रमाणात दूरदृष्टी होती प्रकृतीला म्हणून तर DNA नावाचे जैविक सॉफ्टवेअर आपोआप निर्माण झाले .

असे कुठलेही मन कार्यरत नाही विश्वात , जे काही चालले आहे ते , फिजिक्स च्या नियमांवर आणि अजून काही नियमांवर . असे म्हटले जाते . पण हे नियम म्हणजेच मन ना !! .... मन म्हणजे वेगळं काय आहे ? A system . आणि सिस्टीम चालू राहण्यासाठी

नियम आवश्यक असतात . आणि या सिस्टीम चा उद्देश

सुंदर , कलात्मक असे काही निर्माण करणे .म्हणूनच काही मानवी मने इशवरीय वाटतात . माणसाच्या कलाप्रेरणा , आणि सृजनशीलता , आणि अहंकार . हे कुठं तरी ईश्वरीय वाटतात .

ईश्वरीय म्हणजे तो universal consciousness चा भाग वाटतो .

बाकी God knows .

- निसर्ग देशमुख

आमचा ग्लॅमर वाला हीरो ! – ( ललित प्रभाकर )

मन

समीक्षा श्री. Rajeev Madhav Joshi

आभार महाराष्ट्र टाइम्स आणि श्री.राजीव जोशी

--- आणखी एक चोखंदळ, दिलखुलास अभिप्राय ---

अनेक आमरण उपोषणांनंतर

आता

सहावे बेमुदत उपोषण !

आज प्रकाशित झालेल्या दिनांक २१ सप्टेंबर २०२४ च्या साप्ताहिक ' मार्मिक ' मध्ये संजय डहाळे यांनी आमच्या ' मन ' या दीर्घांकावर सविस्तर परीक्षण लिहिले आहे. जरूर वाचा. संजय डहाळे आणि साप्ताहिक ' मार्मिक ' यांचे मन:पूर्वक आभार !

हे नाटक खूप छान पोचते आहे --

Rangabhoomi.com

बरेच हीरो लोक कपाळावरच काय डोळ्यांवर केस येतील, असे का राहात असतील ?

उत्तर --

अशा हीरोंच्या मानसिक भूमिकेचा शोध घेतला जावा अशी अपेक्षा होती. पण, ते काही तुम्ही केले नाहीत. आता, मी ते ट्राय करतो --- " अहो, मी एक बेफिकीर माणूस आहे. मी स्वत:चीही काळजी नाही करत. आता हे केस डोळ्यांवर आल्यामुळे मला काहीही बघायला त्रास होतो, ते मध्ये येतात – पण, आय डोन्ट केअर ! मी काळजीच नाही करत ! आता, व्हिलनशी मारामारी करताना नीट न दिसल्याने समजा माझा एखादा ठोसा चुकू शकतो, आहे काय त्यात, दूसरा मारता येईल ! मी निर्भय, बेफिकीर, न्यायाचा भोक्ता आणि न्यायासाठी कोणताही धोका पत्करू शकणारा, शूर आणि मी जिंकणारच असा आत्मविश्वास बाळगणारा आहे, हे लक्षात घ्या. मी काही नीट भांग पाडणारा एखादा किरकोळ माणूस नाही ! "

आज दिनांक २७-०९-२४ च्या पुणे मटा मध्ये राजीव जोशी यांनी लिहिलेले ' मन ' चे परीक्षण आलेले आहे.

काल दिनांक २८-०९-२४ रोजी पुरुषोत्तम करंडकच्या पुणे अंतिम फेरीचे पारितोषिक वितरण माझ्या हस्ते झाले. त्या वेळी मी केलेल्या भाषणाच्या बातम्या आज अनेक वर्तमानपत्रांत आलेल्या आहेत. त्या बातम्यांची शीर्षके ---

१. बुद्धिप्रामाण्यवादाचे स्तोम माजवले जात आहे..

--- महाराष्ट्र टाइम्स.

२. तात्कालिक समस्या मांडण्याचे दडपण.

--- सकाळ.

३. कलावंतांना वास्तवाचे बंधन आणि समकालाच्या बेड्या.

--- पुढारी.

४. कलावंतांना वास्तववादाचे बंधन आणि समकालीनत्वाच्या बेड्या

--- केसरी.

५. नाटक पाहायला या, अशी भीक मागावी लागतेय.

--- लोकमत.

६. कलेविषयी देणेघेणे राहिले नाही.

--- सामना.

भाषणात हे मुद्दे विशद केले होते. याचा लौकरच एक लेख तयार करणार आहे.

या निमित्ताने कॉलेज मुलामुलींशी संवाद साधता आला याचा आनंद वाटला.

वरील बातम्यांच्या लिंक्स मला सापडलेल्या नाहीत. कुणाला ते शक्य झाल्यास त्या लिंक्स इथे द्याव्यात ही विनंती.

--- ००० ---

Girish Patke is with Champra Deshpande.

.

नाट्यअभ्यासक, अनुवादक व अभिनेता समीर दळवी Sameer S. Dalvi यानं 'समग्र भानाची शहाणीव देणारे नाटककार-चं.प्र.देशपांडे' या मी लिहिलेल्या लेखावर मनापासून दिलेली प्रतिक्रिया...

मनापासून आभार समीर!

Sameer S. Dalvi

.

अनिरुद्ध पुनर्वाचू -

आपण एखादी गोष्ट, कविता, कादंबरी, नाटक आणि इतर बरंच काय काय वाचत असतो. एकदा वाचतो. त्यानंतर पुढचं वाचतो. पुढचं वाचतांना मागचं वाचलेलं विसरतो नाही म्हणता येणार. पण ते धुसर मात्र होतं. ही अगदी नैसर्गिक गोष्ट आहे. साधारणपणे, आपण कुठलेही साहित्य पाठांतर करायचं, या हेतुने वाचत नसतो. तेव्हा जर का आधी वाचलेला मजकुर या ना त्या निमित्ताने भविष्यात पुन्हा कधी वाचायला मिळाला तर तो आवर्जून वाचावा. किंबहुना, त्या मजकुराच्या लेखकाला जे म्हणायचे आहे, त्याचा पहिल्या वाचनात आपल्याला लागलेला संदर्भ आणि अर्थ पुन्हा एकदा तपासून पाहण्याची संधी त्या पुनर्वाचनाच्या निमित्ताने मिळते. असं करण्याचे जाणवलेले काही फायदे -

एक तर आधी वाचलेल्या मजकुराच्या आशयावर आपल्या मनात आणि मेंदुत जी धुळ साचून राहिलेली असते, ती झाडता येते आणि तो मजकुर नव्याने आपल्याला सामोरा येतो. पहिल्या वाचनात आपल्या मनाने जे संदर्भ आणि अर्थ साचवून ठेवलेले असतात, त्यांचे पापुद्रे उलगडून पाहण्याची शक्यता पुनर्वाचनाच्या निमित्ताने आपसुकच निर्माण होते.

काही मजकुर अर्थनिर्णयनाच्या बाबतीत बहुप्रसवा असतात. ते तसे आहेत, हे समजून येण्यासाठी पुनर्वाचनाची खूप मदत होते. इथे एक गोष्ट, जी आपसुक घडते, ती लक्षात घेण्याजोगी आहे. ती अशी की, पुनर्वाचन म्हणजे निव्वळ आधी वाचलेल्या मजकुराची उजळणी नसते. पुनर्वाचनाचा दिवस हा सर्वस्वी नवा दिवस असतो. नवा सूर्यप्रकाश असतो. नवी संध्याकाळ असते. नवी रात्र असते. नवा भोवताल असतो. पहिल्या वाचनाच्या खेपेस असलेले भोवतालचे चराचर आणि पुनर्वाचनाच्या खेपेचे चराचर यात आमुलाग्र नसला तरी बदल हा असतोच. एखाद्या मजकुराचा आपल्या मनातील अर्थ घट्ट होण्यात आपल्या भोवतालच्या चराचराचा अन्योन्य संबंध असतो, असं मला अनुभवातून वाटतं. पहिल्या वाचनात निसटून गेलेले अर्थ-अन्वयार्थ जे सहसा निसटून जातातच, त्यांच्या गाभ्यापर्यंत पोहचण्यात मजकुराचे पुनर्वाचन आणि त्यासमयीचे चराचर मोठी भूमिका बजावतात.

या न्यायाने, मला मी जे आजवर वाचले त्या सर्वच मजकुरांचे पुनर्वाचन करावेसे वाटते. ते करण्यासाठी लागणारी स्वस्थता लाभेल त्या दिवसांची मी वाट पाहतो आहे.

हे सगळं खरडण्याचं निमित्त झालं ते 'रंगवाचा'च्या ताज्या अंकात माझे मित्र गिरीश पत्केंनी लिहिलेला 'समग्र भानाची शहाणीव देणारे नाटककार - चं. प्र. देशपांडे' हा लेख. प्रदीर्घलेखाचा पहिला भाग या अंकात प्रकाशित झाला आहे. त्याचा दुसरा भाग पुढील अंकात येईल. हा लेख चंप्रंच्या 'मन' या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाच्या दिवशी गिरीशने मला अनौपचारिकपणे वाचायला दिला होता. त्यावेळेस प्रवासात येता जाता मी तो लेख वाचला होता आणि तो आवडल्याचे मी त्यांना कळवले होते. काही दिवसांपूर्वी जेव्हा 'रंगवाचा'चा अंक घरी आला तेव्हा पुन्हा एकदा मी

या लेखाचे अंकातले पुनर्वाचन केले. आणि जे जाणवले ते असे की, चंप्रंच्या नाटकांच्या  स्वभावाची ओळख गिरीशने अतिशय नेमक्या आणि नेटक्या शब्दांत, इंग्रजीमध्ये ज्याला आपण 'ॲप्ट' असे म्हणतो, करून दिली आहे ! चंप्रंच्या नाटकांचे आणि एकांकिकांचे कथाबीज विस्ताराने न सांगता त्यांचा थोडक्यात विषय व ठळक आशयसुत्रे सांगून त्यांच्या पुष्ठ्यर्थ त्या त्या नाटकातील आणि एकांकिकेतील काही संवाद उदाहरणार्थ देऊन शेवटी चंप्रंच्या नाट्यलेखनातली त्यांना जाणवलेली वैशिष्ट्ये, असा क्रम गिरीशने निवडला आहे. या क्रमाशी संबद्ध राहत त्यांनी लेखाचे आरेखन अशया पद्धतीने केले आहे जे वाचल्यानंतर, चंप्रंचे समग्रच नाट्यलेखन वाचण्याची इच्छा वाचकाच्या मनात उत्पन्न व्हावी.

वर उल्लेख केलेल्या मजकुराच्या अर्थनिर्णयाच्या बाबतीत बहुप्रसवा असण्याच्या गुणाचा अनुभव मला या लेखाच्या पुनर्वाचनाच्या निमित्ताने आला. या लेखात चंप्रंच्या 'एकत्र' या एकांकिकेचा उल्लेख आहे. त्यात अर्थनिर्णयाच्या अनुषंगाने गिरीश म्हणतात, 'कुटुंब, समाज या माणसांनी एकत्र राहण्यासाठी केलेल्या व्यवस्था आहेत. पण माणसं खरंच एकत्र असतात का ? की एकत्र असण्याचे सोंग करीत कायम एकेकटीच जगत असतात ? दैनंदिन रूटीनने जखडलेल्या विळख्यातील तोचतोचपणाच्या कंटाळ्यातून बाहेर पडण्यासाठी काही व्यक्ती देवपूजेत रमतात. तर काही व्यसनात मश्गुल होतात. आधुनिक काळात शारीरिक व्याधींबरोबरच मानसिक व्याधीही वाढल्या. जगण्याच्या व्यापात सातत्याने पडणा-या विविध प्रश्नांची उत्तरे शोधण्यात वेळ तर जातोच. शिवाय, मिळालेल्या उत्तरांनी प्रश्नांचे निराकरण होते की, तात्पुरता दिलासा मिळून प्रश्न दडपले जातात ? या एकांकितेतील शेवटचे वाक्य त्या दृष्टीने महत्त्वाचे आहे -

तोः म्हणजे च्यायला जगण्याच्या पद्धती दोनच दिसतात - एक म्हणजे प्रश्न पडू देत जगणं. आणि दुसरी म्हणजे प्रश्न दडपत जगणं. यातली चांगली कुठली ? पडला प्रश्न !! (एकदम वाद्यांचा झणत्कार....ओरडतो) नाही....नाही....मी येतोय तुमच्याबरोबर....आपण सगळे एकत्र....एकत्र....एकत्र जगू....(हसू लागतो. मोठमोठ्याने हसत राहतो. भ्रमिष्टासारखा. एकेक आवाज वाढत जातो. शेवटी खूप व्यक्तींचा हसण्याचा आवाज)

एकांकिकेतला वरील संवाद (मजकूर) पहिल्या खेपेला मी एका संध्याकाळी ट्रेनने प्रवास करत असताना भरगच्च असलेल्या डब्यात बसून वाचला होता. दुस-या खेपेला काल परवा मी तो सकाळच्या थोड्याश्या निवांत वेळेत वाचला. त्यावेळेस आमच्या घराशेजारी असलेल्या बागेत सकाळी योगासनं करायला जमलेली माणसं आपलं सेशन आटोपतं घेत होती. सेशन संपताना जोरजोरात हसण्याचा त्यांचा रोजचा शिरस्ता आहे. त्यांचे ते हसणे ऐकून मला या संवादाचा, गिरीशच्या या अर्थनिर्णयाचा आणखी एक पापुद्रा गवसला आणि मी मनातल्या मनात आनंदलो. अर्थनिर्णयाच्या संदर्भात वाचणा-यांच्या सभोवताली त्या त्या दिवशी असणारे चराचर महत्वाची भूमिका बजावते ते अशी !

ते अर्थनिर्णयन पुढच्या खेपेपर्यंत टिकून राहते. आणि पुनर्वाचनाच्या पुढच्या संधीची वाट पाहत नव्या पापुद्र्याची आशा धरून राहते.

पुनर्वाचनातून गवसलेल्या या आनंदनिधानासाठी पहिल्या खेपेला हा लेख वाचायला दिला, त्याबद्दल गिरीशचे मनःपूर्वक आभार !

समीर दळवी.

दि. २८.९.२०२४

माझ्या पुरुषोत्तम मधल्या भाषणाच्या त्रोटक पोस्टमुळे काही गैरसमज होत होते, ते पाहून, मी लौकरच, हे सर्व स्पष्ट करणारा लेख लिहीत आहे, असे म्हटले होते. तो हा लेख -- त्वरेने लिहून सादर करत आहे ---

पुरुषोत्तम करंडक २०२४ – पुणे केंद्रातल्या अंतिम फेरीचे पारितोषिक वितरण

( अध्यक्षीय भाषण )

--- चं. प्र. देशपांडे.

कै. राजाभाऊ नातूंचे जन्मशताब्दी वर्ष आहे. सुरुवातीला त्यांच्या स्मृतीला अभिवादन करतो. खानोलकर माझे मित्र होते,  त्यांच्या नाटकांच्या निमित्ताने मी एकदोनदा राजाभाऊंना भेटलो होतो. त्यामुळे, त्यांचे नाटक-प्रेम मी जवळून पाहिलेले आहे. महाराष्ट्रातला हा एक खूपच महत्त्वाचा सांस्कृतिक उपक्रम त्यांनी सुरू केला हे मोठे काम आहे. त्याचप्रमाणे ही धुरा वाहून पुढे नेत राहणाऱ्यांचेही महाराष्ट्रावर मोठे ऋण आहे.

महाराष्ट्रीय कलोपासकचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस, इतर सदस्य, कार्यकर्ते, कलाकार तसेच या स्पर्धेचे मान्यवर परीक्षक, उपस्थित सर्व मान्यवर आणि विद्यार्थी-विद्यार्थिनींनो, सर्वांना सप्रेम नमस्कार.

खूप मोठे भाषण करायचा माझा विचार नसला तरीही, माझ्यासारख्या, नाट्यक्षेत्रात ५०-६० वर्षे काम केलेल्या लेखकाला तुमच्यासारख्या ऊर्जायुक्त नव्या पिढीशी संवाद साधायची अशी संधी मिळते तेव्हा काही विचार वा मुद्दे मांडले जाणे अस्थायी ठरणार नाही. मराठी नाटकाची काय अवस्था आहे ? नवरा-बायको संबंधांतली काही विनोदी नाटके किंवा मग रहस्यमय नाटके. अशा नाटकांनी करमणूकही मिळते आणि जगण्यातल्या प्रश्नांना सामोरे जाणे टाळताही येते. आपण मराठी लोक सांस्कृतिक दृष्ट्या डल – मद्दड आहोत. काही विनोदी लेखकांनी आपल्याला सांगितलेले आहे की बाबा, दिवासभरचे व्यापताप आणि ताणतणाव यांनी तू थकलेला असतोस, नाटक बघायचे तर एखादे विनोदी नाटक बघ आणि एरवी घरी पोचल्यावर एखादी मालिका बघ, जेवण कर आणि झोप ! आणि हे मराठी समाजाला पटलेले आहे. जगात जणू फक्त यांनाच असतात ताण ! प्रायोगिक नाटकाला तर मुळातच प्रेक्षक कमी असतो. आता ते नाटक बदललेही असून एकूणच खर्चिकही झालेले आहे. प्रायोगिक नाटकाला स्वत: इंटरेस्ट घेऊन जाणारे काही असतील पण मुख्यत: भीक मागितल्याप्रमाणे त्यांना नाटक पाहायला बोलवावे लागत आहे. व्यक्तिगत विनंत्या कराव्या लागत आहेत. नाटक, साहित्य, कला ही जगणे समजून घेण्याची माध्यमे वा प्रक्रिया आहेत असे गंभीर महत्त्व मराठी माणूस या गोष्टींना देत नाही. हे एकूण स्वरूप जरा जास्तच बिघडलेले असले तरी गेली अनेक वर्षे आपले नाटक आणि साहित्य हे खुजेच राहिलेले आहे. असे का झाले असावे या बाबतीतल्या माझ्या चिंतनातले काही मुद्दे मी तुमच्यासमोर मांडणार आहे. माझे आकलन तुम्ही स्वीकारावे असे नाही पण हे मुद्दे तुमच्याही चिंतनात असायला हवेत असे मला वाटते. त्याशिवाय ही कोंडी फुटणार नाही.

' वास्तववाद ' या मराठीतल्या सिंहासनाधिष्ठित मुद्द्यापासून सुरुवात करू. काय असते वास्तव म्हणजे ? ती वस्तुनिष्ठ अशी काहीही गोष्ट नसते. प्रत्येकाचे व्यक्तिगत वास्तव वेगवेगळे असते. वेळोवेळी आणि वर्तमानात दिल्या जाणाऱ्या प्रतिक्रियांचा तो एक साठा असतो. ‘ बिढार ‘ मधल्या रत्नागिरीकर या पात्राकडे तो लेखक जसे पाहतो तसेच इतर कुणी पाहतील असे नसते. या अर्थाने एकच एक ‘ सत्य ‘ वास्तव असे मुळात अस्तित्वातच नसते. तरीही, मराठीत

याला ‘ अवास्तव ‘ महत्त्व आहे. स्वत:च्या प्रतिक्रिया या फार मौल्यवान आहेत असे समजणारे लेखक स्वत:चे वास्तव ‘ आहे तसे ‘ अभिव्यक्त करत राहतात. हुशारी असेल, विद्वत्ताही असेल पण त्यामुळे कुणाच्याही प्रतिक्रियांना तौलनिक महत्त्व येऊ शकत नाही. या अर्थाने, मुळात अस्तित्वातच नसलेल्या तथाकथित वास्तवावर आधारित ही प्रणाली वा मूल्यधारणा निरर्थक ठरते. एकजण म्हणाले की आता वास्तव इतक्या वेगात बदलत आहे की ते समजून घेऊन कलेत व्यक्त करेपर्यंत ते जुने होते आहे. मला ही समस्या खोटी दिसते. कोणतेही वास्तव जर ‘ सत्य ‘ असूच नाही शकत तर ते समजणे वगैरे निरर्थक ठरते. कोणत्याही लेखकाने त्याचे वास्तव अभिव्यक्त करणे हे दुसऱ्या कुणाच्याही जगण्यात कशासाठी मौल्यवान ठरेल ? प्रत्येकाचा वास्तवाचा दर्जा वा मूल्य कोण कसे ठरवणार ? सारांश, हे असले वास्तववादी साहित्य वा कला ही वाचकाला वा प्रेक्षकाला जमल्यास करमाणुकीपेक्षा काही देऊ शकत नाही. असल्या वास्तववादाचा पुरस्कर्ता लेखक हा इतर सर्व माणसांपासून तुटलेला असतो. मराठी साहित्य आणि कला वर्षानुवर्षे या असल्या बालिश कल्पनेला बांधलेली असणे हे तिच्या खुजे असण्याचे एक कारण आहे. अशा वास्तववादाला जखडलेला लेखक वा कलाकार इतर सर्वांबरोबर काही समजून घेण्याची वा आकलनाची प्रक्रिया घडवू शकत नाही. त्याच्याकडे जे आहे ते मांडणे एवढेच तो करत असतो.
यालाच जोडून आता ‘ समकालीनता ‘ ही कल्पना पाहू. घड्याळाचा काळ फक्त समकाल असू शकतो, बाकी प्रत्येक व्यक्तीचा समकाल वेगळा असतो. त्यामुळे ‘ समकालीन ‘ लेखन असा काही पदार्थ असू शकत नाही. ही फारशी महत्त्वाचीही बाब नाही, हे अनेक उदाहरणांवरून दाखवता येते. हॉपकिन्सच्या कविता त्याच्या मृत्यूनंतर अनेक वर्षांनी प्रकाशित झाल्या आणि त्या महत्त्वाच्या ठरल्या. काफ्काची ‘ट्रायल ‘ ही कादंबरीही त्याच्या मृत्यूनंतर काही वर्षांनी प्रकाशित झाली आणि ती कोणत्याही समकालात नव्हे तर सर्व काळात मानवजातीला महत्त्वाची वाटते. समकालीन या खोट्या तत्त्वाचे महत्त्व कोण माजवते ? तर तात्कालिक समस्यांवर किंवा सामाजिक, राजकीय समस्यांवर लेखकांनी भूमिका घेऊन स्वमतयुक्त लिहिले पाहिजे असा आग्रह धरणारे लोक. इथे एक पाहायला हवे की विभूतिपूजक, वा नायक-खलनायक टाईपचे लेखन हे फारसे महत्त्वाचे ठरत नाही. त्यातली पात्रे मग, छ. शिवाजी महाराज असोत की आंबेडकर की फुले की टिळक वा तसे कुणीही. कारण त्यात आधीच वैचारिक निष्कर्ष तयार असतात. जगण्यातला जिवंत प्रवाह नसतो. मानवी नात्यांतली गुंतागुंत, अटळता, त्यातल्या अनपेक्षित रचना यांचा आवाका घेणे हे तिथे घडत नाही. तशा एका भूमिकावाल्या नाटकाचे उदाहरण द्यायचे झाले तर ‘ उद्ध्वस्त धर्मशाळा ‘ चे देता येईल. ते भूमिकावाले नाटक आहे. विशिष्ट विचारसरणीच्या लोकांनी फुगवत नेलेला तो एक फुगा आहे. शिवाय मराठीत डॉ. लागूंनी आणि हिंदीत ओम पुरींनी काम केल्यामुळे त्याला एक ग्लॅमर प्राप्त झालेले आहे. सर्व मानवांना महत्त्वाचे ठरावे अशा सांस्कृतिक दृष्टीने ते नाटक नापास ठरते. जगातले अनेक कलावंत, लेखक, कलाकार, चित्रकार यांनी कलेतले व्यक्तिगत घटक टाकून त्या अवधानात कलाकृती निर्माण होतात असे म्हटले आहे. परंतु, आहे त्याच डबक्यात डुंबत राहू इच्छिणारे आत्मतुष्ट लोक हे फेटाळून लावतील, हे उघडच आहे. त्यांच्या दृष्टीने त्या थापा ठरत असल्याने आणि ते लौकिक ताकदवर असल्याने मराठीवर त्यांचा सतत प्रभाव पडत राहिलेला आहे. समकालीनतेच्या बाबतीत आणखी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. एखाद्या नाटकात फक्त लँड लाइन फोन आहे आणि मोबाइल नाहीत म्हणून ते नाटक जुने वा कालबाह्य ठरत नाही. कोणत्याही नाटकातल्या वास्तवाशी प्रेक्षकाने स्वत:ला जोडून घ्यायचे असते. ही तर कलेतली प्राथमिक अट आहे. नाटकात आकलनाची जिवंत प्रक्रिया नसेल

तरच ते कालबाह्य होते. ती प्रक्रिया असेल तर ते कधीच कालबाह्य होत नाही. यामुळेच नाटकातले वास्तव आपल्या काळाशी फारसे मॅच होत नसूनही जगातल्या मोठ्या कलाकृतींच्या आपण संपर्कात येतो.

यानंतरचा मुद्दा आहे ' अनुभव '. अनुभव म्हणजे प्रत्येकाचा स्मृतीसाठा आणि त्यातून होणाऱ्या क्रिया-प्रतिक्रिया. हा वास्तववादाचाच भाऊ. त्यामुळे, तेच स्पष्टीकरण पुन्हा इथे देत बसत नाही. एकमेकांचे अनुभव एकमेकांवर थोडेफार प्रभाव पाडू शकतील पण त्यात सांस्कृतिक म्हणावे असे काही असणार नाही. सांस्कृतिक म्हणजे जगण्याचे जंजाळ समजण्याची प्रक्रिया. ती निव्वळ अनुभव व्यक्त करण्यातून घडत नाही. असे असूनही, काही लोक, मराठीत तर बरेच लोक, अनुभव कोणता आहे यावरून कलेचा दर्जा ठरवतात. साहित्य संमेलनाचा अध्यक्ष राहून गेलेला एखादा विचारवंत जेव्हा, ' ग्रामीण साहित्याचे अभिजन साहित्याला आव्हान ' असे बावळट मारामारीचे विधान करतो तेव्हा तो कलेकडे कोणत्या दृष्टीने पाहतो ते कळून येते. धारावीतल्या जीवनाचा अनुभव वा वेश्या वस्तीतला अनुभव हा फ्लॅटमध्ये राहणाऱ्या वा रेल्वे कॉलनीतल्या अनुभवापेक्षा श्रेष्ठ असतो अशी काहींची धारणा असते. इथे दु:ख, दैन्य वा अन्याय यांबाबत संवेदनशील असण्याचा वा असंवेदनशील असण्याचा प्रश्न नाही. जगण्याकडे पाहण्याचा एक मतयुक्त, ' नैतिक ' साचा ठरवल्यामुळे अशी कला संकुचित ठरते – परिपक्वतेच्या, प्रगल्भतेच्या दिशेने जात नाही. इथे ती न्यूटनच्या मांजरांची गोष्ट आठवावी. मोठ्या मांजराला जायला मोठे भोक आणि छोट्यासाठी छोटे भोक ! ते हास्यास्पद ठरते कारण मोठ्या भोकातून ते छोटे पिल्लूही जाऊ शकते, हे लक्षात घेतलेले नसते. मतहीन पद्धतीने जगण्याचा अ-व्यक्तिगत आवाका घेत जाणारी कला न्याय, समता, सौहार्द यांचीच चाहती असते आणि हीच समज वाचकात निर्माण होण्याची संधी निर्माण करत असते हे भूमिकावाल्यांना आणि अनुभवांचे दर्जे मानणाऱ्यांना कळत नाही. अनुभव हे मूल्य नाही असू शकत. त्याला स्वायत्त महत्त्व नसते. तरीही, अभिव्यक्तीचे माध्यम तेच असते. त्याला जेव्हा अव्यक्तिगत आकलनाच्या प्रक्रियेची जोड असते तेव्हाच कला मौल्यवान होते. नुसताच अनुभव व्यक्त करणारी कला खुजी असते.

यानंतर असाच एक खोटा, भ्रामक मुद्दा घेऊ. तो आहे ' इथली माती ' हा अति-कडक मुद्दा. इथला प्रत्येक माणूस स्वत:चा स्मृतिसाठा, स्वभाव, प्रतिक्रियांच्या पद्धती यांमुळे इथल्या इतर सर्वांपासून स्वत:ला वेगळा पाडतच असतो. पण याला एक फसवे, गोंडस, गौरवास्पद रूप देण्यासाठी तो ही इथल्या मातीची कल्पना काढतो. त्यामुळे त्याला इथल्या अनेकजणांना त्याच्या टोळीत सामील करून घेता येते. खरे तर या कल्पनेत काहीच तथ्य नाही. जगभर माणसाचे मन एकाच प्रकारे वागते, त्याच्या सुखदु:खांच्या प्रक्रिया त्याच असतात. अमुक वास्तवाला वा अमुक काळाला महत्त्व देण्यासारखेच हे एक खोटे रचित असते. आता तर जग खूप जवळ आलेले असल्याने या कल्पनेतली हवा आपोआपच जाते आहे. डीन आर्निश इथे येऊन योग-प्राणायाम शिकून जातो आणि त्याचे प्रयोग करून ' रिव्हर्सल ऑफ हार्ट डिसीझ ' हे जागतिक महत्त्वाचे पुस्तक लिहितो. तिकडच्या कवीच्या कवितेत इकडचा शांतिमंत्र वा बुद्ध येतो, हे लक्षात घ्यायला हवे. आपल्याला वाटते की नथिंगनेस हा तिकडच्या मातीतला आहे, इथे तुकारामाच्या शंभर अभंगांत ' रिकामीक ' हा शब्द आहे. जगभर अनुभवाच्या रचना वेगवेगळ्या असल्या तरी आकलनाच्या शक्यता या अ-व्यक्तिगत, समावेशकच असतात, हे समजून घ्यायला हवे. त्यामुळेच तर जगातले साहित्य, नाटके यांची देवाण-घेवाण होऊ शकते. कलाविचार असो की प्रत्यक्ष कलेचे चलनवलन असो, देवाण-घेवाण

होत राहणे हे नुसतेच अटळ नसून हितावहही आहे. सर्व तऱ्हेच्या संकुचित कल्पना गोंजारत बसल्याने मराठीचे खूप नुकसान झालेले आहे.

आणि आता घेऊ या सगळ्या संकुचितपणाचा मूळ स्वामी – ' बुद्धिप्रामाण्यवाद '. शास्त्र, तंत्रज्ञान, अंधश्रद्धानिर्मूलन या क्षेत्रांत आहे याला स्थान पण मानवी जगण्यात – जो भाग मोजता येणार नाही इतका तुलनेने मोठा आहे – त्यात काय आहे बुद्धीचे कार्य ? संघर्ष आणि समस्या निर्माण करणे आणि त्या सोडवण्यात कुचकामी असणे ! मानवी जगण्यात बुद्धी ही एक अपयशी आणि हिंसक बाब आहे. मराठीत, काही हुशार लोकांनी बुद्धिप्रामाण्यवादाचे इतके स्तोम माजवलेले आहे की बुद्धीच्या वैगुण्यांकडे पूर्ण दुर्लक्ष व्हावे. घटस्फोटाच्या टोकावर आलेले पति-पत्नी पाहा. हिच्याकडे ढीगभर तपशील असतात आणि त्याच्याकडेही असतात ! काय निघणार यातून निराकरण ? तडजोड वेगळी आणि समस्यामुक्त होणे वेगळे, हे इथे लक्षात घ्यायला हवे. आजच मी पाहिले – नेतान्याहू म्हणत होते की आमचा पूर्ण विजय होईपर्यंत आम्ही थांबणार नाही ! ये है बुद्धीकी कर्तूत ! सर्व विनाश, युद्धे, छळ यांची शिल्पकार बुद्धीच असते, हे पाहायला हवे. इतर सर्व संकुचित कल्पना जोपासण्यासाठी बुद्धिप्रामाण्यवाद हे जणू काही एक मूल्य आहे अशा भ्रमात राहावे लागते. आपले लेखक, विचारवंत या बुद्धी-रोगाने ग्रस्त आहेत. कशी होणार इथे दर्जेदार, मौल्यवान कलानिर्मिती ? मराठी कलाक्षेत्र हे निष्कर्षातून सुरू होते आणि त्यातच संपते. ॲब्सर्डिटी वा मृषा हे तत्त्व जगात का आले या प्रश्नाचे इथे कुणाला देणे-घेणे नाही. ते सगळे इथल्या मातीतले नसून त्याचा काळ आता संपलेला आहे अशी आत्मतुष्ट निर्बुद्ध भूमिका घेऊन पडून राहावे हे इथले सुख आहे आणि कलेचे प्रगाढ ज्ञान आहे !

सारांश, वास्तववाद, समकालीनता, अनुभव, इथली माती आणि बुद्धिप्रामाण्यवाद – ही इथल्या कलेच्या खुजेपणाची प्रमुख कारणे आहेत. आता यावर, ही कारणे नसून अमुक दुसरी कारणे आहेत – या अंगाने तरी काही बोलावे लागेल किंवा कुठे आहे खुजेपणा ? मराठी कला मोठी आणि समावेशकच आहे – या अंगाने तरी. नुसतीच नकारघंटा वाजवण्याची हुशारी काही कामाची नाही.

--- ००० ---

नव्या समस्या ०२-१०-२४.

इतकी स्फोटके वापरूनही हा पूल एका फटक्यात पडला नाही -- याचा अर्थच हा विनाभ्रष्टाचार बांधलेला पूल होता, हे आता स्पष्ट झाले आहे ! हा पूल इतका पक्का बांधायची खरेच गरज होती का, यावर आता राजकारण सुरू झालेले आहे आणि सरकारने याची चौकशी करायचे ठरवलेले आहे. परंतु, आता, यातून एक वेगळीच समस्या समोर येत आहे. बहुतेक सर्वच अधिकारी निरनिराळ्या चौकश्यांच्या कामांत गुंतल्यामुळे मूळ रूटीन कामे करणार कोण, अशी ही समस्या आहे ! चौकशा कमी करायला कुणाचीच मान्यता नसल्याने नेहमीच्या कामांसाठी वेगळे, नवे अधिकारी नेमावेत अशी मागणी पुढे येत आहे ! जनतेच्या डोळ्यांत, पूल अर्धवट पडतानाची धूळ गेल्याने सध्या शहरात डोळ्यांच्या डॉक्टरांची चलती झालेली आहे. केंद्र सरकारने ताबडतोब इथे डोळ्यांच्या डॉक्टरांचे एक पथक पाठवणे अत्यावश्यक आहे, असे अनेक सामाजिक कार्यकर्ते म्हणत आहेत ! यातून आणखीही काही समस्या निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे !

--- ००० ---

‘ अवकाश कलामंच ‘ पुणे

ही नाट्यसंस्था आम्ही १९९६ साली स्थापन केली. सगळे शून्यातून सुरुवात करणारे होते. त्यांपैकी खालील पाच व्यक्ती कलाक्षेत्रात महत्त्वाची कामे करत आहेत ---

विद्यासागर अध्यापक

आनंद अलकुंटे

प्रशांत तपस्वी

गणेश सागडे

मधुराणी गोखले ( हिने त्या वेळी आमच्या निर्मितीत अभिनय नव्हता केला. नंतर माझ्या एका नाटकात तिने काम केले. )

--- या सर्वांबद्दल आम्हा अवकाशवाल्यांना विशेष आस्था वाटणे साहजिक आहे. विद्यासागरने दिग्दर्शित केलेला एक चित्रपट आंतर राष्ट्रीय महोत्सवांत गाजतो आहे, त्यामुळे हे सर्व मांडले. ‘ अवकाश ‘ चा एक संस्थापक सदस्य म्हणून मी या सर्वांचे खूप अभिनंदन करतो आणि त्यांना भरभरून शुभेच्छा देतो !

--- ००० ---

नेट बंद होते -- दुसरे काही काम नव्हते, मग वाटले, कविता लिहू --

तर या तीन कविता --

नेट बंद असल्याप्रमाणे
अँटिबायोटिक्सच्या गोळ्या
कोंबल्या मेंदूच्या पिशवीत
आणि घसा बिघडल्याप्रमाणे
शेळीच्या लेंड्यांचे भस्म
धारण केले कपाळावर
परतावा मिळतो
ही खात्री असणे
महत्त्वाचे होते
उगीचच कुणी कशाला
शिकत बसेल
निरनिराळ्या केशरचना
फावला वेळच नसण्याच्या
या काळात – सेक्ससाठीसुद्धा
एकत्र येता येत नाहीय
वाट बघत
बसावे लागतेय फास्ट ट्रेनची

गोळ्या, उदबत्त्या, पिना
आणि जगाचे नकाशे
विकणाऱ्यांकडून
कोणत्या अपेक्षा करणार
अतिरेक्यांचा बंदोबस्त करणे
हे आयुर्वेदाचे काम आहे
किंवा संमोहनविद्येचे
--- ००० ---
तुमच्या मनात हेतूंच्या सावल्या
नसल्या तरीही दुसऱ्यांच्या मनांत
त्या कशा पडाव्यात यावर
तुमचा ना ताबा ना क्रोध
माहीतच नसते तुम्हाला
कुठे कसे चाललेत
आरोह, अवरोह
बटण दाबल्याप्रमाणे
चालू, बंद होणारे वाटते
तुम्हाला जग
तुमच्या शब्दकोशांतून पडा
बाहेर आणि बघा अनावृत भासांचे
अमर्याद जग
अमुक झाले की तमुक होईल
हा विश्वास आहे तुमच्याकडे
म्हणून तुम्ही चाललाहात
पुढे पुढे स्वतःला न विसरता
आजारी पडलात तर आहे
अणुभट्टी हा विश्वास तुम्हाला
तरून नेतो सर्व जंतूंच्या
हिंसक स्पर्शांतून
तुम्हाला तरी कुठे आहे
शांत व्हायला वेळ
--- ००० ---

मतभेदांमुळे मला माझे अस्तित्व
दगडी, कणखर आणि निर्विवाद
वाटते – किक बसल्याप्रमाणे
माझी कपॅसिटी ओळखून आहेत
माझे मित्र आणि ढग
मी दगा नाही देत
रात्री-अपरात्रीही
माझ्या अंगात स्वप्ने असोत की
नरकाचे डेव्हलपमेंट प्लॅन्स
स्त्रियांना आवडण्याचा दोष तर
सोडाच, मी एखादे वेळापत्रकही
कधी नीट पाळत नाही
जरी मला
त्याच्या शिक्षाही भोगाव्या
लागतात आणि उचक्याही
जगणेच धोक्यात आणणाऱ्या
मी स्वीकारून चालतो निसर्ग
आणि ऑफीस आणि नाती आणि
माझ्या प्रगतीचे परदेशप्रवास
दुर्घटना वा अपघात मी
ना नाकारतो ना भयप्रद मानतो
माझे एक खुबीदार धोरण असते
निवडक व्यक्ती आणि वस्तूंना
मोठेपणा देणे

--- ००० ---

स्वप्न

आता मोठे स्वप्न पाहायला हरकत नाही. आता मराठी अभिजात आहे. एक उत्तुंग सुरुवात म्हणून मराठीत एक धुवांधार वाद्यमेळसमूह निर्माण करावा. मराठी तरुण-तरुणींत त्याचे वेड आणि नशा पसरावी. त्यांचा कार्यक्रम मुंबईतल्या एका स्टेडियमवर ठेवावा. ' कोल्ड प्ले ' प्रमाणे लक्षावधी लोकांनी त्याचे तिकीट मिळवायचा प्रयत्न करावा. मराठी लोकांनी त्याची तिकिटे १५-१५, २०-२० लाखांना ब्लॅक मध्ये खरेदी करावीत. मैदानात उभे राहून नाचत हजारो मराठीजनांनी त्या कार्यक्रमाची झिंग अनुभवावी !

या कार्यक्रमाला जे जाऊ शकणार नाहीत त्यांनी जुन्या ग्रंथांचे अनुवाद वगैरे कामे करावीत.

मराठी तरुणांना वाचनाचे महत्त्व पटवण्यासाठी कोल्ड प्ले चे कलाकार, अमिताभ बच्चन आणि रजनीकांत यांचा एक एकत्र कार्यक्रम ठेवावा. तिथे मराठी प्रकाशकांना मोफत स्टॉल्स टाकू द्यावेत.

आणखीही अशा काही कल्पना सुचत असतील तर इथे सांगून ठेवाव्यात.

जय मराठी !

--- ००० ---

तुझं शहर हजारो मैलांवर – कवितासंग्रह

--- सुनीता डागा.

ओस जाल्या दिशा मज भिंगुळवाणे ।

--- तुकाराम.

प्रिया अशी नाजुक की हाती येऊनही हात लावू नये

बोलावले तर येणार नाही म्हणून संकोचून गप्प बसावे

--- माझ्या ‘ गालिब ‘ कवितेतून

माझ्या इच्छेचा तेवढाच राहू दे छोटा भाग

ज्यामुळे तुला मी सगळीकडे अनुभवू शकेन

--- टागोर – अनुवाद माझा.

या अवस्था समजून घ्याव्यात. या संग्रहातल्या कविता या स्त्री-पुरुष अशा प्रेमकविता वा विरह कविता नाहीत. तसे तर या कवितांना ईश्वर वा मुक्ती वा भक्ती वा श्रद्धा अशा कोणत्याही माहितीतल्या अर्थांची गरज नाही. यांतला तो म्हणजे सरळ आपण, आपल्या अपूर्णतेच्या बाहेरचा पूर्णतेचा क्षण असे समजू शकतो. ही सरळ देह, मन आणि पूर्णता यांची कविता आहे.

अनुभव व्यक्त करणे वेगळे आणि अनुभवाकडे ‘ पाहणे ‘ व्यक्त करणे वेगळे. ही पाहणे व्यक्त करणारी कविता आहे. त्यामुळे अर्थातच ही तडक प्रतिक्रिया देणारी कविता नाही. ही निव्वळ सुखदु:खांची भावनिक कविता नाही. मराठी वाचकाला सतत हवेसे वाटणारे भावनिकतेचे स्पर्श इथे खूपच कमी आहेत. प्रतिमा, अलंकार यांची गर्दी नाही. गुंग करणारी वा मजा आणणारी सांगीतिक लय नाही. भावनेपेक्षा विचार हे या कवितेच्या अभिव्यक्तीचे माध्यम आहे. ही ‘ स्वत:ला ‘ व्यक्त करणारी कविता नसल्याने हीत एक तटस्थता आहे. ती तटस्थताच इथे प्रमुख आशय आहे. या, आधी ठरलेल्या आशयाच्या कविता नाहीत. अभिव्यक्तीच्या प्रवाहाबरोबरच आशय उलगडत जाण्याच्या या कविता आहेत. या अर्थाने अज्ञातात झेप घेणारी अशी ही कविता आहे. या नुसत्या वैचारिक कॅप्सूल्स नसल्याने ‘ वाचल्या – समजल्या ‘ असे इथे होऊ शकणार नाही. आपल्या आशयाशी एकनिष्ठ असलेली ही कविता मराठीतल्या सवयीच्या कवितेसारखी दाद आणि टाळ्या घेऊ शकेल, असे नाही. वाचकाने आपल्या अपेक्षा आणि अर्थ लावण्याचे अधाशी प्रयत्न बाजूला ठेवून ही कविता वाचायला हवी.

आता जरा प्रत्यक्ष कवितांकडे वळू. कुठल्या कवितेवर किती लिहिणार ? तरीही, थोडक्यात पाहू. सुरुवातीला या ओळी पाहा –

न सांगता
अवचित आपल्या जगात
निघून जाण्याच्या तुझ्या सवयीनं
अस्ताव्यस्त होत राहिलं जगणं
तुझ्या जगाचा विचार करत
हरवत गेलं
जगण्याचं प्रयोजन ( पान ९३ )

पूर्ण जगण्याचे प्रयोजन म्हणावे इतके महत्त्वाचे हे काही आहे. प्रत्यक्ष संवादाबाबत हे पहा –

तुझ्या वाक्यांच्या सरी
बरसत राहतात एकसारख्या
तेव्हा कळत नाही मला की
मी भिजतेय पूर्ण की
शोधतेय गोंधळून आडोसा
तुझं अखंड बोलणं
पर्यायाने माझं न बोलणंच असतं
हे लक्षात येत नाही तुझ्या ( पान ४२ )

‘ त्या दिवसांना ‘ ( पान १२६ ) सारखी एखादी कविता त्याने तिला उद्देशून व्यक्त केलेलीही येते . ‘ असणं नसणं ‘ ( पान ४७ ) ही कविता तर या अजब गूढ संबंधाचे सखोल चित्रणच आहे. त्या कवितेची ही सुरुवात पहा –

तुझ्या नसण्याला सावलीप्रमाणं
सोबत घेऊन चालते मी
तेव्हा कणाकणानं
विरून जात असतं
माझं असणंही
मात्र मिटू देत नाही मी
तुझं नसणं ...

या संग्रहातल्या खूप कविता आशय-समृद्ध आहेत. मराठीतला हा एक अद्वितीय कविता संग्रह आहे.

--- ००० ---

लौकरच येणारे माझे दोन कविता संग्रह --

१. खुल जा सिम सिम

आणि २. जमेल तेवढा तर्क

हा कवितासंग्रह. यातले हे एक स्फुट चिंतन --- ( खुल जा --- )

स्फुट चिंतन

ध्वनि-लय, वृत्तबद्धता वा छंदोबद्धता, अलंकारिकता, प्रतिमा-संपन्नता, त्याचप्रमाणे प्रतिक्रियाशीलता, सुखदु:खांचे वा मीलन-विरहाचे अनुभव यांची बहुलता, एकूणच भावनिकता -- ही साधारणत: परंपरागत कवितेची वैशिष्ट्ये मानली जातात. यांना छेद देणाऱ्या अनेक चळवळी जागतिक कवितेत झाल्या. मनोवैज्ञानिकता, अतिवास्तववाद, भंगलेली एकसंधता, अशा प्रकारच्या ज्ञानातून आणि जाणिवांतून जगात अनेक प्रकारची वेगळी कविता लिहिली गेली. न-कविताही लिहिली गेली. अलीकडे तर भाषा-कविता या प्रकारात कवितेचा अर्थ निर्मिण्यात वाचकाने सहभागी असावे, अशीही एक लाट आली. या गोष्टी, चला, आता नवीन काही करू या, असे म्हणून होत नसतात. जगणे समजून घेण्याची निमित्ते बदलत असतात, जगण्याचा माहोल बदलतो, त्यातून हे घडत असते. वेगळ्या कवितेचे एक वैशिष्ट्य म्हणजे -- Relied heavily on narrative prose over lyrical verses.— म्हणजे गीतात्म ओळींऐवजी निवेदनात्मक गद्यावर भर दिला. शिवाय गद्य कविता हा एक घाटच जन्माला आला ! हे तर मराठीत मुळीच सहन केले जाणार नाही. सरावातल्या, सवयीतल्या कवितेतच जमेल ती विविधता करावी, हीच इथे अपेक्षा असते. कवी म्हणून माझा कोणताही दावा नाही. इथल्या अपेक्षांचे ओझे न वागवता मी कविता लिहीत आलो आहे, एवढे मात्र म्हणतो.

--- चंप्र.

ट्रंप मोदींबद्दल -- " बाहेरून ते पित्यासमान भासतात, मात्र ते खूप चांगले आहेत. " -- पान १२, पुणे मटा, दिनांक -- १०-१०-२४.

Sunil Tambe

जमीन अर्थात शेती, निसर्ग आणि माणूस यांचं सेंद्रीय नातं म्हणजे गाव.

जल, जमीन आणि जंगल या भोवती गावातलं हेवादाव्यांचं राजकारण सुरु असतं.

जेवढ्या जाती तेवढं गावाचं राजकारण गुंतागुंतीचं असतं.

साहित्य व्यवहारात त्याचंच प्रतिबिंब असतं.

ग्रामीण, देशीवादी, दलित इत्यादी साहित्यातले गट गावातल्या राजकारणाचा विस्तार आहेत.

कंपूशाही हे गावाचं लक्षण आहे.

भाऊ पाध्ये, विजय तेंडुलकर, अरुण साधू, अरुण कोलटकर, श्याम मनोहर, नामदेव ढसाळ, मनोहर ओक, दिलीप पुरुषोत्तम चित्रे, चं. प्र. देशपांडे, इत्यादी शहरी वा नागरी साहित्यिक. यापैकी कोणत्याही गटात नव्हते. त्यांनी कोणते गट बांधले नाहीत की कंपू.

ते ना साठोत्तरी होते ना नव्वदोत्तरी. साठोत्तरी, नव्वदोत्तरी गट त्यांना आपल्यात सामावून घ्यावं यासाठी खटपटी, लटपटी करायचे.

त्यांनी कोणत्याही पुरस्कारांसाठी फिल्डिंग लावली नाही. ना आपले कंपू निर्माण केले. किंवा कोणता तरी सामाजिक आधार निर्माण केला. व्यक्तीमूल्य हीच त्यांची प्रेरणा होती.

खुल जा सिम सिम ( कविता संग्रह )

विक्रीसाठी उपलब्ध ---

पाने -- २८५, किंमत रु.४००/--

सवलतीची किंमत रु.३००/-- ( पोस्टेजसह )

पैसे पाठवण्यासाठी ---

Chandrakant Prabhakar Deshpande

HDFC BANK Saving Account No.03591000003204

IFSC : HDFC0000359

For G pay : Mahesh Deshpande mbl 9970065875 OR

UPI ID gathaent-3@okhdfcbank

Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा.

--- ००० ---

धर्म

धर्मांच्या ओळखीवर आधारित जगात कुठेही संघर्ष झाला तर जगात इतरत्र धर्मवादाला बढावा मिळण्यात त्याचा परिणाम होणारच. मुले, स्त्रिया, वृद्ध आणि साध्या नागरिकांच्या हत्या होताना पाहून कुणालाही कळवळा वाटणे साहजिकच आहे. सगळेच म्हणतात की मी युद्धाच्या विरोधात आहे पण सगळेच युद्धाला पोषक भूमीच तयार करत असतात. जसे, भ्रष्टाचार वाईट असे सगळेच म्हणतात आणि तरीही तो थांबत नाही. यात, काही बावळट लोक धर्म आणि धर्म या संकल्पनेशी असणारी समरूपता यांतला फरकच पाहात नाहीत. आणि जणू निष्पापपणे आणि उदात्तपणे गाणी म्हणतात की ‘ मजहब नही सिखाता आपसमे बैर रखना ‘, वगैरे ! हिंदुत्व या संकल्पनेखाली एकत्र येणारे लोक म्हणणारच की बघा ना, जगात काय चाललेय ते – आम्हाला आमची भूमी नको ? ती आम्ही शाबूत ठेवायला नको ? देश ही जशी एक भ्रामक संकल्पना माणसाने तयार केली तशीच धर्म हीही एक भ्रामक संकल्पनाच आहे. सगळ्यांचीच ! हिंदू धर्मात अमुक असे कुठेही सांगितलेले नाही किंवा कुठल्याच धर्मात हिंसा योग्य म्हटलेले नाही – असे मौल्यवान विचार इथे अप्रस्तुत असतात. जसे देश या नावाच्या समूहात असणे माणसाला सुरक्षित आणि आवश्यक वाटते तसेच धर्माचे आहे. धर्माशी बौद्धिक समरूप होणे आणि आचरणात धर्म असणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत, हे नीट पाहायला हवे. लोक विचारतात की बुद्ध होऊन गेला पण त्याचा मानवजातीला काय उपयोग झाला ? हाच प्रश्न प्रत्येक धर्माला लागू होणारा आहे. कारण ‘ अत्त दीप भव ‘ किंवा ‘ निर्वाण ‘ हे जगण्यात

नसले की मग त्या तत्त्वांशी फक्त बौद्धिक समरूपता शक्य असते. अमूकच धर्माच्या लोकांना अक्कल शिकवण्याचा हा प्रश्न नसतो. पूर्ण मानवजातीचाच हा प्रश्न असतो. या सगळ्या प्रकारात समरूपतेत सुरक्षितता वाटणे, जगणे सशक्त वाटणे हे सर्वांचेच चालू असते. याच मार्गाने मग समरूपतेच्या जात, भाषा, प्रांत, पंथ, विचारसरण्या अशाही जरा लहान लहान आवृत्या माणूस निर्माण करत राहतो आणि सर्वांचेच जगणे संघर्षमय करत राहतो, हे डोळे उघडू पाहायला हवे. कुठेच समरूप न होता माणूस जगू शकतो का, हा खरे तर यातला मूळ प्रश्न आहे, पण, तो महत्त्वाचा कुणालाच वाटत नाही. प्रत्येकाला वा प्रत्येक समूहाला हेच दाखवायचे आहे की मी किती सज्जन, बरोबर, नैतिक, उदार आणि उदात्त आणि बाकीचेच कसे जगणे घाण करत आहेत ! असे निवडक बुद्धीचे न्यायाधीश होणे सर्वांनाच कौतुकास्पद वाटते यात शंकाच नाही. कुठे ना कुठे समरूप होणारा माणूस निष्पाप आणि अहिंसक कसा असू शकेल ? आणि मग अमूकच समरूपतेला घातक, हिंसक म्हणण्याच्या पुरोगामीपणाचा उपयोग काय ? याला एकच प्रश्नात्मक उत्तर असते की मीच कसा काय धर्माचरण करू शकेन ? सगळे जग होऊ द्या आधी निष्पाप, अहिंसक, शांत – मग मीही तसे जगायला तयार आहे. आणि असे कदापि घडण्याची शक्यता दिसत नाही, हे सर्वांनाच समजते. मग ‘ मी आणि माझा समूह हितकारक आणि बाकीचे अहितकारक ‘ असा भ्रम स्वीकारून जगणे हेच अटळ बनते. त्यासाठी आपापल्या डोक्यांत निवडक तपशील जमवत राहणे आणि आपापली समरूपता पक्की करत राहणे, हे सगळेच करत राहतात. युद्धाने लोकांच्या जगण्याचा विध्वंस होतोच ना – नॉर्मल काय राहते ? तसेच खरे प्रश्न आर्थिक आहेत, महागाईचे, बेरोजगरीचे आहेत वगैरे उदात्ततेला शून्य किंमत राहील असे हे समरूपतेचे प्रश्न असतात.

या ना त्या प्रकारे स्वत:ला आयसोलेट करणे – अलग पाडणे, त्यातून येणारी वर्चस्वाची इच्छा, एकाकीपणा, वैफल्य, भीती – असे सगळे मनाचे प्रश्न वगळून आपल्याला सामाजिक, आर्थिक, राजकीय निराकरणे हवी आहेत. हे घडणे अशक्य आहे याकडे दुर्लक्ष करणे हा जर पुरोगामीपणा असेल तर आपण सगळेच आणि आख्खी मानवजातच पुरोगामी आहे, असे म्हणता येईल. धर्माच्या समरूपतेच्या प्रश्नांवर चर्चा करणे, एकमेकांना मूर्ख म्हणणे – हीच पद्धत लोकप्रिय आहे आणि राहील ! इलाज नाही !

--- ००० ---

आज दिनांक १६-१०-२४ च्या गप्पाटप्पा ---

गिरीश रांगणेकर, राहुल पुंगलिया, मी आणि गिरीश पतके.

सुमारे अडीच तास अनिर्बंध चर्चा, गप्पा, बातचीत आणि संवाद ---

Girish Patke is with रवीन्द्र दामोदर लाखे and

3 others

निमित्त होते "खुल जा सिम सिम" हा चंप्रंचा नवीन कवितासंग्रह.

७ ऑक्टोबर रोजी प्रकाशित झालेल्या या संग्रहात २६७ कविता आहेत. वेगळी कविता वाचण्याची, तिचा आस्वाद घेण्याची आवड असलेल्या वाचकांना या कविता जरूर आवडतील.

या भेटीत चंप्रंनी कवितासंग्रह आवर्जून भेट दिला. अर्थातच या आधी प्रकाशित झालेली पुस्तकेही त्याला अपवाद नाहीत.

मी माझ्या वकुबानुसार नाटककार व एकांकिकाकार चंप्रंवर लिहिलेही आहे. नाटके दिग्दर्शितही केली आहेत. कविता हा माझ्या आवडीचा साहित्यप्रकार असला तरी अभ्यासाचा आणि व्यासंगाचा नाही. त्यामुळे या संग्रहातील कवितांवर फार बोलण्यास मी योग्य नाही.

या निमित्ताने मराठीतील वेगळी आणि महत्त्वाची कविता लिहिणारे कवी, प्राध्यापक राहुल पुंगलिया आणि लेखक गिरीश रांगणेकर यांच्याबरोबर झालेल्या गप्पांमधून एकुणच दुपार छान साजरी झाली.

शेवटी या संग्रहातील एक कविता येथे देऊन त्या कवितेतच म्हटल्याप्रमाणे कवितेच्या अर्थावर व रूपावरही परंपरेचा ताबा न ठेवता, अर्थ-निरर्थकतेच्या अनाहत स्फोटक बिंदूंवर सवयीचे दुर्लक्ष न करता चंप्रंच्या या संग्रहावर व एकुणच कवितांवर कुणी जाणकार सविस्तर लिहितील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

कविता आणि कवी

नेहमी

कवीच देतो कवितेला शब्द

असेच असते कवितेचे अवतरणे

पण अचानक कधीतरी

लहर लागल्याप्रमाणे

कविता फक्त खूण करते कवीला

आणि स्वतःच देऊ लागते शब्द

कवी काहीसा चकित होत

कवितेचे हे प्रेम येऊ देतो

हे तर अधिकच अर्थपूर्ण

असे म्हणत

येणाऱ्या अर्थावर

मुळीच ताबा न ठेवता

अर्थ

आकार घेत राहतात

अंतिमतः ताबाहीनपणे

निरर्थकतेच्या बिंदूवर

स्फोट पावणारे

नेमके आणि नकळत

०००

Rahul Pungaliya

आज श्री चं प्र देशपांडे, दिग्दर्शक श्री गिरीश पतके, डॉक्टर गिरीश रांगणेकर यांना भेटलो चं प्र देशपांडे यांची कवितेची तीन नवी पुस्तके मिळाली. खूप गप्पा झाल्या. चं प्र नाटककार म्हणून प्रसिद्ध आहेतच. मला त्यांच्या कविताही खूप आवडतात. त्यांचा पहिला संग्रह कोऱ्या कविता मध्ये ग्रेट कविता आहेत. आता हे तीन संग्रह म्हणजे पर्वणीच!

कित्ता आणि अडकित्ता

टिळकांचा कित्ता गिरवण्या ऐवजी त्यांचा अडकित्ता घेणारेच जास्त, असे म्हटले जाते ! ( टिळक सुपारी कातरून खात असत. ) त्याचप्रमाणे मराठीतल्या अभिनयपटूंचे आहे. हिंदीतल्या नटनट्या बहुधा इंग्रजी माध्यमातून वा परदेशात शिकलेल्या असतात. त्यांचे बोलणे-राहणे-वागणे वगैरे सर्व अति-उच्चभ्रू असते. ते असतात बिचारे भारतीयच पण त्यांना बोलताना बऱ्याचदा हिंदी शब्द आठवतच नाहीत. मग ते सरळ इंग्रजी शब्द वापरतात. काही वेळी तर पूर्ण वाक्येही इंग्रजीतच बोलतात ! ते एक वेळ ठीक आहे, पण, मराठीतल्या कलाकारांनाही तोच आहे ' प्रॉब्लेम ' ? त्यातलेही बरेच, उगीचच आपल्याला मराठी शब्द आठवत नसल्याचा अभिनय करतात ( आणि फडतूस इंग्रजीत बोलतात ! ). तसेच आत्ताच एक पाहिले -- शनाया गेली होती घंटाळी देवीला. तिथे ती म्हणाली की घंटाळी ही एक ठाण्यातली सर्वात फेमस देवी आहे ! यावरून मला काय आठवावे -- पूर्वी ' जय संतोषी माँ ' नामक एक हिंदी सिनेमा येऊन गेला होता. फारसा भव्य, खर्चिक नसूनही त्याने त्या काळात उत्पन्नाचे विक्रम केले होते ! त्यामुळे, त्या सिनेमाचा गौरव करणारा एक लेख एका प्रतिष्ठित दैनिकात आला होता. त्याचे शीर्षक होते -- ' सुपरहिट संतोषी माता ' ! यावर काय बोलणार ?

रमेश वाणी हा अभिनेता काही विशेष सादर करतो आहे -- जरूर बघा ---

रवीन्द्र दामोदर लाखे is with Priya Deshpande and
10 others

आता
आता काहीतरी घडेल
अशा विचारात
गर्दीच्या लोकल्स सोडल्याप्रमाणे
व्यवहार सरकत राहतात
फारसे
घटना म्हणून महत्त्व नसलेले
आपले कपडे आपल्या अंगावर
अगदी योग्य फिटिंगचे नसले तरी

कोणाला फारसे खटकत नाहीत

तोवर तेही घटनाहीन खपून जातात

एखादी उत्तेजक हाक यायला हवी

एखाद्या हव्याशा स्त्रीची

वा अध्यात्मिकही चालेल

नाहीतर सारख्या

इतक्या घटना घडत राहाव्यात सरसकट

की एखाद्या वेगळ्या

घटनेची वाट पाहायला

वेळच उरू नये

म्हणजे जगणे सार्थकी लागेल

चंप्र देशपांडे

(खुल जा सिम सिम )

कवितासंग्रह : प्रकाशक चंप्र देशपांडे

स्टाईल नसलेली स्टायलिश कविता - प्रत्येक कवितेची स्वतंत्र स्टाईल - प्रत्येक कवितेला कल्पना नसते पुढे ती कुठली हालचाल करणार आहे. हे प्रतिक्षिप्त म्हणावं तर ते तसं रिपिट होत नाही. सवय झडून गेलेलं वय - कदाचित जाणीवेपासून नेणिवेपर्यंत - आता पहा या कवितेत कवितेच्या ध्यानीमनी नसतांना या ओळी येतात की

एखादी उत्तेजक हाक यायला हवी

एखाद्या हव्याशा स्त्रीची

वा अध्यात्मिकही चालेल

आता हा बघा शायराना अंदाज आहे - या अशा अंदाजाची दरी तुम्ही छलांग मारून ओलांडता पण तुम्हाला कळत नाही की ही दरी होती .

एखादी उत्तेजक हाक यायला हवी

एखाद्या हव्याशा स्त्रीची

या दोन ओळीनंतर दरी आहे आणि मग एकदम ओळ येते की ती हाक

वा अध्यात्मिकही चालेल.

मजा यायला हवी कवितेतून किंवा वाचकाला सजा व्हायला हवी कवितेतून.

पुढील संग्रहाचे काम करता करता ही एक सोपी कविता सापडली आहे बघा -- कदाचित नसेलही ती सोपी --

वाह चांदणे

वाह चांदणे

वाह पाऊस

असे त्याला कधी होत नसे
तसे तर चांदणे आणि पाऊस
अशा अपवादात्मक घटना सोडता
तो आकाशाकडे पाहातही नसे
एखादे फूल वा फुले पाहून सामान्यत:
स्त्रिया हरखून जातात हे पाहून
तो मनात म्हणे स्त्रियांचे मेंदू वेगळेच
चालत असणार नजाकत
हा प्रांतच त्यांचा असावा
लोक निसर्गसौंदर्य पाहण्यासाठी
शेकडो किलोमीटर प्रवास करत जातात
तो त्याला फालतू हावरटपणा वाटे
जरा एक बदल वेगळी हॉटेले
हे ठीक आहे असे तो म्हणे
इयाट काही न समजता अजिंठा
वेरूळ बदामी घारापुरी कोणार्क
पाहणाऱ्यांचेही त्याला हसू येई
सिंहगडावरचे पिठले-भाकरी
यांचा गौरव करणारे लोक पाहून
एवढे काय च्यायला कधी न खाल्ल्यासारखे
असे त्याला वाटे
मुद्दाम हिमालय वा ताजमहाल
पाहायला जावे असे त्याला
कधीच वाटत नसे
सौंदर्य इतिहास आणि संस्कृती
हे त्याला निरर्थक भ्रम वाटत
‘ मी ॲब्नॉर्मल तर नसेन ‘
या विचाराकडे पाहून तो हसे
--- ००० ---

मंगेश कुलकर्णी

प्रकाश बुद्धिसागर हा माझ्या नाटकांचा दिग्दर्शक आणि त्यामुळे मित्र. मंगेश हा प्रकाशचा मित्र, त्यामुळे, माझाही मित्र झाला होता. अनेकदा संध्याकाळच्या गप्पांसाठी आम्ही एकत्र असायचो. एकदा तर, प्रकाशच्या त्या ऐतिहासिक बाईकवर प्रकाश, मंगेश आणि मी असे ट्रिपल सीट दादर पासून मंगेशच्या चेंबूरच्या घरी गेलो होतो ! त्याच्या मराठीतल्या कामाबद्दल अनेकजण लिहितीलच, पण, तो ' यस बॉस ' या हिंदी चित्रपटाच्या तीन लेखकांपैकी एक होता, हे नमूद करावेसे वाटते. माझ्या आठवणीप्रमाणे, ' आवारा पागल दीवाना ' हे नाव मंगेशने सुचवल्याचे त्याने सांगितले होते. त्या चित्रपटाचा पटकथा लेखक म्हणून त्याच्या नावाचा उल्लेख आहे. एक छान, चांगला मित्र गेला ! मंगेशच्या स्मृतीस अभिवादन !

--- ००० ---

मन - चं. प्र. देशपांडे - अभिजीत झुंजारराव - रमेश माळी

आज दुसऱ्यांदा  हा प्रयोग पाहताना पहिल्यांदाइतकाच आवडला.

ठाणे आर्ट गिल्ड - 'टॅग'च्या प्रेक्षकांसोबत, त्यांचा प्रयोग सुरू असतानाचा आणि  त्यानंतरचा प्रतिसाद ऐकत - बघत छान वाटलं.

या दीर्घांकात उल्लेख झालेला 'डोक्याचा कारखाना' हा शब्दप्रयोग यावेळी अधिक पक्का झाला.

रमेश वाणी यांनी या प्रयोगाची जन्मकहाणी आणि सलग दीड तास तो सादर करण्याची तयारी, पाठांतर याविषयी सांगितलं. ते म्हणाले,

"पहिल्या वाचनात ही संहिता अतिशय अवघड वाटली. मात्र, ज्यावेळी स्वतःच्या मनाशी, त्यात निर्माण होणाऱ्या विचारप्रक्रियेशी जुळतेय हे लक्षात आलं, त्याचवेळी आपण हे सादरीकरण करायचं हा निर्णय पक्का झाला.

किमान हजार-पंधराशे वेळा मी ती वाचली. प्रवासात येता - जाता, सहकलाकार सोबत असतानादेखील मी मोठ्याने ते पाठांतर स्वतःशी बोलत राहिलो. त्यांना आधी माझ्या या बडबडीचा अर्थ कळत नसे."

प्रयोग संपल्यानंतर उदय सबनीस यांनी लेखक चं. प्र. देशपांडे यांच्याविषयी आदरयुक्त कौतुकोद्गार काढले आणि सर्व प्रेक्षकांनी टाळ्या वाजवून आपली सहमती दर्शविली

दिग्दर्शक अभिजीत झुंजारराव अभिनेते रमेश वाणी आणि निर्माते विजय चौगुले यांचीही एकमुखाने प्रशंसा करण्यात आली.

नाटक म्हणजे करमणूक असं वाटण्याचे दिवस केव्हाच मागे पडले आहेत . अन् त्यातही जेव्हा माणसाचं 'मन' हेच आपल्यापुढे एक पात्र म्हणून अवतरतं तेव्हा अभिनेता आणि प्रेक्षक हा भेदही सरतो.

आपल्या तथ्य आणि तथ्यहीन 'डोक्याच्या  कारखान्या'शी जणू गळाभेट घडते, अव्याहत सुरू असणारा धडधडाट शांत होतो...

पहिला प्रयोग बघितल्यानंतर लिहिलेल्या पोस्टची लिंक इथे दिली आहे ---

https://www.facebook.com/share/p/J9X1DJwAawdzUbaB/

चित्रा राजेंद्र जोशी - २०.१०.२४

जे. कृष्णमूर्ती

जे. कृष्णमूर्ती स्वत:कडे कोणतेही ग्लॅमर घेत नाहीत आणि जर कुणी असे ग्लॅमर मिरवत असेल तर त्याला जुमानू नका असे सांगतात. माणसाच्या जगण्यात येणारे प्रश्न आणि समस्या यांवर आयुष्यभर ते बोलत राहिले, अनेकांशी चर्चा करत राहिले. जगातले अनेक तत्त्वज्ञ, मानसशास्त्रज्ञ, वैज्ञानिक, कलावंत त्यांत सामील होत राहिले. माणसाला त्याच्या दु:खातून बाहेर पडता येईल का, हा प्रश्न हजारो वर्षे अनेक धर्मांनी हाताळलेला होता. त्याचे धार्मिक अस्मितेचे आणि ओळखीचे स्वरूप घालवून कृष्णमूर्तींनी हे मैत्रीपूर्ण चर्चेच्या स्तरावर आणले. गुरुबाजी नाकारली. कोणतीही तथाकथित धार्मिक परिभाषा वा कर्मकांडांची अवडंबरे नाकारली. पुस्तकी ज्ञान कचऱ्यात टाकायला सांगितले. तू स्वत: तुझ्या प्रश्नांना सामोरे जाणे हा एकच मार्ग, असे त्यांनी सांगितले. यात कोणत्याही तडजोडी नाकारल्या. मानवजातीत हे काही क्रांतिकारक घडत होते. पण क्रांती बाहेर कुठे नाही तर स्वत:तच घडावी लागेल, हे त्यांनी सांगितले. सर्व समस्यांबाबत टप्प्याटप्प्याने, अगदी वैज्ञानिक पद्धतीने त्यांनी विवरण केले. " कशासाठी येता ४०-४० वर्षे माझे बोलणे ऐकायला -- ही काही धार्मिक करमणूक नव्हे ", असे ते म्हणत. ' वर्तमानात जगा ' आणि ' आत्ता नाही तर कधीच नाही ' असे ते म्हणत. जग असे संघर्षमय, हिंसक का होत चाललेले आहे, यावर ते अत्यंत गंभीरपणे बोलत.

यात खरे तर कुणाला काही प्रॉब्लेम असायचे कारणच नव्हते. पण धार्मिक खोटेपणा आणि पुस्तकी साम्राज्ये उभी करणारे यांची सिंहासने यामुळे आपोआप डळमळीत होत होती. त्याची त्यांना भीतीही वाटत होती. तसले अनेक लोक कृष्णमूर्तींबाबत अत्यंत संतापून बोलत. अजूनही बोलतात. एक तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक तर ' हा भडवा काय सांगतो -- हे सगळे गीतेत सांगितलेले आहे ' अशा प्रकारे संतापताना मी पाहिलेले आहेत. प्रत्यक्ष स्वत: कोणत्याही समस्येला तोंड न देता ज्यांना शाब्दिक अधिकारपदे टिकवायची असत ते सगळे कृष्णमूर्तींच्या बाबतीत शत्रू होत. मला स्वत:ला अगदी बालपणापासून जगण्याबाबत गंभीर समस्या भेडसावत आलेल्या असल्याने मला त्या समजून घेण्याच्या प्रक्रियेत कृष्णमूर्तींची खूप मदत झाली. कोणतीही व्रतवैकल्ये, पूजा-अर्चा, दिवे लावणे, जयंत्या-पुण्यतिथ्या असले काहीही मला नको होते. आणि असे माझ्यासारखे जगात खूप लोक होते. ते आस्थेने कृष्णमूर्तींचे ऐकत-वाचत असत.

ज्यांना हे नाही आवडत त्यांनी आपापल्या गल्ल्या, राजधान्या संभाळत बसाव्यात ना. कृष्णमूर्तींना शिव्या देण्याचे, त्यांच्यावर इतके चिडण्याचे काय कारण, असे मला वाटे. कृष्णमूर्ती त्यांच्या श्रोत्यांनाही अनेकदा म्हणत की मी तुमच्यावर अवलंबून नाही, तुम्हीही माझ्यावर अवलंबून राहू नका. आहे तसे सुखासीन जगत राहू इच्छिणाऱ्यांना असा माणूस धोक्याचा वाटू शकतो, हे कळून आले.

अजूनही ज्यांना परंपरेतच फिट राहायचे आहे ते तसे राहातातच. ज्यांना नको आहे कोणतेही अवडंबर ते कृष्णमूर्ती ऐकतात-वाचतातच.

--- ००० ---

काल दि. १९-१०-२४ च्या ठाण्यातल्या प्रयोगाबद्दलचा अभिप्राय --- ( मन )

एक अप्रतिम कलाकृती आज बघण्याचा योग आला...अजुनही त्याच विश्वात आहे....भरपूर काही विचार आहेत मन मोकळे करण्याचे, पण शब्द सापडत नाहीत, कसं मांडायचे.

टैगचे मनःपूर्वक धन्यवाद!

अरुण होशींग

हा आणखी एक महत्त्वाचा अभिप्राय ---

मनातलं काही......

प्रायोगिक नाटकं ही करमणुकीसाठी नसतात. अभ्यासातून कळलेलं काही मांडून, करून पाहण्याचा तो प्रामाणिक प्रयत्न असतो..... आणि हेच त्याचं व्यावसायिक नाटकांपेक्षा वेगळेपण.

रंगभूमीच्या आकलनानंतर तिच्यातील शक्यता आजमावून बघणं, पडताळून पाहणं आणि आजमावून घेणं ..... म्हणजे प्रायोगिक नाटक!

प्रायोगिक नाटक हे एक स्वयंअध्ययन आहे. स्वत:च शिकवणे,स्वत:च शिकणे. रंगभूमीची प्रयोगशाळाच!!

करत, चुकत, सावरत,बदलत.... करून पहाणे. नवी नवी आव्हानं स्वीकारणे आणि निभावणे.

सघन आणि सखोल लेखन करणाऱ्या नाटककारांनी अ-सोप्पं असं काही लिहिणं हे सुद्धा रंगपटावर टाकलेले फासे आहेत. त्या फाशांवरून तुम्हाला पुढली खेळी खेळावी लागते. म्हणुनच प्रयोगाला नाटकाचा ‘खेळ‘ म्हणत असावे. असे लेखकाने टाकलेले फासे चतुराईने वापरून त्यावर मल्लिनाथी करून आपल्या वकुबाचा, अनुभवाचा आणि प्रयोगशीलतेचा हुकमी वापर करत अभिजित झुंजारराव सारखा

धाडसी दिग्दर्शक खेळ रचत जातो. मनस्वी आहे अभिजीत .... आणि हेच त्याचं सच्चेपणा त्याला विशेष आणि वेगळं ठरवतं....

ह्या प्रक्रीयेतला त्याचा स्वसंवाद विलक्षण आहे.... तीच एक प्रायोगिक नाटकांची संहिता ठरू शकते.

मन‘

एकल दीर्घांक करणे हे लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेत्यासाठी प्रचंड आव्हानात्मक आहे. चं प्र देशपांडे यांनी रचलेली संहिता बाकी दोघांनी परिश्रमपूर्वक पेलली आहे पण सादरीकरणात सहजता राखली आहे. नेपथ्य, प्रकाश आणि संगीत वैचारिक खाद्य ठरलं आहे. सगळं समजून घेताना आपलाही मन संवाद समांतर पातळीवर चालू ठेवते हे नाटक. प्रेक्षागृहातला अंधार आणि शांतता पूरक वातावरण निर्माण करतात. ध्यान करताना प्राथमिक अवस्थेत निर्विचार होण्यापेक्षा विचारा सोबत मनाला प्रवाही राहू द्यावे , असे शास्त्र सांगते. हीच प्राथमिक ध्यानावस्था काल अनुभवली.

अशी ध्यानमग्न करणारी नाटके आवडली की नाही ह्याचा विचार करण्यापेक्षा ही अवस्था साधता आली ह्यात समाधान मानावे, असे वाटते.

संपूर्ण गटाचे अभिनंदन आणि मनापासून धन्यवाद !

हर्षदा संजय बोरकर

लेखक चं. प्र. देशपांडे लिखित " मन " या दीर्घांकांच्या प्रयोगाला जाताना मनात एक अपेक्षा होती. चं. प्र. यांच्या लिहिण्यात एकातून एक निघणाऱ्या इतक्या Complexities असतात, त्यात दीर्घांकांचा विषय मन! विश्वात मनाइतकी अन्य कुठलीही वस्तू एकाच वेळी अतिशय अ-तर्क्य , असंबद्ध, खुनशी आणि त्याचवेळी अगदी प्रेमळ, काळजीवाहू वगैरे असू शकत नाही.

या दीर्घांकात नीलकंठ या पापभिरू माणसाच्या मनात नोकरीतल्या

अशाश्वतीची एक टांगती तलवार आहे. ती अशाश्वती खरी आहे का, की ती खोटी आहे, हा प्रश्न इथे नाहीच . त्याच्या मनात ती भीती खोल रुजलेली आहे हेच तेवढे खरे आहे. त्यातून मग तुफान वेगाने त्याच्या मनात विचार येत राहतात. त्याच्या भावनांचा लंबक अस्थिर होतो. त्याची देहबोली बदलत जाते.

भूतकाळात झालेल्या प्रेमातल्या प्रतारणेची एक दुखरी ठसठस त्याच्या मनात कायम वस्तीला आहे. बायकोला सांभाळून घेताना, मुलीची काळजी घेताना ती जरा पुसट होते इतकेच. पण ती दुखरी नस कुरवाळणे, प्रतिस्पर्ध्याच्या पोटात सुरा भोसकून भोसकून त्याला ठार मारल्याचे इमॅजिन करणे हा त्याच्या आवडीचा, खोट्या समाधानाचा एक खेळ आहे. खपली धरली की माणसे खपलीवर बोटे फिरवून ती थोडी थोडी दुखवतात, त्याचाच एक आनंद घेतात.... तसे हे.

मनात येणारे असंख्य विचार मनातच वागवत असंख्य माणसे यांत्रिक रुटीन वर्षानुवर्षे पाळत असतात. चेहऱ्यावरची रेषही हलू न देता. म्हणून नीलकंठ जे जे बोलतो, जे जे भाष्य भोवतालच्या घटनांबाबत करतो, ते ते.... प्रत्येकास कुठेनाकुठे, "अरे हा तर मीच आहे की " या पातळीवर एकरूप करते.

हा दीर्घांक म्हणजे अभिनेत्याच्या शारीरिक कसोटीची परीक्षा आहे. मानेच्या लहानश्या हालचालीपासून, हातवारे, हसणे, घाबरण्याचे वेगळे वेगळे पदर दाखवणे हे सगळे खूप थकवणारे असेल. अभिनेता रमेश वाणी याबद्दल चांगले सांगू शकतील. सत्तर मिनिटे स्वतःशी उलटसुलट गुंतागुंतीचे बोलत राहणे, हे बुद्धीला आणि स्वतःच्या मनाला दमविणारे नाही का? दीर्घांक चोख पाठ झाला आहे .... उत्तम स्मरणशक्ती आणि सराव आणि आवड यामुळे.... असे जरी घटकाभर गृहीत धरले, तरीही up and down भावनांचा हा रोलर कोस्टर जी दमणूक करतो ती वेगळ्या लेव्हलची असणार.

ती कसे हॅन्डल केलीय, हे अभिजित झुंजारराव आणि रमेश वाणी हे दोघे सांगू शकतील.

रंगमंचावरचे नेपथ्य असलेले दोरखंड आवडले. कारण कधी ते रोजच्या जगण्यातली तारेवरची कसरत झालेत तर कधी मंचावर आडव्या पडलेल्या दोराच्या अल्याडचा नीलकंठ एका क्षणी वेगळा आणि पल्याड गेला की क्षणात वेगळा झालाय .

मंचाच्या मागच्या दोरखंडावर आकडे टांगलेले आहेत. घड्याळाच्या/ काळाच्या अधीन झालेल्या नीलकंठच्या (म्हणजे खरेतर आपल्या) वागण्याचे सूचन करणारे आकडे. मला ते जगण्यातले प्रश्न वाटले. एका ठिकाणी चं. प्र. प्रश्नांच्या प्रायोरिटीज बद्दल भाष्य करतात. ते प्रश्न म्हणजे हे आकडे. आज आयुष्यात हजारो टांगलेले प्रश्न आहेत....असतात , त्यांना एकत्र भिडता येणे कधीच शक्य नसते. आत्ता ३२ नंबरचा प्रश्न जीवन मरणाचाय म्हटले तर अचानक सत्राव्वा किंवा दोनशेबहात्तराव्वा प्रश्न समोर येऊन दोरखंडाने गळा आवळतो, असे घडते बरेचदा...या दृष्टीने मी ते आकडे पाहिले.

फोनचे एक मॉडेल बदलून, मंचावर काहीच क्षण अंधार करत काळाचा केलेला बदल पाहून मी थक्क झाले आणि खूष झाले आणि

" कमालच आहे " अशी दाद मनापासून आली.

पंधरावीस वर्षांपूर्वी लिहिलेल्या या दीर्घांकातून मनात निर्माण होणाऱ्या भीतीच्या,

असुरक्षिततेच्या भावनेला युनियनचे तत्कालीन जुने संदर्भ आहेत. पण संदर्भ काहीही असोत, भीतीची भावना आदिम आहे. तितकीच जानलेवा आहे. माणसाला ती नाचवते, त्याचे माकड करते, त्याला भलेबुरे वागायला लावते, हे असेच असणार आहे कायम. असुरक्षित वाटले की पुरुषांना आईची आणि स्त्रीला पित्याची आठवण येणे हा बाळपणातला इडिपस गंड. तो म्हातारे होईपर्यंत सुटत नाही. प्राणप्रिय असलेल्या आपल्या अपत्याच्या बाबतीत काहीतरी अघटीत घडल्याची स्वप्ने पडणे, हे दासबोधातील दुश्चित्त लक्षणांशी खूप साधर्म्य साधणारे आहे, तेही आठवले दीर्घांक पाहताना.

दिग्दर्शक अभिजित झुंजारराव आणि रमेश वाणी, सलाम आहे ! □

अलका सुहास जोशी.

आपल्या गावचे सुपुत्र आणि ज्येष्ठ अभिनेते *रमेश वाणी* यांच्या ज्या अद्भुत प्रयोगाची सध्या नाट्यरसिकांमध्ये आणि समीक्षकांमध्ये प्रचंड वाखाणणी होत आहे, ते 'मन' काल ठाण्यात डॉ.घाणेकर नाट्यगृहात पाहिलं. एकटा माणूस - दीड पावणेदोन तास समोरच्या प्रेक्षकांना खिळवून ठेवतो,स्वतःवरून त्यांची नजर हटू देत नाही - ही जबरदस्त अनुभूती काल मी घेतली. काही एकपात्री प्रयोग मी पूर्वीही पाहिले आहेत. परंतु ते हलक्याफुलक्या विनोदी कथानकावर आधारित असणारे.. पण च.प्र.देशपांडे लिखित हे 'मन' नाटक मनाच्या विविध अवस्था दर्शवणारं आणि गंभीर प्रकृतीचं आहे. त्यामुळेच तर प्रेक्षकांना खिळवून ठेवणं अधिक कठीण काम. पण रमेश वाणी आपल्या जबरदस्त अभिनयातून आणि अफलातून ऊर्जेच्या सहाय्याने ते काम अगदी लीलया करतात. प्रयोग संपल्यावर साऱ्या प्रेक्षकांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट करून रमेश वाणी यांच्या अभिनयाला सलाम केला तेव्हा माझाही उर त्यांच्याविषयीच्या अभिमानाने भरून आला होता..

आपल्या गावाचे भूषण आहेत रमेश वाणी.. अभिनय क्षेत्रातील कोहिनुर..

- *रवींद्र पोखरकर*

वाद विकोपाला

पण सलोखा कायम !

माझ्या, ' संसाराणूपेंडघार ' या एकांकिकेचा उल्लेख केल्याबद्दल मन:पूर्वक आभार ! ही एकांकिका प्रकाश बुद्धिसागरने बसवली होती. त्या वेळी ती गाजलीही. पण नंतर पुन्हा कुणी ती केली नाही. शब्द आणि कृती यांतले अंतर -- या अजब तंत्राने लिहिलेली ती एकांकिका आहे.

Bhalchandra Kubal

.

आजच्या प्रहार मधील म्हणजे दि. २६/१०/२०२४ च्या प्रहार मधील माझा पाचवा वेद.

प्रायोगिक नाटकांचे मरण आपण पहातो आहोत...!

आला आला म्हणता म्हणता एकांकिकांचा सिझन सुरू देखिल झाला. मुंबईतील महत्त्वाच्या स्पर्धा सद्या पार पडताहेत. येत्या काही दिवसात उरल्या सुरल्या पार पडतील. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमधल्या तरुणाईचा जल्लोष प्रत्येक स्पर्धेसाठी चैतन्य निर्माण करुन देणारा ठरतोय. त्यामुळे खुल्या गटाची कळी देखिल खुलतेय. या एकांकिका स्पर्धांमधे कायम खुला गट आणि आंतरमहाविद्यालयीन अशा दोन विभागा मध्ये विभागली गेली आहे. कारण खुल्या गटातील स्पर्धक हे वयोमानाने मोठे असल्याने शिस्त आणि शिष्टाचार पाळणारे असतात. परीक्षा केंद्रावरील अविर्भावात प्रयोग सादरीकरणाच्या गंभीर वृत्तीने प्रत्येक स्पर्धेकडे पहात असतात. साधारणतः खुल्या गटाला विविध वयोगटाचे कलाकार उपलब्ध होऊ शकतात मात्र आंतरमहाविद्यालयीन विद्यार्थी गटाला वयोमानाच्या सादरीकरणाला वयोमर्यादा येतात. कारण वृद्ध अथवा बाल कलाकाराची संहितेला गरज असल्यास कॉलेजमधल्या कुणा मुला/मुलीला ती व्यक्तिरेखा साकारणं भाग असतं याउलट खुल्या गटातील एकांकिकांबद्दल म्हणता येईल. थोडक्यात आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमधल्या एकांकिका खुल्या स्पर्धेच्या तुलनेत कमी पडतात. परंतु आता महाविद्यालये आणि त्यांचे दिग्दर्शक यानी एकांकिकांचे एक "स्पर्धात्मक समीकरण" तयार केले आहे आणि आज मी त्यावरच थोडे लिहिणार आहे. गेल्या चाळीस वर्षांच्या अनुभवाचे हे एक पान म्हटले तरी चालेल.

सर्वप्रथम आपण एकांकिका म्हणजे नेमके काय हे पाहू. एका अंकात सामावलेल्या नाट्यास आपण एकांकिका म्हणतो. स्थलकालाच्या मर्यादित अवकाशात आपल्या सर्व नाट्यशक्ती एककेंद्रित करणारा; थोडक्यात उत्कट, एकसंघ व एकजिनसी परिणाम साधणारा संपूर्ण, स्वयंपूर्ण, एक अंकी नाट्यप्रकार म्हणजे एकांकिका. भरताने संस्कृत नाट्यशास्त्रात नाटकांचे दहा प्रकार सांगितले आहेत. त्यांतले भाण, उत्सृष्टिकांक, व्यायोग आणि वीथी हे चार प्रकार एकांकिकांचे आहेत. याचा अर्थ, भरताच्या काळातही ही चार प्रकारची नाटके होत असावीत. स्थल-काल व कथानकाची एकता साधणाऱ्या, प्रभावी व्यक्तिरेखा असणाऱ्या व एकसंघ स्वरूपाच्या पाच स्वयंपूर्ण एकांकिका भास या नाटककाराने लिहिल्या आहेत. पण भासाला अनुसरून नंतरच्या नाटककारांनी अशा एकांकिका लिहून एक प्रवाही परंपरा निर्माण केल्याचे आढळत नाही. त्यानंतर, भारतामधल्या ब्रिटिश राजवटीच्या काळात मुख्यत्वे संस्कृत आणि इंग्रजी वाङ्मयावरून स्फूर्ती घेऊन मराठी एकांकिका लिहिल्या गेल्या. भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या काळात मात्र हा नाट्यप्रकार मराठीत भरभराटीला आला.आज या नाट्यप्रकाराला निदान महाराष्ट्रात तरी भरपूर मागणी आहे त्यामुळे लोकप्रियतेच्या बाबतीत एकांकिका हा नाट्यप्रकार अव्वल स्थानावर आहे.

एकांकिका सुमारे अर्ध्या ते पाऊण तासाची असते. ती बहुरूपिणी असते. तिला कोणत्याही विषयाचे वावडे नसल्याने ती काव्यमय, चर्चात्मक, प्रहसनासारखी, तत्त्वचिंतनपर किंवा रहस्यकथेसारखी असू शकते. एखाद-दुसरीच मध्यवर्ती व्यक्तिरेखा, अर्थभारित आणि नाट्यगर्भ असे मोजके संवाद, तीव्र व उत्कट परिणाम साधणारे प्रसंग या सर्वांच्या साह्याने एकांकिका एकात्म परिणाम साधते. आजची मराठी एकांकिका ही एकप्रवेशी न राहता बहुप्रवेशी आणि बहुकेंद्री झाली आहे.

मराठीतील सुरुवातीच्या एकांकिका या इंग्रजी एकांकिकांचे अनुवाद आणि रूपांतरे असत. उदा० इंग्रजी 'दि सीक्रेट'चा किरातांनी केलेला 'संशयी शिपाई' हा अनुवाद; 'दि डिअर डिपार्टेड' आणि 'कमिंग थ्रू द राय' या एकांकिकांची माधव मनोहर यांनी केलेली अनुक्रमे 'आजोबांच्या मुली' आणि 'जन्मापूर्वी' ही रूपांतरे. तसेच दिवाकरांचे 'आंधळे'(मूळ इंग्रजी लेखक -मेटरलिंक) वगैरे, राम गणेश गडकऱ्यांचे 'दीड पानी नाटक' ही बहुधा अनुवादित नसलेली स्वतंत्र एकांकिका असावी. पुढील काळात अनंत काणेकर, दत्तू बांदेकर, भा.वि. वरेरकर, मो.ग.रांगणेकर, व्यंकटेश वकील, शं.बा.शास्त्री इत्यादी लेखकांच्या एकांकिकाही प्रकाशित झाल्या.

इ.स. १९५० मध्ये मुंबईतील भारतीय विद्या भवन या संस्थेने आंतरमहाविद्यालयीन एकाकिका स्पर्धा घ्यावयास सुरुवात केली, आणि मराठीत एकाकिका हा नाट्यप्रकार बहरास आला. मी मुद्दाम इथे २०२४ मधे घेतल्या जाणाऱ्या एकांकिका स्पर्धांची यादी देणार नाही कारण आजचा विषय आंतरमहाविद्यालयीन एकांकिकांचे परिवर्तन खुल्या वयोगटातील एकांकिकांमध्ये झाल्यावर त्यांचा दर्जा कमी झालेला आढळतो का ? तर त्याचे उत्तर होय असेच आहे. उदाहरण म्हणून नुकतीच झालेली अमर हिंद मंडळाची एकांकिका स्पर्धा आंतरमहाविद्यालयीन आणि खुल्या गटातील स्पर्धकांचे छान मिश्रण होते. माझ्यामते महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धांमधून हाताळल्या जाणाऱ्या विषयांबद्दल नक्कीच कौतूक आहे. भन्नाट विषयांशिवाय कदाचित का ॅलेजमधील तरुण मंडळी एकांकिका करतच नसावेत. शिवाय मा ॅब सारखे सादरीकरणाचे हत्यार फक्त महाविद्यालयीन मंडळीच वापरु शकतात. आजकाल नॅक ॲक्रेडिएशन महाविद्यालयीन श्रेणी ठरवित असल्याने सांस्कृतिक कार्यावर विशेष लक्ष पुरवले जाते, त्यासाठीचा निधी पुरवला जातो. महाविद्यालयाचे नाव कसे होईल याची जणू चढाओढच लागलेली असते आणि तेच एकांकिका स्पर्धांच्या पथ्यावर पडले आहे. खुल्या वयोगटातील स्पर्धांमधेसुद्धा आंतरमहाविद्यालयीन एकांकिकांचे वर्चस्व वाढू लागलेय. परंतू झगमगीत एकांकिकांच्या सादरीकरणाला न भुलता अगदी सर्वात पहिला जो वयोगटाचा मुद्दा मी मांडला होता, तो निकष लावल्याने अनेक महाविद्यालयीन एकांकिका अपयशही येते. त्यामानाने खुल्या गटातील हौशी मंडळी स्वतःची पदरमोड करुन, ओळखी पाळखीतल्या लेखकाची एखादी एकांकिका हौसे खातर करुन आपला नाट्यकंड शमवताना आढळतात.

मी मुद्दाम एकांकिकेची व्याख्या या लेखात नमूद केली कारण याच नाट्यप्रकाराने मराठी नाटकात वेगवेगळे इझम्स जन्माला घातले, ज्या इझम्सने प्रायोगिक रंगभूमी घडवली. स्पर्धेच्या या प्रचंड गदारोळात स्पर्धांमधून निर्माण झालेली प्रायोगिकतेची तत्त्वे सांगणाऱ्या एकांकिका मात्र आपण गमावल्या आहेत.रुईयाची संसाराणू पेंडघर, रुपारेलची जागतिक शांतता दिन साजरा, चेतनाची डिक्टेटर, ज्ञानसाधनाची अश्वत्थाची मुळे, सिडनहॅमची कर्म, जे.जे. स्कुल आर्टची चौकोनातला त्रिकोण, सिद्धार्थची प्रिय गुरुजी सारखी खरीखुरी प्रायोगिकता जपणाऱ्या एकांकिका मात्र लोपल्या आहेत. त्यांची जागा चटपटीत विषय, नेत्रदिपक सादरीकरण आणि प्रेक्षकांना गुंतवून ठेवणाऱ्या लिखाणातील वेगाने व्यापली आहे. दुर्दैवाने त्याचेच अनुकरण मिनी स्वरुपात हौशी रंगभूमीवरील रंगकर्मी करताना आढळतात. हे असेच पुढील काही वर्षे तरी नक्की सुरु रहाणार, स्पर्धात्मक नाटकच चढाओढ करत रहाणार, आणि नाटकातील प्रायोगिकता संपुष्टात येणार..! थोडक्यात आमची एकच पिढी अशी आहे जिच्या नशिबी प्रायोगिक नाटकाचा उदय, बहर आणि अस्त बघण्याचे दुर्भाग्य अनुभवायला लागणार आहे...!

भालचंद्र कुबल

स्वत:च्या कवितेचा अर्थ सांगणे वा कोणत्याही कारणाने तिचे समर्थन करणे, हे कवीने टाळावे.

तगड्या नाराजीचा माणूसच स्वपक्षाचा उमेदवार पाडण्यात यशस्वी होतो !

" हल्ली काय नाटकबिटक लिहिता की नाही ? "

" नाही -- कविता लिहिल्या अलिकडे बऱ्याच -- "

" माझ्याही माहितीत एकजण आहेत -- तेही कविता करतात -- "

" छान -- त्यांना माझा नमस्कार सांगा -- "

" काही बक्षिसं वगैरे मिळाली का तुम्हाला ? "

" विशेष नाही पण मिळाली -- त्याचा विचार नाही करायचा -- "

" आपण आपल्या पाट्या टाकत राहायचे -- "

" होय -- चला, हॅपी दिवाली ! "

हा वा तत्सम संवाद हे नेहमीच घडत असतात ! उदा ० " लिहीत राहा तुम्ही -- एक दिवशी तुम्हालाही पुलंसारखे लिहिता येईल ! "

शुभेच्छा !

“ अरे हो, बरं झालं भेटलात – त्या ‘ बकुळफुले ‘ नावाच्या दिवाळी अंकात तुमची एक कविता दिसली – हं, काय – ‘ डोंबिवलीचा शार्पनर ‘ ! – तुमची म्हणून वाचली पण कळलं नाही काहीच – काय, म्हणायचंय काय तुम्हाला त्या कवितेत ? “

“ सॉरी हं, खरं तर मी विसरून गेलोय ते – “

“ असू द्या – आपल्याला नेहमी जे वाटतं तेच नीट ओळींत मांडलं की झाली कविता -- उदा ० समता हवी, विषमता वाईट – होय की नाही ? “

“ अगदी करेक्ट आहे – हेच म्हणायचंय मला – “

“ छान – चला, दीपावलीच्या शुभेच्छा ! आणि दीपावली शुभेच्छांवर लिहिलीत की नाही एखादी कविता ? “

“ नाही हो, सुचली

अभिजात राजकारण

दिवाळी आणि निवडणुका एकत्र आल्यामुळे हे अघटित घडते आहे. उमेदवार आता, फराळ, उटणे, साबण यांबरोबरच दिवाळी अंकही मतदारांना सप्रेम भेट देणार आहेत ! पण, यात त्यांनी एक सावधगिरी बाळगणे गरजेचे

आहे. कुणाच्या तरी सांगण्यावरून ते ' मौज ' दिवाळी अंक भेट देतील आणि पस्तावायची पाळी  येईल ! प्रत्येक मतदाराला कोणती अभिजात भेट हवी आहे, ते आधी विचारून घ्यावे, हे बरे !

--- ००० ---

लिहिताना कविता ' भारी ' होण्याची इच्छा वा काळजी कवीला असता कामा नये

" काल तुम्ही आशीर्वाद घ्यायला गेला होता का ? " -- " एकदा दिलाय ना त्यांनी, पुन्हापुन्हा मागायची आपल्या संस्कृतीत पद्धत नाही ! "

सर्जक लेखन म्हणजे काय ?
त्याचा हेतू काय असतो ?

घरवापस

बराच आजारी होतो. इन्फेक्शन व लो बीपी यांचा त्रास होता. डॉ. सचिन यादव यांच्या ‘ चिंतामणी हॉस्पिटल ‘ मध्ये दिनांक ०३-११-२४ ला दाखल झालो होतो. स्वत: डॉ. यादव, डॉ. चौरे, डॉ. गांधी, डॉ. नाईक आणि त्यांचा निष्णात व कार्यक्षम स्टाफ यांच्यामुळे बरा होऊन काल १२-११ ला घरवापास आलो. आता अर्थात पुढील औषधे चालू आहेत. माहितीसाठी ही पोस्ट. भेट वा संवाद सध्या वर्ज्य आहे.
तुम्हा सर्वांच्या आस्थेची व स्नेहाची जाणीव आहेच !

--- ००० ---

गांभीर्य आणि विनोद हे वेगवेगळे कशाला असायला हवेत ? -----
तरीही
इतका बारीक आणि चपळ पक्षी
कशासाठी आहे या जगात
हा प्रश्न आला चर्चेला
देवेंद्र आणि उद्धव भेटले तेव्हा
देवेंद्रांनी उद्धवना विचारले
मे पुं रेगे कोण होते ते सांगा
उद्धव हसून म्हणाले
आम्हीही विकसित करत आणलाय
एक रोबो
जो धर्माच्या ऐवजी

समस्यांची उत्तरेच सांगतो
मग विषय आला
चंप्र कोण हा
दोघांनीही हात झटकले
आणि योगायोगाने दोघेही
मराठी समीक्षा
या चर्चासत्राला गेले
तिथे पुन्हा तो बारीक पक्षी दिसला
तेव्हा समीक्षक म्हणाले
हा पक्षी कुठेही आलेला नाहीय मराठीत
तरीही चंप्र कोण हा विचार
सगळीकडे चालूच राहिला
--- ००० ---

प्रेयसी
अरे, प्रेयसी म्हणजे काल्पनिक रे मित्रा
उगीचच माझी प्रतिमा दुरुस्त करून बिघडवू नकोस
तू तरी कुठे खरा आहेस – मला तर फक्त
तुझी सद्गुणी प्रतिमाच माहीत आहे
माझ्या आधीपासून हे विश्व होतेच
तरीही, सूर्योदयाला मी कायद्याचे पुस्तक वाचतो
बघ, दोन्ही कल्पना म्हणजेच प्रेयसी खरीच
हे झाले चालू तुझ्या मनात मला धिक्कारत
तू प्रेमाचा विषयच काढत नाहीस कुठे
तुझी प्रतिमा जपण्यासाठी सुरकुतत जातोस
प्रेयसीला असे नाही चालत – ती शोधत असते
हक्काने तिच्याकडे पाहणारा, खात्रीने बोलणारा
ती नकारही देऊ शकते – मग तूही नाद सोडावास
पण तिच्या प्रतिमेसमोर तुझी बनावट प्रतिमा नको
प्रतिमांचे खेळ खरे थोडेच असतात – फक्त ते
खरी इजा न करता सन्मानाने चालायला हवेत
तुला तुझी प्रतिमा आणि आप्तस्वकीय

यांचेच महत्त्व असेल तर ते प्रेयसीला नाही चालत

तीही तिच्या प्रतिमेचा डाव खेळतच असते

तिला धोका चालतो पण प्रतिमा खरीच लागते

--- ००० ---

काय असेल बरे माझ्याच या ओळींचा अर्थ ? ---

अर्थ व्यक्त करण्या ऐवजी

स्वातंत्र्य व्यक्त होण्याने

शब्द अभ्यासण्याचा

त्रास वाचू शकतो

०००००

आर्वीकर : खानोलकर काय विशेष साधतात?

सारंग : खानोलकर आधुनिक लेखक तर होतेच, शिवाय अत्यंत संवेदनाक्षम होते. त्यांच्या 'अजगर' या कादंबरीचा अजूनही नीटसा अर्थ आपण लावू शकलेलो नाही. कॉन्शसच्या पलीकडचं काहीतरी त्यात आहे. मराठीत असं लेखन सर्वसाधारणपणे नाही.

आर्वीकर : खानोलकरांबद्दल असंही बोललं जातं की त्यांच्या कलाकृतींमधील आशयाला पेलू शकेल अशी बौद्धिक शिस्त- कुवत त्यांच्यात नव्हती- व्यक्तिश: मला त्यांचं 'एक शून्य बाजीराव' तर ग्रेट वाटतं.

सारंग : हो, हो, खरं आहे. आजवरची सगळी युद्धं या काठीबरोबरच झाली होती. याच्यापेक्षा आणखी 'इंटेलेक्च्युअल' काय असणार? कुठल्याही मराठी लेखकानं यातलं दहा टक्केसुद्धा केलेलं नाही.

त्यांच्या लेखनामध्ये अर्थांचे अनेक स्तर (मल्टिपल लेव्हल्स) असायचे. मराठी लेखक बरेच 'कॅलक्युलेटेड' लेखन करतात. खानोलकर तसे नव्हते. म्हणूनच काही वेळेला त्यांचं लेखन समाधानकारक नसतं. कारण त्यांचा जो मोठा प्रयत्न असतो, त्याचं नीटसं लेखनांतर्गत व्यवस्थापन ते करू शकत नव्हते.

आर्वीकर : म्हणजे असं तुम्ही सुचवताय की अनेकजण ज्या वाटेनं गेलेही नाही, त्या वाटेवरचं काहीतरी खानोलकर शोधत होते?

सारंग : हो आणि बरेचदा ते त्यांनाही समजायचं नाही की यातून आपण काय साधतोय. काही अंशी हे शेक्सपियरसारखं आहे. त्यानं केलेल्या सगळ्या गोष्टी त्याला स्वतःला कळल्या नव्हत्या.

----- ' सोलेदादशी प्रदीर्घ संवाद ' -- पान २९.

' जमेल तेवढा तर्क ' या कवितासंग्रहानंतर येईल -- पुढील कवितासंग्रह ---

' माझ्या आजोबांची सही '.

मन घाबरून जातं...

मन भीत राहतं

स्पर्श करताच प्रश्न घेऊन उभं राहतं..

भूतकाळात गोठून जातं..

स्थळात राहूनही अचपळ होतं... इ....

चं प्र... आपल्याच मनाचा लचका घेऊन आपल्या पुढ्यात ठेवतात की काय असे पाहणाऱ्याला भास होतात..अगदी स्वप्न सुद्धा तीच ती पडत जातात...

तरलपणे वाजणाऱ्या वाद्याचे ध्वनी अचानक कल्लोळात परावर्तित होतात... आणि हे सगळं एकच नट रसाळपणे सहज  सांगत जातो... रेषेच्या आत बाहेर होतं....

श्री. रमेश वाणी या नटाने हे सगळे झोके कुठेही तोल न ढळू देता घेतले आहेत... गतीसाठी केलेल्या हालचाली... कळवळणारी शरीर भाषा... स्वरातील सहजता.... बोलता बोलता वयातील बदल... विषयाचं लीलया स्थित्यंतर... तेही अचूक... कमाल केलीस□

आजूबाजूला इतकी पडझड होत असताना इतक्या श्रध्देने आत्ताच्या काळात असं नाटक करणं, त्यासाठी घेतलेली मेहनत , समर्पण ठायी ठायी जाणवतं..त्यामूळे या संपूर्ण टीमला सलाम ..

डॉ विजयकुमार देशमुख मुंबई

**कॅप्सूल**

विमानप्रवासाचा अनुभव झालाय माझा

अक्कलकोट आणि शिर्डी आणि वारीही झालीय

आता काश्मीरला जाऊन सौंदर्यदृष्टी फुलवून घेणार

मग पिरांदेल्लो वाचून प्रगल्भता मिळवणार

आणि किशोरी ऐकून नादब्रम्ह

ढसाळ, सुर्वे, प्रज्ञा पवार आणि गज्वी

वाचून जरा समाजभानही वाढवणार

तसेच मला धारावीच्या झोपडपट्टीत

जगायचा अनुभव घ्यायचाय

आणि आफ्रिकेतल्या जंगलाचाही

आणि वेश्यावस्तीत काही काळ घालवल्याशिवाय

मी माणूस कसा होणार

एकजण म्हणाला

नुसते एवढे कसे पुरेल

प्रयोगशाळेत तासंतास काम करून

शोध कसे लागतात हेही बघायला हवे
तेवढ्यात एक मित्र म्हणाला
वाहतूक धंद्यासारखा धोक्याचा
आणि कष्टाचा धंदाच नाही
ते न समजता अधुरेच राहाल
लाखे म्हणाले रेल्वे
त्यात सगळे असते
गिरीश म्हणाला मराठीतल्या
विद्वानांचा वावदूकपणा हा एक मोठा प्रांत आहे
या सगळ्यांमुळे मेंदूत कोणकोणती रसायने तयार होतात हे अभ्यासून
योग्य प्रमाणांत ती ती रसायने असलेली एक कॅप्सूल काढावी
असे आता ठरले आहे –

--- ००० ---

' पाच अबसर्ड नाटके ' प्रकाशित झाले.
मराठीतले हे एक अद्वितीय म्हणावे असे पुस्तक आहे.
त्याची विक्री सुरू झालेली असून ते मागवायचे झाल्यास
लागणारी माहिती खालीलप्रमाणे आहे ---
या पुस्तकाची मूळ किंमत र.500/-- असून सवलतीची किंमत रु.350/-- ( पोसटेजसह ) अशी आहे. पैसे पाठवण्याचा तपशील खालीलप्रमाणे ---
Chandrakant Prabhakar Deshpande
HDFC BANK Saving Account No.03591000003204
IFSC : HDFC0000359
For G pay : Mahesh Deshpande mbl 9970065875 OR
UPI ID gathaent-3@okhdfcbank
Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा. धन्यवाद !

थोडक्यात अत्युत्तम ---
प्रश्न - अभिनेत्यांनी आवाजावर कोणते आणि कसे परिश्रम घ्यावेत ?
अतुल पेठे - आपली मराठी रंगभूमी ही शब्द जास्त वापरणारी आहे. अनेक लेखकांनी सक्षम आणि संवेदनशील मराठी नाटकात वापरली आहे. या भाषेची विविध रूपे आहेत, नाद आहेत आणि तालही ! गडकरी, देवल, फुले,

खाडिलकर, अत्रे, वरेरकर, रांगणेकर, तेंडुलकर, कोल्हटकर, कानेटकर, कालेलकर, एलकुंचवार, आळेकर, माडगूळकर, गो.पु., गज्वी, शफाअत, जयंत आणि संजय पवार, साठे, नाईक, श्याम मनोहर, दळवी बंधू, फणसळकर, चं. प्र., दिलीप, धर्मकीर्ती आणि आशुतोष, हिमांशू असे अनेक लेखक आणि त्यांनी विचार व्यक्त करायला वापलेली भाषा ! ( यात काही नावे अनावधानाने राहिलीही असतील)

मी ही सारी नावे मुद्दाम नमूद केली कारण आपण अभ्यासक म्हणून यांची नाटके वाचली पाहिजेत आणि मुख्य म्हणजे स्वतःशी बोलून पाहिली पाहिजेत. अनुभवावरून सांगतो, खूप मजा येते.

का वाचायची याचे दुसरे कारण असे की प्रत्येक लेखकाची भाषेची ताकद आणि मर्मस्थाने वेगवेगळी असतात. भाषेचा पोत वेगळा असतो. तो उच्चारून बघणे हाच मौखिक व्यायाम असतो. आशय पोहोचवण्याकरता भाषेची जाण नटाला असणे आवश्यक असते. भाषा कळणे आणि ती अर्थासकट उच्चारणे हे आनंददायी तर असतेच पण गायनासारखे असते. उच्चारीत शब्द सहज हवा, गायल्यासारखा !

त्याकरता नटाचा श्वास ताकदवान हवा, फुफ्फुसे बळकट हवीत (आणि ती व्यायामाने तयार होतात).

आपण बोलताना शब्द बोलतो पण अर्थ बोलतो का इकडे ध्यान द्यायला हवे. आपल्याला काय पोहोचवायचे आहे त्यानुसार वाक्यांचे खंड पाडावेत. म्हणजे अपेक्षित आघात आपोआप येतील. आपले स्वर आणि आपली व्यंजने बळकट हवीत. आपण जे बोलू ते लोकांना कानाचे द्रोण न करता नीट ऐकायला जावे. आपण आणि समोरची व्यक्ती अथवा माईक यातील अंतर याचे भान असले तर न ओरडता शब्द लखलखीत पोहोचवता येतो.

*आवाजाची तीव्रता  Volume

*आवाजाची पट्टी Pitch

*आवाजाचा पोत / गुणवत्ता Quality of voice / Timbre

या गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

आपला नैसर्गिक आवाज बदलता येत नाही. पण त्यावर व्यायाम करून तो सुसंस्कारित करता येतो.

त्याकरता रोज -

- स्वर म्हणणे
- व्यंजने म्हणणे
- आपल्या स्वरपट्टीचा शोध घेऊन सप्तक वेगवेगळ्या पट्टीत म्हणणे.
- आपल्याला आवडत्या गायकाबरोबर रेकॉर्ड लावून गाणे. ते महान गायक काय करतात आणि जे सोपे वाटते ते किती अवघड आहे हे आपोआप कळेल. 'करके देखो !'.  किशोरीताई ते किशोरकुमार यांचे अंतर्गत दर्शन होईल !
- रोज मोठ्याने वाचन करणे. यात कविता, कथा, कादंबरी, वृत्तपत्रे, अग्रलेख, बातम्या, वैचारिक / ललित वाङ्मय, निबंध, अभंग, ओव्या, म्हणी, वाक्प्रचार असावेत.
- आपण इतरही भाषा बोलण्याचा प्रयत्न करायला हवा.
- आपल्याला किमान ५०/६० कविता पाठ असायला हव्यात. त्या मुखात घोळवल्या की त्याचे वजन कळते. अंतर्गत लय कळते.
- आपण जाणीवपूर्वक इतरांचे बोलणे, व्याख्यान ऐकायला हवे. त्यांनी घेतलेले विराम आणि आघात ऐकायला हवेत.

- विविध भाषेतील गाणी ऐका.

- नाटके मोठ्या आवाजात वाचून पहा.

असो. आणि हे चारदोन दिवस नाही तर जन्मभर करा. आपण 'तपश्चर्या' हा शब्द सोयीस्कररित्या विसरलो आहोत !

सदिच्छा !

- अतुल पेठे

आता विक्रीस उपलब्ध.

पाने -- ३३३

किंमत -- रु.४५०/--

सवलतीची किंमत -- रु.३५०/- ( पोस्टेजसह )

पैसे पाठवण्यासाठी --

Chandrakant Prabhakar Deshpande

HDFC BANK Saving Account No.03591000003204

IFSC : HDFC0000359

For G pay : Mahesh Deshpande mbl 9970065875 OR

UPI ID gathaent-3@okhdfcbank

Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा.

--- ००० ---

स्फुट चिंतन

सुमारे साडेतीनशे पानांच्या कवितासंग्रहात प्रत्येक कविता संपल्यावर ते पान सोडून पुढच्या पानावर जाणे, या पद्धतीने पुस्तकाची साठ-सत्तर पाने वाढवणारी सौंदर्यदृष्टी मला अनावश्यक वाटते. तरीही, काही जागा सोडत कविता मांडल्या आहेत. जिथे कवितांना नावे लिहितानाच दिलेली नव्हती आणि त्या सलग लिहिल्या गेल्या होत्या ते सगळे तसेच ठेवले आहे. दिसणे आणि आटोपशीरपणा यांचा हा समन्वय समजावा.

आकलनाच्या प्रवाहाबरोबर जाणारी कविता अनुभवांचे वेगळेपण ठसवणारी नसते. तिच्यात अनुभवाचे नावीन्य नसून प्रवाहीपणाचेच क्षणोक्षणीचे नावीन्य असते. त्यामुळे, अशा प्रकारात शंभर कवितांना एकच कविता म्हटले तरी चालू शकते. कविता लक्षात राहणे, गुणगुणता येणे, सुखदु:खांच्या घटनांना चपखल म्हणून आठवणे, असे प्रकार इथे खूप कमी असतात. अशा कविता, व्रण, सावल्या, मूडस वा ठसे निर्माण करत नाहीत. कवितेतल्या प्रवाहाबरोबर जाण्याची जाणीव हाच तिचा आशय असतो. तिला बौद्धिक, वैचारिक वा भावनिक आशयाचे अप्रूप नसते. त्यामुळे, ही कविता वाचून काही हाताला लागणे, बोध होणे, सुखदु:खाचा अनुभव येणे, असे फारसे घडत नाही. या कवितेत कवी स्वत:चे अस्तित्व महत्त्वाचे समजून ते वापरत नसल्याने वाचकालाही स्वत:च्या अपेक्षा ओलांडण्याचे महत्त्व जाणवू शकते.

--- चंप्र.

कवितासंग्रह येत राहतील -- ते काम करता करता मध्येच काही तुम्हाला आवडावे असे ---

मराठी साहित्यात
पराभव होऊनही
स्वतःच्या मतांबद्दल फारच टची राहात
जराही वेगळे काही सहन न होणारे
लोकशाहीवादी आक्रमक होत
आणि टोले-प्रतिटोले करत
सहिष्णुतावादी विद्रोही झाले
पण एका वेगळ्या परिस्थितीत
हिंदुत्ववादी कम्युनिस्ट होत
त्यांनी सभात्याग केला आणि तरीही
आधीचे प्रादेशिक हित लक्षात घेत
जागतिक मानवी हक्क संघटनेला
त्यांनी सडेतोड उत्तर दिले
लोकशाहीत विचारसरणीपेक्षा
जनतेचे हितच महत्त्वाचे असते
हे जनता समजून होती
पण काही किरकोळ विचारवंत
बोलत राहिले चेवाचेवाने
सर्वांच्याच भूमिकांतील आंतरविरोधांबद्दल
एवढे होऊनही शुद्ध साजुक
सचोटीच्या भूमिका असणारे
जनतेपासून तुटून सेफ राहिले
मराठी साहित्यात

--- ००० ---

सहा विद्वान सत्याच्या शोधात

राज्यसभा या चॅनेलवरच्या ‘ सरोकार ‘ या कार्यक्रमात एक चर्चा ऐकली. दहा हजार चर्चा ज्या चर्चेवरून ओवाळून टाकाव्यात अशी चर्चा. या चर्चेच्या क्लिप्स जितके लोक पाहतील तितकी देशातली समज वाढेल. या चर्चेतले विद्वान खरोखरचे विद्वान होते आणि खूपच समजुतदार आणि एकमेकांचे ऐकून घेण्याची कुवत असलेले होते. सूत्रसंचालन करणाऱ्या बाईही विद्वानच होत्या. अशी चर्चा मी टीव्हीवर कधीच ऐकली नव्हती. आपापली मते नुसती गोंजारत

बसणाऱ्या सर्वांसाठीच ही एक उद्बोधक चर्चा झाली. याची क्लिप कुठे असते का ते मला माहीत नाही, पण, असल्यास इथे जरूर शेयर करावी. या चर्चेचा विषय होता --

Politics of post-truth म्हणजे उत्तर-सत्याचे राजकारण ! म्हणजे खोटेपणाचे राजकारण, समजा !

वा रे वा ! दिल खुश हुवा ! विद्वानांच्या चर्चेतून ' सत्य ' म्हणजे काय, हे कळण्याची शक्यता नव्हतीच, पण, तो विषय जो चहू बाजूंनी ढवळला गेला ते मला खूपच आवडले ! ती चर्चा ट्रंप यांचे निवडून येणे, यावर मुख्यतः केंद्रित होती, पण, मधून मधून मोदींचे सरकार निवडून येणे, यावरही बोलले जात होते. ही पूर्ण चर्चा विद्यार्थ्यांच्या एका गटासमोर चालली होती. विद्यार्थीही नम्र, एकाग्रतेने ऐकणारे आणि भारी होते ! त्यांचे प्रश्न उत्तम होते !

जमल्यास मिळवून ऐका ! ये बार बार नही होता !

नमस्कार.

'मन'

या नाटकाचा १५ वा प्रयोग

The box 2 इथे

दिनांक २५ डिसेंबर (सुट्टी)

रोजी रात्री ८ वाजता सादर करीत आहोत.

सदर प्रयोग नाटकघर आणि  Atul Pethe यांच्या पुढाकाराने सादर होत आहे.

पुणेकर मित्रहो आपण आजच आपली तारीख वार वेळ राखून ठेवा.

बाबा वर्दम थिएटर्स, कुडाळ आयोजित

कै. बाबा वर्दम स्मृती नाट्य महोत्सव २०२५

'मन' निवडले गेले आहे.

मन पुढील प्रयोग

नाटकघर पुणे आयोजित

अभिनय, कल्याण प्रस्तुत

मन

बुधवार दिनांक २५ डिसेंबर (नाताळ सुट्टी)

रात्री ८ वाजता

The box 2, पुणे

सूत्रधार अतुल पेठे

***

निलायम

ब्लू बॉक्स

कणकवली

गुरूवार दिनांक ९ जानेवारी

संध्याकाळी ७ वाजता

***

शुक्रवार दिनांक १० जानेवारी

रात्री ७ : ३० वाजता

बाबा वर्दम रंगमंच, कुडाळ हायस्कूल, कुडाळ

***

शनिवार दिनांक ११ जानेवारी

संध्याकाळी ७ वाजता

वेणूताई चव्हाण नाट्यगृह, कराड

सर्व मान्यवर आयोजकांचे ऋणी आहो

Girish Patke is with रवीन्द्र दामोदर लाखे and
3 others

मराठीतील साहित्य आणि प्रकाशन व्यवहार यांचा विचार करता दरवर्षी प्रकाशित होणारी पुस्तके काही हजारांमध्ये निश्चितच असतील. ती लिहिणारे व प्रकाशित करणारे यांच्यातील विविधांगी हितसंबंधांविषयी न बोलणेच अधिक श्रेयस्कर.

गांभीर्यपूर्वक महत्त्वाचे काही लिखाण करीत असलेल्या परंतु कोणत्याही गटातटात न मोडणाऱ्या लेखकांवर स्वतःची पुस्तके स्वतःच प्रकाशित करायला लागावीत हे एकूणच साहित्य व्यवहार वा आपली वाङ्मयीन, सांस्कृतिक प्रकृती धड नसल्याचेच द्योतक आहे. प्रकाशित झालेल्या साहित्यावर साधकबाधक चर्चा होणे, कोणत्याही विचारसरणींच्या गटातटात न अडकता सविस्तर समीक्षा होणे या बाबी आता इतिहासजमाच झाल्या असल्याची परिस्थिती आहे.

हे कोणत्या समृद्ध वाङ्मयीन विश्वाचे लक्षण आहे?

हे तर्कहीनच आहे.

असो किंवा खरंतर नसो...

या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नाटककार, कवी व आमचे मित्र चं. प्र. देशपांडे यांचे गेल्या अनेक वर्षांपासून त्यांचे साहित्य पुस्तकरूपात यावे अशी मनापासून इच्छा असणाऱ्या माझ्यासारख्या काही वाचकांच्या इच्छेला मान देऊन व एकूणच मराठीतील प्रकाशन व्यवसायातील आनंद लक्षात घेऊन त्यांनी स्वतःच पुस्तके प्रकाशित करण्यास सुरुवात केली. गेल्या वर्षभरात त्यांची नाटके, एकांकिका व कवितासंग्रह अशी अकरा पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

कोणावरही अवलंबून न राहता, मोजक्याच वाचकांना डोळ्यांसमोर ठेवून केलेली ही निश्चितच एक चांगली, आश्वासक व सकारात्मक कृती मला वाटते.

त्यांनी अगत्यपूर्वक पाठवलेला त्यांचा ताजा " जमेल तेवढा तर्क " हा कवितासंग्रह कालच मिळाला. तो सावकाश वाचणार आहेच. तूर्तास त्यातील दोन कविता खाली देतोय. त्यांतून चंप्रंच्या कवितेसंदर्भातील काही वैशिष्ट्ये निश्चितच उजागर होतील.

फक्त एकच म्हणजे ही कविता केवळ बुद्धिप्रामाण्यवादाची वा तर्काची झापडे लावून 'समजणारी' नाही. तर्काला किती महत्त्व द्यावे याबाबत संत तुकाराम महाराज म्हणतात,

तर्का नाही ठाव।

येथें रिघावया वाव।।

हे लक्षात घेतले की या संग्रहातील कवितांची निरगाठ उलगडत जाईल.

ही कविता

ना दुःख आठवणारी

ना सुख गिरवणारी

ना बियरबारच्या अंधुक प्रकाशात

चवीचवीने उदासी पिणारी

ना जग सतत आपल्या विरुद्ध

असल्याच्या सत्यात

उपरोधाने जहाल झालेली किंवा

जिला सतत बाळगावा लागतो अभिमान

सहिष्णुतेचा आणि माघारीचा अशी

किंवा जिच्या अंगावर उमटत राहते पुरळ

प्रत्येक घटनेच्या ॲलर्जीचे अशी

ही कविता आहे करणारी

निवांत

पायाच अचानक उखडून

वरच्या रचनेचा

बाजूला होणारी

000

झाडे दिसतील, सरडे दिसतील

धडाडत जाणारी मालगाडीही

जाणवेल पण

तर्क सोडल्याशिवाय

निरर्थाच्या कट्ट्यावरची

आकाशगंगा कधीच

नाही ऐकू येणार
वर्षानुवर्षे नुसत्या
अर्थपूर्ण कविता घेत राहिलात
मेंदूत आणि 'समजल्या '
असे होईपर्यंत रेटत राहिलात
तुमच्या प्रखर इच्छांचे वारू
आणि बसत गेल्या त्या कविताही
यांत्रिकपणे आपापल्या जागांत
तर्काने प्रत्येक अनुभवाची
सालटी काढून तो शिजवून
खाल्ल्याशिवाय तुम्हाला
चैन पडत नसे
उरलेले खरकटे तुम्ही
पाठ म्हणून दाखवायचात आणि
घेत राहायचात सांस्कृतिक टाळ्या
इथे मात्र दारावरूनच
मागे नका फिरू
तर्क कोसळण्याच्या उघड भीतीने
आणि आकाशगंगा झंकारण्याच्या
000

माझ्या एका कवितेतल्या ओळी --
डोळे लाल बीपी आणि मूळव्याध
यांसह तो शांततेचे स्वप्न बघतो
प्रामाणिकपणाने आणि निष्ठेने
--- ० ---

नमस्कार.
'मन'
या नाटकाचा १५ वा प्रयोग
The box 2 इथे
दिनांक २५ डिसेंबर (सुट्टी)

रोजी रात्री ८ वाजता सादर करीत आहोत.

सदर प्रयोग नाटकघर आणि Atul Pethe यांच्या पुढाकाराने सादर होत आहे.

पुणेकर मित्रहो आपण आजच आपली तारीख वार वेळ राखून ठेवा.

बाबा वर्दम थिएटर्स, कुडाळ आयोजित

कै. बाबा वर्दम स्मृती नाट्य महोत्सव २०२५

'मन' निवडले गेले आहे.

मन पुढील प्रयोग

नाटकघर पुणे आयोजित

अभिनय, कल्याण प्रस्तुत

मन

बुधवार दिनांक २५ डिसेंबर (नाताळ सुट्टी)

रात्री ८ वाजता

The box 2, पुणे

सूत्रधार अतुल पेठे

***

निलायम

ब्लू बॉक्स

कणकवली

गुरूवार दिनांक ९ जानेवारी

संध्याकाळी ७ वाजता

***

शुक्रवार दिनांक १० जानेवारी

रात्री ७ : ३० वाजता

बाबा वर्दम रंगमंच, कुडाळ हायस्कूल, कुडाळ

***

शनिवार दिनांक ११ जानेवारी

संध्याकाळी ७ वाजता

वेणूताई चव्हाण नाट्यगृह, कराड

सर्व मान्यवर आयोजकांचे ऋणी आहोत.

मनाचा सिटी स्कॅन घेऊन कणकवली,कुडाळ, कऱ्हाड, कोल्हापूर ला जातो आहोत.

रवींद्र लाखे --

जमेल तेवढा तर्क

कवितासंग्रह

कवी : चं. प्र. देशपांडे

रसिक आकर्षित होतील किंवा गुंगून जातील अशा पद्धतीची वाक्यरचना ( ज्याला आपण फ्रेजिंग म्हणू या) करणाऱ्या कविता मराठीत खूप आहेत. शाब्दिक चमत्कार किंवा शब्द चमत्कृती म्हणून या. हे वाचकांना चक्क फसवणे असं म्हणता येईल. अशाही रचना आपल्याला खूप आढळतात. कवितेच्या क्षेत्रात पाहिलं तर ज्या कविता वाचकाला गुंगी आणतात त्या कविता एक तर स्वतःच्याच कवितेच्या नकला करित असतात. मुक्तछंदात कविता लिहिली तरीसुद्धा एक मीटर साधण्याचा प्रयत्न प्रत्येक मराठी कवी करतांना दिसतो. हे मीटर केवळ शब्दयोजनेने साधले गेले तर ते उपरे ठरते किंबहुना कितीतरी वेळा ते आशयाशी फारकत घेते.

चंप्रंच्या कवितेत वरील अवलक्षणे दिसत नाहीत. कारण आशयाची म्हणून स्वतःची एक लय असते किंवा एक मीटर असते किंवा एक ध्वनीमेळ असतो जो आशयाला उभारी देतो, ते त्यांच्या कवितेत सहज साधलं जातं. अगदी प्रयत्नांशिवाय. याला कारण ते सतत करीत असलेली स्वतःच्या कवितेची मोडतोड.सवयीने निर्माण झालेल्या काव्यमय संघटनेची मोडतोड. ही मोडतोड साधली जाते कारण कवीचे व्यक्तिमत्व कंडिशन्ड नाहीये.

त्यांच्या जमेल तेवढा तर्क या नव्या कवितासंग्रहातील एक कविता नमुना म्हणून मी इथे पोस्ट करीत आहे

घटना

घटना किती सांगणार मेकअप
करून कविता वाचनाला गेलेल्या सुंदर स्वमग्न स्त्रिया
आणि सभेच्या बंदोबस्ताला
पाठवलेल्या पोलिसाने स्वतःच भाषणात गुंगून जाणे
असे तर घडतच असते
हे बघा असे घडले ते बघा
किती वाईट किती माणुसकीहीन
असे करत करत मने जात राहतात
प्रेम जिव्हाळा राग द्वेष कळवळा सहानुभूती
अपराधी भाव स्वतःला कळल्या जाणवण्याचा श्रेष्ठत्व भाव यांतून
असे घडावे आणि असे घडू नये हे समजण्याच्या समाधानाची संस्कृती विस्तारत राहते

चं. प्र. देशपांडे

जमेल तेवढा तर्क

(कविता संग्रह )

प्रकाशक : चंप्र देशपांडे

पुस्तक हवे असल्यास संपर्क : 9371005773

माझ्या पुस्तकांच्या विक्री किंमतींबाबत माहिती ---

| पुस्तकाचे नाव | प्रकाशन दिनांक | पाने | किंमत रु. | सवलतीची किंमत ( पोस्टेजसह ) |
|---|---|---|---|---|
| १. आवर्तने | | | | |
| ( कविता-आशय-आकलन ) | २०२३ | २३२ | ४५० | ३४० |
| २. चार पुरुषार्थांची चार नाटके | १०-०८-२२ | २९८ | ६०० | ४५० |
| ३. वस्तू आणि इतर | | | | |
| सहा दीर्घांक | २०-१०-२३ | ३२१ | ४०० | ३०० |
| ४. पाच ॲब्सर्ड नाटके | २५-११-२३ | ३८५ | ५०० | ३७० |
| ५. खुल्लम खुल्ला | | | | |
| ( एकांकिका संग्रह ) | २०-१२-२३ | २६७ | ४०० | ३०० |
| ६. नाणेफेक आणि | | | | |
| इतर पाच नाटके | २५-०३-२४ | ३८४ | ४०० | ३०० |
| ७. ओळख परेड | | | | |
| ( एकांकिका संग्रह ) | ०७-०६-२४ | २८६ | ४०० | ३०० |
| ८. औट घटकेचे राज्य | | | | |
| ( कवितासंग्रह ) | ०२-०८-२४ | १९८ | ३०० | २२५ |
| ९. लिफाफे | | | | |
| ( कवितासंग्रह ) | ३०-०८-२०१४ | २१९ | ३०० | २२५ |
| १०. खुल जा सिम सिम | | | | |
| ( कवितासंग्रह ) | ०७-१०-२०२४ | २८५ | ४०० | ३०० |
| ११. जमेल तेवढा तर्क | | | | |
| ( कवितासंग्रह ) | ३०-११-२०२४ | ३३३ | ४५० | ३५० |
| एकूण --- | --- | --- | ४६०० | ३४६० |

रु.३४६० चा वरील अकरा पुस्तकांचा पूर्ण संच विकत घेणाऱ्यास ‘ तंबाखूची टपरी ‘ हा जगातल्या ५८ कवींच्या काही कवितांच्या अनुसर्जनांचा कविता संग्रह मोफत मिळेल.

प्रत्येक सवलतीची किंमत पोस्टेजसह आहे.

पैसे पाठवण्यासाठी ---

Chandrakant  Prabhakar Deshpande

HDFC BANK  Saving Account  No.03591000003204

IFSC : HDFC0000359

For G pay : Mahesh  Deshpande  mbl 9970065875  OR

UPI ID  gathaent-3@okhdfcbank

Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा.

--- ००० ---

' माझ्या आजोबांची सही ' या माझ्या पुढील कवितासंग्रहाचे काम करता करता ---

चांगले वाचन

हमखास काही चांगले वाचावे

असे वाटले की मी कविता लिहितो

आणि तीच वाचतो दहा वेळा

मला आश्चर्यही वाटते --

आपले मन इतके छोटे

इतके वखवखलेले

इतके अपराधगंडाने विच्छिन्न

असूनही हे कुठून आले सगळे

निरर्थकतेचा सागर खुला करून

आपल्या मनाबाहेरचा

विसावा दाखवणारे

माझ्या भुक्कड मनाने

हे समजून घ्यायचा प्रयत्न

मी सोडून देतो

असेच हमखास चांगले वाचले जाते

--- ००० ---

परिपूर्णतेचा हव्यास एका मर्यादेनंतर सोडावा लागतो !

" मी पाच वर्षांपूर्वीच अमुक करा म्हणून सांगितले होते -- " अशा दोषारोपांचा काही उपयोग नाही -- आता काय करता येईल ते बघा.

फेक न्यूज

बर्ट्रांड रसेलचे ' लेट द पीपल थिंक ' नावाचे एक पुस्तक आहे. त्यात, मुलांना शिक्षण कसे द्यावे हे सांगताना तो म्हणतो – समजा सध्याच्या व्याख्येप्रमाणे ३० वर्षांपूर्वी जे घडले त्याला इतिहास म्हटले जाते. तर ३० वर्षांपूर्वीची वर्तमानपत्रे  घ्यायची आणि त्या वेळच्या एखाद्या घटनेवर त्यांनी कसे वेगवेगळे लिहिले होते आणि आता काळाच्या ओघात त्याकडे कसे पाहिले जात आहे -- हे दाखवायचे ! म्हणजे मुलांना आज वर्तमानपत्र कसे वाचायचे ते कळेल ! उपाय छान आहे हो, पण तरीही ' सत्य बातमी ' अशी काही कळू शकेल का ? विद्वान असो की पत्रकार असो, तो सत्याची बाजू घेणारा असल्याने ' बाजू बदलताना ' कधीच नाही दिसत – हे कसे ? की त्याच्या त्याच्या आकलनात अमुक एक बाजू हीच कायम सत्याची बाजू असते ? आणीबाणीबद्दल अजूनही मूलभूत मतभेद आहेत ! मग त्यात ' फेक ' कुणाला म्हणावे ? एखादी बातमी फिरत असली तर कुणी ' अधिक शहाणा ' येतो आणि त्या बातमीतले दडवलेले दुवे उघड करून तिचा अर्थच कसा वेगळा आहे ते दाखवतो ! अगदी एखादा माणूस मुद्दाम हेतूपूर्वक वा प्रचारासाठी असले काही करत नाही,  असे समजले तरीही त्याला काय दिसावे आणि समजावे हे त्याच्या मानसिक घडणीवरच अवलंबून असणार ! ते टोकाचे एकमेकांच्या विरोधीही असू शकणार – हे पाहायला हवे !

सारांश ' फेक न्यूज ' हे शब्द वापरताना ' खरे ' काही असते हे अध्याहृतपणे गृहीत धरले जाते – असे गृहीत धरणेच मुळात फेक असते ! पण माणसाला सत्य, निस्पृहता ही तत्त्वे अस्तित्वात आहेत या भ्रमाचा आधार असल्याशिवाय जगताच येत नाही ! त्यामुळे, आपले विरोधी लोक फेक न्यूज प्रसृत करत असतात असे सगळ्यांनाच म्हणावे लागते ! कोणत्या प्रकारच्या ' फेक ' ला लोकशाहीत पाठिंबा वाढावा याच्या योजना करण्यात जो अधिक यशस्वी होतो, तोच ' सत्य ' ठरणार ! इतरांनी त्याला ' फेक ' म्हणत रडत-ओरडत राहणे हे केवळ अरण्यरुदनच ठरणार !

हे विवेचनच फेक असेल तर कुणीही  या बाबतीतले ' सत्य ' विवेचन करावे, ही विनंती. जय हिंद, जय महाराष्ट्र !

--- ००० –

केली

रामदास फालतू होते

कारण चातुर्वर्ण्यवादी होते

गीता फालतू

कारण ती संस्कृत आहे

अष्टावक्र भुक्कड

कारण ते जनकबिनक नको

निर्वाण भंगार

कारण ते सामाजिक नाही

आणि योगवासिष्ठ टाकाऊच

कारण ते राम या हिंदूला सांगितलेय

तसेच अमुक निरर्थक

कारण अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा प्रॉब्लेम

तमुक अतिरंजित

कारण अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा प्रॉब्लेम

ते जातीय कारणांनी उदात्त

म्हणून खोटे

आपण खत्रुड असल्याने

अस्मिता म्हणून वापरावे लागणारे

सगळेच कचरा

हिंमत हरलेल्या लोकांचे टेकू

सगळे शोकात्म

आळशी लोकांचे शौर्य

आत्मघातकी

आक्रमण म्हणजे रुदन

न्याय म्हणजे शिजोफ्रेनिया

समता म्हणजे वर्चस्व

सुन लो मेरी बात ( जो निंद्य है )

गम छोड के मना लो रंग रेली

वरना खाओ केली

--- ००० ---

मालकीणबाई

मालकीणबाई बसलेल्या असतात

लगबगीने घरसेविका येते

त्यांना तिला काही सांगायचे असते

ती तडक ड्राय टेरेस गाठते

क्षणात बाहेर येते साबण घेते आणि लुप्त होते

ड्रायमध्ये आवाज येत राहतात

ती खूप घाईत असते

ते काम होताच ती स्वत:त मग्न होत घाईत

झाडू घेते इतक्या घाईत तिला डिस्टर्ब कसे करणार

खिडकीतून वर पाहिले

तर आकाशात दोन पक्षी

अगदी संथपणे घिरट्या घालताना दिसतात

ते पाहून मनाची चिडचिडच होते
तेवढ्यात ती काम संपवून
बाहेर जाऊन दार ओढूनही घेते
जे सांगायचे होते ते राहूनच जाते
मालकीणबाईंना येडे येडे वाटत राहते
उद्या आली की आधी तिला थांबवायचे
आधी इतकी घाई नको
दाखवत जाऊस हे सांगायचे
मग आज राहिलेले सांगायचे
साधे सॅनिटायजरचे सांगायचे होते
कोव्हिड पुन्हा पसरत चाललाय
या विचारात मालकीणबाई दुपारचे लवंडतात
तर मनात ते दोन पक्षी संथ
चिडचिड होत होत
त्या झोपी जाऊ पाहतात
मग थकून झोपी जातात
तेवढ्यात डोअरबेल वाजते
--- ००० ---

मते
मी मते बाळगत नाही
ती वापरतो
वेळोवेळी बदलतो
मला ती उपरी असतात
त्या त्या वेळी मी
त्यांच्या पाठींवरून
डोक्यांवरून हातही फिरवतो
त्यांच्याशी एकनिष्ठ राहणे
म्हणजे पायच तोडून घेणे
ये जानके मी त्यांच्याशी म्हणजेच
माझ्याशीही नसतो एकनिष्ठ
मते म्हणजे असते एक भीती

नसण्याची जल जानेकी
रद्दच होण्याची
ती टाळण्यासाठी
माझी मते बनतात एक संरक्षक भिंत
आणि जगाशी भांडणे वाढत वाढत
माझे असणे धोक्यात येत राहते
हे माहीत असल्याने मी जरा
फटकूनच वागतो त्यांच्याशी
कारण मते लबाड असतात
ती ठेवतात मनाला जखडून
आणि बाहेर
हक्काने मागत राहतात
त्यांच्यासाठी स्वातंत्र्य
मत माझे असो की
मला दिसणारे कोणतेही
मते म्हणजे असतात
सतत चालू असणारे अंत्यसंस्कार
आम्ही सगळेच असतो
मृत्यूच्या अंधारातले
उत्सवप्रिय आशावादी
काहींना असते पूर्ण खात्री
आणणार आहेत त्यांची मते स्वर्ग
त्यांना भेटतो त्यांचा बाप
तो म्हणतो
तुझ्यासारख्या अधार्मिकाला मारले
की मला मिळणार आहे स्वर्ग
तुझ्याशी लढताना मेलो तरीही
मतांना सतत
धारण करावे लागतात मुखवटे
संवेदनशीलतेचे
दु:खितांच्या भल्याचे
म्हणजे झाकून ठेवता येते

त्यांना त्यांची युगानुयुगांची
निरर्थक थरथर
मते असतात विभिन्न
पण एकोप्यासाठी झटणारी
ती काहीशी साशंकही असतात
एक गठ्ठा स्वप्नपूर्तीबाबत
मतांना वाटते
इतर मते आहेत फूटपाडी
कोणतीच मते तयार नसतात
नि:शस्त्र वावरायला हेर न व्हायला
तरीही बिचारी खात्रीत असतात बेसावाध
माझ्या मतांचे इतिहासभूगोल
मी कधीच अबाधित नाही धरत
त्यांचा खोटा वापर करत मजेत जगतो
त्यांना मन मानेल तेव्हा फेकून देत

--- ००० ---

नमस्कार.

नाटककार चं. प्र. देशपांडे आणि दिग्दर्शक अभिजित झुंजारराव दिग्दर्शित 'मन' हे एकपात्री नाटक पुण्यात 'द बॉक्स' ला २५ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता आहे. ते अर्थातच चुकवू नका.

चं. प्र. देशपांडे यांची अनेक नाटके गेली अनेक वर्ष आपण पाहिली आहेत. व्यक्तिशः मला विजय केंकरे दिग्दर्शित 'ढोलताशे' हे नाटक फार आवडते. पुण्यातील गणेशोत्सव मिरवणूक आणि त्या निमित्ते सुरू असणारा राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक गोंगाट यावर त्यात परखड भाष्य केले आहे. त्यांची पंडित सत्यदेव दुबे दिग्दर्शित 'नाणेफेक', चेतन दातार दिग्दर्शित 'इराक', गिरीश पतके दिग्दर्शित 'बुद्धिबळ आणि झब्बू', रवींद्र लाखे दिग्दर्शित 'समतोल' ही नाटकेही सुपरिचित आहेत. नातेसंबंध, त्यातील अनेक तात्विक प्रश्न, उलट सुलट वागणे, प्रस्थापित जगण्याला तपासणे हे त्यांचे लेखन वैशिष्ट्य आहे. त्यांनी अनुवादित केलेल्या काही जागतिक कवींच्या कविता 'तंबाखूची टपरी' या संग्रहात आहेत. तर अशा लेखकाचे 'मन' हे नाटक आहे.

*जाता जाता : आजही सतीश आळेकर, दिलीप जगताप, श्याम मनोहर, अजित दळवी, चं. प्र. देशपांडे असे सिनियर लोक नाटक लिहिते आहेत ही मराठी रंगभूमी संदर्भात मोठी गोष्ट वाटते.

आपल्या भोवती नाटकवाली मुले जमवून वेगळं नाटक करण्याची धडपड करणारे काही लोक असतात, त्यात कल्याणचा अभिजित झुंजारराव आहे. तो सातत्याने काही नवे करू पाहात आहे. त्याने दिग्दर्शित केलेले 'लेझिम

खेळणारी मुले' हे दखलपात्र होते. अभिजितने आमच्या 'मानसरंग नाट्य महोत्सवा'त 'रंगीत संगीत गोंधळ' हे मानसिक आजार असलेल्या व्यक्तींचे नाटक नेटकेपणाने सादर केले होते.

तर अशा नाटक करू पाहणाऱ्या लोकांच्या सोबत आपण असावे हा यातील आनंददायी भाग. आपले 'मन' मोकळे होते. २५ ला सायंकाळी या. नाटक सलग दीड तास आहे. सोबत पोस्टरवर माहिती आहे.

- अतुल पेठे

१५ डिसेंबर २०२४

गणित आणि झाकीरभाई !

अजब होता तो ! अत्यंत अवघड गणिते स्वतःच रचे आणि स्वतःच ती सोडवे ! लोक तोंडात बोटे घालत ! तो म्हणे, तो काळ, ते गणित आणि ते काळाचे तुकडे अनुभवत पुन्हा एकसंध होणारे गणित – सगळे मिळून एकच ते ! ! सगळे मिळून एकच ते ! तुम और हम – सबको जहां मिलना है वही वह प्युअर रिलीफका क्षण ! जिथे तुम्ही, आम्ही आणि काळ सगळेच क्षणभंगूर ! एक सत्य म्हणून ! शेवटची जुगलबंदी त्याने खुद्द काळाबरोबर केली ! पाताळ, भूलोक आणि स्वर्ग असा सर्व प्रांत ओलांडत चाललेले प्रदीर्घ आवर्तन सगळी स्टेशने सोडून देत पुढे जात राहिले ! श्वास रोखले गेले आणि एका क्षणाला टाळीचा आवाज आला ! ती त्याने काळाला दिली की काळाने त्याला, कोण जाणे ! पूर्ण विश्वाने निःश्वास टाकला ! सुखदुःख नाही ! झाकीरभाई, अब तुम नही हो और हम तुम्हारे साथ हैं ! मतलब, कला का ये अंतिम पडाव है ! यहीं पे मिलते रहेंगे ! सरताजभाई !

--- ००० ---

अनपेक्षित

ननग सैतेक

स्वल्प स्वल्प कन्नड बरतद

झळका माडिघ्येनू

उटा माडिघ्येनू

नानु होगतिनि

यल्ला छलो अद

निनग बरुदिल्ला

हिंग याक माडतिरी

कुडरी कुडरी

नानु माताडतिनी

नीनू माताड ब्याडा

ना हेळतिनि

हे असे अवशेष

माझ्या बालपणातले
ज्यांचा नक्कीच असणार
काही ना काही परिणाम
माझ्या आजच्या जगण्यावर
माझ्या स्वभावावर
तुमच्याशी माझे
पटण्या न पटण्यावर
तुम्हालाच काय
मलाही नाही कळणार
कशामुळे काय होतेय ते
ते कन्नड मित्र अजून आठवतात
आणि तो तीव्र उताराचा रस्ता
सायकलसाठी बेष्ट
आणि ती तास बावडी
प्रचंड आणि हिरवीगार
आणि शेजारीच एसटी स्टँड
मी काही अनपेक्षित वागलो तर ते
तुमच्या त्या भाषेच्या अज्ञानावर ढकला
--- ००० ---

गेला तो काळ
गेला तो काळ सहा सहा महिने
बागेत फिरत
मेलडी करत बसण्याचा
आता ढाण ढाण संगीत वाजेल
त्या बधीर हवेत
करून घ्यायचा संभोग
हो तर हो म्हण नाही तर नाही
स्त्रीची फक्त शुचिता आणि पुरुष
जातिवंत अपवित्र
असे समजून तिला
मनवत बसायचा काळ

झाला आता इतिहासजमा
हो तर हो म्हण नाही तर नाही
एक तर संख्या खूप आहे
आणि प्रत्येकच आहे प्रॉब्लेमपरिप्लुत
कुणीच नाहीय
परिपूर्ण प्रतिसाद देऊ शकेल असे
कुणीच नाहीय खास महत्त्वाचे
हो तर हो म्हण नाही तर नाही
गूळ काढत बसणे
म्हणजे काहीतरी खास
अपवादात्मक मिळवण्याचे प्रयत्न
कुणाची बालपणे कशी गेली
कुणात कशा आहेत विकृती
आणि कोण होऊ शकेल हिंसक
हे नाही माहीत
हो तर हो म्हण नाही तर नाही
विद्युत नसेल तर डीझेल बघ
तेही नसेल तर लाकडे बघ
गया सो गया चल उरक लौकर
हो तर हो म्हण नाही तर नाही
--- ००० ---

डॉ. लागू स्वतंत्रपणे मोठे होतेच पण निळूभाऊ फुले यांच्याबरोबर जोडलेले नाव म्हणूनही मराठी मनात त्यांचे एक विशेष स्थान आहे. त्यांच्या मोठेपणाची एक आठवण --
पुण्यातले मनोहर मंगल कार्यालय. दोघेतिघे मिळून निळूभाऊ फुले यांची मुलाखत घेत होते -- त्यांतले एक होते डॉ. लागू. तुडुंब भरलेल्या त्या हॉलमध्ये डॉ. लागूंनी प्रश्न विचारला -- " तुमचे ' सखाराम बाइंडर ' पाहिल्यावर मी तुमचे पाय धरले होते, ते आठवतेय का ? " निळूभाऊ नम्र स्मित करत म्हणाले, " होय। आठवतेय -- " एका एवढ्या प्रचंड यशस्वी नटाने दुसऱ्या एका तुल्यबळ नटाला असा भर सभेत मानाचा मुजरा करावा हा प्रसंग एक अत्यंत हृद्य प्रसंग म्हणून लक्षात राहिलाय !
डॉक्टरांच्या स्मृतीस अभिवादन !

मन

एक अद्वितीय एकपात्री दीर्घांक.

मराठीत विनोदी एकपात्री दीर्घांक बरेच असतात.

काही हलकेफुलके क्षण असले तरी एकूणात गंभीर असा हा दीर्घांक आहे.

लेखक चंप्र, दिग्दर्शक अभिजित आणि अभिनेता रमेश यांना तुम्ही जाणता.

पुण्यातल्या पहिल्या प्रयोगाला, नाटककार, चित्रपटकार, जाहिरातकार उपस्थित होते.

त्या सर्वांनी वाखाणलेले हे नाटक आहे.

अनेक वृत्तपत्रे आणि जाणकार प्रेक्षक आणि जानेमाने रंगकर्मी यांनी

या नाटकावर दिलखुलास अभिप्राय दिलेले आहेत.

जो प्रयोग घडणे खूप अवघड वाटत होते तो प्रयोग विजय चौगुले यांच्या भक्कम पाठिंब्याने

घडतो आहे. एवढेच नव्हे तर अनेक ठिकाणांहून त्याला मागणी येते आहे.

पुण्यातला हा आता दुसरा प्रयोग २५ डिसेंबर २०२४ ( नाताळ ) रोजी संध्याकाळी ७ वाजता

द बॉक्स हब इथे ' नाटकघर ' तर्फे आयोजित केलेला आहे.

याचे सूत्रधार आहेत आपले जानेमाने आदरणीय रंगकर्मी अतुल पेठे !

अशी नाटके, दर आठ दिवसांनी प्रयोग लागतील अशी नसतात.

दिवस, वेळ आधीपासून राखून ठेवूनच ती पाहायची असतात.

लौकरच या नाटकाचा कोकण दौरा होणार आहे.

सारांश --- जरूर बघा – ' मन '

एकपात्री नाटक ! अभिनेता रमेश वाणी याच्या कारकीर्दीतला एक विशेष टप्पा !!!

--- ००० ---

स्वप्नील चव्हाण –

*चंप्र देशपांडेंच्या वस्तू या नाटकातील एक तुकडा... सगळ्याच साहित्य जिज्ञासू लोकांनी/ कलावंतांनी अवश्य अवश्य अवश्य वाचावा असा!*

हे नाटक मिती चार कल्याण या संस्थेने २०१०/११ सालि केले असावे. मीही यात एक भूमिका करत असे.

नेहा नामक प्रेयसी, कवी असलेल्या जानन नामक आपल्या प्रियकराची अलीकडच्या साहित्य वातावरणाच्या पार्श्वभूमीवर आणि तो स्वतः कवी म्हणून जगताना तो काय आहे या एकूण परिप्रेक्ष्यात त्याची उलटतपासणी घेते असा हा प्रसंग, परंतु त्यात आलेले एकूण चिंतन हे अद्भुत आहे. महान आहे.

नेहा -

( आता जाननला उद्देशून- ) मी काही तुला क्रीमिनल म्हटलेलं नाही - तुझ्याच कवितेनं मला अलीकडं वेडं केलेलं आहे, असंही नाही म्हणत मी- कारण वेडं करायला ती काही करमणूकप्रधान किंवा स्वप्नील कविता नाही! पण माझे

पपा तुला क्रिमिनल म्हणाले ही गोष्ट- म्हणजे .. जाऊं दे! मीच तुझा छडा लावते- म्हणजे तुझ्या गुन्ह्याचा - असलाच काही गुन्हा तर।! ( जानन पोझिशन बदलून वाचत राहतो..)

मला एकच सांग, तुझ्या कवितालेखनातला सगळ्यात महत्त्वाचा भाग कोणता ? लिहिताना तुला होणारा आनंद ? तुझ्या कवितेचा तुझ्या वाचकारी होणारा संपर्क? की तुझ्यावर टीकालेख येणं? तुझ्यावर विशेषांक निघणं ? पारितोषिक मिळणं? मग काही दिवस अभिनंदनाचा वर्षाव होत राहणं ? काय ? यांतलं महत्त्वाचं काय ? ( काहीक्षण. ..)

एका समीक्षकाला तुझ्या कविता आवडायच्या, तर, त्यानं तुझ्यावर लिहिलं पाहिजे म्हणून तू त्याच्या मागे लकडा लावला होतास आणि त्याच्या घरी तू चकरा मारायचास, हे मला माहीत आहे.. पारितोषिक मिळाल्यावर, आपण खरोखरच सर्वश्रेठ आहोत हे तुझं स्वतःबद्दल चं मत अधिक पक्कं होताना मी पाहिलेलं आहे. ( थांबते, त्याच्या प्रतिसादाची वाट पाहते -) म्हणजे तुझं काहीच म्हणणं नाही यावर ? मग, याचे ज्याला जे वाटतील ते अर्थ निघाले तर चालतील? की तुझ्या कृतींबद्दल तुलाच clarity नाही असं समजायचं? बरं ते जाऊ दे! श्रेष्ठ ठरणं हे तुला महत्वाचं वाटतं की नाही ते तरी सांग. तुझ्यापेक्षा कमी दर्जाच्या माणसाला जेंव्हा युगपुरुष म्हणून मान्य करण्यात येतं तेव्हा तुला काय वाटतं ते सांग, चल। किवा, तू जेंव्हा तु एखाद्या दुसऱ्या कवींवर बोलतोस तेंव्हा तु त्यांच्यावर भाषेबाबत किंवा तांत्रिक आक्षेप घेतोस !

त्यांच्या आशया बाबत आक्षेप घ्यायची कुवत दाखवत नाहीस -- असं म्हटलं तर ? .. की आशय, भाषा, तंत्र -- सगळं एकत्रच असतं असं म्हणून तू या आरोपातून सुटका करून घेशील? बरं, तेही जाऊं दे, चल! तुझं श्रेष्ठत्व कशात आहे तेवढंच बोल, चल! ( जानन जरा घसरून, अधिक आरामात, पाय पसरून बसतो -- वाचन चालू )

जानन, हे माझं स्वगत चाललेलं नाही आहे तुझ्याशी संवाद चाललाय हा-

(इथे समोरचे मधले दार उघडत. यशोधन वाहेर येतो.)

शोधन :- वस्तूचा खरेपणा अनिवार वस्तूला मनाचे सारेच व्यवहार मनाला. ( मागे जातो. दार बंद होते.)

नेहा :- या ओळी लिहिणारा तू! तू कधी शहाणा असतोस आणि कधी वेडा - असं तर नाही? आणि तू खूप लोकप्रिय खूप मोठा कधी होणार ?, तुझ्यावर प्रेम करणारा एखादा माणूस तुला म्हणतो की तुम्ही -- लिहीत राहा, तुम्हीही विंदा व्हाल- तेव्हा तू विद्ध होतोस आणि असं म्हणणाऱ्याला विचारतोस की गदिमांना ज्ञानपीठ का मिळालं नाही याचा विचार करा आणि उत्तर सापडल्यावर मला सांगा, कधी गदिमा,कधी सुरेश भट, कधी पाडगावकर आणि कधीकधी तर खेबुडकर - असे पेच तू त्यांना घालतोस ! जरा थोडे अधिक शहाणे असले तर चित्रे, कोलटकर असे पेच घालतोस! बरेचसे नामोहरम होतात, बरेचसे अवांतर बडबड करत राहतात ! तुझं काम होतं।! पण तुला काय म्हणायचंय? ते म्हण ना स्पष्टपणे ! तुझी कविता मुळातल्या प्रश्नांना हात घालते रे मग तू असल्या फंदात का पडतोस ? तू लोकप्रिय का होऊ शकत नाहीस हे तुला माहीत नाही ? तरीही लोकप्रियतेचे सगळे मार्ग मान्य असल्यासारखा का वागतोस ? देशभक्ती किंवा गरिबांची कणव किंवा अन्यायग्रस्तांची बाजू घेणं असं काही प्रदर्शन असल्याशिवाय ज्ञानपीठ मिळत नसतं -हे तू का सांगत बसतोस ? आणि प्रदर्शन हा तुझा शब्द झाला- कणव खरी नसते ? आणि जर त्या गोष्टी खऱ्याही असू शकत असतील तर त्या महत्वाच्या नाहीत? देशभक्ती महत्वाची नाही? काही क्रांतीकारकांनी

मृत्यू पत्करून मिळवलेल्या स्वातंत्र्याच्या वातावरणाचा फायदा घेऊन तृ त्यांच्याच विरुध्द कसा काय बोलू शकशील? आणि ज्याला श्रेष्ठ होण्यात इंटरेस्ट आहे तो देशभक्ती कशी काय कमी दर्जाची लेखू शकेल ?

..तुझ्या कवितेपेक्षा जरा जास्तच अर्थपूर्ण समजा मी बोलले तर चालेल ना ?..यावर तू काय म्हणतोस ते मला माहीत आहे- महत्वाकांक्षा खरी असते - सूडभावना खरीच असते जातीचा, धर्मांचा अभिमानही खराच असतो! नुसतं खरं असून उपयोग काय ? होय की नाही ? मला उलट तुझीच कणव येते तुला पडणाऱ्या खऱ्या प्रश्नांत लोक इंटरेस्ट घेत नाहीत म्हणून तू लोकांना महत्वाच्या वाटणाऱ्या गोप्टीना बळी पडतोस !.पटतंय का ?

तुला हिंदी फिल्मचं ग्लॅमरही हवंय का? अमिताभसारखा तुझा पुतळा बसवायचाय इंग्लंडच्या म्युझियम मध्ये? बरं, ते जाऊ दे-- कलेच्या क्षेत्रात अकल्पनीय उंची गाठणे हा निकष घेऊन अमिताभ आणि आरती प्रभू यांची कशी तुलना होऊ शकेल? कोण अधिक उंच ?.. बर, जरा थोडं सैलसर बोलू का ? अभिताभनं भारतातल्या पिढ्या घडवल्या आणि पुलंनी महाराष्ट्रातल्या पिढ्या घडवल्या ! -- हे वाक्य घेऊ! यात पुलं जरा अमिताभ पेक्षा लहान ठरतात का? आणि एकूणातच महाराष्ट्र तर मागेच पडत चाललेला दिसतो आणि बाकीच्या भारताने उलट महाराष्ट्रही काबीज करत नेला आहे असंच दिसतं - तर कोण श्रेष्ठ?? अमिताभ की पुल?

(जानन पुस्तक मांडीवर ठेवतो आणि अधिकच रिलॅक्सड बसतो.) तुझं लक्ष आहे नं ?..अभिताभनं काय दगडं इथल्या पिढ्या घडवल्या ? कायदा हातात घेऊन इथं कितपत दुष्टांच निर्दालन झालं? दुष्टाला धड दुष्ट म्हणायची सोय नाही इथे!

उलट अमिताभनं इथल्या माणसांना पंक्चर केलं! दुष्टांचा पाडाव होतो या खोट्या धुंदीत ठेवलं त्यानं त्यांना! नुसता स्वत: यशस्वी होत बसला! त्याची कुवत असामान्य। पण कसली कुवत? कशासाठी वापरली?

चिनी अंकशास्त्रा प्रमाणं अमिताभच्या जन्मतारखेवरून त्याच्या जगण्याचा अर्थ असा दिसतो की पैशाचा अतिरेकी लोभी आणि पैसा हेच सर्वस्व मानणारा! ते चिनी शास्त्र शास्त्र आहे की नाही हा प्रश्नही विचाराच पण त्यावरून येणारा निष्कर्ष बरोबर की चूक हेही विचारायला नको ?..ऊफ्!! देवा! मी देवा म्हटलं म्हणजे मला देव ही काय चीज आहे हे माहीत आहे असं नाही हं! एक आपली बोलण्यातली सवय।! ही सवयही टाळली जावी अशी दुसऱ्या कुठल्या विचारसरणीची सवय मला नाही एवढाच त्याचा अर्थ ! त्यामुळे, मी तुला हेच विचारतेय की तुझी कविता हा तुझ्या सवयीचा 'परिणाम आहे का? फार तर वेगळी असेल तुझी सवय! सगळयांचीच मनं ही वेगवेगळीच असतात, तुझं जरा जास्तच वेगळें असं समजू! बास? खुश? त्यामुळंच तर तू एक सर्जक माणूस ठरत नाहीस? बहुसंख्य लोकांचा सवयींपेक्षा वेगळ्याच सवयींनी युक्त माणृ्स म्हणजेच् तर सर्जक माणूस नव्हे? मला तर तुमच्या प्रतिमा, भाषा, शब्दसंपत्ती, तंत्रावरची पकड - सगळंच आदरणीय वाटतं, पण, शिवाय, हे प्रश्नही पडतात! करू काय ! तू झोपलायस की काय ? तू माणसाच्या एकूण जगण्याला महत्व देणारा माणूस असूनही या सगळया प्रश्नांच्या कचाट्यात तू सापडतोस -असं् जर मी म्हटलं तर तू काय म्हणशील ?

जानन:- तुझं बरोबर आहे पण माझं तुझ्यावर प्रेम आहे हीच पार्श्वभूमी ठेव!! (जानन पुन्हा वाचन सुरू करतो..)

नेहा:- तुझं एक उत्तर मला माहीत आहे - मागणी तसा पुरठा करणारे ते व्यावसायिक आणि स्वतःच्या जगण्यातून लिहिणारे ते सर्जक! ( काही क्षणांनी--) खुप वाचावं लागतं? खूप कष्ट करावे लागतात? खूप कवीवर मतं देता यावी लागतात? राजकारण, अर्थकारण समजावं लागतं ? ज्या गोष्टीत आर्थिक फायदा नाही ती उपयोगी का समजावी ? -

या प्रश्नाचं उत्तर देता आलं नाही तर ? तर काय ? ( वयस्कर आवाजात -) तू म्हणायचास या सगळ्या प्रश्नांनी तुला त्रास होतो - तुझा छळच झाल्यासारखं तुला वाटतं ! -तुला असल्या वैचारिक कसरतींची गरज नाही तू एक उत्स्फूर्ततेच्या मार्गानं जाणारा कवी आहेस - तत्वांपेक्षा तुला भावनाच महत्वाची वाटते -- आणि कलेत भावनाच महत्वाची असते ! -- याला तू अमिताभचंच उदाहरण द्यायचास -. त्याच्या अभिनयातल्या भावनिक तीव्रतेमुळंच तर त्याच्या पिक्चरमधले तद्दन खोटे प्रसंगही खरे वाटतात !. जसे राग, लोभ तशी तुझी कविता असं तू म्हणायचास।!
तुला काही गंभीर प्रश्न पडायचे पण तरीही तू त्या उत्स्फूर्ततेच्याच मार्गाचा आधार पसंत करायचास ! ही काय भानगड होती रे? ही कसली टाळाटाळ होती ? तू कशाला घाबरत होतास? तुझ्या कवितेतलं नावीन्य तुझ्या वाचकांनी त्यांच्यां सवयींमध्ये बसवून टाकायला तुझी परवानगी होती -- असाच याचा अर्थ ना ? आणि तरीही तुला लोकप्रियता कमीच लाभली! काय असावी याची कारणं ? तुझ्या बोलण्यात मधेच वर येणारा तुझा फटकळपणा ? की दुसऱ्यांनाही आपण चांगलं म्हणावं,आपणही त्यांच्याकडून चांगलं म्हणवून घ्यावं - हे तुला जमलं नाही ? तू श्रेष्ठ असल्याची तुझी भावना तुला दडवून ठेवता आली नाही, हेच खरं ! त्यामुळं श्रेष्ठ मंडळींच्या यादीतनं लोकांनी तुला वगळूनच टाकलं! ही नियती !
( तो पुस्तक ठेवतो, डोक्यापाठीमागे दोन्ही हात पकडून बसून राहतो. नेहा आता तिच्या नॉर्मल आवाजात बोलते-)
नेहा:- कविता चांगल्याच आहेत तुझ्या पण तुला माणसं संभाळणं जमलं नाही. तू माणसांशी तुटकपणे वागणार, ज्याच्या त्याच्या मर्यादा सांगणार.. आणि लोकांनी तरीही तुझा उदो उदो करावा -- हे कसं घडणार ? लाख तुझ्या कविता चांगल्या असतील पण त्यांच्यावर भाषणं, चर्चा करायला आणि त्या ऐकायला लोक जमायला हवेत ना? आता तर, एके काळचे तुझे मित्रही तुझ्याबद्दल कुठे काही बोलत नाहीत! तुझा उल्लेखही करत नाहीत,
तुझं म्हणणं काय तर समीक्षा संबंधित कलावंत रॅपो कसा ठेवतो याच्यावर अवलंबून असणं चुकीचं आहे ! मराठीत लिहितोयस ना तू! मग ही असली अपेक्ष कशी चालेल ? इथे सगळ्यांनी आपापले ग्रुप्स केले आणि एकमेकांच्या टिमक्या वाजवायची सोय केली, त्यातून मग पॉवर पॉलिटिक्स प्रमाणे एकदोन्
एकदोन गृप्समध्ये समझोते करून आणखी अधिक गाजणंही काहींना जमलं! हे वाईट आहे असं म्हणू नकोस तही काही काळ हे करून पाहिलेलं आहेस' थोडफार जमलंही तुला ते! पण यात आपलं श्रेष्ठत्व सोडून वागावं लागतं हे तुझ्या लक्षात आलं। शिवाय आणखीही एक प्रॉब्लेम होता --तू ज्या टोळीत गेलास ते सगळे समाजवादी टाईप लोक होते! कविता प्युर सुखदु खाच्या रचना पाहणाऱ्या, चिंतनशील प्रकारच्या लिहायच्या आणि त्यांचा गवगवा समाजवाद्यांकडून करून घ्यायचा। हेही विचित्रच होत होतं! आणि ओंगळही। बरं तुझ्याच प्रकारचं लिहीणाऱ्यांची अशी एखादी प्रभावी टोळी
नव्हती की बाबा तिच्यात सामील व्हावं ! आता तू असं म्हणायला लागला आहेस की समकालीन लोक कधीच एकमेकांना न्याय देऊ शकत नाहीत ! हॉपकिन्स सारखा कवी किंवा मेटॅफिजिकल कवी कसे जगाला त्यांच्या मृत्यनंतर समजले किंवा खरे समजले! - हेही सारखं तुझ्या बोलण्यात येत असतं! तू त्या टोळीत सामील झाला होतास तेंव्हा मात्र तुझी मतं वेगळी होती। माझ्या नंतरच्या काळात माझं लेखन लोकांपर्यंत नीट पोचणं आणि तसली आशा बाळगणं मला नको आहे --मी आज लिहितो आहे ना,
मग आज आणि आत्ताच काय ते घडायला हवं! आणि काय ते घडायला हवं म्हणताना तुझ्या मनात

काय होतं ते मी सांगते - सगळ्यांनी तुला युगपुरुष म्हणून मान्य करणं -- तसं जाहीर करणं -- आणि तेच नेहमी बोलत राहणं! ( काहीक्षण.)
तुझ्यामाझ्या वयात अंतर जरा जास्त आहे पण असे
मोठे मोठे गोंधळ डोक्यात घेऊन तू जगतोस म्हणूनच मला आवडतोस! पपा तुला क्रिमिनल म्हणतात! खरंही आहे ते! तुझ्यात इंटेग्रिटी नाही ! उत्तम कविता लिहिणं आणि तिचा वाचकांशी संपर्क होणं याव्यतिरिक्त असल्या बाहेरच्या गोष्टींचा भिकारडेपणा का असावा तुझ्यात ?

रवीन्द्र दामोदर लाखे
हे नाटक आणि हे दृष्य उभं कसं राहिलं त्याविषयी बोल - हे नाटक म्हणजे दिग्दर्शक म्हणून माझ्या काळजाचा तुकडा आहे

लौकरच उपलब्ध होत आहे माझा एक ३८६ पानांचा जंबो कवितासंग्रह --
' माझ्या आजोबांची सही ' -----

ही कविता कधी का लिहिलेली असे ना --
आहे मात्र अमर ---
बरोबर
कुणाही दोघांत संघर्ष झाला
की दोघेही बरोबर असतात
मग न्यायालय काहीही देवो निकाल
हे एक साधे सत्य न कळल्यामुळे
भलत्याच रस्त्याला गेलेल्या मधमाशा
परत आल्याच नाहीत त्यांच्या आवाजांकडे
डोळे लावून बसलेल्या मुंग्या
कंटाळल्या शेवटी थकल्या
निराश झाल्या
त्यांची अवस्था पाहून ओशाळलेले
दिवे मंद होत गेले जणू
त्यांनाही नकळत
त्यांचे डोळे कोरडे पडले होते
ही शांतता म्हणजे जणू
मृत्यूपूर्वीचे ढगच

असे समजून सर्वच उंदीर
आपापल्या बिळांत गेले
इतक्या वर्षांचा त्यांचा व्यासंग
मातीमोल ठरला होता
--- ००० ---

बघा बाबा -- हा मजकूर इथे देतोय तर कविता म्हणून ---
आरोप
अहिंसकावर हिंसेचे आरोप
धार्मिकावर अधर्माचे आरोप
डाव्यावर श्रीमंतीचे आरोप
गरिबावर उद्धटपणाचे आरोप
प्रेमिकावर प्रतारणेचे
देशभक्तावर हेरगिरीचे
चालकावर बुडवण्याचे
पोशिंद्यावर शोषणाचे
त्यागावर भोगाचे
राजकारण्यावर
भूमिका नसण्याचे
प्रामाणिकावर
आत्मकेंद्रितपणाचे
कवीवर
संवेदनहीनतेचे
जातिअंतवाल्यावर
जातीयतेचे
समतावाद्यावर
अस्मितेचे
असे आरोपच आरोप
पण सगळेच
सत्य म्हणून निर्दोष
निर्दोषांवर दोषांचे आरोप
सज्जनावर दुर्जनपणाचे

शुचिर्भूतांवर भ्रष्टाचाराचे

ब्रम्हचाऱ्यावर लैंगिकतेचे

सत्यावर असत्याचे दुसरे काय

--- ००० ---

अत्यानंद !!!

मी, माझा पक्ष, माझी भूमिका या गोष्टींचे विषारी प्रदूषण करणारेच फक्त या महाराष्ट्रात आहेत की काय असे वाटत असताना एक अत्यानंदाची बातमी आली आहे ! पुण्याच्या लोहगाव आंतरराष्ट्रीय विमानतळाला संत तुकाराम महाराजांचे नाव दिले जाते आहे. स्वभाव, मते आणि भूमिका द्या फेकून असे दोन ओळींत सांगणारा तुकाराम हा आपला अलिकडचा खरा संस्कृतिनिर्माता ! सध्याच्या वातावरणात हे नाव देण्याचे कुणाला तरी सुचावे आणि इतर राजकीय नावे बाजूला ठेवायची मराठी जनांची तयारी व्हावी, हे म्हणजे महाराष्ट्राचे दैव ‘ उजळल्या दिशा ‘ या मार्गाने जाऊ लागल्याचे लक्षण आहे. विषारी प्रदूषण करणाऱ्या सर्वांना तुकाराम ‘ पंडित जन ‘ म्हणतो. त्यात प्रामुख्याने सगळे राजकारणी आणि त्यांचे अनुयायी आले. तुकाराम म्हणतो, “ अहो पंडित जन । तुका टाकावा थुंकोन ।। “
तुका म्हणजे तुमचे आमचे सर्वांचे आक्रमक व्यक्तिमत्व !
या निमित्ताने तुकारामांची कविता ( होय, कविताच ! ) वाचायची बुद्धी काहींना होईल आणि आपली विमाने प्रदूषणविरहित आकाशात विहरू लागतील असे वाटते !
जय हिंद, जय महाराष्ट्र !

--- ००० ---

अध्यात्म

कसली कोडी कसले उखाणे

कसल्या भेंड्या कसली गाणी

कसले जप कसले भूलभुलैयाचे राजवाडे

कसली कर्मकांडे कसला सराव

भावना विचार यांची कसली ही डिझाईन्स

हरवलेल्या क्षणांचे

कसले हे म्यूझियम्स

फुटलेले फोड वाहत्या जखमा

खपल्या उत्तेजक सजावटीच्या पताका

सामान सगळे हेच बाळगत

आस्तिक वा नास्तिक असणारे मासे

मांसाहारी असोत की शाकाहारी

सापडलेय आपल्याला
अंधारात जगण्याचे रहस्य
म्हणून आत्मविश्वासाने
व्यसनाधीन होत राहतात
निसर्गप्रेमाच्या
हीच माणसे
देतील ब्लू प्रिंट
निळ्या आभाळाखाली
सर्व व्यवस्था बदलून
त्यांच्या आजोबांच्या नावाने
उभारण्याची उद्यान
जिथे मुतारीची संकल्पना असेल
एका धर्मनिरपेक्ष नगरसेवकाची
हे सगळे एकमेकांचे शत्रू असले तरी
अंतरपाट धरतील कुणाच्याही लग्नात
फक्त काहींच्या डोक्यांत जाळ जाईल
ते संस्कृत मंत्र ऐकून
पण ते दाखवणार नाहीत
सर्वांना माफ करत
जसे सर्वच फूटपाडे सत्ताधारी
करत असतात दुर्लक्ष त्यांच्याकडे
एकाकी होणे उदास वाटणे
भीती वाटणे काळजी वाटणे
अजून सगळेच अर्धवट असल्याचे
असमाधान वाटणे
हे सगळ्यांचे सारखेच असते चालू
पण स्वाभिमानापोटी
हे काहीच नसल्याप्रमाणे
ते दाखवत राहतात परकेपणा
आपापल्या सिगरेटींची वलये
अधिक सुंदर समजत
पाठांतर असेल वेगवेगळे

पण म्हणून आपण
कायम दुरावलेलेच राहणार का
हा प्रश्नही एकत्र पाहायचा तर
उगीचच ते कमीपणा घेणे होईल
अवलंबून असणे होईल
गरज नसताना
म्हणून ते सुप्रभात म्हणून
निघून जातात बागेबाहेर
खरे तर हेही समजत असते
मनांचे वेगवेगळे तुकडे असलेले आपण
एकत्रितपणे काहीच नाही पाहू शकणार
आपापले किल्ले आपणच फोडावे लागतील
याच बिंदूवर लागणार असतो कस
सर्वच त्यात माहीर असतात
काही म्हणतात अध्यात्माची काही गरज नाही
काही म्हणतात अध्यात्माशिवाय जगणे
म्हणजे नुसत्याच उलट्या होत राहणे
तरीही सगळे पळतात मात्र एकाच दिशेने
--- ००० ---

चळवळी
साठोत्तरी कवितेला
हात नव्हते
नव्वदोत्तरीत तिला
हात फुटले पण
मेंदू थोडा सडला
एकविसाव्या शतकात
तिला डोहाळे लागले
जागतिक होण्याचे
पण तिचे सांडपाणी
तुंबून राहिले
जानेवारीच्या

सातव्याच दिवसात

तोवर वाचणारे निम्मे

गेले वर

आणि निम्मे अडकले

सलूनच्या खुर्च्यांवर

मग हे सगळे

आले भाषेवर

ही भाषाच अशी घडली होती

की झोपडपट्ट्या वाढत होत्या

आणि निर्वासितांचे घोळके

साठत होते मनामनात

कवींचे कळप

शोधत राहिले मार्ग

एकटे राहून

चिंतन करण्याचे

आणि चळवळी थंडावत गेल्या

याचे अपश्रेय कवींचेच की काय

--- ००० ---

रोगाची भूमी

आज दिनांक २१-१२-२४ च्या MYFA ( Make Yourself Fit Again ) या आरोग्य पुरवणीत डॉ. मृण्मयी मांगले  यांचा एक छोटासाच पण महत्त्वाचा लेख आलेला आहे. या बाई एम बी बी एस असून वारंवार उद्भवणाऱ्या ( Chronic ) आजारांच्या विशेषज्ञ आहेत. त्यांचा हा लेख अर्थातच वैज्ञानिक संशोधनावर आधारित आहे. लेखाचे शीर्षक – ‘ मी ‘ पणाचा त्याग – हे जुनाट वाटले तरी यातली माहिती ही धार्मिक वा आध्यात्मिक अंगाने दिलेली नाही. “ मी अनेक लोकांना केवळ त्यांच्या स्वभावामुळे गंभीर आजारांना बळी पडताना पाहिलेले आहे “ असे त्या म्हणतात. त्या लेखाच्या मजकूरावरून उदाहरणार्थ क्रोध या भावनेमुळे शरीरात वाईट रसायने स्रवतात तर प्रेम, करुणा यांमुळे हितकारक रसायने स्रवतात. रागावू नका, फक्त एक उदाहरण घेतोय – व्यवस्था किडलेली आहे, ती बदलायला हवी अशा सतत संतप्त भावनेत जगणारे काही लोक दिसतात. हे लोक प्रेमकविता वा निसर्ग कविता असे फारसे लिहीत वा वाचत नाहीत. याचा अर्थ ते जनहितासाठी स्वत:ला रोगांची भूमी करायला तयार असतात, असा घ्यावा का ? अशी आणखीही अनेक उदाहरणे असू शकतील . बरे, क्रोध न बाळगावा तर वाईट शक्तींचे फावणार ! काय, करावे काय ?

--- ००० ---

एकाने विचारले --

काहीतरी अगम्य लिहून कविता म्हणायचे का?

मी उत्तर दिले --

नका म्हणू -- आता हे वाक्य बघा १९८२ साली वारलेल्या कवीचे ---

A poem should not mean but be.

Archibald MacLeish

( याचा थोडा सैल अनुवाद -- कवितेने अर्थपूर्ण असू नये -- तिने ' असावे ' . )

आता याला जगात मान्यता आहे, पण, मराठीत हे पचनी पडायला सुमारे ३०० ते ५०० वर्षे लागतील ! तोवर मराठी भाषेचेच काही खरे नाही, असे डॉ. सुधीर रसाळ म्हणताहेत ! करावे काय ?

ज्येष्ठ रंगकर्मी कै. पंडित सत्यदेव दुबे यांच्या स्मृती दिना निमित्त

'मन'

आज पुण्यात     प्रयोग क्रमांक १५

निस्सीम एझिकिएल

या विचारवंत कवीची जन्मशताब्दी १६ डिसेंबरला सुरू झाली. ते भारतीय पर्यावरणातले इंग्रजी कवी होते. १९५२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या पहिल्या कवितासंग्रहाचे नाव ‘ टाइम टु चेंज ‘ असे होते. त्या संग्रहाने त्यांनी गद्यप्राय मुक्तछंदाला प्रतिष्ठा मिळवून दिली असे डॉ. गजानन मालोकार, त्यांच्या आज दि. २६-१२-२४ च्या पुणे मटा मध्ये आलेल्या लेखात म्हणतात. मराठीत अजूनही हा विषय अत्यंत गांभीर्याने चघळण्याचा आहे, हे आपण पाहातोच. याच विषयावर एझिकिएल यांचा १९७१ च्या ‘ स्पॅन ‘ मासिकात ‘ अमेरिकन पोएट्री इन द सिक्स्टीज ‘ हा एक लेख आलेला होता – ज्याचा उल्लेख मी माझ्या, ‘ कवितेतील अ-भाव ‘ या सत्यकथेत आलेल्या लेखात केला होता. पुण्यात त्यांचे, ‘ ॲब्सर्ड ड्रामा ‘ या विषयावर झालेले व्याख्यान मी ऐकले होते. त्यातले अत्यंत महत्त्वाचे, माझ्या लक्षात राहिलेले वाक्य होते, ‘ देअर इज नो मेसेज ! ‘ ॲब्सर्ड नाटके कोणताही संदेश वा बोध देत नाहीत – हा मुद्दा त्यांनी मांडला होता.

त्यांच्या स्मृतीस अभिवादन !

--- ००० ---

आता विक्रीसाठी उपलब्ध --

माझ्या आजोबांची सही

( कवितासंग्रह )

पाने -- ३८६

किंमत -- रु. ४५०/ -- फक्त

सवलतीची किंमत रु. ३४० / -- ( पोसटेजसह )

पैसे पाठवण्यासाठी ---

Chandrakant Prabhakar Deshpande

HDFC BANK Saving Account No.03591000003204

IFSC : HDFC0000359

For G pay : Mahesh Deshpande mbl 9970065875 OR

UPI ID gathaent-3@okhdfcbank

Payment ट्रान्सफर केल्यावर येणारा UTR कोड आणि पत्ता 9970065875 ह्या नंबर वर पाठवावा.

--- ००० ---

**३१-१२-२४.**